१९२९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
नं. ४२२

ॐ

सदृश पवित्रमिह विद्यते।

REFBK-0001917

# कौन्ट टॉलस्टॉय.

## ( चतुर्थ खण्ड. )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०९१७
REFBK-0001917

प्रकाशक:
प्रभाकर श्रीपत भसे,
स. –आ. गो. ग्रंथमाला,
गिरगांव–मुंबई.

१९२१.

मुद्रक:
प. रा. गोखळेकर,
जगद्धितेच्छु प्रेस,
५०७ शनवार, पुणें.

भारत-गौरव-ग्रंथमाला–पुष्प सदतिसावें.

# कौन्ट टॉलस्टॉय.

## ( चतुर्थ खण्ड. )



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

—भगवान् श्रीकृष्ण.

१९२१.

( सर्व हक्क स्वाधीन. )

साधी प्रत एक रुपया.]

[कापडी प्रत दीड रुपया.

PUBLISHER:

P. S. BHASE,

*Manager,*

BHARAT GOURAV GRANTH MALA,

Girgaon, Bombay.

Printed by

Keshav Ravaji Gondhalekar

at his

*JAGADHITECHHU PRESS*

507 Shanwar Peth, Poona.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भगवान् श्रीकृष्णकृपेनें भारत–गौरव–ग्रंथमालेचें हें नवीन पुस्तक तयार झालें असून तें आम्ही आश्रयदात्यांच्या हातीं प्रेमपूर्वक देत आहों. या पुस्तकाच्या प्रकाशनास फार वेळ झाला, ही गोष्ट कबूल केली पाहिजे. आमचे सदय अंतःकरणाचे आश्रयदाते याबद्दल ग्रंथमालेस क्षमा करतील असा भरंवसा आहे. हा उशीर छापखान्याच्या कृपेनें झाला असो कीं अन्य कांहीं कारणामुळें झाला असो; परंतु त्यामुळें ग्रंथमालेचें नुकसान इतकें झालें कीं, वाटेल ती व्यवस्था करून ही उशीराची सबब काढून टाकल्या-वांचून आम्हास स्वस्थ बसवेना व त्याप्रमाणें प्रयत्न करीत असतां हा प्रयत्न बऱ्याच यशस्वी रीतीनें सिद्धीस गेला, हें कळविण्यास आम्हास आनंद वाटतो. नेहमीं उशीर हा व्हावयाचाच आणि आम्ही आश्रयदात्यांची क्षमा मागून मोकळें व्हावयाचें, असाच क्रम इतके दिवस चालला होता; परंतु आतां यापुढें असा उशीर होणार नाहीं अशी आम्हास पुष्कळ आशा उत्पन्न झाली आहे. झाला हा उशीर पुष्कळच झाला, हें खरें; तथापि झालेला हा उशीर वाढत्या किंमतीच्या दृष्टीनें कित्येक आश्रयदात्यांना थोडासा सोयीचाच झाला, असें म्हणतां येईल. आज सहा महिन्यांच्या अवधींत हीं दोन पुस्तकें आश्रयदात्यांच्या हातीं पडल्यामुळें तेवढ्या किंमतीची व्यवस्था करण्यासहि आमच्या कांहीं आश्रयदात्यांना सोयीचें गेलें असेल. तसेंच दोन पुस्तकें एकाच वेळीं हातीं पडल्यामुळें जवळ जवळ तीन महिन्यांनीं एक पुस्तक मिळाल्यासारखेंच आहे.

ग्रंथमालेस केवळ उशिराचीच अडचण आहे, असें नाहीं; तर दुसऱ्याहि अनेक अडचणी आहेत व त्या दूर करण्याचा प्रयत्नहि इतके दिवस चालला होता; परंतु या वेळेस इतका बेसुमार उशीर झाला कीं, ग्रंथ-मालेच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडल्यासारखें होऊन ग्रंथमाळेस तायतोब उद्योगास लागावें लागलें. अशा वेळीं आम्ही निरुत्साह होऊं नये म्हणूनच कीं काय कोण जाणें आश्रयदात्यांकडून नाना प्रकारच्या

तकरारींचीं पण उत्साहजनक अशीं पत्रावर पत्रें येत होतीं. वाङ्मयाच्या दृष्टीनें सगळ्या महाराष्ट्रास भारत–गौरव–ग्रंथमाला हें एकच आशेचें स्थळ असल्यामुळें केवळ आश्रयदात्यांकडूनच ग्रंथमालेस सूचना येतात असें नाहीं, तर ज्यांचा तसाच अधिकार आहे, अशा विद्वानांकडूनहि ग्रंथमालेस अनेक सूचना सद्धेतूनें व फार काळजीपूर्वक होतात. तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करून सगळयांच्या इच्छेप्रमाणें या सूचना शक्य तितक्या अंमलांत आणण्याचें आम्ही ठरविलें आहे.

काळ किती झपाट्यानें बदलत आहे, हें सर्वांच्या डोळ्यांसमोर आहेच. तेव्हां त्या दृष्टीनें ग्रंथमालेच्या पुस्तकांत विविधता व उपयुक्तता वाढावयास पाहिजे, अशा अर्थाच्या सूचना पुष्कळांकडून आलेल्या आहेत. वस्तुतः या गोष्टीकडे आमचेंहि लक्ष असल्यामुळें आमचा यथाशक्ति प्रयत्न चाल-लेला होताच. महाराष्ट्रांत नांव घेण्यासारखी अशी भारत–गौरव–ग्रंथ-माला ही एकच ग्रंथमाला आहे, तेव्हां तिचें कार्यक्षेत्र वाढवून मुख्यतः चालू व तरुण पिढीच्या हातीं जीं पुस्तकें देणें जरूर झालें आहे, अशा प्रकारचीं पुस्तकें प्रकाशित करण्याचा प्रयत्न ग्रंथमालेनें करावयास पाहिजे, अशा अर्थाच्या सूचना विद्वानांकडून झालेल्या आहेत. बाकीच्या सूचना आश्रयदात्यांनीं केलेल्या असून त्यांचें संकलित स्वरूप खालीं क्रमवार देत आहों. १ वाटेल तो प्रयत्न करून नियमित वेळीं पुस्तकें प्रकाशित करावीं. २ आम्ही पुस्तकांचा संग्रह जो करतों, तो स्वतःसाठीं तर करतोंच; परंतु हें वाङ्मयधन आमच्या मुलाबाळांच्या हातीं पडल्यावर त्यांच्या संस्कृतीस योग्य वळण लागलें जाईल, अशीं पुस्तकें प्रकाशित व्हावींत. ३ केवळ किंमतीच्या दृष्टीनें पुस्तकांच्या मजकुरांत छाटाछाट करूं नये. दहा वीस पानें मजकूर जास्त झाला, तर तो घालून पुस्तकास पूर्णता आणावी. ४ पुस्तकांचा संग्रह करून तीं जपून ठेवावींत अशीं पुस्तकें फक्त भारत–गौरव–ग्रंथमालेचींच असतात, तेव्हां तीं थोडीशी किंमत वाढवून ग्लेज कागदावर छापावींत व त्यांत चित्रें घालून बांधणीहि मजबूत करावी.

शेंकडों विद्वानांकडून व आमच्या हजारों आश्रयदात्यांकडून झालेल्या या सूचना फार चांगल्या आहेत, याबद्दल मुळींच कांहीं वाद नाहीं; व ग्रंथमालेंत असल्या सुधारणा करण्याचा लोभ आम्हासहि अनिवार उत्पन्न

होतो; परंतु यांत अडचणीहि तशाच जबरदस्त आहेत. विद्वान् लेखक-वर्गाकडून लेखनसहाय्य मिळणें ही पहिली अडचण होय. गेल्या चार महिन्यांत अनेक विद्वानांना यासंबंधानें आम्ही पत्रें लिहिलीं व कित्येकांना जातीनिशींहि जाऊन भेटलों; परंतु स्वतंत्र ग्रंथरचना करून महाराष्ट्र-वाङ्मय समृद्ध करावें, ही इच्छा आम्हास फारच थोड्या ठिकाणीं आढळून आली. परकीय भाषेंतल्या कोणत्या तरी पुस्तकाचें मराठींत भाषांतर करून देणारे मात्र पुष्कळ भेटले. यावरून महाराष्ट्र—साहित्याचें क्षेत्र स्वतंत्र लेखकाच्या बाबतींत किती दरिद्री आहे, हें लक्षांत येऊन फार वाईट वाटलें; तथापि महाराष्ट्रांतल्या कांहीं चांगल्या लेखकांचें सहाय्य आम्ही मिळविलें असून त्यांचीं उत्कृष्ट पुस्तकें लवकरच आश्रयदात्यांच्या हातीं पडतील अशी आम्हास उमेद आहे.

विलायतच्या हुंडणावळीच्या घोंटाळ्यानें कागद वगैरे मुद्रणसामग्री महाग झालेली व शिवाय ग्रंथमालेंत कांहीं सुधारणा करावयाच्या असल्या-मुळें ग्रंथमालेस दोन आण्यांनीं किंमत वाढवावी लागली. प्रत्येक पुस्त-कांत दहा वीस पानें मजकूर वाढल्यास तो द्यावयाचा, कागद ग्लेज वापरावयाचा आणि चित्रेंहि द्यावयाचीं, या सर्व सुधारणा निदान दोन आणे तरी किंमत वाढविल्यावांचून करणें शक्य नाहीं, हें कोणासहि कळण्यासारखें आहे. तथापि अशा स्थितींतहि आमचीं पुस्तकें महाग आहेत, असें जर कोणास वाटत असेल, तर गेल्या चार सहा महिन्यांत असें एकादें आमच्या मालेपेक्षां स्वस्त पुस्तक मिळालें आहे कीं काय ? असें त्यांना आम्ही स्पष्ट आव्हान करतों. सुप्रसिद्ध निःस्वार्थव्रत केसरी पत्राची किंमत पूर्वी पाऊणआणा होती, ती आतां दीड आणा आहे व जाहिरातीचे दर जे ओळीला चार आणे होते, ते ओळीला आठ आणे आतां केले आहेत, ही गोष्ट महाराष्ट्रीयांच्या डोळ्यांपुढें स्पष्टपणें असतां, भारत—गौरव—ग्रंथमालेच्या पुस्तकांची वाढलेली किंमत मात्र वाजवी नाहीं, असा जर कोणीं आरोप केला, तर हा आरोप केवळ अन्याय्य नव्हे तर दुष्टबुद्धीनें केला आहे, असें कोणाहि न्यायप्रिय मनुष्यानें म्हण-ण्यास प्रत्यवाय उरणार नाहीं.


यापुढें आश्रयदात्यांच्या हातीं लवकर पुस्तकें पडावीं म्हणून प्रणय-

पंकाचा तिसरा खंड, टॉलस्टॉयचा पांचवा व सहावा खंड, चक्रवर्ती नेपोलियन, पंककीटक व देशद्रोही अशीं चरित्रें व कादंबऱ्या एकाच वेळीं निरनिराळ्या छापखान्यांत छापण्यास सुरुवात केली आहे. या उपायानें पुस्तकें लवकर लवकर आश्रयदात्यांच्या हातीं पडतील; परंतु पुस्तकांचा क्रम मात्र मागेंपुढें होण्याचा संभव आहे आणि त्याला तूर्त तरी कांहीं इलाज नाहीं. यांपैकीं प्रणयपंक व टॉलस्टॉय हीं पुस्तकें मात्र रफ कागदावरच निघतील. कारण हा कागद आम्ही अगोदरच घेऊन ठेवला आहे. बाकी सर्व पुस्तकें ग्लेझ कागदावर निघतील.

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या चरित्राचें लेखनकार्य सुप्रसिद्ध भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनीं पत्करलें आहे, एवढें सांगितलें म्हणजे तें किती उत्कृष्ट होईल हें निराळें सांगावयास नको. या चरित्रास कागद चांगल्यापैकीं ग्लेझ व जाड वापरणार आहों, व प्रत्येक खंडांत चार सुंदर चित्रेंहि देणार आहों. त्या दृष्टीनें हा दोनशें पानांचा व चार चित्रांचा खंड बारा आण्यांच्या मानानें किती स्वस्त आहे, याचा आश्रयदात्यांनीं जर विचार केला, तर त्यांना नुसतें आश्चर्यच वाटणार नाहीं, तर ग्रंथमालेची दयाहि येईल व ग्रंथमालेस नवीन अधिक वर्गणीदार मिळवून पाठविण्यास ते बिलकुल आळस करणार नाहींत, अशी आम्हास उमेद आहे.

मुंबई, गिरगांव, ता. २१।५।१९२१.

सर्वांचा नम्र साहित्यसेवक,
प्रभाकर श्रीपत भसे.



कौंट टॉलस्टॉय.

# कौंट टॉलस्टॉय.

## ( चतुर्थ खण्ड. )

### प्रकरण पहिलें.

### नवजीवन.

मागील खंडावरून पुढें चालू.

" अशा रीतीनें शारीरिक उद्योगाची योग्यता अनेकांनीं अनेक प्रकारांनीं सिद्ध केली आहे; पण अंगमेहनत हा धर्माचा पाया आहे, ही गोष्ट बोंड्यारेफ यानें जशी सरळ मार्गानें आणि चोख सिद्ध केली आहे, तशी दुसऱ्या कोणीहि ती केली नाहीं. "

बोंड्यारेफच्या मतांचा थोडक्यांत सारांश टॉलस्टॉय यांनीं पुढीलप्रमाणें दिला आहे.

" 'आपल्या निढळाच्या घामाची भाकरी तूं खा.' ही खिस्ताची आज्ञा दृष्टिआड करून आणि पुष्कळसे मूर्खपणाचे विधी करणें हें आपलें धार्मिक कर्तव्य आहे, असा स्वतःचा गैरसमज करून घेऊन पुष्कळ लोक स्वतःस आणि आपणाबरोबर लोकांसहि फसवीत असतात. याच फसवेगिरीनें जगांतील नानाविध दुःखांस जन्म दिला आहे. खिस्ताची ही आज्ञा कोणीं शिरसाप्रमाण मानीत नाहींतच; पण तिच्या विरुद्ध वागणें हेंच बहुतेकांस पसंत झालें आहे. खिस्ताची ही आज्ञा शक्य तोंपर्यंत मोडण्यासाठीं धडपडण्यांत राजापासून रंकापर्यंत सर्वांची चढाओढ सुरू आहे. आपल्या पोटाला लागणारी भाकरी प्रत्येकानें आपल्या अंगमेहनतीनें

मिळविली पाहिजे हा बोंड्यारेफचा आद्य सिद्धांत आहे. मनुष्यानें भुकेनें आणि थंडीनें मरूं नये आणि त्याला शीतोष्णाची बाधा होऊं नये म्हणून त्याला ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्या सान्या त्यानें स्वतःच्या अंगमेहनतीनें मिळविल्या पाहिजेत. प्रत्यक्ष शारीरिक जोरजुलुमापासून उत्पन्न होणारीं दुःखें वगळलीं, तर मनुष्यजातीचीं बाकीचीं सारीं दुःखें भुकेमुळें उत्पन्न होणारीं आहेत; असें आपणास आढळून येईल. एका पोटाच्या गरजेंत दुसऱ्या अनेक गरजा उत्पन्न होतात. कांहीं लोकांना शक्तीबाहेर काम करावें लागतें, तर दुसरे कित्येक शुद्ध आळसांत कुजत पडलेले असतात. मग हे आळशी लोक नानाप्रकारचीं दुर्व्यसनें उत्पन्न करतात. सर्वत्र अनुभवास येणारी ही विषमता नाहींशी करण्यासाठीं सर्वांनी परस्परांस मदत करणें, याहून अधिक पवित्र असें कर्तव्य दुसरें कोणतें आहे? एका बाजूला अठराविश्वे दारिद्य तर दुसऱ्या बाजूला संपत्तीचा नागपाश. अशा रीतीनें सांप्रतच्या स्थितींत मनुष्यजात दोन्ही बाजूंनीं नागविली जात आहे. केवळ पाटावरून ताटावर उड्या मारून बाकीचा काळ लोळत पडून घालविण्यांतच खरें सुख आहे, असा जो लोकांचा सांप्रत समज आहे, तो सर्वथा चुकीचा आहे. मनुष्य जातीच्या व परमेश्वराच्या सेवेंत देह झिजविणें यांतच परम सुख आणि यांतच अंतिम कल्याणहि आहे. दुसऱ्यानें आपल्या श्रमानें उत्पन्न केलेली भाकरी जोंपर्यंत तुम्ही खात आहां, तोंपर्यंत मनुष्यजातीची अथवा देवाची सेवा तुमच्या हातून घडणें शक्य नाहीं, हें पक्कें ध्यानांत धरा. तुमच्या गरजा स्वतःच्या अंगमेहनतीनेंच तुम्ही भागविल्या पाहिजेत. तुम्ही मोठे बाजीराव असा, मोठे दयाळू अंतःकरणाचे असा, मोठ्या प्रधानकीचीं कामें करा अथवा मोठे शास्त्रीपंडित असा; पण स्वतः चमचमीत भोजन करीत असतां भुकेनें व्याकूळ झालेलीं माणसें दाराशीं उभीं आहेत, हें पाहून तुमच्या हृदयास कांहींच द्रव येणार नाहीं काय? छे! छे! असें होणार नाहीं. अशीं माणसें खुद्द तुमच्या दारापुढें नसलीं, तर तेथून दहा पावलांवर अथवा फारच झालें तर दहा मैलांवर तुम्हांस शेंकडों आढळतील. अशीं माणसें आहेत, ही गोष्ट तुम्हांला पक्की ठाऊक आहे. तुमचा सुखाचा पेला कांठोकांठ भरलेला असला, तरी या जाणिवेचा विषबिंदु त्या

पेल्यांत पडून त्याची चव बिघडविल्यावांचून राहणार नाहीं. स्वतःची भाकरी स्वतःच मिळवावयाची असा निश्चय प्रत्येकानें केला, तर प्रत्येकाला उभ्या वर्षांत फक्त चाळीस दिवस काम करावें लागेल, असा बोंड्यारेफचा हिशोब आहे."

इ० स० १८८६ सालीं टॉलस्टॉय यांनीं लिहिलेले बहुधा सारे लेख याच विषयाचे आहेत. एका फ्रेंच गृहस्थाला एक निबंधवजा पत्र याच वर्षीं त्यांनीं लिहिलें असून त्यांत या विषयाचा ऊहापोह बऱ्याच विस्तृत रीतीनें केलेला आहे. याशिवाय 'आतां आपण काय करावें' हा ग्रंथ लिहिण्याचें त्यांचें काम सुरू होतेंच. मधून मधून शेतांत जाऊन शेतकीचीं कामें ते करीत आणि या कामीं त्यांना बरेच शिष्यहि मिळूं लागले. या वेळीं टॉलस्टॉयकुटुंबाची सामान्य दिनचर्या कशी होती, हें ॲनासुरोंनच्या पुढील वर्णनावरून दिसून येईल.

"चहाच्या वेळीं आधणांत चहाचा पाला अधिक टाकला आहे कीं काय, हें सुद्धां कौंटसाहेब मोठ्या काळजीपूर्वक पहात. अशा रीतीनें एका बाजूनें ते काटकसर करीत खरी, पण दुसऱ्या बाजूनें मिळकतीची वाहिवाट भलभलत्या मार्गानें करून हजारोंच्या रकमा ते गमावीत होते. या वेळीं स्वतःच्या देहाकडे त्यांचें पूर्ण दुर्लक्ष होतें. अंगावरील कपडे कितीहि मळलेले असले, अथवा ते कसेहि वेडेवांकडे घातलेले असले तरी, तिकडे त्यांचें लक्ष नसे. ज्या गृहस्थानें आपला सारा जन्म उत्तमोत्तम पायमोजे वापरले, तोच गृहस्थ आतां शेतकऱ्याप्रमाणें पायांना फडक्याच्या चिंध्या गुंडाळूं लागला, तर कोणालाहि अर्थातच नवल वाटेल."

"कित्येक वेळां कौंटसाहेबांचा विक्षिप्तपणा अगदीं कळसास पोहोंचे. एके दिवशीं बोलतां बोलतां ते म्हणाले, 'उवा या घाणेरड्या आहेत हें खरें; पण एखाद्या गरीबाच्या अंगावर उवा असल्या तरी त्याची फारशी खंत मानूं नये. स्वच्छता राखणे, याला सुद्धां पैसा लागतो. आणि इतका पैसा त्याच्याजवळ नसल्यानें त्याच्या अंगावर उवा होतात. त्याला तो तरी काय करणार?' अशा गोष्टी ऐकल्या म्हणजे या म्हाताऱ्याला वेड लागलें आहे कीं काय, अशी शंका पुष्कळांना येई."

"पण कौंटसाहेबांचें हें वर्तन वेडेपणामुळें होत नव्हतें, हें मात्र खरें.

कष्ट आणि दुःखें सोसण्याची ताकद आपल्या अंगांत किती आहे, हें अजमावून पाहण्याचे त्यांचे हे मार्ग होते. कोणते जिन्नस आपल्या गरजेचे आहेत आणि कोणते जिन्नस चैनीचे असून केवळ संवयीमुळें आपल्या जरूरीचे होऊन बसले आहेत, याचा निवाडा या मार्गानें ते वारंवार करीत. त्यांच्या विक्षिप्तपणाच्या वागणुकीचें रहस्य त्यांच्या अत्यंत सान्निध्यांत असणाऱ्या मनुष्याला मात्र समजण्यासारखें होतें."

अॅना सुरोननें काढलेलें आणखी एक शब्दचित्र पहा.

"कुरणांत गवत वाळूं लागलें. चाऱ्याचें पक्कें गवत करण्याचे दिवस आले. कौंटसाहेबांच्या घरीं पाहुण्यांची कोण गर्दी. अमीर उमराव, शाळा-गुरु, तत्ववेत्ते, कवि वगैरे लोकांची गर्दी उडून गेली. हे सारे लोक गवताची कापणी करण्याकरतां टॉलस्टॉय यांचे शिष्य बनले होते. या कामीं शेतकऱ्यांहूनहि आम्ही अधिक शिताफी दाखवूं असें त्यांना वाटत होतें. ही मंडळी गवत कापण्यास निघाली. कुरणांत जिकडे तिकडे चरचरां विळे वाजूं लागले. जिकडे नजर फेंकावी तिकडे माणसेंच माणसें गवत कापतांना दिसत. कौंटसाहेबांचे सारे शेतकरी त्यांत अर्थातच होते; पण त्यांच्या बरोबरोबरीनें स्वतः कौंटेसबाई, सारीं मुलें आणि त्यांच्या दाया व शिक्षकिणीसुद्धां मदतीस हजर होत्या. कौंटसाहेबांचीं शिकारी कुत्रीं गवतावर आनंदानें लोळत होतीं. त्या दिवशीं सूर्यानें तर जणूं काय आपले बाराहि डोळे उघडले होते. जवळच असलेल्या एका लहानशा टेकडीवर शेतकऱ्याचा पोषाख केलेली कौंट साहेबांची स्वारी उभी होती. थोड्याच वेळानें ते स्वतः गवत कापूं लागले. या कामांत ते पुरे गढून गेले असल्याचें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. विळ्यांचा चरचर आवाज उत्तमसंगीताहूनहि त्यांना अधिक मधुर वाटत होता."

"या वेळीं एक पाहुणा अमेरिकेंतून तेथें आला होता. फ्रे, असें नांव त्यानें धारण केलें होतें खरें; तथापि तो रशियन होता, हें मीं तेव्हांच ताडलें. त्याचें वय पन्नाशीच्या पुढें जरी गेलें होतें, तरी त्याचा चेहरा एकाद्या तरुणासहि मागें सारील असा टवटवीत होता. कित्येक वर्षे मांसाहार त्यानें पूर्ण वर्ज केला होता, एवढेंच नव्हे, तर दहा वर्षांत मीठ सुद्धां त्यानें खाल्लें नव्हतें."

"शाकाहाराच्या या वेडानें कौंट साहेबांच्या मुलींनाहि कांहीं काळ पछाडलें होतें. पण मांसाहार बंद केल्यामुळें त्यांच्या तोंडावरची टवटवी अगदीं जात चालली, हें पाहून कौंटेसबाईना मोठी भीति वाटूं लागली; पण पुढें थोड्याच दिवसांत ही लहर ओसरून सारी शाकाहारी मंडळी मांसावर यथेच्छ ताव मारू लागली."

अशा रीतीनें टॉलस्टॉय यांच्या मुली पुन्हां मांसाहारी बनल्या असें ॲनासुरोन म्हणते; पण तें सर्वांशीं खरें नाहीं. धाकटी मुलगी मेरी ही पुढें थोड्याच काळानें पक्की शाकाहारी बनली व वडील मुलगी राशियाना ही तितकी निग्रही नसली, तरी बऱ्याच अंशानें शाकान्नाचे पदार्थ खाऊं लागली. क्रिमियन युद्धापासून टॉलस्टॉय यांची पचनक्रिया चांगल्यारीतीनें कधींच चालत नव्हती; तथापि वैद्यांच्या सल्याला सोडून आणि पत्नी-च्याहि विरुद्ध वागून मांसाचें सेवन आमरण त्यांनीं केलें नाहीं. ॲना-सुरोन म्हणते,

"अशा प्रकारें आहारविहारांचा निग्रह करण्यांत कौंटसाहेबांचा एक विशिष्ट हेतु होता. इंद्रियनिग्रह आणि मनोनिग्रह करून त्यांच्या द्वारें आत्म्याची उन्नति साधण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता. केवळ शरीर-स्वास्थ्यासाठीं मांसाहार त्यांनीं सोडला, असें नाहीं. कित्येक वेळां नुसत्या शाकाहारामुळें त्यांचें शरीर अगदीं क्षीण झाल्याचेंहि स्पष्ट दिसे; तथापि शरीराचे चोचले चालू द्यावयाचे नाहींत, हा त्यांचा निश्चय केव्हांहि ढळला नाहीं. त्यांचा कंबरपट्टा वारंवार ढिला पडून तो बरोबर बसता करण्यासाठीं त्याच्या पट्टीला नवीं नवीं भोकें पाडावीं लागत यावरून त्यांची क्षीणता कशी झपाट्यानें वाढत होती, हें दिसून येईल."

"तथापि अशा स्थितींतहि त्यांनीं कधींहि त्रासिकपणा दाखविला नाहीं. त्यांची पूर्ण आनंदी वृत्ति पाहिल्यासारखीच कायम होती. नाना-प्रकारचे खेळ ते खेळत. मुलांबरोबर धांवण्याच्या शर्यती लावीत, पियानो वाजवीत आणि संध्याकाळच्या वेळीं पाळकोऱ्या कागदावर लहान पोरां-सारखीं वेडींवांकडीं चित्रेंहि काढीत. लोकांच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा वाटणाऱ्या गोष्टी त्यांना अगदीं तुच्छ दिसत. अशा गोष्टी बोलतांना कोकांनीं केलेले गंभीर चेहरे पाहून त्यांना मोठें हसूं येई. स्वतःकरतां नवे

बूट शिवावेत आणि जुन्यांना ठिगळें लावावींत, हा त्यांचा क्रमहि सुरू होताच. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, ते अगदीं साधेभोळे आणि दयाळू असे कुटुंबी गृहस्थ होते. त्यांचा साधेपणा पाहून 'या गृहस्थाला दहांच्यापुढें आंकडे तरी मांडतां येतात कीं नाहीं,' अशी सुद्धां कोणाला शंका यावयाची."

"कौंटसाहेबांच्या त्या साडेतीन हात देहांत जणूं काय तीन चार प्रकारचीं माणसें रहात असत. साहित्याचार्य टॉलस्टॉय, कौंट टॉलस्टॉय, जमीनदार टॉलस्टॉय, चांभार टॉलस्टॉय आणि कुटुंबवत्सल टॉलस्टॉय, इतक्या पुरुषांची वस्ती त्या एका देहांत होती. कित्येक वेळां या साऱ्यांना हद्दपार करून ते निव्वळ टॉलस्टॉय बनत. कांद्याला जसे निरनिराळे पापुद्रे असतात, त्याप्रमाणें इतके पापुद्रे त्यांच्या सूक्ष्म देहावर चिटकले होते. हे सारे पापुद्रे एकादे दिवशीं ते काढून टाकीत. मग त्या दिवशीं आपले आईबाप कोण, त्यांचीं नांवें काय, आणि आपले पूर्वज कोण होते या गोष्टींचेंहि त्यांना विस्मरण होई."

वुइलियम फ्रे या नांवानें सुरोन बाईनें ज्या गृहस्थाचा उल्लेख केला आहे, त्याचें खरें नांव व्ही. के. हिन्स असें होतें. त्याचा जन्म रशियांत झाला होता. फिन्लंडांतील पायदळ पलटणींत कांहीं वर्षें नौकरी करून त्यानें तोफखाना व जनरल स्टॉफ यांतहि विशेष लष्करी शिक्षण मिळविलें होतें. या गृहस्थाच्या ठिकाणीं लहानपणापासूनच चांगली कर्तृत्वशक्ति दिसत होती. तो उत्तम प्रकारचा गणितज्ञ असून। अर्वाचीन भौतिक शास्त्रांचें ज्ञानहि त्याला चांगलें होतें. अशा प्रकारचा चवरस मनुष्य सरकारी नौकरींत अथवा खाजगी धंद्यांत कोठेंहि पडला असता, तरी त्याचा भाग्योदय खचित झाला असता; पण स्वार्थाकडे त्याचें लक्ष नव्हतें. तेव्हां कांहीं परार्थ साधावा या हेतूनें तो अमेरिकेंत गेला. आणि तेथें परस्पर सहाय्याच्या तत्वांवर एक शेतकऱ्यांची वसाहत त्यानें स्थापिली. या त्याच्या प्रयत्नाला यावें तसें यश आलें नव्हतें. पुढें शिक्षक या नात्यानें अमेरिकेंत आणखी कांहीं काळ काढून तो इंग्लंडांत आला व इ. स. १८८५ सालीं रशियांत पुन्हां परत गेला. धर्माच्या बाबतींत टॉलस्टॉय व फ्रे यांच्यांत अनेक बाबींत तीव्र मतभेद होता; तथापि त्यांचीं

इतर बाबींतली बरींचशीं मतें जुळतीं असल्यामुळें या दोघांचा स्नेह जमला होता. टॉलस्टॉय यांस लिहिलेल्या एका पत्रांत क्रे म्हणतो,

"नवीं धर्मतत्वें आणि नीतितत्वें यांचा स्वीकार करण्यास रशियन लोक अत्यंत उत्सुक आहेत हें पाहून माझ्या मनांत एक निराळाच विचार आला. रशियन सरकाराशीं झगडा करण्यांत जनतेचा किती तरी काळ व्यर्थ जातो, हें पाहून माझ्या हृदयाला पीळ पडतो. या झगड्याचा उपयोग कितपत होईल, कीं तो अगदींच फुकट जाईल, हेंहि मला सांगतां येत नाहीं. तेव्हां असल्या निरुपयोगी कार्यांत आपल्या कर्तृत्वशक्तीचा फुकट व्यय करण्यापेक्षां या स्वार्थत्यागाचा उपयोग अधिक खऱ्या आणि उपयुक्त कार्यांकडे केल्यास किती बरें होणार आहे! जगांतील दुष्टत्वाशीं आपणास सामना बांधावयाचा आहे; पण हें कार्य दुष्टत्वाच्या शस्त्रास्त्रांनीं मात्र करावयाचें नसून निराळ्याच मार्गानें तें आपणास साधावयाचें आहे. कसलेंहि संकट कोसळलें, तरी पदभ्रष्ट न होतां आपला देह जनतेच्या सेवेला वाहणें, हा तो मार्ग होय."

स्वतःच्या व टॉलस्टॉयच्या मताबद्दल क्रे म्हणतो,

"आम्हां दोघांत अनेक प्रकारचा मतभेद आहे. दोघांच्या परिस्थितींत भिन्नता आहे आणि दोघांच्या कार्यांचे मार्गहि वेगवेगळे आहेत; तथापि एका बाबीबद्दल आम्हां दोघांत एकवाक्यता झाली आहे. व्यक्ति आणि समाज यांच्या जीवितांत जे अनेक प्रकारचे प्रश्न उद्भवतात त्यांचीं समाधानकारक उत्तरें मिळण्यास शुद्ध धर्मज्ञान हाच एक उपाय आहे, अशी आम्हां दोघांचीहि खात्री झाली आहे. धर्माची सत्यता अकटोविकट दंतकथांनीं पटविली पाहिजे असें नाहीं. अथवा मृत्यूनंतर चिरजीवन धर्म प्राप्त करून देतो, म्हणून तो ग्राह्य असेंहि म्हणावयास नको. स्वतःच्या व दुसऱ्यांच्या चालू जीविताचें निरीक्षण ज्यांनीं केलें असेल, त्याला धर्माचें महत्त्व याच जीवितांत पटल्यावांचून रहावयाचें नाहीं. या बाबींत टॉलस्टॉय यांच्या म्हणण्यांत व माझ्या स्वतःच्या मतांत पूर्ण एकवाक्यता आहे. पुष्कळशा नैतिक सिद्धांताच्या बाबींत तरी आमचीं मतें चांगलीं जुळतात.

"गेल्या उन्हाळ्यांत मी रशियांत गेलों, तेव्हां सुशिक्षित रशियन

लोकांवर टॉलस्टॉय यांच्या मतांची छाप किती बसली आहे, हें मला प्रथमच दिसून आलें. त्याप्रमाणेंच बाह्य देशींहि ग्रंथांच्या द्वारें त्यांच्या मतांचा प्रसार झपाट्यानें होत आहे, हेंहि मला कळलें. तोंपर्यंत या गोष्टीची गंधवार्तासुद्धां मला नव्हती. मीं त्यांचे ग्रंथ वाचले, तेव्हां एक पत्र लिहून माझीं स्वतःचीं मतें मीं त्यांना कळविलीं. त्याच्या उत्तरादाखल त्यांनीं मला प्रत्यक्ष भेटीकरतांच बोलाविलें. त्याप्रमाणें मी त्यांच्याकडे गेलों आणि त्यांच्या सहवासांत जे पांच दहा आनंदाचे दिवस गेले, ते मी कधींहि विसरणार नाहीं."

फ्रे यासनाया येथें गेला होता, त्या वेळीं फिनरमन या नांवाचा दुसराहि एक पाहुणा तेथें होता. फ्रेच्या भेटीचा परिणाम टॉलस्टॉयवर काय झाला, हें या पाहुण्यानें पुढील प्रमाणें सांगितलें आहे.

"शाकाहाराची योग्यता फ्रे याच्या मुखानें टॉलस्टॉय यांस प्रथमच कळली. जीवहत्येशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध न येऊं देणारा, असा हा गृहस्थ टॉलस्टॉय यांनीं प्रथमच पाहिला. फ्रेचें सर्व म्हणणें ऐकून घेतल्यावर टॉलस्टॉय म्हणाले, 'तुमचें तत्व फारच चांगलें आहे; पण नुसतें शाकान्न मनुष्याला पुरेसें होईल काय ?"

फ्रेनें उत्तर दिलें. "हो हो. नुसते गहूंसुद्धां मनुष्याच्या जीवनाला पुरेसे होतात. कोरडे गव्हांचे दाणे नुसतेच चावून खाल्ल्यानें जीवधारण उत्तम प्रकारें होऊं शकतें."

लियोनीं प्रश्न केला, "काय म्हणतां, ते दळावयाला सुद्धां नकोत !"

फ्रे म्हणाला, "मनुष्याच्या दांताहून अधिक चांगलें जातें कोठें मिळणार !"

हें उत्तर ऐकून लियो यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्या आनंदाच्या भरांत उठून फ्रेला त्यांनीं कडकडून मिठी मारली.

फ्रे पुढें म्हणाला, "धान्यधुन्य हें सध्यां हवें तेथें आणि साहजिकपणें मिळतें म्हणून तें सांगितलें; पण मानवी जीविताला त्याची सुद्धां आवश्यकता नाहीं. स्वतःचा जीव जगविण्यासाठीं झाडें तोडून त्यांच्या हत्येचें पाप माथीं घेण्याचें कारण मनुष्यास नाहीं. फार काय; पण आपल्या दांतांची रचना आणि आपल्या आंतड्यांची बांधणी या गोष्टी लक्षांत

घेतल्या तर मनुष्यप्राणी हिंस्र कोटीच्या पशूंतला नाहीं, हें निःसंशय सिद्ध होतें. दुसऱ्या पशूंना फाडून खावें आणि आपण जगावें, अशी त्याची देहरचनाच नाहीं. विरळ आणि सुळ्यासारखे दांत हिंस्र पशूंना मात्र असतात. तसे दांत मनुष्यांना नाहींत. त्याचप्रमाणें त्याच्या पोटांतलीं आंतडींहि हिंस्र पशूंच्या आंतड्यांपेक्षां किती तरी अधिक लांब आहेत. मनुष्यानें मांस खाणें हें सृष्टिरचनेच्या विरुद्ध आहे, असें या दोन गोष्टींनींच सिद्ध होतें."

"त्याचप्रमाणें मनुष्य निव्वळ धान्याहारी आहे, असेंहि नाहीं. नुसता धान्याहार मनुष्याला मानवण्यास त्याच्या आंतड्यांची लांबी हल्लींपेक्षां दुप्पट पाहिजे. तीं तशीं नाहींत, यावरूनच तो धान्याहारी नाहीं, त्याचप्रमाणें माणसांचे दांतहि गाईम्हशींच्या दांतांसारखे रुंद असावयास हवे होते. या रचनेचा विचार करतां फळें आणि फळांतील मगज हेंच मनुष्याचें स्वाभाविक अन्न होय. तो गवत खाणाराहि नव्हें अथवा मांसाशनहि करणारा प्राणी नव्हे. तो फलाहारी प्राणी आहे. उदाहरणार्थ रानांतले वानरच घ्या. फळें आणि बियांतील मगज खाऊन ते राहतात. यामुळें त्यांचीं शरीरें किती लवचिक आणि धष्टपुष्ट आहेत व त्यांचें चापल्य केवढें आहे याचा विचार करा. आपल्या हाताच्या एकाच सपाट्यानें गोरिला वानर सिंहाचा जबडा फोडूं शकतो, असें आढळण्यांत आलें आहे. त्याचप्रमाणें एका गोरिलानें आपल्या दांतांनीं बंदुकीची नळी चपटी करून टाकल्याचें मीं पाहिलें आहे."

"मांस खाणारे लोक आपल्या मताच्या पुष्टीसाठीं नाना प्रकारचे युक्तिवाद लढवीत असतात. कोणी म्हणतात, मांस खाण्यानें अशक्तांचा सशक्त होतो, कोणी म्हणतात, कीं मांस मनुष्याच्या जठरांत पचून गेलें म्हणजे त्याचें रूपांतर उत्तम विचारांत होऊन त्याजकडून महत्कृत्यें होतात. मांसाशनांत पाप तें काय आहे? असा प्रश्न ते करीत असतात. ते जनावरें खातात हें त्यांच्या मतें जनावरांचेंच भाग्य होय. त्यांच्या या म्हणण्यावर नरदेहाची रचना हेंच उत्तर होय."

"जर्मनपंडित नीचे याचें हेंच मत आहे. हल्लींच्या मनुष्यजातीहून सर्व प्रकारें अधिक श्रेष्ठ अशी जात निर्माण करण्याकरतां कोणाचीहि

आहुती द्यावी लागली, तरी त्याला नीचेची हरकत नाहीं. खालच्या वर्गाच्या लक्षावधि मनुष्यांच्या हिताचा बळी देण्यास तो तयार आहे. खालचा वर्ग शेतांत खपतो, कोळसे काढण्यासाठीं पृथ्वीच्या पोटांत उतरतो, गिरण्यांत आणि आगगाड्यांत हाडांचीं काडें करून घेतो, या साऱ्या हालअपेष्टांचें रूपांतर मनुष्यातीत मनुष्यजातींत कसें होणार, हे नीचेच जाणें. सध्यांच्या व्यापारी युगानें लक्षावधि सामान्य माणसांस भरडून मात्र टाकलें आहे. मग या साऱ्या दुःखाकष्टांचा मोबदला एका मनुष्यातीत मानवाच्या रूपानें मिळणार असेल, तर कोण जाणे !"

हें भाषण ऐकून टॉलस्टॉय म्हणाले, "तुमच्या या भाषणावरून आप्टीन मठांतील एका महंतानें सांगितलेल्या एका दंतकथेची मला आठवण झाली."

"परमेश्वरानें सृष्टि निर्माण केली, तेव्हां यक्ष, किन्नर, देवदूतादि प्राण्यांची सूक्ष्म सृष्टि त्यानें प्रथम निर्माण केली. पुढें या देवदूतांना परमेश्वराचा हेवा वाटूं लागला. गर्वानें ते फुगून गेले आणि स्वर्गांतील सर्व प्राण्यांना फूस देऊन देवाविरुद्ध त्यांजकडून त्यांनीं बंड करविलें. या सर्व देवदूतांना परमेश्वरानें नरकवासाची शिक्षा दिली. तेव्हां त्यांचा मुख्य पुढारी सैतान ऊर्फ सेटन झाला व बाकीच्या मंडळीचें रूपांतर समंध, खवीस, डाकिणी, या रूपांत झालें. आपल्या मित्रांची ही दशा पाहून स्वर्गांतील देवदूतांना फार वाईट वाटलें आणि देवाकडे जाऊन ते म्हणाले, देवा, हें तूं काय केलेस ? तुझ्या या करण्यानें आमच्या संख्येंत केवढा मोठा खाडा पडला आहे ? आतां तो कसा भरून निघणार ?"

"देवदूतांचें हें भाषण ऐकून देव म्हणाला, 'अरे, अश्रद्धावान् प्राण्यांनो, अजून माझ्या सामर्थ्याची ओळख तुम्हांस पटली नाहीं. तर आतां पृथ्वीवरील अत्यंत सूक्ष्म जीवजिवड्यांतून तुमच्या बरोबरीचे प्राणी मी निर्माण करतों, पहा ! असें म्हणून देवानें मनुष्यप्राणी निर्माण केले."

"आपल्या हाडांचीं काडें करीत आयुष्य कंठण्याचा प्रसंग सामान्य जनांना येतो आणि त्यांच्यावर अनेक दुःखेंहि कोसळतात; पण ईश्वराची ही रचनाहि व्यर्थ आहे, असें नाहीं. कारण असल्या दुःखमय परिस्थितींतहि पवित्र सुखाच्या जागा आढळतात. आणि संसारतापानें पोळलेली

माणसें या जागांचा आश्रय करतात आणि तेथें परमेश्वराच्या कृपेनें या क्षुद्र प्राण्यांतून देवदूतासारखे प्राणी निर्माण होतात. मग स्वर्गातून जे पतन पावले असतील त्यांच्या जागीं या नव्या देवदूतांची नेमणूक होते."

ही गोष्ट सांगून टॉलस्टॉय पुढें म्हणाले, "महंताचें भाषण चालू असतां बाहेर सुतार करवतीनें लांकडें कापीत होते. त्यांच्या करवतण्याचा ध्वनि ऐकून मीं म्हटलें, महंत महाराज, तुमचें म्हणणें बरोबर आहे. हे सुतार नव्या देवदूतासाठीं घरें बांधण्याची तरतूदच जणूं करीत आहेत."

"मांसाशनाबद्दल फ्रे यानें मला जें कांहीं सांगितलें, तें माझ्या बुद्धीला तंतोतंत पटलें. आतांपासून मी मांसाला न शिवण्याची शपथ वाहतों."

त्या दिवसापासून टॉलस्टॉय यांनीं मांसाशन खरोखरच वर्ज केलें. आणि पुढें कांहीं दिवस तर नुसत्या ओट धान्याच्या खिरीवर त्यांनीं काढले."

मांसाशनाचा त्याग केल्यानंतर, एके दिवशीं ते आपल्या एका मित्राला भेटण्यास त्याच्या हाटेलांत गेले. त्या वेळीं त्याचें जेवण चाललें होतें, तेव्हां मांसाशनाविरुद्ध टॉलस्टॉय यांनीं त्याला उपदेश केला व म्हटलें, 'मनुष्याला, जिव्हालौल्य असूं नये.' इतक्यांत एक धान्याचें पक्वान्न वाढप्यानें टॉलस्टॉय यांजपुढें आणून ठेवलें. तें खाण्यास टॉलस्टॉय सुरुवात करणार तों, त्यांचा मित्र हंसून त्यांना म्हणाला, 'कौंटसाहेब, हेंहि जिव्हालौल्यच आहे.' हें ऐकतांच आपल्यापुढचें ताट पलीकडे सरकावून टॉलस्टॉय म्हणाले, 'हो हो. हेंहि खरेंच. भाकरी आणि पाणी याखेरीज मनुष्याच्या जीविताला दुसऱ्या कसल्याहि पदार्थाची जरूर नाहीं."

ॲना सुरोनबाई म्हणते. "टॉलस्टॉय यांनीं याच वेळीं शिकार करण्याचें सोडलें. त्यांना शिकारीचा विलक्षण नाद होता. किंबहुना तें त्यांचें एक व्यसनच झालें होतें. यामुळें तें सोडण्यास फार जड गेलें. एके दिवशीं कित्येक तास लिहिण्यांत घालविल्यानंतर कौंटसाहेब खोलींतून बाहेर आले आणि आपली बंदुक खांद्यावर घेऊन ते आपली टोपी शोधूं लागले. स्वतःची टोपी सांपडत नाहीं, असें पाहून जें सांपडलें तें शिरस्त्राण डोक्यावर चढवून ते घराबाहेर पडले. संध्याकाळीं ते परत आले

तेव्हां मारलेला एक ससा त्यांनीं बरोबर आणला होता आणि खाकोटीला त्यांच्या मुलीची टोपी होती. त्यांचा चेहरा अत्यंत म्लान दिसत होता आणि एकाद्या चोरासारखे लपत छपत ते घरांत शिरले."

" टॉलस्टॉय यांच्या हातून झालेला हा प्राणिवध अखेरचा होय. त्यांचीं मुलें शिकारीला जातात, हें त्यांना माहीत आहे; पण मुलांनीं शिकार काय आणली, हें टॉलस्टॉय कधींच पहात नाहींत.'

टॉलस्टॉय यांच्या आयुष्यांत हे दिवस पुन्हां मोठ्या आणीबाणीचे आले. त्यांच्या ठिकाणीं त्यागबुद्धि पुन्हां जोराऊं लागली. तिच्या सपाट्यांत आतां तंबाखूची पाळी आली. गरीब बिचारे कौंटसाहेब ! हें व्यसन सोडण्यास त्यांना किती जड गेलें ! तंबाखू ओढणें वाईट आहे, कारण तीहि एक चैनच आहे. तंबाखू पेरण्यांत जी जमीन फुकट जाते, तेथें बारली सारखें धान्य पेरलें, तर कांहीं गरीबांची क्षुधा निवारण तरी होईल.' हे शब्द एके दिवशीं बोलून त्यांनीं आपली विड्यांची पेटी पुस्तकांच्या फळीवर कायमची ठेवून दिली.

हें व्यसन सोडण्यास कौंटसाहेबांस भगीरथ प्रयत्न करावे लागले. एकादे दिवशीं एकादा विडीचा तुकडा हातांत घेऊन त्याजकडे चोरट्या दृष्टीनें त्यांनीं निहाळीत बसावें अथवा दुसरे लोक विड्या ओढूं लागले, म्हणजे आपल्या नागपुड्या फुगवून त्या धुराचा वास घेण्याचा यत्न त्यांनीं करावा. अखेरीस एकादे दिवशीं त्यांजवर या व्यसनाचा विजय होई. टॉलस्टॉय हे निव्वळ संन्याशी आहेत, असा जो पुष्कळांचा समज होता, तो अगदीं चुकीचा होता. प्रसंगीं आपली वृत्ति वाटेल तितकी आवरून धरण्याचें बळ त्यांच्या ठिकाणीं होतें हे खरें; तथापि पूर्ण त्यागी ते कधींच नव्हते."

तंबाखूचें व्यसन सोडण्यास टॉलस्टॉय यांस विलक्षण यत्न करावे लागले, असें वरील हकीकतीवरून दिसतें. तथापि त्या व्यसनावरहि कायमचा जय त्यांनीं अखेरीस मिळविला. यासनाया येथून निघून फ्रे दक्षिण रशियांत गेला तो पुन्हां मास्को येथें डिसेंबर महिन्यांत टॉलस्टॉय यांस भेटला. 'आपण काय केलें पाहिजे' हा ग्रंथ टॉलस्टॉय या वेळीं पुरा करीत होते. ग्रंथाच्या अखेर अखेरच्या भागांत अनेक धर्मांचा व संप्रदा-

यांचा ऊहापोह करून आपली सध्यांची रहाटी कोणत्या दिशेनें बदलली पाहिजे, हें ठरविण्याचा यत्न त्यांनीं केला आहे.

हा सर्व भाग फ्रे यास त्यांनीं वाचून दाखविला. फ्रे हा स्वतः आधिभौतिक शास्त्रांचा भक्त असल्यामुळें समाजाची रहाणी त्या शास्त्रांच्या अनुरोधानें असावी व तींत केवळ धर्ममतांस प्राधान्य असूं नये, असें म्हणणाऱ्यांपैकीं फ्रे होता. जडधर्माचारांच्या ऐवजीं नीतितत्वांचें प्राधान्य असावें, असें त्याचें मत होतें.

टॉलस्टॉय यांच्या विवेचनापैकीं, शास्त्र व धर्म यांची संगति टॉलस्टॉय यांनीं जेथें लाविली होती तो भाग फ्रे यास पसंत पडला. ती रात्र टॉलस्टॉय यांच्या खोलींत घालवून व टॉलस्टॉय यांच्या आधीं मोठ्या पहांटेस उठून आपलें स्वतःचें मत फ्रे यानें सविस्तरपणें लिहून काढलें.

टॉलस्टॉय यांनीं हा लेख वाचून पाहिला; पण आपल्या नेहमींच्या चालीप्रमाणें, आपलींच मतें खरीं; असा हट्ट ते घेऊन बसले. फ्रेबद्दल टॉलस्टॉय यांच्या चित्तांत चांगला आदर वसत होता. तथापि त्याचीं सारीं मतें त्यांनीं केव्हांच कबूल केलीं नाहींत. फ्रे हा पुढें लवकरच इंग्लंडास निघून गेला व त्यानंतर या दोघांची भेट पुन्हां झाली नाहीं.

टॉलस्टॉय यांजबद्दल फ्रे याचें काय मत होतें, हें त्याच्याच पत्रांतील पुढील उताऱ्यावरून व्यक्त होतें.

"परस्परांचे स्वभाव परस्परांस पुरे कळून चुकले आहेत. आम्ही दोघेहि एकाच साध्याकरतां यत्न करीत आहों. व्यक्तीची अथवा समाजाची सुधारणा आंतून घडावी, हाच आम्हां दोघांचाहि हेतु आहे. केवळ सुधारणेचें कलम बाहेरून आणून समाजाच्या रोपड्यावर तें बांधणें केव्हांच इष्ट नाहीं, असें आम्हां दोघांचेंहि मत आहे. आम्हां दोघांत मार्गाबद्दल मतभेद असला, तरी साध्याबद्दल एकवाक्यता आहे. आमचीं मनें एक झाली आहेत. मानवी जीवनाचा हेतु काय, या प्रश्नाचें उत्तरहि दोघांचें एकच आहे. आतां आपापल्यापरी वेगवेगळ्या मार्गानें जाऊन आपलें साध्य सिद्ध करण्यास पूर्वी [illegible] हि अधिक जोरानें व ताज्या दमानें खटपट करणें इतकेंच बाकी उरलें आहे. आम्हांस अखेरीस यश येईल, यांत शंका नाहीं. या पवित्र कार्यांत आम्ही एकमेकांचे प्रतिपक्षी नसून

खांद्याला खांदा भिडवून लढणारे मित्र आहों. समाजाची रचना सर्वथा शुद्ध नीतीच्या नव्या पायावर उभारून भविष्यकाळ मनुष्यजातीला सुखावह करणें, हें आम्हां दोघांचेंहि पवित्र कार्य आहे."

तथापि, यानंतर आणखीहि एक वेळ टॉलस्टॉय यांस आपल्या मताकडे वळविण्याचा यत्न फ्रे यानें केला. त्यानें आणखी कित्येक मुद्दे लिहून तयार केले व ते टॉलस्टॉय यांजकडे पाठविले. या मुद्यांवर टॉलस्टॉय यांनींहि उत्तर पक्ष केला व एका शिवाय बाकीचे सारे मुद्दे त्यांनीं खोडून काढले. ज्या मुद्याला त्यांनीं संमति दिली, तो फ्रेचा मुद्दा असाः—

"तुम्ही रूढ करूं पहात असलेल्या नव्या ख्रिस्तीधर्माचें स्वरूप जुन्यापासून पूर्णपणें विभक्त करतां येत नाहीं. यामुळें त्या दोघांची सरमिसळ होते. परमतासहिष्णुता, आणि धार्मिक जुलूम यांचे कट्टे शत्रु तुम्ही आहां, पण नव्याजुन्याची मिसळ तुम्ही केल्यामुळें जुन्या जुलमी धर्माधिकाऱ्यांच्या पगड्यांत स्वतःच न कळत तुम्ही सांपडतां, याची वाट काय?"

या मुद्यावर टॉलस्टॉय यांनीं 'तुमचें म्हणणें बरोबर आहे' एवढाच शेरा मारला आहे.

फ्रेचा आणखी एक मुद्दा असा होता. "पूर्वीं होऊन गेलेल्या व सांप्रतहि असणाऱ्या ख्रिस्तीधर्मप्रचारकाहून तुम्हीं सांगत असलेल्या ख्रिस्तीधर्माचें स्वरूप ज्या अर्थीं अगदीं वेगळें आहे, त्या अर्थीं त्याला तसें वेगळें नांव स्पष्टपणें देणें हें उचित आहे, असें मला वाटतें. कारण त्यामुळें गैरसमज व घोटाळा हीं होणार नाहींत. त्याचप्रमाणें ख्रिस्ताचें नांव वगळून दुसऱ्या एकाद्या गोड्या नांवानें तुमचीं मतें पुढें आणणें हें मला अधिक श्रेयस्कर दिसतें. कारण चालू जुलूम आणि असहिष्णुता हीं ख्रिस्ताच्या नांवाशीं पूर्ण जखडलीं गेलीं आहेत."

यावर टॉलस्टॉय यांनीं उत्तर दिलें, "तुम्हीं म्हणतां, ही गोष्ट माझ्यानें करवत नाहीं. मला जें कांहीं ज्ञान प्राप्त झालें आहे, तें सारें ख्रिस्तापासूनच मीं मिळविलें आहे व अद्यापीहि मी त्याचाच शिष्य आहें. आणि भविष्यत् काळीं ख्रिस्तापासून किती तरी ज्ञान मला प्राप्त व्हावयाचें आहे. याकरतां त्याच्यापासून मला विभक्त होतां येत नाहीं."

अशा रीतीनें टॉलस्टॉय हे आपलीं मतें बनविण्यांत आणि त्यांचा

प्रसार करण्यांत गुंतले असल्यामुळें त्यांच्या घरच्या मिळकतीकडे पाहण्यास त्यांस अर्थातच फुरसत सांपडली नाहीं. आणि यामुळें त्यांचें आर्थिक नुकसान पुष्कळ झालें. ॲना सुरोन म्हणते:—

"या हिंवाळ्यांत समारा येथील जमीनजुमल्याकडे टॉलस्टॉय यांनीं मुळींच लक्ष दिलें नाहीं. यासनाया येथून समाराचा पल्ला पुष्कळ लांब आणि तशांतून त्या काळीं तिकडे आगगाडीचा रस्ताहि नव्हता. त्यांतच एकादा बुभुक्षित टॉलस्टॉय यांजकडे येई व शेतकीचें ज्ञान आपणास उत्तम आहे, असें सांगे. याशिवाय कौंटसाहेबांचीं मतें आपणास मान्य असल्याचा बहाणा त्यानें केला, तर तेहि त्याजवर एकदम खुष होऊन एकाद्या मिळकतीचा कारभार त्याजकडे सोंपवीत. एकंदरीनें असल्या प्रकारामुळें टॉलस्टॉय यांचें आर्थिक नुकसान फार झालें, यांत मात्र शंका नाहीं. लक्षावधि रुपये फुकट बुडाले. आतां समारा प्रांतांतील जमीन मुळचीच फार सुपीक असल्यामुळें तिच्यांतून पुष्कळ उत्पन्न येई, ही गोष्ट वेगळी."

"कौंटसाहेबांची वृत्ति या वेळीं मोठी विलक्षण झाली होती. एकाद्या नवख्या मनुष्यानें या वेळीं त्यांना पाहिलें असतें, तर ते खचित वेडे आहेत, असें त्याच्या मनांत आलें असतें. आज एक विचार बोलून दाखवावा, तर दुसऱ्या दिवशीं त्याच्या विरुद्ध आचरण करावें, असा प्रकार कित्येक वेळां घडत असे. एकादे वेळीं आपल्या विचाराप्रमाणें ते प्रत्यक्ष वागूं लागत आणि आपल्या कृतीपासून दुसऱ्या कोणास उपसर्ग पोहोंचतो कीं काय, याचा विचारसुद्धां ते करीत नसत."

सामान्य सुशिक्षित लोक आणि टॉलस्टॉय यांच्या विचारसरणींत मूलतःच एक मोठा भेद होता. सामान्य सुशिक्षितांना ज्या गोष्टी मोठ्या महत्त्वाच्या वाटतात, त्या टॉलस्टॉय यांच्या खिजगणतींतहि नव्हत्या. आणि टॉलस्टॉय यांस ज्यांचें महत्त्व वाटे, त्या सुशिक्षितांच्या जमेंत नव्हत्या. यामुळें पुष्कळ वेळां त्या दोघांत गैरसमज उत्पन्न होई, यांत नवल नाहीं.

यासनाया येथें येणाऱ्या पाहुण्या मंडळींत बहुधा दोन तट पडत. एक टॉलस्टॉय यांचा पक्ष व दुसरा विरुद्ध पक्ष. टॉलस्टॉय यांच्या पक्षांची

मंडळी प्रत्येकानें शेत काम जातीनें केलें पाहिजे असें म्हणणारांपैकीं होती. या पक्षाचें प्रामुख्य ज्या प्रमाणें टॉलस्टॉय यांजकडे होतें, त्याच प्रमाणें विरुद्ध पक्षाच्या अध्यक्षत्वाचा मान त्यांच्या पत्नीकडे होता. पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें या साऱ्या गोष्टी अशाच चालाव्या, असें या पक्षाचें म्हणणें होतें.

या वेळीं फिनरमन् या नांवाचा एक तरुण यहूदी यासनाया येथें आला. याजबद्दल ॲना सुरोन हिनें पुढील हकीकत सांगितली आहे.

" एके दिवशीं ही मूर्ति अचानक येऊन उभी राहिली. हा आला कोठून व कशाकरतां आला, याची माहिती कोणासहि नव्हती. कौंटचे शिष्य होऊन काम करण्यासाठीं आपण येथें आलों आहों, असें तो म्हणाला. त्याचें भाषण ऐकून कौंटसाहेबहि खुष झाले आणि गांवांतल्या एका घरीं त्याची राहण्याची सोय त्यांनीं केली. हा तरुण बरेच दिवस तेथें राहिला व पुष्कळांस अडचणीच्या प्रसंगीं त्याचा उपयोगहि चांगला होत असे. गरीब शेतकऱ्यांच्या घरीं कोणी अजारी झालें, तर त्याची शुश्रूषा रात्रीचा दिवस करून हा करीत असे. या वेळीं टायफस तापाची सांथ गांवांत असल्यामुळें पुष्कळांना फिनरमन्चा उपयोग झाला. या त्याच्या परोपकारबुद्धीमुळें पुष्कळांना तो देवासारखा वाटूं लागला, यांत नवल नाहीं. गांवांतले पुष्कळ तरुण त्याच्या भजनीं लागले. यांत माझा स्वतःचा मुलगाहि होता. या मंडळीनें त्याचे देव्हारे माजविण्याचा खटाटोप केला; पण मला मात्र त्याच्याबद्दल जबरदस्त शंका वाटत होती. कौंटेसबाई:—मोठ्या धोरणी आणि व्यवहारी असल्यामुळें फिनरमन्चा उपयोग पुष्कळ प्रसंगीं त्यांनीं करून घेतला. एके दिवशीं शिवण काम आपणास चांगलें येतें, असें तो म्हणाला, तेव्हां बाजारांतून कांहीं कापड आणून कौंटेसबाईनीं तें त्याला दिलें व कौंटसाहेबांची एक विजार तयार करण्यास सांगितली. फिनरमन्नें तें कापड फाडलें आणि दोन वेडेवाकडे एकत्र जोडलेले भोत कौंटेसपाशीं आणून दिले. ही त्याची चतुराई कौंटेसच्या नजरेस आली, तेव्हांपासून मात्र फिनरमन् तिच्या मनातून पुरा उतरला."

" फिनरमन् पुष्कळ वेळां शेतकामहि करीत असे, आणि हें काम

नसलें म्हणजे आपला वेळ तो धर्माभ्यासाकडे लावी. त्याला कौंटसाहेब पुष्कळ वेळां जेवायला बोलवीत असत. आणि तोहि हंसत खेळत व मोठ्या मौजेच्या गोष्टी सांगत सर्वांची करमणुक करी. एके दिवशीं कौंटसाहेबांचा धर्मपंथ सोडण्याचा आपला निश्चय त्यानें जाहीर केला आणि एका धर्मगुरूकडे जाऊन पुराण्या ग्रीक पंथाचा तो अनुयायी बनला. त्याच्या या दीक्षाविधीच्या प्रसंगीं टॉलस्टॉय कुटुंबापैकीं कोणीहि हजर नव्हतें."

"एके दिवशीं नव्या लष्करभरतीच्या ठिकाणीं येऊन तूं हजर हो, असा हुकूम त्याला आला आणि तेव्हांपासून हा गृहस्थ जो नाहींसा झाला तो त्याचा पत्ता आम्हांस पुन्हां केव्हांच लागला नाहीं."

या वेळीं मराया स्मिथ या नांवाची एक स्त्री पिटर्सबर्ग येथून टॉलस्टॉय यांच्या घरीं आली. पिटर्सबर्ग येथील एका मुलींच्या शाळेंत ती मुख्य मास्तरीण होती. टॉलस्टॉय यांचे लेख वाचून त्यांच्या भेटीसाठीं ती कांहीं दिवस यासनाया येथें येऊन राहिली. या आपल्या भेटीच्या हकीकतींत मराया म्हणते.

"टॉलस्टॉय यांचा यासनाया येथील जीवनक्रम एकंदरीनें अत्यंत कष्टदायक आहे, असें मला दिसून आलें. ते एका मताचे आणि त्यांच्या आजूबाजूची सर्व मंडळी भिन्न मताची असा प्रकार असल्यामुळें सर्व कुटुंबांत राहूनहि ते अगदीं एकटे पडल्यासारखे दिसत. आपल्या कुटुंबांतील मंडळींचीं मनें कालांतरानें तरी आपण आपल्या बाजूचीं करून घेऊं असा भरंवसा त्यांना वाटत असल्यामुळेंच ते कुटुंबास चिकटून राहिले; पण ही गोष्ट कधीं काळीं तरी शक्य होईल कीं काय याची मला जबर शंका आहे. त्यांनीं हातीं घेतलेलें हें काम कधींहि यशस्वी होणार नाहीं. त्यांचें कुटुंब त्यांच्या विचाराप्रमाणें वागणार नाहीं, एवढेंच नव्हें तर विरुद्ध मताची आणखीहि मंडळी तेथें गोळा होईल, अशी मला धास्ती वाटते. असें झालें तर लियो यांना एकहि मित्र मिळावयाचा नाहीं. आणि कदाचित् त्यांच्या मताचा अभिमानी असा एकादा स्नेही दैववशात् त्यांना मिळाला, तर त्यांच्या कुटुंबांतील मंडळी त्याचा छळ केल्यावांचून राहणार नाहींत."

" एके दिवशीं बोलतां बोलतां लियो मला म्हणाले, हें सारें माझेंच पाप आहे. व्होरोनका नदी झासेका नदीला जेथें मिळते, तेथल्या संगमाजवळ झोंपडी बांधून रहावें, असा निश्चय किती वेळां तरी मीं केला होता. ती जागा अगदीं एकांताची आणि निर्मक्षिक आहे. त्या जागेकडे माझें मन अद्यापिहि ओढतें, पण संसार सोडून अशा रीतीनें एका खांबावर वस्ती केल्यासारखा मी राहिलों, तर ईश्वराचा अपराध मी केल्यासारखें होईल. ज्या अडचणीच्या स्थितींत त्यानें मला ठेवलें, तेथें त्या अडचणी तशाच सोशीत राहून त्याची सेवा करावी, हें मला अधिक श्रेयस्कर वाटूं लागलें. माझ्या आजूबाजूचीं माणसें माझा उपहास करतात आणि माझ्याविरुद्ध वागतात, हें मला कळतें; पण त्यामुळें माझा अहंकार कमी होतो. आणि मी अधिक ईश्वरासन्निध आहें, असें मला वाटूं लागतें. मी अरण्यांत जाऊन राहिलों, तर तेथें मला स्वतंत्रता व शांति हीं मिळतील; पण ईश्वराचें सान्निध्य तेथें राहिल कीं काय याची मला शंका वाटूं लागते. अशी शंका आली म्हणजे माझा जीव व्याकूळ होऊन जातो. परमेश्वरानें मला सोडलें, तर त्या शांतीचा आणि स्वातंत्र्याचा मला उपयोग तरी काय ? त्यापेक्षां हल्लींच्या असह्य जाचांत पण परमेश्वराच्या सान्निध्यांत राहिलेलें अधिक बरें, असें वाटून संसारांतच राहण्याचा मीं निश्चय केला "

टॉलस्टॉय यांच्या आयुष्यक्रमांतील या काळासंबंधीं लिहितांना आर्बुझाप म्हणतो, " या वेळीं लियो अगदीं सामान्य शेतकऱ्याप्रमाणें शेतांत काम करून त्यांच्याचसारखा रोजमुरा घेत असत. मालकाकडून अर्धेलिनें शेतें घेऊन आणि अंगमेहनतीनें तीं खेडून धान्याचा अर्धा हिस्सा ते घेत असत. अशा रीतीनें स्वतःच्या अंगमेहनतीनें उत्पन्न झालेल्या धान्याचा तीनपंचमांश हिस्सा स्वतः करतां ठेऊन दोनपंचमांश एका गरीब विधवेला ते देत."

एके वेळीं त्यांचा स्नेही गे यासनाया येथें तीन महिने येऊन राहिला होता. या अवधींत या दोघांनीं विटा पाडून दुसऱ्या एका विधवेचें घर बांधून दिलें. विटांचें काम कौंट स्वतः करीत आणि त्यांच्या दोन मुली गवताचें छप्पर तयार करीत."

" त्या घर बांधण्याच्या कामांत टॉलस्टॉय यांस चांगलेसें यश आलें नाहीं. विटांचा गारा व्हावा तसा तयार न झाल्यामुळें त्यांना लवकर भेगा पडून त्या ढांसळून जात. टॉलस्टॉय यांना कुंभाराचें काम चांगलेंसें साधलें नाहीं हें खरें; तथापि त्यांची उद्योगशीलता केवढी दांडगी होती, इतकाच मुद्दा यांत पाहण्यासारखा आहे."

" आपल्या उपदेशानें टॉलस्टॉय यांनीं यासनाया येथें व्होडका दारूचा खप साफ बंद करून टाकला. गांवांतील आबालवृद्धांचें प्रेम त्यांजवर असल्यामुळें त्यांच्या एका शब्दाबरोबर दारूचें उच्चाटन पुरें झालें. आतां हें विष मिळण्याचें ठिकाण यासनाया येथें एकहि नाहीं. 'जो तंबाकू ओढीत नाहीं, त्याचें आयुष्य दहा वर्षांनीं वाढतें आणि जो दारू पीत नाहीं, तो आपल्या आयुष्यांत वीस वर्षांची भर घालतो,' असें टॉलस्टॉय म्हणत."

" टॉलस्टॉय हे पूर्वीं स्वतः थोडीशी दारू पीत असत. एकादें विशेष अंगमेहनतीचें काम झालें म्हणजे थकवा मोडण्याकरितां अगदीं हलक्या प्रमाणाची दारू अर्धें पाणी घालून ते घेत; पण पुढें एवढें पेयहि त्यांनीं बंद केलें व त्यानंतर पाणी आणि ताकासारखा एकादा पदार्थ यांशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पेयाचें सेवन त्यांनीं केलें नाहीं."

याच वेळची हकीकत फिनरमन पुढील शब्दांनीं सांगतो. " सारा दिवस आम्ही गवतकापणीचें काम करीत असूं. आम्ही गवत आणून टाकलें म्हणजे गंज रचण्याचें काम टॉलस्टॉय करीत. आम्हाबरोबर मरायाहि गवतकापणीचें काम करी. हा आमचा उद्योग सूर्यास्तापर्यंत चाले. संध्याकाळच्या सुमारास गंजी रचण्याचें काम पुरें झालें म्हणजे टॉलस्टॉय गंजीवरून उतरत. एके दिवशीं संध्याकाळीं सूर्य अस्ताला जात असता, त्याची शेवटची कोर क्षितिजावर दिसत होती. त्या कोरीकडे बोट करून टॉलस्टॉय म्हणाले, 'सूर्याबरोबरच आम्हीहि आपला दिवसाचा कारभार आटोपला.' इतक्यांत एका आगगाडीच्या इंजिनांतून धूर निघून सूर्य दिसेनासा झाला. हें पाहून टॉलस्टॉय म्हणाले, 'या दुष्ट यांत्रिक शक्तीचा आणि त्याबरोबर आमच्या दुष्ट जिण्याचा अंत हा सूर्यनारायण खचित करील, अशी मला भीति वाटते."

" इतक्यांत आमच्यापैकीं मध्येंच कोणीसा प्रश्न केला, 'ज्यांत कोणत्याहि वाईट गोष्टीची भेसळ नाहीं, असा आयुष्यक्रम शक्य आहे काय? चांगलें आणि वाईट यांची भेसळ नसेल, तर मनुष्यप्राणी जगावर राहूं तरी शकेल काय?' यावर कौंट म्हणाले, 'हा प्रश्न मोठा मार्मिक आहे; पण माणसाची उत्पत्ति वाईटांतून झाली नसून चांगल्यांतून झाली आहे, हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. परवां नुकताच प्राचीन दंतकथा मी वाचीत होतों, त्यांत कित्येक उच्च तत्त्वें अगदीं साध्या भाषेनें ग्रथित केलेलीं मला आढळलीं. यांपैकींच एक दंतकथा मी तुम्हांला सांगतों."

" पृथ्वी आणि स्वर्ग या दोहोंतील सुंदर वस्तु एकत्र करून एक नवा प्राणि निर्माण करण्याचा विचार परमेश्वरानें केला. तेव्हां सत्य या नांवाचा देवदूत परमेश्वराला म्हणाला; देवा, असा प्राणि तूं निर्माण करूं नकोस, तसें केल्यास त्याचा पश्चात्ताप तुला लवकरच होईल. पृथ्वीवर दंभाचें आणि लुच्चेगिरीचें साम्राज्य माजवून तो तुझें नांव खराब करून टाकील. मोहक वस्तूंचा मोह अनावर होईल."

" इतक्यांत न्यायदेवता म्हणाली, असा प्राणि मुळींच निर्माण करूं नको. तो केवळ स्वार्थसाधु बनून पृथ्वीवर दुष्ट वर्तन करील. दुसऱ्यांचीं दुःखें आपल्या कानीं तो येऊं देणार नाहीं. दुःखितांचे अश्रु त्याच्या अंतःकरणापर्यंत पोहोंचणार नाहींत."

" शांतिदेवी म्हणाली, असा प्राणि पृथ्वीवर रक्ताच्या नद्या वाहवील. रक्तपात हा त्याचा धंदा होऊन बसेल. पृथ्वी उध्वस्त करण्यांत तो भूषण मानील आणि कोणत्या क्षणीं आपणास मृत्यु येतो अशी धास्ती प्रत्येक जीवाला वाटूं लागेल."

" देवतांचीं हीं भाषणें ऐकून सर्वेश्वराचें मुख सचिंत दिसूं लागलें. असला प्राणि सृष्टीला उपद्रव करील, अशी धास्ती त्याला वाटूं लागली. याकरतां अशा प्रकारचा प्राणि निर्माण करूं नये असा विचार तो मनांत करूं लागला."

" इतक्यांत परमेश्वराची सर्वांत धाकटी मुलगी पुढें सरली आणि बापाच्या गळ्याला मिठी मारून म्हणाली, असा प्राणि तूं निर्माण कर. तुझ्या सर्व दूतांनीं अशा प्राण्याला सोडलें, तरी मी त्याला ताळ्याव

आणीन, मी त्याला शोधून काढीन आणि त्याच्या दुर्गुणांचें रूपांतर सद्गुणांत करीन. सत्यमार्गापासून तो भ्रष्ट होऊं नये म्हणून मी त्याजवर सारखी नजर ठेवीन. मी त्याच्या अंतःकरणांत वास करीन आणि त्याला मी दुर्बळांचा साह्यकारी करीन."

" हें भाषण ऐकतांच सर्वेश्वराचें मुख पुन्हां उल्हसित झालें. त्यानें तो प्राणि निर्माण केला; आणि त्याला म्हटलें तूं दयेचें मूळ आहेस हें लक्षांत ठेव."

* * *

" मनुष्यप्राण्याची उत्पत्ति अशा रीतीनें झाली आहे. तो वाईटांतून निर्माण झाला नसून चांगल्यांतून निर्माण झाला आहे."

टॉलस्टॉय यांचें हें भाषण ऐकून मराया म्हणाले, " तर मग आमच्या ठिकाणीं पापबुद्धि कोठून आली ? "

टॉलस्टॉय म्हणाले, "एका मोठ्या सरदाराचा एक फळबाग होता. त्यांत फार उंची प्रतीचीं फळझाडें लावलीं होतीं. बागेच्या फाटकाजवळ दोन रक्षक त्यानें ठेवले होते. यांपैकीं एक लंगडा व दुसरा आंधळा होता. सरदार मनांत म्हणाला, हे दुसऱ्या कोणाला आंत जाऊं देणार नाहींत आणि त्यांना स्वतःला हीं फळें खातां येणार नाहींत. अशा विचारानें निर्धास्त होऊन तो आपल्या महालांत शिरला. हळू हळू मध्य रात्र झाली. तारकापति चंद्र उदय पावला. त्या बागेंतील झाडांवर त्याचे किरण पडून झाडांचीं फळें अद्भुत शोभेनें चमकूं लागलीं, तेव्हां लंगडा रक्षक आंधळ्याला म्हणाला, " गड्या या बागेंतलीं हीं फळें किती सुंदर दिसतात म्हणून सांगूं ! "

आंधळा म्हणाला, 'तर मग त्यांतलीं घेऊन ये. आपण दोघेहि तीं खाऊं.' दीर्घ निश्वास सोडून लंगडा म्हणाला, 'अरे, मी तेथवर जाणार कसा ? मला आपल्या खांद्यावर घेऊन तूं तेथवर नेशील, तर मी फळें तोडीन.'

" आंधळ्यानें ही गोष्ट कबूल करून लंगड्याला आपल्या खांद्यावर घेतलें आणि दोघांनींहि तीं फळें यथेच्छ खाल्लीं."

" सुप्रभातीं सरदारसाहेबाची स्वारी बागेंत येऊन पाहते तों झाडांवर

फळें दिसेनांत. ते रक्षक आपापल्या जागीं कायम होते. त्यांजकडे पाहून क्रुद्ध मुद्रेनें सरदार म्हणाला, ' चोराला तुम्ही आंत कसें जाऊं दिलें ?"

'सरकार, आपल्या पायांची शपथ येथून कोणीहि चोर आंत गेला नाहीं.'

'वर मग तुमच्यापैकींच हें काम कोणी केलें तें सागा. खरी गोष्ट कबूल करा.'

लंगडा म्हणाला, 'सरकार, सरळ जाग्यावर देखील दोन पावलेंसुद्धां मला टाकतां येत नाहींत, हें आपणास दिसतेंच आहे.'

आंधळा म्हणाला, 'धनीसाहेब, मला रस्त्याची दिशा सुद्धां दिसत नाहीं, मग हें काम मी करीन तरी कसें ?'

सरदारानें लंगड्या नौकराला उचलून आंधळ्याच्या खांद्यावर ठेवलें आणि म्हटलें, 'हें काम तुम्हीं अशा रीतीनें केलें आहे !'

* * *

"मनुष्याची गोष्ट अशीच आहे. शरीर बोलून चालून मृत्पिंड. तें अगदीं शांत आणि आज्ञाधारक आहे."

"तें म्हणतें, पातक करणें मला शक्यच नाहीं. मी आंधळें. मोहक वस्तु मला दिसत नाहींत आणि त्यांचा करताहि मला ठाऊक नाहीं."

"जीवात्मा म्हणतो, मी तर कधींच पातक करीत नाहीं. तुझा त्याग केला, म्हणजे शुद्ध वातावरणांत मी गरुडासारखी भरारीं मारून जातों."

"हीं भाषणें ऐकून जीवात्म्याची योजना शरीराच्या खांद्यावर सर्वेश्वर करतो आणि अशा रीतीनें मानवी जीविताचें रोप उगवतें. कालें करून तें मोठें होऊं लागतें आणि त्याला नानाविध फळें येऊं लागतात. या दोघांच्या संयोगांतच सारें रहस्य सांठविलें आहे. यांत भयंकर वस्तूंप्रमाणेंच अत्यंत सुखदायक वस्तूहि आहेत."

* * *

"सूर्य अस्तास जाऊन मागें उरणारा संधिप्रकाशहि हळू हळू निस्तेज होत होता. पूर्वक्षितिजावर मोठमोठाले निळ्या रंगाचे ढग तरंगत होते. तिकडे बोट करून टॉलस्टॉय म्हणाले, "सृष्टींत केवढाल्या प्रचंड घडामोडी होत आहेत ! आतां सूर्यास्त होऊन काळोख पडला, तरी भावी अरुणोदयाच्या आशेवर सृष्टि जीव धरून रहाते. आतां आणखी एक दंतकथ

मी तुम्हांला सांगतों. कशावरून कोण जाणें आज मला दंतकथाच आठवूं लागल्या आहेत."

*　　*　　*

" एका राजाच्या मुलीचा विवाह एका कोट्याधीश सावकारपुत्राबरोबर ठरला होता. आपल्या भावीपत्नीच्या सुखासाठीं त्या सावकारपुत्रानें अनेक प्रकारच्या तजविजी केल्या. त्यानें सुंदर संगमरवरी दगडांचा एक मनोहर राजमहाल बांधला. त्या राजमहालाला सुवर्णमय वेलबुट्टीनें त्यानें शोभा आणली होती. तिच्या दागिन्यांसाठीं त्यानें उंच प्रतीचें जवाहीर अनेक देशांहून आणविलें. मेजवान्या आणि नाचरंग यांचा त्यानें धुमधडाका उडवून दिला; पण इतक्या साऱ्या गोष्टींचा परिणाम त्या राजकन्येच्या चित्तावर मुळींच झाला नाहीं. कारण ती बोलून चालून राजाची मुलगी होती. यामुळें यांत नवीन असें तिला कांहींच नव्हतें."

" हाच न्याय जीवात्म्यालाहि लागू आहे. सृष्टि आपला सारा खजिना त्याजपुढें उघडते आणि इंद्रियजन्य सुखांचीं अनेक साधनें त्याजपुढें मांडते; पण जीवात्म्याचें समाधान एवढ्यानें होंत नाहीं. कारण तो परमात्म्याचा पुत्र आहे."

" टॉलस्टॉय यांची गोष्ट संपली. याजवर पुढें कोणी कांहींच बोललें नाहीं. जो तो आपापल्या विचारांत गर्क होतासा दिसलें. त्यांनीं सांगितलेल्या दंतकथांत असलेला गंभीर अर्थ आणि टॉलस्टॉय यांची गोष्ट सांगण्याची हातोटी यांचा परिणाम आम्हा श्रोत्यांच्या चित्तावर इतका झाला कीं, सर्व श्रोते आनंदसागरांत पोहूं लागले. आपण या चालू जीविताच्या बाहेर कोठें तरी आहों, असेंच स्वांस वाटूं लागलें."

यानंतर मराया यासनोया येथें फार दिवस राहिली नाहीं. यासनोयापासून थोड्या मैलांच्या अंतरावर एका खेड्यांत झोंपडें बांधून तेथें तिनें कायमची वस्ती केली. तेथें शेतवाडी करून अगदीं साध्या शेतकऱ्याच्या राहणीनें ती आपला काळ घालवीत होती.

मराया ही जातीनें शेतकरीण नव्हती. ती उच्चवर्गीय स्त्री असून शिक्षकिणीचा धंदा करीत होती. अशा स्थितींत आपल्या वर्गाचा अभिमान सोडून आणि मानाच्या धंद्याला रजा देऊन ती अगदीं साध्या

राहणीनें राहूं लागली. यावरून टॉलस्टॉय यांचीं मतें तिला पुरीं पुरीं पटलीं होतीं, असें मानण्यास हरकत नाहीं. आतां जुनी राहणी सोडून हा नवा आयुष्यक्रम स्वीकारण्यांत समाजहित तिनें अधिक साधलें कीं कमी साधलें, याबद्दल मतभेद होण्याचा संभव आहे; तथापि साध्या राहणीचा जो धडा स्वतःच्या उदाहरणानें तिनें स्ववर्गीयांसमोर मांडला, त्याची योग्यता कमी होऊं शकत नाहीं.

पावसाळ्यांतील शेतकीचीं कामें संपल्यानंतर टॉलस्टॉय यांचा मित्र गे हा बहुधा यासनाया येथें रहात असे. या वेळीं कौंटेसबाई व शाळेंत जाणारीं मुलें मास्को येथें जात आणि टॉलस्टॉय यांच्या मुली व गे ही मंडळी यासनाया येथें रहात. या वेळीं टॉलस्टॉय यांच्या लेखनाच्या कामांत गेची बरीच मदत त्यांना होत असे.

व्हॉसेली मोरोझॉफ या नांवाचा टॉलस्टॉय यांचा एक शिष्य होता. याचें प्राथमिक शिक्षण टॉलस्टॉय यांच्या शाळेंतच झालें होतें. यानंतर खाजगी लेखनवाचनानें यानें आपल्या ज्ञानांत बरीच भर घातली होती. टूला शहरीं गाडीवानाचा धंदा तो करीत असे; आणि फावल्या वेळीं मासिकांतून कांहीं लेखहि लिही. यानें टॉलस्टॉय यांजसंबंधीं पुढील हकीकत सांगितली आहे.

"माझे आद्यगुरु लियो टॉलस्टॉय यांजबद्दल अनेक चमत्कारिक गोष्टी यासनाया येथील सहाध्यायांकडून माझ्या कानीं येऊं लागल्या. लियो हे साधे शेतकरी बनले असून नांगरण्याचें, पेरणीचें, कापणीचें, लांकडें फोडण्याचें, सुतारकीचें व बूट शिवण्याचेंहि काम ते करतात, अशी माझी मित्रमंडळी मला सांगूं लागली. एक मित्र तर असेंहि म्हणाला कीं, लियो तुला आतां ओळखतांहि येणार नाहींत. आपण शाळेंत असतां ते चांगले होतेच; पण आतां तर ते त्याहूनहि चांगले झाले आहेत. ते इतके दयाशील बनले आहेत कीं, काम करतां करतां एकादा घोडा थकला, तर ते स्वतःला नांगरासहि जुंपून घेतात. महामारी सारख्या भयंकर रोगाची सुद्धां क्षिति न बाळगतां ते आमच्या सारख्यांच्या झोंपड्यांत येऊन आम्हांस मदत करतात."

"माझ्या मित्राच्या तोंडची ही हकीकत ऐकून लियो यांचें दर्शन मी

केव्हां घेईन, असें मला झालें. ताबडतोब मी यासनाया येथें गेलें. सोडून मी त्याला तबेल्यांत बांधतों आहें इतक्यांत ऐंशी वर्षें वयाची माझी मावशी धांवत येऊन मला म्हणाली, "तुला काय सांगूं! माझें म्हणून म्हणावयास या जगांत कांहीं नाहीं. फुटकी कवडीसुद्धां मजजवळ नाहीं. लियो यांची मदत नसती, तर इतके दिवस मी जगलेंसुद्धां नसतें. परमेश्वर बिचाऱ्याला दीर्घायु करो. आमच्या सारख्या निराश्रितांचा तो आधार आहे. माझें गवत कापून त्यांनीं गंजी रचल्या आणि माझें शेतहि त्यांनींच नांगरलें. आतां हें मोडकळीस आलेलें झोंपडेंसुद्धां तेच बांधीत आहेत."

"मावशीशीं थोडा वेळ गोष्टी केल्यावर मी लियो सुतार यांजकडे जावयास निघालों. त्यांच्या घरीं पोहोंचल्यावर त्यांजसमोर मी एकदम गेलों नाहीं, जरा आड उभें राहून मी त्यांजकडे पाहूं लागलों. अरेरे! माझ्या आद्य गुरूची काय ही स्थिति! त्याचे सारे केंस अगदीं करडे झाले असून तोंडावर सुरकुत्या तरी किती ह्या! तो अगदीं म्हातारा झाला होता, पण त्याची काम करण्याची हौस कशी आहे, पहा! सद्याच्या अस्तन्या मागें सारून वाकसानें लांकूड तासणीचें काम चाललें आहे. कमरेला पटाशी आणि लहानशी करवत हीं आयुधें लोंबत होतीं."

"मी लियो यांना जाऊन भेटलों. त्यांच्याशीं थोडेसें भाषण मीं केलें. अधिक परिचय होतांच 'कौंट,' 'सरकार' 'श्रीमंत' हीं त्यांचीं विशेषणें माझ्या मनांतून पार गळून गेलीं. बाबा लियो सुतार, बाबा लियो शेतकरी याच मूर्ति पूर्वींच्या श्रीमंताच्या जागीं दिसूं लागल्या. सदोदित सत्कार्य कर, असा उपदेश करतांना ते मला म्हणाले,, 'मी आज जिवंत आहें; पण कदाचित उद्यांच हें शरीर थडग्यांत जाईल ही गोष्ट नित्य लक्षांत बाळगून होईल तितकें सत्कार्य आजच करीत जा.' त्यांचे हे शब्द माझ्या हृदयांत अक्षय्य होऊन बसले आहेत."

"लियो निकोलिव्हिच यांजवर माझें मनापासून प्रेम जडलें. मी त्यांची भेट घेण्याची खटपट करूं लागलों. त्यांची भेट जेव्हां जेव्हां होई तेव्हां तेव्हां प्रेम आणि सौजन्य याच शब्दांचा उच्चार माझ्या कानीं वारंवार

पडे. खेड्यांतली राहणी, अंगमेहनत, उत्तम क्षुधा आणि निर्वेध झोंप हींच मनुष्याच्या खऱ्या सुखाचीं साधनें होत असें लियो म्हणत."

इ. स. १८८६ च्या जानेवारीच्या १८ व्या तारखेस टॉलस्टॉय यांचा चार वर्षांचा आलेक्झी नांवाचा मुलगा छातीच्या विकारानें वारला. ॲना सुरोन म्हणते,

"केवळ छत्तीस तासांच्या अवधींत हें सुंदर पुत्ररत्न प्रेतरूप झालें. एके दिवशीं संध्याकाळीं तो खोकूं लागला. त्याच्या छातीला थंडीचा विकार झाला आहे, ही गोष्ट वैद्याच्या लक्षांतच आली नाहीं. वैद्यमहाराजांनीं आपली चूक पाठीमागून कबूल केली."

"या प्रसंगीं कौंटसाहेबांची वर्तणूक त्यांच्या मतांना साजण्यासारखी होती. श्रद्धावंतांना मृत्यूची किंमत नाहीं, असें ते म्हणत आणि या प्रसंगीं ते अगदीं शांततेनें वागले. मरते वेळीं मुलानें त्यांना हांक मारली तेव्हां अगदीं शांत चित्तानें ते त्याच्या बिछान्याजवळ जाऊन उभे राहिले."

"मुलानें त्यांना ओळखून आपले दोन्ही हात त्यांच्यापुढें केले आणि वर कडीपाटाकडे डोळे करून म्हटलें, 'तें पहा, तें पहा,' 'कोण ?' असा प्रश्न त्याच्या आईनें विचारला; पण त्याचें उत्तर येण्यापूर्वींच त्याचा प्राण देहाला सोडून गेला."

"भटभिक्षुक आणि उत्तरक्रिया वगैरे गोष्टींवर टॉलस्टॉय यांचा स्वतःचा विश्वास मुळींच नव्हता; तथापि आजूबाजूच्या मंडळींच्या समजुतीकरतां कोणत्याहि क्रियाकर्माला त्यांनीं हरकत घेतली नाहीं."

"आलेक्झी हा मुलगा फार शहाणा आणि मितभाषी असे. बाळस्वभावाला अनुरूप अशी वायफळ बडबड त्यानें कधींच केली नाहीं. केव्हांहि पाहिलें, तरी तो विचारमग्न दिसे. मातापितरांचे चांगले गुण त्याच्या अंगीं उतरले होते."

---

# प्रकरण दुसरें.

## आतां काय केलें पाहिजे ?

भिकारी लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं जो उद्योग टॉलस्टॉय यांनीं केला, त्यावरून गरीब आणि श्रीमंत यांची जीवितयात्रा परस्परांशीं कशी जखडून बांधली आहे, हें टॉलस्टॉय यांच्या ध्यानांत आलें. हा अनुभव लक्षांत घेऊन या दृष्टीनें नवीन उद्योगास त्यांनीं आरंभ केला. या विषयावर 'आतां काय केलें पाहिजे' हें पुस्तक इ. स. १८८६ सालीं त्यांनीं प्रसिद्ध केलें.

या ग्रंथांत टॉलस्टॉय एके ठिकाणीं म्हणतात, 'माझा जीवनक्रम स्पृहणीय नाहीं, ही गोष्ट माझ्या ध्यानांत आली, तेव्हां तो सुधारणे हें माझें सरळ कर्तव्य होतें; पण तसें न करतां लोकांचा जीवनक्रम सुधारला पाहिजे, ही वेडगळ कल्पना माझ्या मनांत शिरली. पुढें अनुभवाअंतीं ही गोष्ट अशक्य कोटींतील आहे, असें मला दिसून आलें.'

शहरांतील दारिद्र्याचा प्रकार त्यांनीं पूर्ण अवलोकन केला होता. शहरांतले दरिद्री लोक म्हणजे मूळचे खेड्यांतलेच असून केवळ पोटासाठीं शहराचा आश्रय ते करतात, असें त्यांस दिसून आलें; पण असें कां होतें याचें कारण मात्र त्यांच्या लक्षांत येईना. वास्तविक पाहतां सृष्टीची संपत्ति खेड्यांत अधिक. झाडें, कुरणें, दाणागोटा आणि गाईवासरें हीं खेड्यांत जशीं असतात, तशीं शहरांत असत नाहींत; मग जेथें धूळ आणि दगड हीच संपत्ति तेथें हे लोक इतके धांवत कां येतात ? याचें कारण हेंच कीं खेडेगांवांत उत्पन्न होणारी संपत्ति तेथेंच न राहतां ती शहराकडे धांव घेते आणि खेडवळ लोकहि तिच्या मागें लागून शहरांत येतात. कोणत्या तरी रीतीनें श्रीमंतांची नौकरी करून या संपत्तीचा मिळेल तेवढा अंश मिळवावा, या हेतूनें नानाप्रकारच्या नौकऱ्या ते करतात. याच ग्रंथांत टॉलस्टॉय म्हणतात, "चैनी मागें चैन अशा चैनीच्या चक्रांत आम्ही शहरवासी श्रीमंत लोक सांपडलों आहों. ही चैनबाजीची स्थिति आमच्या अंगवळणीं इतकी पडून गेली आहे कीं, तींत कांहीं विशेष

आहे, अथवा कांहीं अस्वाभाविक आहे, असें ध्यानांतच येत नाहीं. विस्तीर्ण राजमहाल बांधावेत आणि मग त्यांत दहापांच माणसांनीं रहावें, हेंहि आम्हांस स्वाभाविकच वाटतें. आमच्या घरांच्या खोल्या उबदार राखण्याकरतां इतकें सर्पण खर्च होतें कीं, तेवढ्याखर्चांत कित्येक गरीब कुटुंबांचा स्वंयपाक होईल. पण यांतहि कांहीं अस्वाभाविकपणा आहे, असें आमच्या मनांत सुद्धां येत नाहीं. सहज अर्धा मैल जावयाचें झालें, तरी दोन घोड्यांची गाडी आणि दोनतीन नौकर इतका सरंजाम बरो-बर घेण्यांत आमच्या दृष्टीनें विशेष कांहींच नाहीं. आमच्या जमिनीवर पसरण्यास लागणाऱ्या सतरंज्यांची किंमतच पांचचार हजार रुपये सहज असते. मुलांच्या खेळण्याकडे महिन्याकांठीं पंचवीसतीस रुपये सहज खर्च होतात. या साऱ्या गोष्टींत आमच्या दृष्टीनें विशेष कांहींच नाहीं. या गोष्टी आमच्या आंगवळणी पुऱ्या पडलेल्या असतात. आणि दारिद्र्य गरिबांच्या आंगवळणी कसें पडत नाहीं, याचेंच आम्हास नवल वाटतें. मरेपर्यंत कष्ट करून सरकारदेण्यासाठीं गुरेंढोरें आणि हांडीभांडीं विकणें; हें गरिबांना स्वाभाविकच नव्हे काय ? आमच्या श्रीमंतीबद्दल आम्ही कधींहि तक्रार करीत नाहीं, मग आपल्या दारिद्र्याबद्दल त्यांनीं तरी ती कां करावी ? आम्हाला श्रीमंती जशी स्वाभाविक, तसेंच त्यांना दारिद्र्य स्वाभाविक? आम्हां श्रीमंतांत कांहीं लोक फारच भोळे असतात. ते म्हणतात कीं, आम्ही चैन करतों म्हणून पुष्कळ गरिबांचीं पोटें भरतात. याकरतां आमच्या चैनीबद्दल गरिबांनीं आम्हास सदोदित दुवा दिला पाहिजे. पण मनुष्य गरीब झाला म्हणजे बुद्धिहीन होतो, असें नाहीं. आणि श्रीमंत लोक जसा बुद्धिवाद करतात, तसा गरिबांसहि करतां येतो. एकाद्या मनुष्यानें दहापांच हजार रुपये एकाद्या भलत्याच चैनीसाठीं उध-ळले, तर आपल्याला त्याचें तें करणें वाईट दिसतें. तेवढ्या पैशांत त्याला एकादें घर बांधतां आलें असतें अथवा स्वतःच्या शेतवाडींत त्याला सुधारणा करतां आली असती, असें आपल्या मनांत येतें. हाच बुद्धिवाद गरिबांनाहि सुचत नाहीं असें नाहीं. केवळ नव्या गरजा उत्पन्न करून त्या भागविण्याकरतां पैशाची उधळपट्टी श्रीमंत लोक करतात, तेव्हां गरिबांच्या मनांतहि हाच बुद्धिवाद उभा रहातो. त्यांतून गरिबांच्या गरजा म्हणजे

चैनीच्या गरजा नसून केवळ जीवितधारणाला अत्यंत आवश्यक अशा त्या असतात. यामुळें श्रीमंतांच्या पेक्षांहि त्यांच्या मनांत हा बुद्धिवाद अधिक जोरानें उसळतो.

लक्षावधि लोकांनीं सदोदित उपाशीं रहावें आणि सदोदित कामाच्या जोखडाखालीं आपल्या माना द्याव्या व कांहीं लोकांनीं सदोदित चैन करावी, आणि सदोदित भरपगारी रजा भोगावी, हें न्याय्य आहे, असें गरिबांस वाटत नाहीं. आणि हा न्याय त्यांस कधींहि पटावयाचा नाहीं. आरंभीं आरंभीं या गोष्टींबद्दल विषाद वाटून त्यांना राग येतो; पण ज्या अर्थीं सारा समाज या गोष्टी कायदेशीर मानतो, त्या अर्थीं त्यांजविरुद्ध गडबड करण्यांत अर्थ नाहीं, असें समजून गरीब लोक स्वस्थ बसतात. पुढें हळू हळू हाच श्रीमंतांचा कित्ता गिरविण्याचा यत्न ते करतात व शक्य त्या रीतीनें काम टाळावें व शक्य त्या रीतीनें पैसे अधिक मिळवावे, ही बुद्धि त्यांस सुचूं लागते.

"अलीकडे नौकर किती बेगुमान आणि काम चुकावू झाले आहेत हो!" अशी श्रीमंतांची तकरार नेहमीं ऐकूं येते. पण या कामीं त्यांचे गुरु आपणच आहों, हें मात्र श्रीमंत लोक कधींच कबूल करायचे नाहींत. काम न करणें आणि नुसती चैन भोगणें, हेंच मनुष्याचें इतिकर्तव्य आहे, हें वळण श्रीमंत लोक प्रत्यक्ष उदाहरणानें त्यांना रोज घालून देतात. मग त्यांनीं तें वळविलें, तर त्यांत त्यांचा काय अपराध ? असल्या रिकामटेकड्या गरिबांतून कांहीं लोक थोड्याबहुत श्रीमतीपर्यंत पोहोंचतात. कांहीं त्यांहून उतरत्या पायरीपर्यंत येतात आणि जीं येथपर्यंत सुद्धां पोहोंचत नाहींत, असल्या माणसांचा भरणा कुंटणखान्यांत तदनुषंगिक इतर प्रकारांत होतो.

गरीब आणि श्रीमंत हा भेद समाजांत अधिक बळावत चालला आहे. गरीबाशीं संपर्कच येऊं नये अशी बुद्धि श्रीमंतांत अधिक बळावत आहे. गरीबांच्या स्थितीसंबंधानें श्रीमंतलोक जाणूनबुजून काणाडोळा करीत असतात.

आपलें भाग्य म्हणून ज्या वस्तूंचा संग्रह श्रीमंत करीत असतात, त्यांचें स्वरूपसुद्धां अशाच प्रकारचें आहे कीं, त्यांच्यामुळें ही दुही वाढतच

जाईल. आमच्या वर्गाचे सारे यत्न गरीबांपासून स्वतःस वेगळे करण्याकरतांच असतात. आमचें खाणेंपिणें गरीबांहून अगदीं भिन्न. आमचे कपडेलत्ते आणि ते पेहेरण्याची तऱ्हा अगदीं वेगळी. आमच्या घरांच्या पद्धति अगदीं वेगळ्या आणि फार काय पण आमचें शिक्षणहि आमच्या मुलांच्या डोक्यांत हीच वेगळेपणाची कल्पना प्रत्यहीं ठसवीत असतें. अशा रीतीनें गरीब आणिं आम्ही यांच्यामध्यें अभेद्य तटबंदी निर्माण करण्याकरतां आमच्या संपत्तीचा नऊदशांश भाग तरी आम्ही किमानपक्ष खर्च करीत असतों. आम्ही अन्न वेगळ्या प्रकारचें खातों एवढेंच नव्हे तर ज्या पद्धतीनें तें खातों, ती पद्धतसुद्धां हा भेद ढळढळीतपणें दाखवीत असते. जेवणाच्या टेबलाजवळ जावें कसें, बसावें कसें, उठावें कसें, लेडीशीं हस्तांदोलन करावें कसें? इत्यादि शुष्क गोष्टींचें सुद्धां आम्ही शास्त्र बनविलें आहे.

पोषाकाची तऱ्हासुद्धां हीच. गरीबांपासून आम्ही वेगळे कसे दिसूं हाच मुद्दा ध्यानांत बाळगून आम्ही आमच्या पोषाकाची रचना करतों. आमच्या घरांची रचना पाहिली, तरी तेथें सुद्धां मुख्य तत्व हेंच. प्रत्येकाला एकलकोंडें कसें राहतां येईल आणि गरीबांच्या दृष्टीला आपण पडणार नाहीं, अशी तजवीज कशी करतां येईल, हें धोरण पाहूनच आम्हीं आमचीं घरें बांधतों. जों जों मनुष्य अधिक श्रीमंत तों तों गरीबांत आणि त्याच्यांत भिंती अधिक असतात. श्रीमंती अधिक झाली कीं चौक्यापहारे अधिक वाढतात. आणि यजमानांची गांठ घेणें गरीबांना अधिक जड होतें.

हिंडण्याफिरण्याच्या तऱ्हेंतसुद्धां हाच प्रकार आढळून येतो लहानशा खटाऱ्यांत दोन तीन शेतकरी मजेनें बसून जात असतात आणि वाटेंत एकादा दोस्त भेटला तर त्याला बसण्यापुरतीहि जागा ते देतात; पण आम्हां श्रीमंतांच्या गाड्या हलक्या आणि नाजुक एकापेक्षां अधिक माणसांचें ओझें त्या सहन करावयाच्या नाहींत."

"आमच्या स्वच्छतेच्या कल्पना याच तोडीच्या आहेत. आमच्या स्वच्छतेच्या शास्त्राबरहुकूम वागण्याची इच्छा एकाद्या गरीबानें केली, तर

ती गोष्ट त्याला अगदीं अशक्य. 'ज्यांचे हात नाजुक ते परक्याच्या श्रमावर पुष्ट होतात' अशी एक रशियन म्हण याच तत्वाची द्योतक आहे."

"आम्हाला हात पुसण्यासाठीं रोज दहापांच रुमाल सहज लागतात. आणि ही स्वच्छता आमच्या हुजऱ्यानें राखली पाहिजे, असाहि आमचा कटाक्ष असतो. पांढरे सफेत हात मोजे घालून मग तशा हातानें त्यांनीं आमचीं पत्रें अम्हांस दिलीं पाहिजेत. हा आमच्या चैनीचा प्रकार कोणत्या थरापर्यंत पोहोंचावा, याला कांहीं मर्यादा नाहीं. जोंपर्यंत इतर लोक आम्हासाठीं श्रम करण्यास तयार आहेत, तोंपर्यंत त्यांच्या रक्ताचा शेवटचा बिंदु अटविण्यास आम्ही मागें घेणार नाहीं."

"आमची शिक्षणपद्धति पाहिली, तर तिच्याहि पोटांत हेंच तत्त्व. आमची वागण्याची पद्धति आणि आमचें शिक्षण यांचेमुळें आम्ही आणि गरीब यांमध्यें इतक्या भिंती उभ्या झाल्या आहेत कीं, परस्परांची नजर-भेट होणेंहि दुरापास्त. ज्या श्रीमंताला गरिबाचें कल्याण करण्याची इच्छा असेल, त्यांनीं या भिंती प्रथम पाडल्या पाहिजेत. एकंदरींत मला जें आढळून आलें तें हेंच कीं, गरिबांच्या अनेक विपत्तींचें कारण आमची संपत्ति आहे."

एकाद्या गरिबाची वास्तपुस्त करून त्याला कांहीं मदत केली, तर तो संतुष्ट होत नाहीं, असा अनुभव टॉलस्टॉय यांस वारंवार येई. असें कां होतें, याचा उलगडा मात्र पुष्कळ काळपर्यंत त्यांस झाला नाहीं; तथापि अशा स्थितींतसुद्धां आपली मदत अनाठायीं जाते असें वाटून त्यांस राग न येतां उलट वाईटच वाटे. यासंबंधांत ते लिहितात, "मी त्या वेळीं माझ्या खेडेगांवीं होतों. 'एका यात्रेकरूला देण्यासाठीं एक पावली घेऊन ये' असें माझ्या मुलाला मीं म्हटलें. त्यानें जवळूनच एका आचाऱ्याकडून उसनी घेऊन ती मला दिली. पुढें पुन्हां दुसऱ्या प्रसंगीं अशीच जरूर मला लागली असतां त्या आचाऱ्याकडे मी गेलों आणि एक रुपया त्याच्या हातावर ठेवला. पावली कापून घेऊन बाकीचें नाणें मला तो परत देईल असें मला वाटलें; पण तसें न करतां त्यानें तो रुपया खिशांत टाकला आणि आमच्या रशियन चालीप्रमाणें माझ्या हाताचें चुंबन त्यानें

घेतलें. या त्याच्या वर्तणुकीचा मला वास्तविक राग यावा; पण तसें न होतां, मला माझीच लाज वाटूं लागली."

"गरिबाला म्हणून जो पैसा मी देतों, तो वास्तविक कोणाचा ? मी जें दान करतों त्याची किंमत माझ्या दवलतीच्या मानानें इतकी क्षुल्लक असते कीं, माझ्या दवलतीचा तो कितवा हिस्सा आहे, हें आंकड्यानें सुद्धां सांगतां यावयाचें नाहीं. तेवढा भाग माझ्या खिशांतून गेला, तर त्याची उणीव मला भासत सुद्धां नाहीं. चैनीच्या अनेक प्रकारांत जसा मी पैसा उधळतों, तसाच दानधर्म हाहि माझ्या चैनीचाच एक प्रकार असतो. मला वाटेल त्या वेळेस चैनीखातर दानधर्म करतां येतो. मग आचाऱ्याला दिलेला रुपाया त्याला मी बक्षिसच दिला असेल, असें तरी त्यांच्या मनांत कां येऊं नये ? रस्त्यानें जातांना जसे भिकाऱ्यांना पैसे वांटणें, त्याचप्रमाणें एकादा रुपया आचाऱ्यालाहि देणें होय. ज्याच्या खिशांत बिनश्रमाचा पैसा खुळखुळतो, त्याच्या दृष्टीनें दान हाहि एक करमणुकीचाच प्रकार असतो."

"वास्तविक विचार केला, तर हा पैसा माझ्यापाशीं आला कोठून ? त्यांतला कांहीं अंश जमिनीपासून मला मिळाला. ही जमीन माझ्या बापापासून मला मिळाली. ही जमीन मीं खंडानें लावली आणि प्रसंगीं नापिक झाल्यामुळें शेतकऱ्यानें भांडींकुंडीं आणि रेडेपाडे विकून माझ्या खंडाची भरती केली. या पैशांतील दुसरा भाग माझ्या ग्रंथांच्या द्वारें मजपाशीं आला. माझीं पुस्तकें लोकांना हानिकारक असतील, तर खोटा माल विकून खरा पैसा घेतल्याचें पाप माझ्या पदरीं पडतें. आतां माझीं पुस्तकें उपयुक्त असतील तर तीं विकण्याचें हें पातक अधिकच होतें. लोकांना उपयोगी अशी वस्तु मजपाशीं असतां निव्वळ पैशाच्या लोभानें तीं त्यांच्या पदरीं पडूं न देणें हें पातकच नव्हे तर काय ? माझ्या ग्रंथांचा संग्रह करावा म्हणुन एकाद्या विद्यार्थ्यानें अथवा एखाद्या गरीबशा शिक्षकानें आपलीं डांडींभांडींहि गहाण टाकलीं असतील. आणि अशा रीतीनें जमलेल्या या पैशाचा उपयोग तरी मीं काय करतों ? तो पैसा बरोबर घेऊन मी शहरांत येतों. आणि जे दरिद्री लोक गुलामांप्रमाणें राबतील त्यांना मी तो देतों. या पैशामुळें त्यांच्यापासून प्राप्त होणाऱ्या

साऱ्या वस्तु मला मिळवितां येतात. भरपूर मोबदला न देतां वाटेल तितके श्रम मात्र त्यांजकडून मला घेतां येतात. आणि केव्हां माझी लहर फिरली तर यांतली एखादी दमडी कवडी, त्यांतल्याच एखाद्या भिकाऱ्याकडे मी भिरकावतों."

"अशा रीतीनें दमड्यांचा आणि पैशांचा एका हातानें दानधर्म करून कर्णाचा लौकिक मिळवीत असतां दुसऱ्या हातानें त्याच गरीबांपासून लक्षावधि रुपये माझ्या तिजोरींत मी भरीत असतों. इतकी सारी विचारपरंपरा माझ्या चित्तांत उभी राहण्याबरोबर माझी मलाच लाज वाटू लागली, यांत काय नवल आहे? अरेरे! जे लक्षावधि लोक आज अर्धपोटीं रहात आहेत, त्यांच्या साऱ्या विपत्तीचें पुरें पातक माझ्याच शिरावर आहे, यांत शंका नाहीं. अशा ज्या स्थितींत मी राहतों, त्या स्थितींत माझा जीवनक्रम चालू ठेवणें मला शक्य नाहीं; हें मी त्रिवार म्हणतों."

"ही सारी विचारपरंपरा माझ्या जाणिवेंत येण्यास पुष्कळसा त्रास भोगावा लागला; पण ही पूर्णजाणीव झाल्याबरोबर माझा जीवनक्रम मला भेसूर दिसूं लागला. या पापगर्तेत मी गळ्यापर्यंत बुडालों आहें, असें मला दिसून आलें; तथापि अशा स्थितींतहि तींतून बाहेर पडण्याचा यत्न न करतां गरीबांना मात्र या चिखलांतून बाहेर काढण्यासाठीं मी धडपडूं लागलों."

लोककल्याण करावें, अशी इच्छा मला झाली. अन्नवस्त्रावांचून उभ्या रशियांत एकहि मनुष्य असूं नये असें मला वाटूं लागलें. मनुष्याला योग्य अशा स्थितींत सर्वांनीं असावें, अशी बुद्धि माझ्या ठिकाणीं उद्भवली. एका बाजूला अशी बुद्धि उद्भवली असतां गरीबांना लुबाडण्याचे जे अनेक प्रकार राजरोसपणें चालू आहेत, त्यांत माझी भागीदारी कायमच होती. गरीबांच्या श्रमाचें फळ रिकामटेकड्या लोकांनीं कसें उपटावें, याचे अनेक प्रकार आहेत."

"खालच्या वर्गाचा आयुष्यक्रम ज्या पद्धतीनें चालतो, तींत त्यांना शारीरिक कष्ट साहजिकपणेंच पुष्कळ सोसावे लागतात. आणि त्यांतून वरचा वर्ग त्यांच्याशीं ज्या हातचलाख्या करतो, त्यांमुळें त्यांची जीवितयात्रा दिवसानुदिवस अधिक खडतर होत जाते. कितीहि काम केलें, तरी

दिवसेंदिवस पोटाची भर होण्यास त्यांस अधिकाधिक अडचण पडते. उलटपक्षीं त्यांच्या श्रमावर पोसलेला रिकामटेकडा श्रीमंत वर्ग अधिकाधिक पुष्ट होत जातो. त्यांच्या संपत्तींत वर्षानुवर्ष अधिक भर पडते. अर्वाचिन काळीं भौतिक शास्त्रांची वाढ झाली खरी; पण त्या शास्त्रांची व्यवहाराची दिशा अशा प्रकारची आहे कीं, तीमुळें त्यांची मदत फक्त श्रीमंतांसच होते. केवळ कामाच्या रगाड्याखालीं खालच्या वर्गातील वृद्ध माणसें, बायका आणि मुलें हीं अक्षरशः चिरडून जातात, ही गोष्ट माझ्या डोळ्यांनीं मीं पाहिली. एका बाजूनें पोटाला तुटवडा आणि दुसऱ्या बाजूनें कामाचा रगाडा, अशा चरकांत त्यांची देहयष्टी पिळून जाऊन ती रोगांना बळी पडतात. शास्त्रांच्या वाढीमुळें खालच्या वर्गाची दैना वाढून वरच्या वर्गाची मिजास इतकी वाढली आहे कीं, जुन्या काळीं या मिजाशीची नुसती कल्पनाहि कोणास करतां आली नसती. थैल्या सदोदित इतक्या भरलेल्या असतात कीं, पोटाकरितां आम्हांस श्रम तर करावे लागत नाहींतच; पण आमची चैन आमच्या पुत्रपौत्रादिकांस वंशपरंपरेनें चालवितां यावी, अशीहि तजवीज आम्हांस करून ठेवतां येते. मनुष्यानें उद्योगरत असावें, हें जुनें ध्येय आतां रद्द झालें असून त्याच्या जागीं संपत्तिमान असावें, हें ध्येय आलें आहे. सिंदबादखलाशाच्या मानगुटीला एक म्हातारा बसला होता, आणि रात्रंदिवस तो त्याला सोडीत नसे, अशी गोष्ट आरबी भाषेंत आहे. त्याचप्रमाणें वरचा वर्ग कनिष्ट वर्गाच्या मानगुटीला समंधासारखा चिकटला आहे. श्रीमंत लोकांनीं दयाशीलतेचें कितीहि सोंग आणलें तरी मगरमिठी ढिली करण्यास मात्र तो कधींच कबूल होत नाहीं."

"पैशाइतकी दुष्ट आणि पापी चीज जगांत दुसरी कोणतीच नाहीं, अशी माझी पक्की खात्री होऊन चुकली. सगळ्या अनीतीचें आणि पापाचें मूळ पैशांत आहे, आणि माझ्या भोंवतीं जितकीं दुःखें मी पाहतों त्या साऱ्यांचें मूळ पैशांतच आहे, अशी माझी खात्री झाली."

केवळ याच प्रश्नाची चर्चा करण्याकरितां या ग्रंथाचीं कित्येक प्रकरणें टॉलस्टॉय यांनीं खर्ची घातलीं आहेत. एका बाजूला संपत्तीची अतिशय वाढ आणि दुसऱ्या बाजूला अठरा विश्वे दारिद्र्य अशा प्रकारची विषम

वाटणी जगांत अस्तित्वांत आहे, तोंपर्यंत जगांत गुलामगिरी अस्तित्वांत राहणार, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. अमेरिकेंत एक प्रकारची गुलामगिरी कायद्यानें बंद केली; पण त्याच कायद्यानें दुसऱ्या प्रकारच्या गुलामगिरीस उत्तेजन दिलें. अमेरिकेंतील गुलामगिरी बंद झाली, म्हणून हर्षानें टाळ्या पिटणारे युरोपियन लोक आपल्या देशांत वेगळ्या पद्धतीची गुलामगिरी दिवसाढवळ्या राजरोस चालूं देतात, हें नवल नव्हे काय? ही गुलामगिरी शुद्ध मनगटाच्या जोरावर चालते. एकाद्या जेत्यानें एकादा देश जिंकला म्हणजे तेथील सारी जमीन तो बळकावून बसतो आणि गरीबांस वेठीस लावून अनेक मार्गांनीं त्यांस लुचाडतो. नाण्याची पद्धत तेथें सुरू झाली कीं, बाकीचे कायदे हळू हळू प्रवेश करतात. मालमत्तेच्या रक्षणाचा कायदा निर्माण होतो. जमिनीचें धनीपण जेत्याकडे कायदेशीर हक्कानें जातें आणि गरीबांना खावयासहि मिळेनासें होतें. जीवितयात्रेस आवश्यक असणाऱ्या साऱ्या वस्तु पैसा देऊन त्यांना खरेदी कराव्या लागतात आणि तो पैसा त्यांजपाशीं नसतो. मग श्रीमंतांची गुलामगिरी करावी आणि पैसा मिळवावा, हें ओघालाच आलें. विकत घेतलेल्या गुलामाला जन्मभर पोसण्याची जबाबदारी तरी त्याच्या मालकाच्या शिरावर असे; पण या कायदेशीर गुलामगिरींत तीहि जबाबदारी नाहीं. अशा रीतीनें हा कायदा श्रीमंतांची जबाबदारी कमी करून खालच्या वर्गास पूर्णपणें नागवीत आहे. प्रत्येक गरीब मनुष्य कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें श्रीमंतांची गुलामगिरी सांप्रत करीत आहे."

अशा प्रकारची गुलामगिरी समाजांत असणें, लोकांच्या आंगवळणी पडल्यामुळें तिचें वाईट स्वरूप लोकांच्या लक्षांत येत नाहीं, आणि यामुळें तिजविरुद्ध कोणी गडबडहि करीत नाहीं. एकादी वाईट चाल दीर्घकाळ प्रचारांत राहिली म्हणजे तिचा वाईटपणा बुद्धिमान पुरुषांच्याहि लक्षांत येईनासा होतो. झेनाफन, प्लेटो, ॲरिस्टॉटल, यांसारख्या तत्ववेत्त्यांसहि गुलामगिरीची पद्धत आवश्यक वाटत होती. सांप्रतकाळची मजूर वर्गाची स्थिति पाहिली, तर ती गुलामगिरीसारखीच आहे, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. जुनी गुलामगिरीची पद्धत समाजाला जितकी विघातक होती, तितकीच सांप्रतची मजुरीची पद्धतहि विघातक आहे.

वास्तविक पाहतां पैसा हें एक विनिमयाचें साधन मात्र आहे. श्रम आणि पैसा यांच्यांतहि वास्तविक पाहतां योग्य परिमाण असलें पाहिजे. यांच्यांतील जन्यजनकभाव नष्ट होतां उपयोगी नाहीं, पण श्रम आणि पैसा यांच्यांत कांहींच संबंध आज उरलेला नाहीं. एकाद्याजवळ पुष्कळ पैसा असला, तर त्यानें पुष्कळ श्रम केले असले पाहिजेत, असा अजमास आज कोणीहि करणार नाहीं. जवळ पैसा असणें, म्हणजे लोकांवर फुकट सत्ता चालविण्याचें साधन जवळ असणें, असाच अर्थ आज झाला आहे. अर्वाचीन काळच्या गुलामगिरीचें स्वरूप अशा प्रकारचें आहे, असें टॉलस्टॉय म्हणतात.

"मी कोणत्याहि उद्योगाला हात लावला नाहीं, सध्यां लावीत नाहीं, आणि पुढेंहि लावणार नाहीं. बँक पुस्तकांतील चिठ्या फाडणें, एवढाच उद्योग माझ्या हातांत आहे," असें म्हणणारा श्रीमंत मनुष्य 'उद्योग करावा, तेव्हां पैसा मिळतो,' असा उपदेश बेशरमपणें करीत असतो. वेड्याचें बरळणें याहून अधिक वेडेपणाचें असेल काय ?"

टॉलस्टॉय म्हणतात, "इतर श्रीमंतांप्रमाणें माझ्याहि डोक्यांत एका काळीं हेंच खुळ होतें. मजजवळ पैसा होता, आणि तो पैसा उद्योगामुळेंच प्राप्त झाला होता, असेंहि मला वाटत होतें. किमान पक्ष असा पैसा जवळ असणें कायद्याच्या दृष्टीनें तरी बरोबर आहे, असें मला वाटे; पण गरीब लोकांत मी फिरूं लागलों, तेव्हां त्या पैशाची खरी जन्मभूमि मला त्यांनीं सांगितली. त्यांच्याच खिशांतून पुष्कळसा पैसा उपटावा आणि मग त्यांतील थोडासा अंश दयाशीलतेचा बहाणा करून त्यांच्या पदरांत टाकण्यास पुढें सरावें ही वस्तुविपर्यासाची कमाल होय, असें मला कळून चुकलें. मग आतां करावें तरी काय ? या प्रश्नालाहि उत्तर याच विचारपरंपरेंतून मला मिळालें."

"प्राचीनकाळापासून चालू क्षणापर्यंत बुद्ध, इसाया, साक्रेटीस, येशूख्रिस्त वगैरे पुरुषांनीं ज्या तत्वांचा उपदेश आमच्या कानींकपाळीं केला, त्यांची सत्यताहि मला याच वेळीं कळली. 'आम्हीं काय करावें ?' या प्रश्नाला हे अवतारी पुरुष उत्तर देतात, 'ज्याच्याजवळ दोन अंगरखे असतील, त्यानें एका उघड्यास झांकावें, आणि ज्याच्याजवळ दोन

भाकरी असतील त्यानें एका क्षुधितास त्यांतील एक द्यावी.' 'इंद्रियांची आणि परमेश्वराची भक्ति एकाच वेळीं करतां येणें अशक्य आहे.' या येशूच्या वचनांतलें रहस्य आतां माझ्या लक्षांत आलें. जरूरीपेक्षां अधिक अन्नवस्त्र कोणाकडूनहि घेऊं नका, असा हुकूम आपल्या शिष्यांस त्यानें कां केला, हें आतां माझ्या लक्षांत आलें. एक वेळ सुईच्या नेढ्यांतून उंटहि जाऊं शकेल; पण श्रीमंत मनुष्य स्वर्गाच्या द्वारांतून जाणार नाहीं, या येशूच्या वचनाचें खरें मर्म आतां माझ्या ध्यानीं आलें. घरदार, वतनवाडी आणि बायकामुलें सोडून माझ्या मागें जो येत नाहीं, तो माझा शिष्यच नव्हे, हें येशूचें म्हणणें, माझ्या गळीं तंतोतंत उतरलें."

"केवळ स्वार्थाचा मार्ग पाहणें, एवढेंच मनुष्याचें [illegible] नसून परार्थासाठींहि झटणें, त्याचें कर्तव्य आहे. हा सृष्टीचा कायदा [illegible]ाचें उल्लंघन करणें मानवीसमाजास हितकारक होणार नाहीं; पण प्रत्यक्ष सृष्टींत [illegible] कायद्याचें उल्लंघन वारंवार होत असतें, असें माझ्या नजरेस आ[illegible]. [illegible] माणसें बलिष्ठ होऊन सामान्य समाजापासून वेगळीं होतात आणि [illegible] त्यावर अम्मल गाजवून त्यांच्या श्रमाचा फुकट फायदा घेतात. पुष्कळ माणसांवर सत्ता चालविण्याचें जें सामर्थ्य त्यांस प्राप्त [illegible]लेलें असतें, त्याचा उपयोग सामान्य जनसमूहाच्या सुखवृद्धीसाठीं न [illegible]तां केवळ आपल्या इंद्रियांचे चोचले पुरविण्यांत तीं करीत असतात. आणि हीच गोष्ट अखेरीस त्यांच्या नाशास कारण होते. सामान्य जनसमूहांत जी विपत्ति आढळते, तिचें मूळ या गुलामगिरींत आहे, अशी माझी खात्री झाली. सांप्रत चालू असलेली गुलामगिरी केवळ मनगटाच्या जोरावर चालू आहे. खड्या लष्कराची पद्धत, जमीनदारीची पद्धत आणि कराची पद्धत, हीं या मनगटाच्या जोराच्या जुलमाचीं चिन्हें होत. ही अर्वाचीन गुलामगिरी जिवंत ठेवण्याचे हे तीन उपाय आहेत."

"मी सर्फ लोकांचा धनी होतों, तेव्हां ही गोष्ट माझ्या लक्षांत आली आणि या पापापासून मुक्त होण्याची खटपट मीं केली. जणूं काय माझ्या पदरीं सर्फ लोक नसून हे सामान्य शेतकरी आहेत, अशा [illegible] त्यांच्याशीं मी वागूं लागलों. माझ्या धनीपणाचा कोणताहि दा[illegible] [illegible] मीं ठेवला नाहीं. इतर जमीनदारांनाहि हाच उपदेश करून माझ्या बाजूचे

वातावरण शुद्ध करण्याची खटपट मीं केली. आतां बाकीच्या गुलामगिरीची पद्धत मोडून टाकण्याचा यत्न याच दिशेनें करण्याचा बेत मीं केला. दुसऱ्या कोणाचे श्रम फुकट खाणें म्हणजे या पद्धतीला दुजोरा देणें होय. याकरतां कोणाचे श्रम घ्यावयाचे नाहींत असा मी निश्चय केला."

"हा निश्चय पाळावयाचा म्हणजे आपल्या पुष्कळशा गरजा कमी करावयाच्या व आपलीं कामें आपण स्वतः करावयाचीं. असें करण्यावांचून याला दुसरी तोड नाहीं, असें माझ्या अनुभवास आलें."

"माझ्या जीवनक्रमाचा सारा तपशील मी चाळून पाहिला; तेव्हां कित्येक लोकांचे श्रम फुकट खाण्यांतच माझें आयुष्य जात होतें, असें मला दिसून आलें. याकरतां हा सारा आयुष्यक्रमच बदलला पाहिजे, असें माझ्या अनुभवास आलें."

"खेड्यापाड्यांत उत्पन्न झालेली सारी संपत्ति शहराकडे धांव घेते, हें गरीबांच्या विपत्तीचें पाहिलें कारण होय!"

"गरीब आणि श्रीमंत असा भेद निर्माण होऊन या दोघांत पक्की भिंत निर्माण होणें, हें दुसरें कारण होय."

"याकरतां विपत्तीचीं कारणें मुळांतच उत्पन्न होऊं न देणें, अवश्य आहे, असा सिद्धांत मीं काढला. लोकांची मेहनत होतां होईतों घ्यावयाची नाहीं, आणि लोकांकरतां होतां होईतों अधिक काम करावयाचें, असा माझा भावी आयुष्यक्रम मी ठरविला आहे. 'एक मनुष्य आळशी झाला कीं दुसरा भुकेनें मरतो' अशी म्हण चिनी भाषेंत आहे. या म्हणीची सत्यता पाहण्याकरतां मला केवढ्या तरी चक्रव्यूहांतून जावें लागलें."

"मनुष्यसमाज म्हटला, कीं त्यांत परस्परांच्या हितसंबंधाची गुंतागुंत असावयाचीच. या हिशेबाची तोंडमिळवणी बरोबर असते, तोंपर्यंत त्या समाजांत विपत्तीचें कारण नसतें; पण एकाच्या खात्याला श्रमरूपी सारा तोटा आणि दुसऱ्याच्या खात्याला संपत्तिरूप सारा फायदा, असें होऊं लागलें म्हणजे, तो समाज साऱ्या विपत्तींचें माहेरघर होऊन बसतो. हा हिशेब इतका साधा आणि सोपा आहे कीं, तो कळण्यास मोठ्याशा पांडित्याची जरूर नाहीं. आपले श्रम किती आणि आपली संपत्ति किती, हें

ज्याचें त्यास घरच्या घरींच पाहतां येण्यासारखें आहे. उधळपट्टी करण्याइतका पैसा ज्याच्या गर्दीं आहे, असा मनुष्य नेहमीं फुकट खाऊ असतो. उधळ्या मनुष्य लोकांचीं दुःखें वाढविण्यास कारण होत असून मितव्ययी मनुष्य लोकांचे श्रम कमी करीत असतो."

श्रीमंती आणि गरीबी या दोन स्थितींचें सुंदर चित्र टॉलस्टॉय यांनीं केलेल्या पुढील वर्णनांत आढळतें.

" मास्कोशहरीं मी राहतों त्या भागांत बऱ्याच गिरण्या आहेत. दररोज सकाळीं पांच वाजतां जिकडे तिकडे शिट्याच शिट्या ऐकूं येऊं लागतात. बायका, पोरें आणि म्हातारेकोतारे, अशा सर्व प्रकारचे लोक या गिरण्यांतून काम करीत असतात. माझ्या घराजवळच असलेले तीन कारखाने केवळ नाचखान्यांत उपयोगीं पडणारें सामान तयार करीत असतात. त्यांत पायमोजे, रेशमी वस्त्रें, सेन्ट व सुवासिक तेलें वगैरे चैनीचे पदार्थ मात्र तयार होतात. सकाळीं पांचाला पहिली शिटी वाजली कीं, कोठें तळघरांत अथवा इकडेतिकडे आडसांधीला पडलेलीं बायकापोरें खडबडून उठतात आणि या कारखान्यांकडे धांवत सुटतात. मग त्या गिरणीच्या उष्ण, कोंदट आणि घाणेरड्या जागेंत दहाबारा तास त्यांना काढावे लागतात. असल्या या पदार्थांचा उपयोग तरी काय ? हेंहि त्यांना समजत नाहीं. अशा रीतीनें आठवड्यामागें आठवडे आणि वर्षामागें वर्षे लोटत असतें."

" ज्या दिवशीं सुट्टी असते, त्या दिवशीं या कामकऱ्यांपैकीं बहुतेकांची हजेरी गुत्यांत लागावयाची. बरोबर बदफैली बायकाहि असावयाच्या. तेथून बाहेर पडल्यावर जी भाषा त्यांच्या तोंडांतून बाहेर पडते, ती माझ्यासारख्या गृहस्थाला ऐकवतहि नाहीं; पण आपण काय बोलतों, तें सुद्धां त्यांना समजत नसतें. अशा प्रकारचा एखादा तांडा समोरून आला, म्हणजे त्याला टाळण्याकरितां, रस्त्याच्या अगदीं कडेनें मी जात असें; पण त्यांच्या जीवनक्रमाचें सूक्ष्म अवलोकन जेव्हां मीं केलें; तेव्हां त्यांचा राग न येतां मला त्यांची कींव येऊं लागली. ज्या प्रकारें त्यांचें आयुष्य जात असतें, त्या प्रकारांत त्यांचें वर्तन बिघडतें यांत कांहींच नवल नाहीं. त्यांत थोडीं तरी माणसें सुवर्तनी कशीं राहतात, याचेंच मला नवल वाटे.

लागलें. अशा रीतीनें रात्रीच्या अकराबारावाजेपर्यंत काळ काढून ही मंडळी आपापल्या खबदाडांत परत जात. त्यांतील कित्येक जे अगदींच गैरशुद्धींत असतात, त्यांची रवानगी पोलिस ठाण्यावर होते."

" इतक्यांत रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें झोंकबाज गाड्या दिसूं लागतात. थाटदार पोषाक केलेले गाडीवाले व हुजरे या गाड्यांच्या आगेंमागें असतात. खाण्याची यथास्थित चैन असल्यामुळें हे लोक शरीरानेंहि घष्टपुष्ट असतात. त्यांणि तासास चवदा मैल गाड्या हांकीत हे जात असतात. गाडीच्या आंत नजर फेंकावी तों अंगाभोंवतीं लोंकरीचीं उबदार वस्त्रें परिधान करून श्रीमंतांच्या स्त्रिया सुखासीन झालेल्या असतात. आजूबाजूला फुलांचे गुच्छ आणि माळा गुंफलेल्या असतात. घोड्याचें जीन, गाडी, तिच्या रबरी धांवा, हुजऱ्यांच्या अंगावरील पोषाक आणि स्त्रियांच्या अंगावरील मखमल, हातमोंजे, सेन्ट इत्यादि साऱ्या वस्तु कोणी निर्माण केलेल्या असतात? मघांशीं आपापल्या खबदाडाकडे अथवा पोलिस ठाण्याकडे जो तांडा गेला, त्यानेंच त्या निर्माण केलेल्या असतात. गाडीच्या रस्त्यांत आड आला म्हणून ज्या दारूड्याच्या पाठीवर आपल्या कोचमनानें चवदाव्या रत्नाचा उपयोग केला, त्याचा संबंध आपल्या या नाचाच्या पोषाकाशीं यत्किंचित् तरी असेल, अशी शंकासुद्धां या लक्ष्मी-पुत्राच्या डोक्यांत शिरत नाहीं."

" नाचखान्यांत गेल्यावर ही मंडळी जेव्हां खुशाल चैन करतात, तेव्हां त्या दारूड्याच्या अस्तित्वाचा विचार त्यांस स्पर्श करीत नाहीं. रात्रीं अकरांपासून सकाळीं सहांपर्यंत खाद्यपेयावर ताव मारण्यांत ही मंडळी दंग झालेली असते; पण ज्यांच्या श्रमावर ही आपली चैन यथास्थित चालते, ते लोक खबदाडांतून आणि खुराड्यांतून उपाशीं पडले आहेत, अथवा त्यांपैकीं कांहीं बर्फानें गारठून मरत आहेत, हे विचार त्यांच्या चैनीचा भंग करीत नाहींत."

" आणि या चैनीचें स्वरूप तरी काय? तरुण स्त्रियांनीं आणि मुलींनीं स्तनप्रदेश उघडा टाकून आणि तंग पोषाक घालून अशा प्रकारच्या अर्धनग्न स्थितींत पुरुषांपुढें स्वतःचें प्रदर्शन करावें, हीच यांची मजा. शालीनता हा स्त्रियांचा पहिला अलंकार होय. हा अलंकार झुगारून

देण्यास कोणीहि खरी सभ्य स्त्री कबूल होणार नाहीं. पण अशा स्थितींत परक्या पुरुषास मिठ्या मारून त्यांजबरोबर गिरक्या खाणें हेंच मोठ्या सुधारणेचें लक्षण मानलें जातें. वृद्ध आजीबाईनें अशा गोष्टींना वास्तविक आळा घालावा, पण तसें न करतां त्याहि शिंगें मोडून वासरांत शिरूं पाहतात आणि या किळसवाण्या प्रकाराला स्वतःच उत्तेजन देतात. वृद्ध पुरुषहि त्यांचेच भागीदार. असल्या गोष्टी करण्याला उत्तररात्रीचा काळ पसंत केला जातो, हेंहि रास्तच आहे. कारण काबाडकष्ट करणारे गरीब लोक या वेळीं निद्रेच्या पाशांत सांपडलेले असतात. यामुळें श्रीमंतांचे हे रंगढंग त्यांच्या नजरेस पडत नाहींत. आतां या गोष्टी चोरून कराव्या असें श्रीमंतांना वाटत नाहीं, कारण यांत लाजण्यासारखें कांहीं आहे, हेंच त्यांच्या मनांत येत नाहीं."

"आपल्या स्नेही मंडळींपैकीं एखाद्याला आज खावयास मिळालें नाहीं, असें आपणास कळलें तर त्याला जेऊं घालीपर्यंत आपणास आपलें अन्नहि गोड लागत नाहीं. मग ज्यांच्या जिवावर ही सारी चैन श्रीमंत लोक भोगतात, ते उपाशीं मरतात अथवा अर्धपोटीं राहतात, हा विचारहि त्यांच्या मनांत कसा येत नाहीं, याचेंच मला राहून राहून आश्चर्य वाटतें. दुष्ट पोरें कुत्र्याची शेंपटी पिळतात आणि त्यांला केंकटाऊन आपण हंसतात, त्यांतलाच हा प्रकार होय."

"हजार हजार रुपयांचा पोषाक अंगावर घालून नाचाला जाणारी प्रत्येक स्त्री नाचखान्यांत जन्माला आली होती असें नाहीं. पुष्कळांनीं खेडींपाडीं पाहिलीं होतीं. तेथल्या गरीबांची स्थितीहि त्यांच्या निदर्शनास प्रत्यक्ष आली होती. किमानपक्ष स्वतःच्या घरचीं चाकरमाणसें आणि त्यांचीं कुटुंबें एवढ्यांची तरी माहिती त्यांना असते. आपल्या अर्धनग्न शरीरावर जो पोषाक आपण घालतों, त्याच्या किंमतींत एका गरीब कुटुंबाचें सबंध घर बांधतां येईल, हा विचार त्या स्त्रियांच्या मनांत कधींच येऊं नये काय? मखमल, रेशीम, पक्वान्नें, फुलें, अत्तरें आणि इतर चैनीच्या वस्तु निर्माण करण्यांत किती गरीबांचीं हाडें मोडलीं, हा हिशोब लक्षांत येऊं नये, इतकीं यांचीं डोकीं मठ्ठ आहेत काय? या वस्तु कोणत्या परिस्थितींत निर्माण होतात, हें यांना समजलें पाहिजे;

पण इंद्रियसुखलालसेची मदिरा पिऊन त्यांचीं डोकीं धुंद झालेलीं असतात. यामुळें इतका दूरवर विचार करण्याचें सामर्थ्यच त्यांस नसतें, असेंहि एक वेळ म्हणतां येईल; पण केवळ आपल्या चैनीसाठीं पांच सहा गरीब माणसांना रातभर जागरण करावयास लावून त्यांना आपण थंडींत कांकडत ठेवतों, एवढेंहि तिला समजूं नये काय? शून्य अंशाच्या खालीं बत्तीसाव्या अंशापर्यंत पारा पोंहोंचला असतां आपला गाडीवाला घोड्याची लगाम हातांत धरून तिष्ठत राहिला आहे, हेंहि तिला दिसत नाहीं! पण यांत त्या बिचाऱ्या तरुण पोरींचा तरी काय अपराध? अशा रीतीनें वागण्यांत खप्पड झालेल्या थेरड्यांनाहि जर भूषण वाटतें; तर तरुणांनाहि तसेंच वाटावें, यांत नवल नाहीं. याकरतां तरुणांचा प्रश्न बाजूला ठेवून या प्रश्नाचें उत्तर मी त्या म्हातारड्यांनाच विचारतों."

"हे म्हातारडे कांहीं कमी असतात, असें तुम्ही समजूं नका. त्यांच्यापाशीं याला उत्तर तयार आहेच."

'मी कोणावरहि जुलूम करीत नाहीं. साऱ्या वस्तु मी विकत घेतों आणि नौकरांनाहि पगार देतों. यांत पाप तें काय?'

'मला स्वच्छता आवडते आणि माझे सद्रे जो परीट उत्तम धुईल त्यालाच पैसे देण्याचा माझा करार असतो; मग कपडे धुतां धुतां तो टेकीस आला अथवा मेला तरी त्याचें मला काय?'

'क्रयविक्रय करणें हाच पैशाचा उपयोग आणि मीं एकट्यानें या गोष्टी केल्या नाहींत, म्हणून बाकीचे लोक थोडेच थांबणार आहेत? मीं आपली पिशवी बांधली, तरी दुसरे लोक या वस्तु घेणारच. जग हें असेंच चालावयाचें, मग मीं तरी आपली चैन कां बुडवावी?'

"वास्तविक पाहतां अशा प्रकारच्या जबाबावर अधिक चर्चा करण्याची सुद्धां आपणास लाज वाटली पाहिजे; पण सत्यापासून आपण इतके लांब आलों आहोंत कीं, त्याची पुसटसुद्धां ओळख राहिली नाहीं. यामुळें या विषयाची अधिक चर्चा करणें भाग आहे."

"एकच सद्रा तुम्ही आठवडाभर घातला अथवा विडा ओढण्याचें सोडून दिलें, तर एका परटाचे अथवा एका विडीवालीचे तेवढे श्रम

वाचतील आणि जो पैसा या कामीं तुम्हांस द्यावा लागतो, तो तुम्हास निराश्रितांस देतां येईल.”

“ पण मीं एवढें सांगितलें म्हणजे हे निर्लज्ज लोक थोडेच गप्प बसणार आहेत. ते म्हणतात, तुमचें म्हणणें मीं एकट्यानें कबूल केलें तरी तेवढ्यानें काय होणार ? समुद्रांत खसखस इतकाच त्याचा उपयोग.”

“ असें समजा कीं, रानटी लोकांच्या वस्तींत मी गेलों आहें. येथें फार रुचकर असें मांसाचें पक्कान्न त्यांनीं मला वाढलें आणि दुसऱ्या दिवशीं मला असें कळलें कीं, पाडाव केलेले शत्रूचे लोक कापून त्यांच्या मांसाचें हें पक्कान्न केलें होतें. असें समजल्यावर माझी स्थिति काय होईल बरें ? मनुष्याचें मांस खाण्याची रूढि या लोकांत आहे, आणि तें पक्कान्न मीं खाल्लें नसतें तरी सुद्धां ते कैदी निःसंशय मारले गेले असतेच, या वेदांतानें माझें समाधान होईल काय ? भुकेनें पोटांत काहूर उठविलें, तर आपद्धर्म म्हणून मनुष्याचें मांसहि प्रसंगीं मी खाईन; पण अशा प्रसंगीं चार पाहुणे जेवावयास बोलावून त्या पक्कान्नाची मेजवानी त्यांना देणें, आणि तसें करण्यांत मोठी फुशारकी मारणें हें कर्म तरी माझ्या हातून कालत्रयीं होणार नाहीं.”

* * *

“ कांहीं ना कांहीं काम करणें हें प्रत्येकाला आवश्यकच असतें; पण त्या कामाचें खरें मोल कसें ठरवावयाचें हीच काय ती मुद्याची बाब आहे. आपण ज्यांच्यासाठीं एकादें काम करीत असतां, त्यांना त्याचा उपयोग कितपत होत असतो आणि त्याचा अमुक उपयोग आपणास होतो, अशी जाणीव त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होते कीं नाहीं, हें पाहणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें एकादें काम करतांना तें लोकोपयोगी व्हावें, इतकाच उद्देश आपल्या मनांत असतो कीं नाहीं, हेंहि पाहणें अवश्य आहे. समाज म्हटला कीं, कामाची वांटणी तेथें आलीच. श्रमविभागाचें तत्व एका देहापासून तों थेट राष्ट्रीय देहापर्यंत सारखेंच लागू पडतें. एक देह सुरक्षित राहण्याकरतां हस्तपादादि अवयवांना आपापलीं कामें ज्याप्रमाणें वांटून द्यावीं लागतात, त्याचप्रमाणें राष्ट्रदेह सुरक्षित राहण्याकरितां निरनिराळ्या व्यक्तींस निरनिराळीं कामें करावीं लागतात; पण या राष्ट्र-

देहांत ही होणारी कामाची वांटणी न्याय्य आहे कीं नाहीं, हें कसें समजावें? एकाद्या किड्याच्या अवयवांत कामाची वांटणी कशी असते, याचा शोध शास्त्रज्ञांनीं कितीहि बारकाईनें लावला, तरी राष्ट्रदेहांत कामाची वांटणी न्याय्य रीतीनें करतां येणें त्यांना शक्य नाहीं. ज्यांना मरेमरेपर्यंत काम करावें लागतें, त्यांच्याशीं कितीहि सूक्ष्म बुद्धिवाद तुम्हीं घातलात, तरी आपणास इतकें काम असणें न्याय्य आहे, ही गोष्ट त्यांच्या बुद्धीस कधींहि पटावयाची नाहीं."

"गिरणींत सदोदित राबणाऱ्या मजुराशीं तुम्हीं कितीहि बुद्धिवाद केलात, तरी हा श्रमविभाग नसून ही केवळ गुलामगिरी आहे, असेंच तो म्हणणार; आम्हीं गरीब म्हणून आमच्यावर हा जुलूम तुम्हीं गाजवितां, असेंच तो म्हणणार."

"लोकांना पदोपदीं नडविणारी आणि त्यांच्या योग्य वाढीस पदोपदीं विघात करणारी, जर एकादी संस्था अस्तित्वांत असेल, तर ती सरकार हीच होय. ही गोष्ट केवळ रशियन सरकारासच लागू आहे असें नाहीं, तर जगांतील सारीं सरकारें हीं एकमेकांचीं लहान मोठीं भावंडें होत. मोजदाद करावयास सुद्धां कठिण इतके कामदार मिळून हें सरकार बनलेलें असतें. आज साऱ्या जगभर जो सांपत्तिक घोंटाळा माजला आहे, त्याचें मुख्य कारण चैनीच्या वस्तूंचा भयंकर सुकाळ हें होय. ज्यांची जरूर कोणालाहि पडत नाहीं, असल्या वस्तूंचे ढीगांच्या ढीग प्रत्यहीं तयार होत असतात. वास्तविक त्यांची आवश्यकता कोणालाच नसते."

"एकादा चांभार लोकांच्या उपयोगीं न पडण्यासारखे बूट दिवसभर बांधीत राहिला, तर त्याच्या या श्रमाचा मोबदला लोकांकडून त्याला कधीं तरी मिळेल काय? आपला चरितार्थ लोकांनीं चालविला पाहिजे, असें तो म्हणूं लागला; तर त्याची रवानगी वेड्यांच्या इस्पीतळांत आपण खचित करूं. पण सरकार या नांवाच्या संस्थेंत जे हजारों लोक भरलेले असतात, ते कोणतें लोकोपयोगी काम तयार करीत असतात? अर्वाचिन काळांत हजारों कल्पक व शोधक निघाले; पण त्यांच्या शोधांची खरी आवश्यकता कितीशी आहे? आणि असें असतांहि यांना आम्हीं शिरा-

पुरीचें भोजन नित्य दिलें पाहिजे आणि उत्तमोत्तम कपडे त्यांच्या अंगा वर आम्हीं घातले पाहिजेत, हें नवल नव्हे काय ?"

"एकादा चेटक्या असला, तर उगीच छां छूं करून लोकांकडून साखरभाताचें जेवण तो उपटतो. पण त्याच्या त्या छांछूला लोकांकडून मागणी तरी असते: पण ज्यांच्या क्लृप्त्यांना लोकांकडून मुळींच मागणी नाहीं, असले वीरमंत्री जेव्हां आपला कर आमच्यावर लादतात, तेव्हां त्यांना काय नांव द्यावें, हेंच मला समजत नाहीं. सरकार, धर्म खातें, आणि शास्त्रीय शोधांच्या संस्था हीं सारीं खुळें याच मासल्याचीं होत. हीं खुळें साऱ्या जगभर दिवसाढवळ्या वर तोंड करून नांदत आहेत, आणि त्यांच्यापुढें आम्हांला मान वांकवावी लागत आहे. आणि या साऱ्या गोष्टी श्रमविभागाच्या तत्वानुसार घडत असतात !"

"बांडगुळाप्रमाणें दुसऱ्यांच्या जिवावर तीस वर्षें वयापर्यंत एकादा गृहस्थ आपला चरितार्थ चालवीत असतो. आपलें शिक्षण पुरें होतांन लोकोपयोगी कामें करून या ऋणाची फेड आपण करूं असें वचन या काळांत तो देत असतो. पुढें हा काळ संपतांच बनेतोंपर्यंत श्रमांची टाळाटाळ तो करतो आणि मरेपर्यंत लोकांच्या श्रमावर आपली उपजीविका चालविण्यासाठीं धडपड करतो. आणि अशा रीतीनें प्रत्यक्ष वागत असतांहि लोकोपयोगी कामें मी करीन अथवा करतों, असें तोंडानें तो म्हणत असतोच. जें काम तो करीत असतो, तें तूं कर असें लोकांनीं त्याला कधींच सांगितलेलें नसतें. यालाच श्रमविभाग म्हणावयाचें कीं काय, याचा विचार ज्यानें त्यानें आपल्या मनाशीं करावा. केवळ मनगटाच्या जोरावर दुसऱ्यांच्या श्रमांचा हा अपहार होय, असें मी स्पष्ट म्हणतों. याला, 'ईश्वरी रचना असें' नांव धर्मशास्त्रज्ञांनीं द्यावें अथवा 'राष्ट्रदेहाचा श्रमविभाग' असें अर्थशास्त्रज्ञांनीं खुशाल म्हणावें. मनुष्यप्राणि अस्तित्वांत आला, त्या काळापासून हें श्रमविभागाचें तत्व त्यानें मान्य केलें आहे आणि पुढेंहि तें तो मान्य करीत राहील. याकरतां श्रमविभाग हवा कीं न व्हावा हा प्रश्न मुद्याचा नाहीं; पण श्रमांची वांटणी न्याय्य रीतीनें झाली आहे कीं नाहीं, हें कोणत्या मापानें ठरवावें, हाच प्रश्न आहे."

"श्रमविभागांत मानसिक आणि शारीरिक असे दोन भेद करण्यांत येत असतात. यांपैकीं मानसिक श्रम करणारांची बडेजावकी सध्यां इतक्या शिकोपास गेली आहे कीं, एकाद्या पंडितानें कोणत्याहि कामाला हात लावणें ही कल्पनासुद्धां आम्हांस सहन होईनाशी झाली आहे. त्यानें नांगराला हात लावला, तर त्याच्या डोक्यांतलें शहाणपण तावडतोब गळून जाईल असें आम्हांस वाटतें; पण लोकांच्या श्रमावर सदोदित चरणारा हा विद्वान गृहस्थ आपल्या आयुष्यांतला अर्धाअधिक काळ खाऊनपिऊन मजा मारणें, शुष्क गप्पागोष्टी करणें, कादंबऱ्या आणि वर्तमानपत्रें वाचण्यांत, आणि नाटकें, तमाशे पाहण्यांत घालवीत असतो, हें आमच्या लक्षांत येत नाहीं. काफीपान गृहांत, नाटकगृहांत अथवा नाचाच्या समारंभांत आमच्या तत्ववेत्त्यांना चैन करतांना पाहून आम्हांस यत्किंचितहि आश्चर्य वाटत नाहीं. आम्हांला सुमार्गाला लावण्याचा विडा ज्यांनीं उचलावा, त्यांनींच आपल्या आयुष्याचा व्यय दारूबाजींत, जुगारींत, रंडिबाजींत अथवा याहिपेक्षां वाईट छंदांत करावा, यांत कांहीं विपरीत आहे, असें आमच्या मनांतहि येत नाहीं."

"आपण कांहीं चमत्कार करून दाखविणार आहों, असें हे सगळे लोक जनतेस नित्य भासवीत असतात. आपला योगक्षेम अशा रीतीनें न चालला, तर शास्त्रें आणि कला यांची घडगत नाहीं, असेंच जणू काय ते लोकांस भासवीत असतात. प्राचीन काळच्या चेटक्यांना, मांत्रिकांना आणि किमयागारांनाहि असेंच वाटत होतें."

"शास्त्रें आणि कला यांची आवश्यकता मानवी जीविताला आहे, ही गोष्ट मलाहि मान्य आहे; किंबहुना अन्न आणि पाणी यांजहूनहि त्यांची आवश्यकता अधिक आहे, हेंहि एक वेळ मी कबूल करीन; पण शास्त्र आणि कला या सभ्य नांवाखालीं वावरणाऱ्या सर्व चिजा तशाच उपयुक्त आहेत, हें मात्र मी कधींहि कबूल करणार नाहीं. मानवी ज्ञानांतहि पायऱ्या आहेत. त्यांत वरची पायरी कोणाची आणि खालची कोणाची याचा विचार आपण अवश्य केला पाहिजे."

"मानवी जीविताची इतिकर्तव्यता काय आणि त्याचें खरें कल्याण कशांत आहे, हें सांगणारे महा पुरुष मानवी जातीच्या आरंभकाळापासून

तिच्यांत निर्माण झाले आहेत. त्यांनीं जीं शास्त्रें निर्माण केलीं, तीं अर्थातच पहिल्या प्रतीचीं होत. कारण मनुष्याच्या साऱ्या जीविताच्या ओघास तीं शास्त्रें वळण लावीत असतात. मनुष्याच्या ज्ञानांत वरच्या पायरीचें कोणतें आणि खालच्या पायरीचें कोणतें, हें या शास्त्रांच्या दृष्टीनें ठरविलें पाहिजे."

"इतिहासाच्या अरुणोदयकाळापासून हे खोटे शास्त्रीपंडित अस्तित्वांत असल्याचें दिसून येतें. मानवी जीविताची इतिकर्तव्यता काय, हें सांगण्याचें काम वास्तविकपणें त्याचेंच होय; पण तसें न करतां लोकांस फसवून त्यांची दिशाभूल कशी करावी आणि आपल्या पोळीवर तूप कसें ओढावें, याच गोष्टीचा विचार ते करीत. ज्ञानाचा खरा मार्ग त्यांनीं झांकून टाकला. इजिप्शियन्, हिंदू, चिनी, ग्रीक इत्यादि साऱ्या लोकांत असले भोजनभाऊ पंडित अस्तित्वांत आले आहेत आणि त्यांची ही परंपरा आपल्या या चालू काळापर्यंत अखंड राहिली आहे."

"हल्लींचा काळ म्हणजे सुवर्णयुग आहे, असें हे लोक आम्हास भासवीत असतात. अशा काळांत जन्मास येण्यास महत्भाग्य पाहिजे, असें ते म्हणतात. अर्वाचीन शास्त्रांनीं नैसर्गिक शक्तीवर मिळविलेले विजय आणि त्यामुळें पालटलेलें जगाचें स्वरूप यांचें वर्णन तिखटमीठ लावून ते करीत असतात; पण मनुष्यप्राणी किती वेडा आहे ! स्वतःचें खरें रूपहि त्याच्या लक्षांत येत नाहीं. आपलें वांकडें तोंड त्याला सरळ दिसतें. प्राचीन काळीं ज्या ज्या शास्त्रांनीं हल्लींच्याप्रमाणेंच त्या वेळच्या जनतेचे डोळे दिपवून टाकले, तींच शास्त्रें कालांतरानें निर्माल्यवत् होऊन त्यांचें अस्तित्व नुसत्या नांवावांचून दुसऱ्या कोठेंहि दिसत नाहीं. मग सांप्रतचीं हीं शास्त्रें विलयास जाणार नाहींतच, अशी हमी कोण देऊं शकेल ?"

"सूक्ष्म दृष्टीनें पाहणारास या भवितव्यतेचीं चिन्हें आजच दिसत आहेत; पण अशा स्थितींतहि आम्ही पूर्वीसारखेच आंधळे राहिलों आहों. पूर्वींच्या लोकांहून आम्ही अधिक भाग्यवान् असें आम्हास वाटतें, सत्याचा मार्ग आम्हासच सांपडला आहे, हा आमचा विश्वास अद्यापीहि ढळत नाहीं; पण ज्या ज्ञानाबद्दल एवढी फुशारकी आम्ही मारतों, त्याचा प्रसार सामान्य लोकांत किती आहे आणि त्याची गरज तरी लोकांना

कितीशी आहे, याचा विचार आम्ही मुळींच करीत नाहीं. यामुळें आमचें सारें ज्ञान आम्हापाशींच राहतें आणि सामान्य जनता आम्हापासून विभक्त होऊन चालू परंपरेनें आपला काळ पूर्वींप्रमाणेंच कंठित असते. हा विभक्तपणा दिवसेंदिवस वाढत जात आहे, आणि त्यामुळें एकंदर समाजाची स्थिति अत्यंत शोचनीय होत चालली आहे. अशा स्थितींत अधिक डोळेझांक न करतां या भावी संकटाचें स्वरूप ओळखून त्याला धैर्यानें तोंड देण्याची तयारी आपण आजच केली पाहिजे."

"एकंदर परिस्थितीचें नीट अवलोकन करून समाजाच्या या रोगावर कांहीं तरी इलाज करण्याची वेळ आली आहे. आम्हा विद्वानांची स्थिति सध्यांच्या काळीं गंजीवरील कुत्र्याप्रमाणें झाली आहे. आम्ही स्वतः खात नाहीं आणि लोकांसहि खाऊं देत नाहीं. स्वर्गाच्या द्वारावर हातांत सोटे घेऊन आम्ही उभे राहिलों आहों. आम्हीं स्वतः आंत जाणार नाहीं आणि दुसऱ्यासहि जाऊं देणार नाहीं, हीच जणूं काय आमची प्रतिज्ञा. धर्माच्या नांवानें लोकांस लुबाडणारीं भटेंभिक्षुकें लबाड, असा टाहो आम्ही फोडीत असतों, पण आम्ही शास्त्रदेवतेचे उपाध्ये अधिक लबाड आणि अधिक लफंगे आहों. आम्हास कवडीचेंहि मोल नसतां सामान्य जनाच्या डोळ्यांत धूळ फेंकून मुलाम्याचें नाणें आम्ही खऱ्याच्या भावानें विकीत असतों. ज्या देव्हाऱ्यांत बसून जनतेची पूजा आम्ही ग्रहण करतों त्यांत बसण्याचा यत्किंचितहि हक्क आम्हास नाहीं. तो हक्क लुच्चेगिरीनें आम्ही मिळविला आहे आणि त्याचें संरक्षण भामटेगिरीनें आम्हीं करीत आहों."

"जुन्या क्याथोलिक पंथांतील धर्माधिकारीहि अशाच रीतीनें लोकांना लुबाडतात, असा आक्षेप त्यांजविरुद्ध कोणी घेत असतात. यावर माझें उत्तर इतकेंच कीं, मुक्तीचा मार्ग लोकांना आपण दाखवितों, असें तोंडानें तरी ते म्हणतात. आम्ही त्यांना उलथून पाडून त्यांची जागा बळकावली; पण मनुष्याचा जीवनक्रम कसा असावा, हें त्यांस शिकविलें नाहीं, किंबहुना असल्या प्रकारच्या इंद्रियातीत विषयांच्या मागें लागण्यात अर्थ नाहीं, असेंहि आम्ही स्पष्ट म्हणतों आणि असें असतांहि आमचा योगक्षेम सामान्य लोकांनीं उत्तम प्रकारें चालविला पाहिजे, असें आम्हास वाटतें.

आणि हाच बांडगुळाचा जीवनक्रम आपल्या मुलांसहि चालवितां यावा, अशा पद्धतीचें शिक्षण आम्ही त्यांस देत असतों."

"प्राचीन काळीं जातिभेद होते, आणि आम्हीं आतां ते नाहींसे केले आहेत, असा गर्व आम्ही वाहतों, पण एका वर्गानें सदोदित कामाखालीं मरावें, आणि दुसऱ्यांनीं सदोदित आळसांत लोळावें, हा भेद आमच्या लक्षांत येत नाहीं. रशियन भाषेचें अक्षरहि ज्याला कळत नाहीं, अशा एकाद्या हिंदूला रशियांत कांहीं दिवस आणून ठेविलें, तर आळशी आणि काम करणारे अशा दोन जाती रशियांत आहेत, हें तो तावडतोब सांगेल. कोठेंहि झालें, तरी जगांत मुख्य जाती या दोन."

"लोकांच्या श्रमावर स्वतः फुकट चरणें, हा आमचा जन्मसिद्ध हक्क आहे, असेंच आम्हास वाटतें. आमच्या बुद्धीचा इतका विपर्यास चालू शिक्षणपद्धतीमुळें झाला आहे. आमचीं डोकीं या शिक्षणानें इतकीं भ्रमिष्ट केलीं आहेत कीं, ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी उघड असतांहि आम्हास दिसत नाहीं. आणि अशा स्थितींतहि आम्ही स्वतःस खिस्ताचे अनुयायी म्हणवितों. आम्ही सुशिक्षित, आम्ही गरीबांचे कनवाळू, आम्ही दयेचे सागर असें म्हणविण्यास यत्किंचितहि दिक्कत आम्हास वाटत नाहीं."

"मग आतां करावें काय ?"

"या प्रश्नाला जें उत्तर मला मिळालें आहे, तें कोणाहि सच्या दिलाच्या मनुष्याला पटण्यासारखें आहे, असें मला वाटतें. तें उत्तर असें.—चालू खोटा जीवनक्रम आपण टाकला पाहिजे. या भ्रामक जीवनक्रमामुळें आम्ही लोकांची आणि स्वतःचीहि फसवणूक करीत आहों. लोकांस फसविणें हें मोठें पातक आहे, असें आपण म्हणतों; पण त्याहूनहि मोठें पातक म्हटलें म्हणजे स्वतःस फसविणें हें होय. स्वतःच्या विवेकबुद्धीचे डोळे बांधण्याइतकें मोठें पाप दुसरें कोणतेंहि नाहीं."

"परमेश्वराची मोठी कृपा कीं, चालू जीवनक्रमांतलि हा भ्रामकपणा माझ्या लक्षांत आला आणि तो जीवनक्रम सोडून देण्याइतकें धैर्य माझ्या ठिकाणीं होतें, ही परमेश्वराची विशेष कृपा होय. हा चालू क्रम मीं सोडून दिला आणि या माझ्या कृतींचें चीजहि चांगलें झालें.

चालू जीवनक्रम म्हणजे अन्योन्य संबंध नसलेल्या अनेक फसव्या गोष्टींचा बाजार आहे, असें मला स्पष्ट दिसूं लागलें. ज्या गोष्टी पूर्वी मला समजत नव्हत्या, त्यांचा अर्थ माझ्या लक्षांत येऊं लागला."

"माझी बुद्धि अनुपम आहे आणि जें जें कार्य मी करतों, तें तें बिनमोल आहे, असें आपणापैकीं प्रत्येकास वाटतें. स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल फाजील घमेंड बाळगण्यास आपण नेहमींच तयार असतों. ही खोटी समजूत ज्याला नाहींशी करावयाची असेल, त्यानें स्वतःच्या सुशिक्षितपणाच्या सार्‍या कल्पना प्रथम बाजूस ठेवल्या पाहिजेत. विश्वविद्यालयानें आपणांवर शिक्का मारला, एवढ्यानेंच आपण सामान्य जनातीत झालों, ही कल्पना आपण प्रथम टाकून दिली पाहिजे. जे लोक हातानें काम करतात; त्यांच्याबरोबर काम करणें आपलें कर्तव्य आहे, ही जाणीव आमच्या ठिकाणीं उत्पन्न झाली पाहिजे."

"विश्वविद्यालयांतील शिक्षणानें उत्पन्न केलेला खोटा दंभ झुगारून देऊन स्वतःस मी सामान्यांपैकींच समजूं लागलों, तेव्हां माझा पुढील मार्ग मला स्पष्ट दिसूं लागला. या मार्गाचा प्रारंभ म्हटला म्हणजे स्वतःचें अन्न स्वतःच्या कष्टानें मिळविणें हा आहे. आपली चाकरी आपण तर करावयाचीच; पण याशिवाय प्रत्येक प्रसंगीं दुसर्‍याचीहि सेवा करावयाची, हा या मार्गांतला पहिला धडा होय. आपणास कांहीं विशिष्ट हक्क जन्म-दारभ्यच प्राप्त झाले आहेत, असें कोणीहि समजूं नये. मानवी जीवित हक्क भोगण्यासाठीं नसून आपलें कर्तव्य बजावण्याकरितां आणि परसेवा करून ऋणमुक्त होण्याकरतां आहे, हें आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि या दृष्टीनें विचार केला म्हणजे स्वतःचा जीव जगविण्यास लागणारी साधनसामुग्री स्वतःच मिळविणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे, हें कोणाच्याहि लक्षांत येईल. प्रथम हें कर्तव्य आपण करूं लागूं, तेव्हांच इतर गोष्टी करावयाचा हक्क आपणास मिळेल. एखादा मनुष्य अरण्यांत राहूं लागला आणि देहधारणाकरतां हात सुद्धां हलवावयाचा नाहीं, असा त्यानें तेथें निश्चय केला, तर त्याबद्दल निसर्गाकडून त्याला देहदंडाची शिक्षा तावड-तोब होईल. मग तोच मनुष्य सामान्य लोकांत राहूं लागला, आणि स्वतःच्या पोटाकरितां काहींच उद्योग त्यानें केला नाहीं, तर त्यालाहि कांहीं शिक्षा

अवश्य पाहिजे. अशा स्थितींत त्याचा जीवनक्रम विवेकशून्य आणि विसंगत बनत जातो, हीच त्याला शिक्षा."

" आतां अशा प्रकारच्या उद्योगास आरंभ करावयाचा तर आपल्याच सारख्या विचारांचे चार स्नेहीसोबती आपणाजवळ पाहिजेत आणि अशा गोष्टीस आपल्या कुटुंबीयांचीहि संमति पाहिजे, असें आरंभीं माझ्या मनांत आलें; पण पुढें मी असा विचार केला कीं, माझ्या या कृतीनें माझ्या ठिकाणीं दंभ उत्पन्न होणार नाहीं काय ? माझ्यासारख्या कुलीन माणसानें शारीरिक श्रम केलेले नव्हते. तेव्हां ही रूढिविरुद्ध गोष्ट लोकांत गाजावाजा करून करणें इष्ट नाहीं, हें मला तेव्हांच दिसून आलें. आपल्या स्नेह्यासोबत्यांची संमति अशा गोष्टीला विचारणें म्हणजे आपल्या निरभिमानपणाचें नसतें स्तोम माजविणें होय, असें मनांत येऊन माझी मलाच लाज वाटली."

" अशी स्थिति थोडेच दिवस चालली. प्रथम आपलीं रोजचीं कामें आपणच करावयाचीं असें ठरवून स्वतःच चुला पेटवून माझें चहापाणी स्वतःच्या हातानें मी करूं लागलों. रोज लागणारें पाणी मी आपल्याच हातानें भरून ठेवूं लागलों. आणि कपड्याची व्यवस्थाहि माझी मीच पाहूं लागलों. प्रथम कांहीं दिवस माझी ही वर्तणुक पाहून चाकर माणसें बिचकल्यासारखीं दिसत; पण पुढें लवकरच या गोष्टीचें त्यांना कांहीं वाटेनासें झालें."

" अशा रीतीनें या कामांत वेळ पुष्कळ मोडला, तर लेखन वाचनाचें काम माझ्या हातून होणार नाहीं, ही एक अडचण आरंभीं मला भासली होती. लेखनापासून मला स्वतः तर आनंद होत असेच; पण माझे लेख उपयुक्त आहेत, असेंहि केव्हां केव्हां माझ्या मनांत येई. यामुळें या शारीरिकश्रमाचा परिणाम माझ्या विचारशक्तीवर विपरीत होतो कीं काय, अशी धास्ती आरंभीं मला वाटत होती; पण प्रत्यक्ष अनुभवानें अखेरीस ती निखालस खोटी ठरली. उलट शारीरिक मेहनतीमुळें मनाची क्रियाशक्ति वाढते, असाच अनुभव मला आला."

" शारीरिकश्रमाकडे सरासरीनें दिवसाचे आठतास मोडत. आणि इतकें करूनहि मानसिक काम चारपांच तासपर्यंत मला चांगल्यारीतीनें

करतां येत होतें. आणि माझी लेखनक्रियाहि पूर्वीपेक्षां अधिक सरळ चाले. हाच क्रम मीं आरंभीं स्वीकारला असता; तर जे लेख लिहावयास मला चाळीस वर्षें लागलीं, ते सारे केवळ चवदा वर्षांत मीं लिहून टाकले असते. हा हिशेब इतका साधा आहे कीं, एकाद्या लहान मुलालाहि तो सहज समजेल. दिवसाच्या चोवीस तासांपैकीं आपले आठ तास झोंपेंत जातात. बाकीच्या सोळा तासांचें काय होतें ? मानसिक श्रमाकडे केवळ पांचच तास एकाद्यानें रोजचे खर्च केले, तर त्याच्या हातून केवढें तरी कार्य होईल आणि बाकीच्या अकरा तासांचे काय होतें ? याचा हिशोब कोणीच पहात नाहीं."

"शारीरिकश्रमानें मानसिक शक्ती क्षीण होत नाहींतच; पण उलट त्या वाढीस लागतात, हा माझा प्रत्यक्ष अनुभव सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा आहे."

"इतका वेळ शारीरिक श्रमांत घालवावयाचा म्हटलें, तर ज्ञान संपादन केव्हां करावें ? बायकांमुलांशीं गप्पागोष्टी केव्हां कराव्या आणि संसारसुख कधीं भोगावें ? असेहि प्रश्न कोणी करील. त्यांना माझें अनुभवाचें उत्तर इतकेंच कीं, शारीरिक श्रम विशेषतः शेतकीचे श्रम तुम्ही करून पहा, म्हणजे या साऱ्या गोष्टींची चव तुम्हास अधिक कळून येईल."

"आतां येथें आणखीहि एक प्रश्न उपस्थित होण्याचा संभव आहे. स्वतःचें काम स्वतःच करावयाचें म्हटलें, तरी माझ्या इतक्या गरजा मी एकटाच कसा भागविणार ? पण माझ्या पुष्कळशा गरजा खोट्या असून, केवळ फाजील लाडानें त्या वाढल्या होत्या, असें मला कळून आलें. माझे शारीरिक श्रम वाढत गेले, तशा या गरजाहि कमी होत गेल्या आणि त्या केव्हां नाहींशा झाल्या, हें मला समजलें सुद्धां नाहीं. कुबेरालाहि भीक लावतील, अशा सवयी केवळ फ्याशनच्या नादीं लागून आम्ही आपल्या अंगीं जडवून घेतल्या आहेत. या साऱ्या सवयी आपोआपच नाहींशा होतात. त्याचप्रमाणें माझ्या खाद्यपेयांतहि विलक्षण बदल झाला जेवायला बसलें म्हणजे भूक जागी करण्यासाठीं नाना प्रकारच्या चटण्या, कोशिंबिरी आणि सुंदर पक्वान्नें मला लागत; पण मी शारीरिक कष्ट करूं

लागल्यापासून जोंधळ्याची भाकरी आणि कोबीची आमटी या वस्तु मला अमृतापेक्षांहि गोड लागूं लागल्या."

"माझें वय बरेंच झाल्यामुळें अशा वयांत शारीरिक श्रम तुम्हांस सोसणार नाहींत, अशी भीति कांहीं डॉक्टरांनीं मला घातली होती, पण मला अनुभव आला तो असा कीं, शारीरिक कष्ट जों जों अधिक तों तों माझी प्रकृति अधिक निकोप राही आणि माझें मनहि अधिक उल्हासित राही."

"संशयसागरांत गटंगळ्या खातां खातां आणि बुद्धीला विचाराची शीण देतां देतां, ज्या मोठ्या तत्वाचा शोध मीं लावला, तें हेंच कीं, डोळे पाहण्याकरतां, पाय चालण्याकरतां आणि हात व पाठ हीं काम करण्याकरतां परमेश्वरानें मनुष्यास दिलीं आहेत. यांचा उपयोग न करणारा मनुष्य सृष्टीच्या दंडास पात्र होतो. हें साधें तत्व समजावयास मला इतका काळ आणि इतके श्रम लागले, याबद्दल माझें मलाच हंसूं येऊं लागलें."

"रूसो–तुर्क युद्धांत एका सरबराई कासगारानें धान्य खरेदीच्या कामावर एका शेतकऱ्याची योजना केली होती. पुष्कळ दिवस हें काम करतां करतां कांहीं कारणानें त्या शेतकऱ्याला वेड लागलें. आपण कोणी मोठे सरदार असून सरकारी कंत्राटदार असल्यामुळें बादशहानें आम्ही सर्व सरबराई उत्तम प्रकारें ठेवली पाहिजे, अशी वडबड तो करी."

"तूं कांहीं काम करशील का ? असा प्रश्न कोणी त्याला केला, तेव्हां तो म्हणाला, 'माफ करा मेहेरबान. काम करणें हें भिकारड्या शेतकऱ्यांकडे सोंपविलें आहे. शेतकऱ्यांचा जन्मच त्यासाठीं आहे आणि सांप्रतच्या नाना प्रकारच्या यंत्रांमुळें तर त्याचें काम अधिकच सुलभ झालें आहे. यामुळें केवढेहि शारीरिक श्रम करणें त्यांच्या आहाराबाहेर नाहीं.'"

"यावर तो दुसरा गृहस्थ म्हणाला, 'मग तूं जगतोस तरी कशाकरतां ?' कंत्राटदार महाराजांनीं उत्तर दिलें, 'अहो, कशाला म्हणून काय विचारतां !' कसा तरी वेळ घालविण्याकरतां !"

"हा वेडा कंत्राटदार आरशासारखा आहे, असें मला वाटतें. माझ्यासारख्या श्रीमान वर्गापैकीं ज्याला आपलें खरें स्वरूप पाहण्याची इच्छा असेल त्यानें त्याच्या समोर उभें राहून आपलें चोख स्वरूप पाहून घ्यावें."

" कसा तरी काळ घालविणें आणि गरीब लोकांना राबवून स्वतः चैन करणें, हेंच आम्हां श्रीमंतांचें धर्मतत्व आहे. गरीब लोकांसाठीं आम्ही काय केलें पाहिजे, असा प्रश्न आम्ही विचारतों, तेव्हां तो विचारण्यांत आमचा वास्तविक हेतु कांहींच नसतो. किंबहुना आम्हास कांहींच करतां येणें शक्य नाहीं, इतकेंच आमच्या मनांतून लोकांवर बिंबवावयाचें असतें."

" या बाबतींत पूर्ण विचारक्रांति झाल्याशिवाय या प्रश्नाचें समाधान कारक उत्तर कधींहि मिळावयाचें नाहीं. लोकांच्या जिवावर चरणें हें घोर पातक आहे, असें श्रीमंतांस वाटूं लागलें पाहिजे. त्याचप्रमाणे शेतकरी म्हणजे निव्वळ चालतेंबोलतें यंत्र असून त्यांत अन्न भरून त्याज कडून वाटेल तितकें काम घ्यावें, हेंहि महापातक आहे, असें श्रीमंतांस कळलें पाहिजे. इतकी विचारक्रांति झाल्यानंतर सत्यविचारांचा उदय आपोआप होईल आणि 'आम्ही काय केलें पाहिजे' या प्रश्नाचा निकाल कायमचा लागेल."

" श्रमविभागामुळें फायदा होतो, असें एक महातत्व अर्वाचीन काळीं सांगण्यांत येतें; पण हा फायदा कोणाच्या पदरीं पडतो, याचा विचार हे तत्वज्ञ मुळींच करीत नाहींत. या तत्वाच्या धोरणानें सांप्रत काळीं नाना प्रकारच्या चैनीच्या वस्तूंची पैदास विपुल होऊं लागली आहे; पण या वस्तु करण्यांत कोणत्या वर्गाचे श्रम खर्ची पडतात आणि त्या वापरणारा वर्ग कोणता, याचा विचार हे तत्वज्ञ मुळींच करीत नाहींत. केवळ चैनीच्या वस्तु बनाविण्यांत कित्येकांच्या पिढ्यांच्या पिढ्या गेल्या आहेत; पण अशा प्रकारच्या श्रमविभागाने एकदर मनुष्यजातीचा फायदा कसा होतो, हें माझ्या तरी लक्षांत येत नाहीं. या साऱ्या वस्तु जीवितास अत्यंत आवश्यक अशा असल्या, तर तुमचें म्हणणें मला कांहीं तरी खरें वाटलें असतें. तुम्हाला सामान्य मनुष्य जातींचें कल्याण साधावयाचें आहे ना? तुमचा मुख्य उद्देश हाच आहे ना? मग लक्षावधि मनुष्यांवर जुलूम करून त्यांना जनावरापेक्षांहि खालच्या पायरीवर ठेवून एकसारखें राबविणें यात त्यांचें कल्याण आहे काय?"

" एकंदर जनतेचें कल्याण हा आमचा उद्देश नसून मूठभर लोकांना चैन करतां यावी इतकाच आमचा हेतु आहे, असें तुमचें म्हणणें असेल,

तर त्याला सोपा उपाय म्हटला म्हणजे कांहीं मनुष्यांनीं दुसऱ्या मनुष्यांस खावें, हा होय. माणसाचें मांस मोठें रुचकर असतें, असें मनुष्यभक्षक रानटी लोक सांगतात. पण लक्षावधि मनुष्यांचे देह आणि त्यांचीं मनें हीं सदोदित संतुष्ट रहावींत, यांतच मानवजातीचा खरा फायदा आहे, असें मला तरी वाटतें आणि हा फायदा साधावयाचा असेल, तर श्रीमंतांनीं काम करूं नये, हें वेडेपणाचें तत्व समूळ नाहींसें झालें पाहिजे. या खुळांतून श्रीमंत लोक जेव्हां बरे होतील, तेव्हांच मानवजातींत शांति आणि संतोष हीं नांदूं लागतील. साऱ्या जगभर आज जो उफराटा कारभार दिसून येतो, तो नाहींसा करून मानवी जीवित सुसंगत करणें, हाच एक सुलभ उपाय होय."

"मानवी जातीपुढें हा प्रश्न फार जुन्या काळापासून आहे. एकाचे श्रम दुसऱ्यानें खावे ही रीत प्राचीन काळापासून अस्तित्वांत आहे. जुन्या काळीं गुलामगिरी अस्तित्वांत होती. आणि सांप्रत तिचें रूपांतर मिळकतींत झालें आहे. मिळकत मिळकत म्हणून संपत्तीचा मोठा भाग श्रीमंतांनीं आपल्या हाताखालीं घालावा, आणि त्याच्या जोरावर गरीबांस पाहिजे तसें राबवावें, हें गुलामगिरीचें नवें रूपांतर होय."

"सांप्रतचा मालमत्तेचा कायदा हाच या सर्व अरिष्टांच्या मुळाशीं आहे. यामुळेंच मिळकत असलेले आणि नसलेले या दोघांचेंहि नुकसान होत आहे. संपत्तीचा जे दुरुपयोग करतात, ते विवेकभ्रष्ट होऊन अधोगतीला जात आहेत आणि श्रीमंत व अकिंचन यांजमध्यें भयंकर तेढ उत्पन्न होऊन ती हातघाईला येण्याचीं चिन्हें आजच आपणास दिसूं लागलीं आहेत."

"निरनिराळीं राज्यें आणि त्यांचीं सरकारें हीं नाना प्रकारचीं खलबतें करतात आणि एकमेकांशीं युद्धें करतात. तींहि या मिळकतीच्याच लालचीमुळें. ऱ्हाईन नदीच्या कांठचा मुलूख, आफ्रिका, चीन अथवा बालकन द्वीपकल्प यांतील स्पर्धेचें मूळ या मिळकतींतच आहे. पेढीवाले, व्यापारी, कारखानदार आणि जमीनदार या लोकांचा जन्मभर उद्योग पाहिला तर हाच. सरकारी कामगारहि याच पंथाचे. न्यायाच्या अदालती आणि पोलिस यांचें काम मिळकतीचें संरक्षण करणें हेंच. काळ्या

पाण्याच्या जागा, तुरुंग आणि याच जातीच्या इतर भयंकर जागा यांचें अस्तित्व या मिळकतीमुळेंच चालू राहिलें आहे."

"मालमत्ता अथवा मिळकत या शब्दांचा अर्थ तरी काय ? एकाद्या जिनसावर मनुष्याची सत्ता अप्रतिहतपणें चालत असली म्हणजे तो जिन्नस, त्याची मिळकत असें आपण म्हणतों. मनुष्याला हातपाय वगैरे अवयव ज्याप्रमाणें निसर्गानें दिले आहेत, त्याचप्रमाणें घरहि त्याला निसर्गानेंच दिलें आहे, असा आपला पक्का समज झाला आहे. हा माझा हात आणि हें माझें घर या दोन वाक्यांत आपणास कांहींच फरक दिसत नाहीं; पण वास्तविक पाहतां या दोन वस्तु एकाच जातीच्या आहेत असें म्हणणें ही मोठी चूक आहे. हें बुद्धिहीनतेचें लक्षण आहे. वास्तविक मालमत्ता हें दुसऱ्याचे श्रम फुकट खाण्याचें एक साधन मात्र आहे. लोकांचे श्रम म्हणजे माझी मालमिळकत असें मला खचित म्हणतां येणार नाहीं. माझ्या इच्छाशक्तीशीं आणि ज्ञाणिवेशीं ज्या वस्तूंचा प्रत्यक्ष संबंध असेल, आणि ज्या वस्तूंची क्रिया केवळ माझ्या इच्छेवर अवलंबून असेल, त्याच वस्तु केवळ माझ्या हेत."

"तर मग मालमत्ता म्हणजे काय ? मालमत्ता म्हणजे जीवर माझी अप्रतिहत सत्ता चालते आणि जिची कशीहि वाट लावण्यास मला पूर्ण सत्ता आहे, ती. जी मजपासून कोणासहि घेतां येत नाहीं, आणि मरेपर्यंत मजबरोबर जी अवश्य असणार, तेवढीच माझी मालमत्ता. या मालमत्तेचा योग्य उपयोग करून तिच्यांत सुधारणा करणें व ती वाढीस लावणें, हें माझें अवश्य कर्तव्य होय."

"मनुष्याचीं जड इंद्रियें आणि त्याच्या मानसिक शक्ती, एवढीच त्याची खरी मालमत्ता होय. पण हा खरा अर्थ बाजूस राहून दुसऱ्याचे श्रम फुकट खाण्याकरितां मालमत्ता या शब्दाचा अर्थ जेव्हां बदलण्यांत आला, तेव्हांच युद्धें, खून, फांशीच्या शिक्षा, कायदे आणि त्यांच्या अदालती आणि तुरुंग इत्यादि वस्तूंचें बीज पेरलें गेलें."

"प्रसंग पडल्यास गटारें उपसणेंसुद्धां नामुष्कीचें काम नाहीं, असें ज्या दिवशीं माझ्या वर्गांतील लोकांस वाटू लागेल, त्याच दिवशीं समाजाच्या खऱ्या प्रगतीस आरंभ होईल. माझ्या वर्गाचे लोक गटारें भरून

ठेवण्याचें काम मात्र स्वतः करतात आणि लोकांकडून तीं जबरीनें उपसवितात. स्वतःचे बूट लोकांकडून जबरीनें करवून अनवाणी चालणारांच्या शेजारून जाण्यांत त्यांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं. फ्रेंच भाषा येत नसणें अथवा अगदीं ताजी खबर ठाऊक नसणें, हें त्यांस मोठें लाजीरवाणें वाटतें; पण भाकरी तयार करण्याची विद्या ठाऊक नसतां ती खाण्याची शरम त्यांस मुळींच वाटत नाहीं. कडकडीत इस्त्रीचे कपडे नसले, म्हणजे त्यांस लाज वाटते; पण हे कपडे त्यांचा आळस आणि फुकटखाऊपणा जगजाहीर करीत असतात, याची लाज त्यांना वाटत नाहीं. हात मळकट असणें हें त्यांस लज्जास्पद वाटतें; पण कामानें कडक झालेले आणि मळलेले हात हें उद्योगशीलतेचें लक्षण आहे."

"याकरतां समाजाची सुधारणा तुम्हास करणें असेल, तर मालमत्तेसंबंधीं जे ग्रह तुमच्या डोक्यांत पक्के होऊन बसले आहेत, ते तुम्ही काढून टाकले पाहिजेत. सर्व प्रकारची सत्ता आज पैशाच्या हातीं आहे व ती तशी असणें हें न्याय्यहि आहे, असा तुमचा समज आहे. हा समज आपल्या डोक्यांतून तुम्हीं काढून टाकला पाहिजे. लक्षावधि लोक कामाखालीं रगडले जात असतां उंची कपडे घालून इकडून तिकडे उगीच मिरवणें लज्जास्पद आहे, हें तुम्हास कळलें पाहिजे. शेंकडों लोक भुकेनें मरत असतां आपल्या कुत्र्याला शिरापुरी खाऊं घालणें अयोग्य आहे, हें तुमच्या चित्तावर ठसलें पाहिजे. सामान्य जनांत जे विचार आज रूढ झालेले आहेत त्यांची आमूलाग्र क्रांति होऊन नवे विचार जेव्हां जन्मास येतील तेव्हांच हल्लींच्या बऱ्यावाइटाच्या कल्पनांचीहि क्रांति होईल. अशी क्रांति होणार अशीं चिन्हें आजच दिसूं लागलीं आहेत. तुम्हाला आवडो अगर न आवडो, पण अशा क्रांतीच्या दिवसांकडे यदृच्छा तुम्हाला खेंचून नेत आहे. सामान्य जनतेचीं चित्तें या नव्या विचाराकडे वळलीं आहेत. स्त्रियांच्या मनांतहि या नव्या विचारांचें बीजारोपण झालें आहे. आतां त्याचा वृक्ष होण्याचाच अवकाश आपणास आहे."

"आपल्या जीवितास अवश्यक अशीं कर्तव्यें करण्याचें पुरुषांनीं टाळलें, तर सबंध मानवजाती मृत्युपंथास लागेल आणि हीच जबाबदारी स्त्रियांनीं टाळली, तर हा मृत्यु येण्यास एकादी पिढी अधिक लागेल."

" आपणावरील जबाबदारी अनेक शतकांपासून पुरुष टाळीत आला आहे; तथापि त्या काळींहि स्त्रियांनीं आपली जबाबदारी टाळली नाहीं. याला अपवाद म्हटला, तर फक्त वेश्या वर्गाचा. उच्च वर्णीय लोकांत स्त्रियांचें प्राबल्य पुरुषांवर दिसून येतें याचें कारण हेंच. पारीस मधल्या स्त्रिया नाना प्रकारच्या युक्तया योजून आपलें तारुण्य आणि सौंदर्य यांचा बिघाड होऊं देत नाहींत. यामुळें पुरुष वर्गावर त्यांनीं अबाधित साम्राज्य स्थापन केलें आहे, असें म्हणतात; पण ही गोष्ट अक्षरशः खोटी आहे. पुरुषावर सत्ता चालते, ती नियुत्रिक स्त्रीची चालत नसून स्वकर्तव्य-तत्पर आणि मातृपदास पोहोंचलेल्या अशा स्त्रीची चालते, हें लक्षांत ठेवलें पाहिजे."

" जी स्त्री कृत्रिम उपायांनीं वांझ बनून आपल्या अंगयष्टीनें आणि कुरळ्या केसानें पुरुषास भुलवूं पाहते, ती पुरुषाची अधिष्ठात्री देवता नसून त्याच्या कामवासनेस बळी पडलेली आणि अधोगतीस पोहोंचलेली स्त्री होय. तीहि पुरुषाप्रमाणेंच कर्तव्यभ्रष्ट झालेली असते आणि पुरुषा-प्रमाणेंच तिनेंहि आपला जीवनहेतु विफल केलेला असतो."

" स्त्रियांचे हक्क! या एका नव्या वेडानें आम्हांस सध्यां पछाडलें आहे; पण हें खरोखरच खूळ आहे. प्रजोत्पादन हेंच त्यांचें खरें कर्तव्य होय. आपलें खरें कर्तव्य टाकून पुरुषांप्रमाणें पेढ्यांवर, सरकारी कचेरींत, विश्वविद्यालयांत आणि इतर ठिकाणीं भलभलत्या कामाचीं सोंगें करीत बसणें हें त्यांचें कर्तव्यच नव्हे. स्वतःच्या कर्तव्यास चुकणे, हेंच त्यांचें अधःपतन होय. या अधःपतनास माझ्याच आठवणींत सुरवात झाली आणि आतां हा प्रचार दिवसेंदिवस अधिक वाढत्या प्रमाणांत आहे."

" स्त्रीजाति आपलें कर्तव्य विसरली; यामुळें पुरुषाला मोह पाडून त्याला आपला बंदा गुलाम बनविणें, हेंच आपलें कर्तव्य आणि यांतच आपलें सामर्थ्य आहे, असा भ्रम स्त्रियांना उत्पन्न झाला. यामुळेंच पुरुषांप्रमाणें स्त्रियाहि कर्तव्यभ्रष्ट होऊं लागल्या. पुरुष जीं कामें करतात, तींच आपण करावीं, असें वाटून सर्व बाबतींत त्यांचें अनुकरण त्या करूं लागल्या. यामुळें स्त्रिया आणि पुरुष हीं दोघेंहि कर्तव्यभ्रष्ट होत आहेत."

" शरीराचा मोहकपणा कायम राखण्यांत मुलें आड येतात, असें

स्त्रियांस दिसून आलें, तेव्हां अर्वाचीन शास्त्रांची मदत घेऊन वांझपणा उत्पन्न करण्याच्या मार्गास त्या लागल्या. अर्वाचीन शास्त्रें काय! कोणत्याहि घाणेरड्या कामांत मदत करण्यास त्यांचा हात सदोदित पुढेंच असतो. हल्लीं अशा प्रकारचीं औषधें व इतर यांत्रिक वस्तु यांचा प्रचार श्रीमंत वर्गाच्या स्त्रियांत अतिशय फैलावला आहे."

"जी स्त्री कामासक्ति न सोडतां वांझ बनूं पाहते, ती खरोखरच कुलटा या नांवास पात्र आहे. आणि एखादी जी पतीत स्त्री पुष्कळ मुलांची माता झाली असेल, ती आपल्या कर्तव्यास जागली असून ईश्वरी सूत्राप्रमाणें वागली आहे, असें समजावें."

"स्त्रियांस आपलें खरें कर्तव्य करावयाचें असेल, तर हा प्रकार त्यांनीं आतां सोडून दिला पाहिजे. स्वतःचा जीव धोक्यांत पाडून आणि प्रकृतीस प्रसंगीं अपायाहि करून घेऊन जी स्त्री स्वकर्तव्यतत्पर राहते तीच समाजाची खरी अधिष्ठात्री देवता होय. आपल्या उदाहरणानें कर्तव्यतत्परतेचा धडा घरांतील पुरुषांस आणि आपल्या मुलांबाळांस ती घालून देईल. आपल्या मुलांनीं बांडगुळांप्रमाणें लोकांच्या जीवावर चरावें आणि मोराप्रमाणें नटून आळसांत काळ काढावा, ,हें तिला कधींहि खपणार नाहीं."

"आपल्या भावी जनतेच्या कल्याणाची जबाबदारी, आपल्या शिरावर आहे, ही गोष्ट स्त्रियांना समजत नाहीं असें नाहीं. हें जिला समजत नसेल, ती खरोखर माता या पदवीलाच योग्य नाहीं."

टॉलस्टॉय यांच्या एकंदर लेखमालिकेंत 'आतां आपण काय करावें' या ग्रंथास बरेंच प्रमुखस्थान देणें वाजवी आहे. संपत्तीची विषमता जगभर वाढल्याचा अनुभव आपणास प्रत्यक्ष येत आहे. लक्षावधि गोरगरीब उपाशीं मरतांना आपण प्रत्यहीं पाहतों; पण हा भयंकर प्रकार नजरेसमोर प्रत्यक्ष घडत असतां, मी मी म्हणविणारे समाजसुधारक डोळे झांकून बसले आहेत हाहि अनुभव आपणास आहेच. मोठमोठ्या साम्राज्यांचीं सूत्रें केवळ लोककल्याणासाठीं आपण हातीं वाहतों, असा बाणा मिरविणारे धुरंधर मुत्सद्दीहि या भयंकर संहाराकडे, खुशाल कानाडोळा करीत आहेत. ईश्वराच्या लेकरांचें कल्याण करणें इतकेंच आमचें कर्तव्य

आहे, असें म्हणविणारे धर्मगुरु आणि धर्मपंथ खुशाल घोरत पडले आहेत. अशा स्थितींत टॉलस्टॉय यांनीं चर्चेसाठीं हा प्रश्न स्पष्टपणें लोकांपुढें मांडला, हेंच या ग्रंथाचें महत्त्व आहे.

उघड उघड गुलामगिरीची पद्धत जगांतून नष्ट झाली असली, तरी गुप्त गुलामगिरी अद्यापीहि जगभर चालू आहे. जगांत आळशी आणि ऐतखाऊ अशी एक मानवजाती निर्माण झाली असून अहोरात्र खपून अर्धपोटीं राहणाऱ्या दुसऱ्या मानवजातीवर तिचें वर्चस्व अबाधित कायम आहे, हें टॉलस्टॉय यांचें म्हणणें नाकारतां येण्यासारखें नाहीं. ही स्थिति आतां अगदीं असह्य होऊं लागली आहे आणि या भावनेचें वारें दिवसेंदिवस समाजांत अधिकाधिक खोल जाऊं लागलें आहे. या सर्व परिस्थितीचा विचार ताबडतोब करणें अत्यावश्यक आहे, ही गोष्ट टॉलस्टॉय यांच्या या ग्रंथानें अगदींच स्पष्ट करून सांगितली आहे. स्वतःस समाजसेवक म्हणविणारांस आज जर कांहीं महत्त्वाचें कर्तव्य असेल, तर तें हेंच होय.

लक्षावधि गोरगरीबांची स्थिति टॉलस्टॉय यांनीं प्रत्यक्ष अवलोकन केली आणि या रोगावर आपल्यापरी त्यांनीं उपायहि सुचविला आहे. पण हा उपाय तरी खरोखर यशस्वी होईल कीं काय याची बरीच शंका आहे. प्रत्येकानें आपापल्या पोटाकरतां शारीरिक मेहनत करणें अवश्य आहे, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. संपत्तीचें 'माप' या दृष्टीनें पैसा हा सर्वथैव त्याज्य आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. त्यांचें हें मत शुद्ध सत्वगुणी अशा अरण्यवासी ऋषिजनास मात्र सर्वथा लागू पडण्यासारखें आहे. पण गुणत्रयीच्या खिचडीनें भरलेल्या या जगांत, हें तत्व सरसहा लागू करणें, फायदेशीर होईल कीं नाहीं, याची जबर शंका आहे. सृष्टपदार्थांवर मनुष्यानें जो विजय आजपर्यंत मिळविला आहे, तो सर्वथा त्याज्य आहे, असें म्हणणें धाष्टर्याचें होय. या विजयामुळें संपत्तीची विषम वांटणी होऊन गरीब आणि श्रीमंत असा स्पष्ट भेद निर्माण झाला हें खरें. तसेंच गरीबांचीं हाडें भरडणाऱ्या गिरण्यासारख्या संस्था या विजयामुळेंच निर्माण झाल्या हेंहि खरें; तथापि अशा स्थितींतहि स्टिफिनसनपासून केल्व्हीनपर्यंत साऱ्या शास्त्रज्ञांचें उद्योग केवळ फोल

झाले, असें म्हणणें चुकीचें होईल. अर्वाचीन शास्त्रांनीं उद्योगधंद्यांत जी क्रांति घडवून आणली, ती निर्भेळ चांगली नाहीं आणि निर्भेळ वाईटहि नाहीं. मनुष्याच्या सुखसोयीला लागणाऱ्या जिनसा कमी श्रमानें आणि कमी खर्चानें निर्माण करणें, या शास्त्रांमुळेंच शक्य झालें आहे.

टॉलस्टॉय हे स्वतः फार सात्त्विक बुद्धीचे पुरुष होते; पण या वृत्तीमुळेंच या ग्रंथांत त्यांनीं जागोजाग चुक्या केल्या आहेत. शास्त्रीयशोध लावणारा प्रत्येक मनुष्य निव्वळ स्वार्थानें भरलेला भोंदू आहे, हें टॉलस्टॉय यांचें मत अतीशयोक्तीचें नाहीं, असें कोण म्हणेल? सध्यां जग नव्या मन्वंतरांत प्रवेश करूं पहात आहे. जुन्या परिस्थितीचा अंत आणि नवीचा विजय यांच्या संधिकाळांत तें सध्यां आहे. अशा वेळीं समाजाच्या नेत्या पुरुषांनीं आपलें डोकें फार शांत ठेवलें पाहिजे. गरीबांच्या आत्यंतिक कळवळ्यामुळें टॉलस्टॉय यांचें डोकें शांत राहिलें नाहीं. यामुळें त्यांनीं सुचविलेल्या मार्गानें समाजाची उत्क्रांति न होतां, भयंकर क्रांति होईल कीं काय अशी धास्ती वाटते.

सरकार ही संस्था कोणत्याहि स्वरूपांत असली, तरी ती सर्वत्र त्याज्यच आहे, असें टॉलस्टॉय यांचें मत आहे. समाजाची रचना कोणत्याहि प्रकारच्या सरकाराकडून सुव्यवस्थितपणें होईल, अशी आशा त्यांस वाटत नाहीं. सरकार म्हणजे शुद्ध लुटारूंची टोळी असें त्यांना वाटतें. याकरतां सरकार ही संस्थाच समूळ नष्ट झाली पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. कोणतेंहि सरकारी ऑफिस घेतलें, तरी त्यांत अथपासून इतीपर्यंत खावू लोकांचाच भरणा असतो व त्यांचें लक्ष लोककल्याणापेक्षां स्वतःचा खिसा भरून घेण्याकडे अधिक असतें, असें त्यांचें मत आहे. टॉलस्टॉय यांच्या या म्हणण्यांत पुष्कळ तथ्य आहे, हें कोणासहि नाकबूल करतां यावयाचें नाहीं. तथापि, सरकार ही संस्थाच नाहींशी झाली, तर जनतेचें अधिक कल्याण होईल, असें म्हणण्यास तरी आपणापाशीं आज काय पुरावा आहे?

कोणत्याहि मनुष्याच्या कृत्याचा जमाखर्च करतांना लोकांना त्यानें दिलें किती, व लोकांचें त्यानें खाल्लें किती, या दोन्ही बाजू बरोबर नमूद करणें अवश्य आहे, हें टॉलस्टॉय यांचें म्हणणें प्रत्येकानें लक्षांत ठेवण्यासारखें

आहे. केवळ लोकांची सेवा करण्यासाठींच आपण अवतार धारण केला आहे, असें सांगणारीं मनुष्यें त्या लोकसेवेच्याच द्वारें स्वतः गबर होण्याचा प्रयत्न कसा करीत असतात, याचा दाखला सर्व देशांत आपणास प्रत्यहीं पहावयास सांपडतो.

टॉलस्टॉय यांच्या विचारसरणींत व्यवहारदृष्टया ज्या कांहीं चुका झाल्या आहेत, त्यांचें कारण त्यांच्या अत्यंत तीव्र सत्वगुणांत आहे. गरीबांची लहानशी नड त्यांना दिसली, तरी त्यांचें माथें भडकून जातें आणि मनाच्या तशा स्थितींत अव्यवहार्य उपाय ते सुचवूं लागतात. हा दोष जगाच्या आरंभापासून सर्व साधुसंतांत आढळून येतो. महात्म्यांनीं सांगितलेले समाजसुधारणेचे उपाय प्रत्यक्ष अमलांत आणण्याचा प्रयत्न ज्यांनीं केला, त्यांचीहि अखेरीस फसगत झाली. टॉलस्टॉय यांच्या विचार-प्रेरणेनें जे जे नवे समाज अमेरिकेंत अथवा रशियांत स्थापन झाले, त्यांत बराच काळ टिकून राहिला असा समाज एकहि नाहीं. मानव-कुलाचें जीवित त्यांतील सर्व घटकांच्या परस्पर सहकारितेवर अवलंबून आहे. जगभर लहान लहान समाज सहकारिता न करतां, एकमेकांपासून अलग राहूं लागले, तर एकंदर मानवजातीची स्थिति फार भयंकर होईल. याकरतां परस्परावलंबन आणि सहकारिता या गोष्टी अवश्य आहेत. आणि जेथें परस्परावलंबन आलें, तेथें कांहीं तरी नियम आणि कायदे हे आलेच.

संपत्तीची मालकी कोणाहि विशिष्ट व्यक्तीकडे वंशपरंपरेनें असू नये हें टॉलस्टॉय यांचें म्हणणें अशाच प्रकारचें आहे. मालकी हक्क जगांतून आज नष्ट झाले, तर जगाच्या हल्लींच्या गोंधळांत अधिक भर मात्र पडेल.

अशाप्रकारची सदोष विचारसरणी टॉलस्टॉय यांच्या या ग्रंथांत असली, तरी प्रत्येक समाजनेत्यानें हा ग्रंथ वाचावा व त्याजवर मनन करावें, अशी त्याची योग्यता आहे यांत मात्र शंका नाहीं.

---

## प्रकरण तिसरें.

### एक धामधुमीचें वर्ष.

इ. स. १८८६ च्या आरंभीं टॉलस्टॉय मास्को येथें असतां गे हा कांहीं काळ त्यांजबरोबर रहात होता. त्या वेळीं गे यानें टॉलस्टॉय यांच्या गोष्टींत घालण्याकरतां कांहीं चित्रें तयार केलीं. त्याचप्रमाणें येशूख्रिस्ताचें एक चित्रमय चरित्रहि तयार केलें. अशा रीतीनें टॉलस्टॉय यांची लेखणी व गे याचें कलम यांचा संयोग या दोघांसहि फार सुखावह झाला. यानंतर थोड्याच काळांत गेनें तयार केलेली चित्रमाला प्रसिद्ध झाली. या वेळची हकीकत सांगत असतां फिनरमन म्हणतो---

" गेवर टॉलस्टॉय यांचें विलक्षण प्रेम जडलें होतें. गेसंबंधीं बोलत असतां टॉलस्टॉय एकदां मला म्हणाले, 'मनुष्याच्या अंतःकरणाचीं सारीं वळणेंवांकणें गे यास स्पष्ट दिसतात. एकहि भावना त्याच्या दृष्टिपथांतून सुटत नाहीं. कोळशाच्या कांडीनें आपलीं चित्रें तो भराभर रेखाटीत जातो. आध्यात्मिक सामर्थ्य येशूच्या चेहऱ्यावर व्यक्त झालें, या बायबलाच्या वाक्याला अनुसरून जें चित्र त्यानें तयार केलें आहे, त्याजवरून नजरसुद्धां काढूं नये, असें मला वाटतें. अनेक चितार्‍यांनीं ख्रिस्ताचीं चित्रें आपापल्या परी रेखाटलीं आहेत; पण ज्या सामर्थ्याच्या बळावर ख्रिस्तानें जग झुलविलें, तें सामर्थ्य गेशिवाय दुसऱ्या कोणाच्याहि चित्रांत व्यक्त होत नाहीं."

टॉलस्टॉय यांचें हें प्रेम गेकडून त्यांस सव्याज परत मिळत होतें. टॉलस्टॉय यांनीं अध्यात्मविद्येचें दान आपणास केलें, असें गे यास वाटे. आपण कांहीं केलें तरी टॉलस्टॉय यांचे हे उपकार आपल्या हातून फिटावयाचे नाहींत, असें त्यास वाटे. यामुळें या दोन व्यक्तींत विलक्षण प्रेम जडलें, तर त्यांत नवल नाहीं. "

या वेळीं रुबीनस्टिन या नांवाचा एक गृहस्थ पियानो वाजविण्यांत कुशल म्हणून प्रसिद्धीस आला होता. मास्को शहरीं एक अखेरची मैफल त्यानें केली, त्या वेळीं त्या मैफलीला जावें की नाहीं याजबद्दल टॉलस्टॉय

यांच्या चित्तांत मोठी भवति न भवति झाली. मनुष्याच्या शुद्ध भावनांना चेतविणारें असें त्याचें वादन नाहीं, असा त्याजवर टॉलस्टॉय यांचा आक्षेप होता. उलटपक्षीं सामान्यदृष्ट्या त्याचें पियानोवादन अत्यंत कुशलतेचें होतें, हेंहि कोणास नाकबूल करतां येण्यासारखें नाहीं. अशा रीतीनें टॉलस्टॉय यांच्या चित्ताची चलबिचल सुरू असतां मैफलीचीं तिकिटें संपून गेलीं. पुढें त्याच दिवशीं संध्याकाळीं क्याशकिन नांवाचा त्यांचा एक मित्र त्यांच्या भेटीस आला असतां टॉलस्टॉय त्याला म्हणाले, 'काय करावें, आजची ही संधिहि फुकट जाते, याबद्दल मला फार वाईट वाटतें. आतां तिकिट मिळणें शक्य नाहीं.' यावर क्याशकिन म्हणाला, "तुमच्यासारख्या श्रोत्याला तिकिटाची अडचण कसली ?"

क्याशकिन यानें ही सारी हकीकत रुबीनस्टीनच्या कानावर घातली, तेव्हां टॉलस्टॉय यांजकरतां स्वतत्र जागेची योजना करून एक तिकिट टॉलस्टॉयकडे त्यानें पाठविलें; पण त्या रात्रीं ती स्वतंत्र जागा अखेरीस रिकामीच राहिली. पोशाक घालून मैफलीची तयारी टॉलस्टॉय यांनीं केली; पण आपण करतों हें अयोग्य, या भावनेचा उद्रेक त्यांच्या ठिकाणीं इतका झाला, कीं एकाएकीं घेरी येऊन ते बेशुद्ध पडले.

गायनवादनविद्येबद्दल टॉलस्टॉय यांचीं मतें काय होतीं, याचा खुलासा क्याशकिन यानें पुढीलप्रमाणें केला आहे.

'बिटोव्हन आणि शूमन यांच्या चिजा टॉलस्टॉय यांस मनापासून आवडत असत, हें मी स्वानुभवानें सांगतों. गायनविद्येबद्दल पुष्कळ वेळां परस्परविरुद्ध मतें त्यांनीं प्रगट केलीं आहेत, याचें कारण त्यांच्या चित्तांत चालणारी चलबिचल हेंच होय. केवळ कला या नात्यानें बिटो-व्हन आणि शूमन यांजसारखे गायक त्यांस आवडतात, पण नीति-दृष्ट्या त्यांची कला उच्च भावनांचा परिपोष करीत नाहीं, असें त्यांचें मत आहे. टॉलस्टॉय हे स्वतः भावनामय अंतःकरणाचे आहेत, यामुळें सुंदर गायनानें त्यांचें चित्त हलतें. अशा स्थितींत गायनविद्या चांगली, असें ते म्हणतात; पण शुद्ध नीतीच्या दृष्टीनें या कलेचा विचार ते करूं लागले, म्हणजे, त्याच कलेला ते दोषी ठरवितात.'

इ. स. १८८६ च्या हिंवाळ्याच्या आरंभीं टॉलस्टॉय यासनाया येथें

गेले. हा १३० मैलांचा प्रवास त्यांनीं पायींच केला. आगगाड्यांसंबंधीं त्यांचें मत बरेच दिवस प्रतिकूल झालें होतें. आगगाड्यांपासून फायद्या-पेक्षां नुकसानच अधिक होतें, असें त्यांनीं आपल्या मनानें ठरावेलें होतें. यासनायाचा प्रवास पायानें करण्याचें हें एक कारण असून याशिवाय सामान्य लोकस्थितीचें अवलोकन करावें, असाहि त्यांचा हेतु होता. यामुळें हा प्रवास पायानें करण्यांत त्यांचे हे दोन्हीहि हेतु साध्य झाले.

खांद्यावर एक पडशी टाकून तींत कांहीं खाण्यापिण्याच्या वस्तु व थोडेसे कपडे त्यांनीं घेतले. या प्रवासांत तीन स्नेही त्यांजबरोबर होते. यांपैकीं दोघेजण चांगल्या खानदानींतल्या घराण्यांतले असून तिसरा गेचा मुलगा होता. यांपैकीं दोन सरदारपुत्र अर्ध्या वाटेंतच या प्रवासाला कंटाळून मास्कोला परत आले आणि गेचा मुलगा व टॉलस्टॉय असे दोघेजण तिसऱ्या दिवशीं आपल्या मुक्कामीं पोहोंचले. वाटेंत टॉलस्टॉय यांस कोणीहि ओळखलें नाहीं. ते घरीं गेले, त्या वेळीं फिनरमन बागेच्या दरवाजांतच त्यांस भेटला. त्याला टॉलस्टॉय म्हणाले, "असा गम्मतीचा प्रवास मीं कधींच केला नव्हता. सामान्य शेतकऱ्याबरोबर खावें प्यावें, त्यांजबरोबर गप्पा माराव्या आणि त्यांच्यांतच झोंपी जावें, यासारखी मौजेची गोष्ट दुसरी नाहीं. वृद्ध माणसांपासून पूर्वींच्या बादशाहींतल्या किती तरी मौजेच्या गोष्टी मला कळल्या. पहिल्या निकोलस बादशा-हाच्या वेळीं लष्करी शिस्तीच्या नांवाखालीं सामान्य शिपायावर कसा जुलूम होत असे, याचें यथातथ्य वर्णन नव्वद वर्षांच्या एका वृद्धानें मजपाशीं केलें. वेताच्या छड्यांनीं तीन तीनशेंपर्यंत फटके मारून एकाद्या शिपायाचा तरी जीव घेण्यांत आला नाहीं, असा दिवसहि सुना जात नसे. 'काठी रे काठी' असा ध्वनि साऱ्या पलटणींत रोज ऐकूं यावयाचा. निकोलस बादशाहाला 'काठीवाला निकोलस' असें टोपण नांव त्याच्या फौजेनें दिलें होतें."

यासनायाला पोहोंचल्यानंतर 'निकोलस काठीवाला' या मथळ्याचें एक लहानसें पुस्तक टॉलस्टॉय यांनीं लिहून तयार केलें; पण हा मथळा किंवा पुस्तकांतील विषय सरकारी परीक्षकास पसंत पडणें शक्य नसल्या-

मुळें, त्यानें अर्थातच त्याजवर बहिष्कार घातला. पुढें थोड्या काळानें या पुस्तकाच्या कांहीं हस्तलिखित प्रतींचा प्रसार झाला.

हा लेख ज्यानें अशा रीतीनें प्रथम प्रसिद्ध केला, त्याचा शोध लावून पोलिसनें त्याला पकडलें. तो प्रसिद्ध करण्यास टॉलस्टॉय यांची अनुमति त्यानें मिळविली नव्हती; तथापि त्या प्रकाशकाची आई टॉलस्टॉय यांजकडे जाऊन म्हणाली, 'आपली अनुमति होती,' असें तुम्ही म्हणाल, तर माझा मुलगा पोलिसाच्या तावडींतून सुटण्याचा संभव आहे. ही गोष्ट टॉलस्टॉय यांनीं कबूल केली.

पुढें थोड्या दिवसांनीं मास्कोच्या गव्हरनर जनरलनें टॉलस्टॉय यांस आपल्या भेटीस बोलाविलें. 'मला तुमच्या भेटीची इच्छा नाहीं. तुम्हाला तशी इच्छा असल्यास तुम्हीच येऊन मला भेटावें' असें उत्तर टॉलस्टॉय यांनीं त्याला पाठविलें. गव्हरनर त्यांच्या भेटीस अर्थातच गेला नाहीं. पण टॉलस्टॉय यांची कानउघाडणी करण्याकरतां आपल्या दिमतींतल्या एका तरुण हस्तकास त्यांच्याकडे पाठविलें. इतर सामान्य पाहुण्याप्रमाणें त्याचेंहि स्वागत टॉलस्टॉय यांनीं मोठ्या प्रेमानें केलें. पण संभाषणाच्या वेळीं 'असल्या दुष्ट सरकाराच्या नौकरींत राहणें हा मोठा अधर्म आहे' असा उपदेश त्यांनीं त्याला केला.

आपल्या जीवनक्रमाची दिशा कशी निश्चित करावी, हें कोडें टॉलस्टॉय यांस अद्यापीहि उकललें नव्हतें. तारीख २१ मे रोजीं गे याला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात, 'तुम्ही आपल्या स्वतःच्या कामांत चूर झालां आहां, हें पाहून मला मोठा आनंद होतो. आपण आपलें काम करावें, हें चांगलेंच; पण तें करीत असतां लोकोपयोगी काम करणें, हें त्याहून अधिक चांगलें. मीहि सध्यां येथें पुष्कळ काम करीत असतों. माझें हें कार्य अगदींच निरुपयोगी ठरणार नाहीं, असा भरंवसा मला आहे. 'आतां काय करावें' या पुस्तकाची पुढील एक पुरवणी सध्यां मी लिहित असून सामान्य लोकांकरितां लहान लहान चोपड्या लिहिण्याचा माझा विचार आहे. पूर्वीं लिहावयास घेतलेलीं पण तशींच अर्धवट पडलेलीं अशींहि अनेक पुस्तकें मजपाशीं आहेत; पण या भाऱ्याकडे पहावयास मला अद्यापीहि फुरसद होत नाहीं. आपण आपल्याचपुरता उद्योग करीत असतों

आणि शुद्ध स्वार्थानें आपली दृष्टी जेव्हां अंध झालेली असते, तेव्हां काय करावें आणि काय न करावें, याजबद्दल आपल्या चित्तांत गोंधळ उडतो. बरें काय आणि वाईट काय, याचा निवाडा आपल्या बुद्धीस करतां येत नाहीं; पण आपल्या चित्तांतून स्वार्थ निघून गेला आणि परार्थाचा विचार आपण करूं लागलों म्हणजे साऱ्या अडचणी क्षणार्धांत निघून जातात आणि आपलें चित्त व बुद्धि तीव्र होते. आपल्या जीवितांतील विसंगतपणा निघून जाऊन सर्व परिस्थिति सुसंगत दिसूं लागते. स्वर्गाचें राज्य मिळविण्यासाठीं खटपट करा म्हणजे तुमच्या सर्व उणीवा आपो-आप भरून निघतील! अशी धर्माची आज्ञा आहे; पण आपली वागणुक नेहमीं या आज्ञेच्याविरुद्ध असते. आपली धडपड स्वर्गाचें राज्य मिळविण्यासाठीं होत नसून ती आपल्या उणीवा भरून काढण्यासाठीं असते. स्वर्गाचें राज्य मिळविण्यासाठीं खटपट केली, तर इच्छित वस्तु अनायासें प्राप्त होतात असा नियम धर्मानें सांगितला; पण आपली वागणूक या-विरुद्ध असल्यामुळें या इच्छित वस्तूंची तर प्राप्ती होत नाहींच; पण स्वर्ग-द्वारहि आपण गमावतों. यामुळें ना येथें ना तेथें अशी आपली गत आहे. आपली सारी खटपट पाण्यांत गेल्याप्रमाणें निष्फळ होते. हा नियम तुम्हाला जसा कळला आहे, तसा तो साऱ्यांनाच कळता, तर किती बहार झाली असती! हा नियम म्हणजे केवळ शब्दांचें रूपक नव्हे. धर्म हें नुसतें बोलाचें शास्त्र नव्हे. यांत शुद्ध व्यवहारिक स्वरूप अत्यंत स्पष्टपणें सांगितलें आहे, ही गोष्ट मी माझ्या स्वतःच्या अनुभवानें सांगतों."

टॉलस्टॉय यांची बुद्धि कादंबरीलेखनाकडून निघून धर्मज्ञानाकडे वळली, याजबद्दल पुष्कळ कादंबरीभक्तांस मोठा विषाद वाटतो; पण ज्या गोष्टीमुळें या कादंबरीभक्तांचें नुकसान झालें, तिजमुळें एकंदर जगाचा फायदा पुष्कळ झाला, यांत मात्र शंका नाहीं. टॉलस्टॉय यांज-सारख्या प्रभावशाली बुद्धीच्या लेखकाची लेखणी धर्मज्ञानाकडे वळली, याजमुळें जगाचें लक्ष त्यांजकडे अधिक वळलें. टॉलस्टॉय यांची बुद्धिमत्ता आणि विशेषतः त्यांच्या ठिकाणीं असलेलें स्पष्ट बोलण्याचें धैर्य यांजमुळें बाह्य देशांतील लोकांचें लक्षहि त्यांच्या लेखांकडे वेधूं लागलें. परदेशीय लोक यांच्या भेटीसाठीं वारंवार येऊं लागले. आणि त्यांजमध्यें विचार-

विनिमय होऊं लागला. मनुष्यसमाज सुधारण्याकरतां बाह्यदेशीं कोणत्या प्रकारच्या खटपटी सुरू आहेत, याचें ज्ञान टॉलस्टॉय यांस अशा भेटींमुळें होऊं लागलें.

एके दिवशीं देरुलीड या नांवाचा एक फ्रेंच गृहस्थ त्यांच्या भेटीस आला. हा स्वतः कवि असून क्षात्रवृत्तीचा देशभक्त होता. रशिया आणि फ्रान्स यांजमध्यें सख्य जोडून इ. स. १८७१ सालाबद्दल जर्मनीवर सूड उगवावा, व आलसे लॉरेन्स प्रांत जर्मनीकडून परत घ्यावेत, या उद्देशानें तो रशियांत आला होता. टॉलस्टॉय यांच्या भेटीनें अशा प्रकारच्या मनःस्थितीच्या गृहस्थाची नाउमेद झाली असली, तर त्यांत नवल नाहीं. या भेटीसंबंधीं ॲनां सुरोन हिनें पुढीलप्रमाणें हकीकत दिली आहे.

“लष्करी झगा अंगांत घातलेला आणि चेहऱ्यामोहऱ्यांतहि लष्करी बाण्याचा हा उंच गृहस्थ आहे तरी कोण, हें आम्हा कोणासच कळेना.”

“देरुलीड! हें नांवसुद्धां किती चमत्कारिक. तें आम्ही कधींसुद्धां ऐकलें नव्हतें. कसलींच वर्तमानपत्रें आम्ही बहुतकरून वाचीत नसूं. कारण वर्तमानपत्रांच्या वाचनानें बुद्धि भ्रष्ट होते, असा कौंट यांचा पक्का समज होता. तशीच एकादी नवलाची गोष्ट घडली, तर तिची वार्ता कर्णोपकर्णी यासनायापर्यंत येऊन ती आम्हासही समजत असे.”

“युद्ध आणि सूड हे शब्द कौंट यांच्या कोशांत सापडण्यासारखे नव्हते. यामुळें देरुलीडच्या मोठ्या वक्तृत्वाचाहि फारसा उपयोग झाला नाहीं, यांत नवल नाहीं. त्याचें वक्तृत्व चालू असतां स्वतः कौंट कांहींच बोलत नव्हते, तथापि त्यांच्या चेहऱ्यावर ज्या तिरस्काराच्या भावना स्पष्ट दिसत, त्यांमुळें आपलें भाषण यांना नापसंत आहे, ही गोष्ट देरुलीडच्या लक्षांत आली.” तेव्हां तो विषय सोडून देऊन अखेरीस देरुलीड म्हणाला, ‘रशियांतील’ अत्यंत प्रतिभासंपन्न ग्रंथकाराच्या भेटीसाठींच मी रशियांत आलों.’

“यानंतर तीन दिवसपर्यंत देरुलीड यासनाया येथें होता आणि या वेळांतहि आपली ही सूडाची कल्पना कौंटपुढें मांडण्याचा प्रयत्न त्यानें परोपरीनें केला; पण अशाप्रकारची गोष्ट निघतांच कौंटचा चेहरा दगडासारखा निर्विकार बने. यामुळें ती गोष्ट त्याला तितकीच सोडावी लागे.”

" अखेरीस बोलतां बोलतां कौंट म्हणाले, 'युद्धाचा भेसूरपणा मला स्वतःलाच अनुभवास आला आहे. कांचेसारखे डोळे करून आकाशाकडे टक लावून पाहणारीं हजारों प्रेतें अद्यापीहि माझ्या नजरेसमोर आहेत. 'आपल्या आयुष्याच्या भर ज्वानींत त्या अकालमृत्युकडे आपली रवानगी ज्यांनीं केली त्यांची झडती घे, अशी मागणी तीं सारीं जणूं काय परमेश्वराकडे करीत आहेत, असें मला वाटे.' यावर देरुलीड म्हणाला, 'र्‍हाईन नदी फ्रेंचांकडेच राहिली पाहिजे.' कौंटनें उत्तर दिलें, 'देशाच्या सरहद्दी रक्ताच्या रंगानें आंखणें योग्य नव्हे. परस्परांच्या संगनमतानें आणि दोघांचाहि फायदा पाहून त्या ठरविणें हेंच युक्त आहे.' यावर देरुलीड म्हणाला, 'युद्ध करणें हा मानवी स्वभावच आहे. मनुष्य स्वभावतःच युद्धप्रिय आहे.' कौंट म्हणाले, 'पण युद्ध टाळणें अवश्य आहे आणि शक्यहि आहे. मुख्य गोष्ट हीच कीं, युद्ध पेटविणाऱ्या माणसांचें अस्तित्व नाहींसें झालें पाहिजे.' इतकें बोलून कौंटसाहेब एकदम उठले आणि खोलीबाहेर तडक निघून गेले."

एके प्रसंगीं तर खोलीच्या बाहेर पडतांच टॉलस्टॉय यांनीं रागाच्या भरांत खोलीचा दरवाजा धाडकन लावून घेतला, ही गोष्ट त्यांनीं स्वतःच सांगितली आहे. पण देरुलीड इतका निगरगट्ट कीं, टॉलस्टॉय यांची गांठ पडली तेव्हां, हा पूर्वीचा प्रसंग जणूं काय घडलाच नाहीं; अशा थाटानें हाच विषय त्यानें पुन्हां त्यांजपुढें काढला. या विषयाचा निकाल करून घेण्याची एक युक्ति, टॉलस्टॉय यांनीं देरुलीड याला सुचविली. ते म्हणाले, एका बाजूस फ्रान्स आणि एका बाजूस रशिया या दोनखोडी चरकांत जर्मनीला पिळून काढणें युक्त आहे कीं नाहीं, हा प्रश्न आमच्या एकाद्या साध्याभोळ्या शेतकऱ्याला आपण करूं. देरुलीड यानें ही गोष्ट कबूल करतांच टॉलस्टॉय यांनीं एका शेतकऱ्याला बोलवून आणलें आणि त्याजपुढें तो प्रश्न त्यांनीं मांडला. डोकें खाजवीत खाजवीत शेतकऱ्यानें उत्तर दिलें, 'फ्रेंच आणि रशियन या दोघांनीं मिळून आधीं कांहीं तरी उपयोगी काम दिवसभर करावें आणि संध्याकाळीं जर्मनांना बरोबर घेऊन एकाद्या गुत्त्यांत जावें आणि दिवसाच्या सार्‍या श्रमाचा परिहार एकत्र मिळून करावा, हेंच योग्य आहे.'

अशा रीतीनें या विषयाची चर्चा करण्याचा यत्न देरुलीड यानें अनेकवार केला. अखेरीस या प्रतिभाशाली लेखकाची लेखणी आपल्या उपयोगीं पडणार नाहीं, अशी त्याची खात्री झाली. तो तेथून जावयास निघाला, तेव्हां टॉलस्टॉय त्याला म्हणाले, "माणसें मरतात, यासाठींच लढाया वाईट असें मी म्हणत नाहीं; पण युद्धाच्या कल्पनेमुळें ज्या दुष्ट मनोभूमिका तयार होतात, त्या पापमूलक असल्यामुळें युद्ध ही पापाची शाळा होय असें मी म्हणतों. तुमची स्वतःचीच गोष्ट पहा. तुम्ही अद्यापि तरुण आहां आणि एकादें सत्कार्य करण्याची धमक तुमच्या अंगात आहे; पण देशाभिमानाच्या खुळानें तुम्हास पछाडलें आहे. कांहीं तरी सत्कार्य करावें, अशी बुद्धि तुमच्या ठिकाणीं नाहीं आणि परमेश्वरावरहि तुमचा भरंवसा नाहीं. अशा रीतीनें तुमचें मन अगदीं रिकामें राहिलें आहे. तेव्हां भलभलत्या गोष्टींच्या भरी भरून मनुष्यांस परस्परांचे गळे कापण्यास चिथविण्यासाठीं देशोदेश तुम्ही पायपीट करीत आहां. युद्धामुळें देशांत अशा प्रकारच्या अनेक मनोभूमिका तयार होतात आणि तसें होणें मला इष्ट वाटत नाहीं."

यासना या येथें टॉलस्टॉय यांस भेटण्याकरितां नेहमीं पुष्कळ लोक येत असत. त्यांत स्टाव्होविच या नांवाचा एक तरुण गृहस्थ होता. टॉलस्टॉय यांजवर याची भक्ति फारच जडली होती आणि त्यांचीं बहुतेक मतें त्याला मान्य झालीं होतीं. विशेषतः आपल्या श्रीमंतीचा त्याग करून सामान्य शेतकऱ्यांप्रमाणें आपलें आयुष्य शेतकींत घालवावें, अशी त्याची मोठी इच्छा होती.

एके दिवशीं भल्या पहांटे उठून सर्वांनीं मिळून गवत कापणीस जावें, असा बेत झाला. संध्याकाळच्या जेवण्याच्या वेळीं या विषयाची चर्चा चालू असतां स्टाव्होविच म्हणाला, "आतां आपण सारे लवकरच झोंपीं जाऊं या, म्हणजे अरुणोदयाबरोबर उठण्यास बरें पडेल. जे लोक केवळ निरुद्योगीपणांत आपले दिवस घालवितात, ते बहुतकरून फार उशिरां उठतात. कारण सकाळच्या प्रहरीं सूर्याला आपलें तोंड दाखविण्यास त्यांना लाज वाटते. आपल्याला तशी लाज वाटण्याचें कारण नाहीं. कारण आपण आतां सामान्य लोकांप्रमाणेंच दिवसभर काम करणार आहों

आपल्या बरोबरीचे असे कोट्यवधि लोक जगांत आहेत, अशी खात्री चित्ताला असणें, ही केवढी संतोषकारक गोष्ट आहे!"

पण कौंटेसबाईला हा बेत पसंत पडला नाहीं. आपल्या मुलांना ती ओरडून म्हणाली, "असलीं कामें तुम्ही करणें मुळींच इष्ट नाहीं. जन्मतःच तुम्ही कौंट आहां आणि मरेपर्यंत तुम्हास कौंटच राहिलें पाहिजे."

तिचें भाषण ऐकून सर्वांचाच मोठा मनोभंग झाला. 'मनुष्याचे खरे शत्रु त्याच्या कुटुंबांतच असतात' एवढें एकच वाक्य टॉलस्टॉय बोलले.

दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं अशाच प्रकारचा विषय चर्चेस निघाला असतां, टॉलस्टॉय म्हणाले, "मनुष्यानें कोणतेंहि कार्य हातीं घेतलें असतां त्यांत त्याच्या आप्तेष्टांकडून अडथळा किती येतो, हें समजलें म्हणजे तो मनुष्य सत्यशोधनासाठीं खरोखर कितपत तयार आहे, हें अजमावतां येतें. आपल्या अशा प्रकारच्या कार्यामुळें त्यांच्या चालू जीवनक्रमांत अडथळा येईल, अशी भीति त्यांना वाटत असते. आपला आयुष्यक्रम बदलावा, अशी इच्छा त्यांना नसते. यामुळें तो बदलण्याची खटपट घरांतच कोणीं करूं लागला म्हणजे साहजिकपणें त्याचे आप्त त्याला अडथळा करतात. पण आपला हा उद्योग केवळ वरवरचा नसून तो मनःपूर्वक होत आहे, अशी त्यांची खात्री पटली, म्हणजे आपल्याविरुद्ध एक शब्दहि उच्चारण्याची छाती त्यांस होणार नाहीं. आज त्यांच्या शब्दापुढें आपणास मान वांकवावी लागते; याचें कारण हेंच कीं, आपल्या चित्ताची तितकी खरी तयारी नाहीं. दुसऱ्याच्या चित्ताचा लंगडा भाग बरोबर शोधून काढण्याची हातोटी जगाला फार चांगली असते आणि सत्यशोधनाचा बाणा जे मिरवितात, त्यांच्या ठिकाणचा हा दुर्बळ भाग शोधून काढून जग आपले हल्ले तेथें चढवीत असतें. असे हल्ले चालावयाचेच; पण आपण सत्याची कांस बळकट धरली असली, म्हणजे या साऱ्या हल्ल्यांना पुरें पडण्याचें सामर्थ्य आपणास प्राप्त होतें."

"बुद्धीचे श्रम करणाराला शारीरिक मेहनत ही विसाव्याची जागा आहे. मला तरी अशा शारीरिक मेहनतीमुळें मोठी विश्रांति मिळत असते. दिनमानाप्रमाणें लांकडें तोडण्याचें अथवा गवत कापण्याचें काम मी करतों. जमीन नांगरण्यांत जी मौज आहे, ती अनुभवावांचून कळणार नाहीं. हें

काम मोठ्या कष्टाचें आहे, असा जो पुष्कळांचा समज आहे, तो अगदीं चुकीचा आहे. जमीन नांगरणें हें खेळण्याइतकेंच गमतीचें आहे. ताज्या मोकळ्या हवेंत रक्ताभिसरण उत्तम होतें आणि त्यामुळें मेंदूहि अगदीं शांत होऊन जातो. मोकळें फिरण्यानें पाय हलके होतात आणि भूकहि उत्तम लागते. रात्रीं झोंप तरी किती सुखाची येते म्हणून सांगूं ?"

"शारीरिक मेहनत ही मला तरी अगदीं आवश्यक होऊन बसली आहे. नुसतें एका जागीं बसून बुद्धीच्या मेहनतीचें काम करणें, आणि त्या जोडीला शारीरिक मेहनत कांहींच नसणें, ही खरोखर मोठी आपत्ति होय. एखाद्या दिवशीं अशी मेहनत झाली नाहीं, म्हणजे संध्याकाळ-पर्यंत मी अगदीं निकामी होऊन जातों. माझ्याच्यानें लिहवत अथवा वाचवत नाहीं. आणि दुसरा कोणी बोलत असला, तर लक्षपूर्वक तें ऐकवत नाहीं. माझ्या डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागतात आणि डोकेंहि फिरूं लागतें; त्या रात्रीं मला धड झोंपहि येत नाहीं."

या वेळीं टॉलस्टॉय यांनीं सामान्य लोकांकरतां म्हणून अनेक लहान लहान गोष्टी लिहिल्या. यांतील कांहीं गोष्टी जुन्या काळच्या संतांच्या असून दुसऱ्या कांहीं जुन्या दंतकथांच्या आधारें दिल्या होत्या. कित्येक वेळां संध्याकाळच्या वेळीं बऱ्याच शेतकऱ्यांस एकत्र करून त्यांच्याशीं शिळोप्याच्या गप्पागोष्टी टॉलस्टॉय करीत असत. 'मूर्ख ऐव्हॉन' 'परमेश्वर खरें जाणतो' इत्यादि गोष्टी अशा शिळोप्यांच्या गप्पांतूनच त्यांनीं निर्माण केल्या आहेत. याशिवाय म्हाताऱ्या बायांपासून कांहीं भाकडकथाहि ते ऐकत असत. यासनायाजवळील एका खेड्यांत अनीसा नांवाची एक फार वृद्ध बाई रहात असे. तिच्याजवळ अशा भाकडकथांचा संग्रह मोठा असून तिची गोष्ट सांगण्याची ढपहि फार मोहक होती. तिचा बहुतेक जन्म खेड्यांत गेल्यामुळें तिची भाषा शुद्ध रशियन होती. एकदां तिजपासून गोष्टी ऐकतां ऐकतां टॉलस्टॉय तिला म्हणाले, "आजीबाई, खरोखर पहातां अस्सल रशियन भाषा मी तुमच्यापासूनच शिकलों." याच वर्षी टॉलस्टॉय यांनीं एक नव्या पद्धतीचें क्यालेंडर छापून तयार केलें. प्रत्येक तारखेच्या खालीं एखादी सुंदर म्हण, एकादा उपदेशपर उतारा, एखाद्या साध्या पक्वान्नाची कृति, अथवा सामान्य रोगावरील घरगुती औषधें, अशीं

छापली होती. टॉलस्टॉय यांचें हें क्यालेंडर इतकें लोकप्रिय झालें कीं, त्याच्या आवृत्तीवर आवृत्ति निघून बहुतेक शेतकऱ्यांच्या घरांत तें लटकूं लागलें.

टॉलस्टॉय यांच्या मागें एकंदर उद्योग कांहीं थोडे होते, असें नाहीं. बाहेर गांवाहून भेटीला येण्याऱ्या माणसांचें आगतस्वागत करणें, पत्रव्यवहार करणें, शेतकी करणें, आणि कुटुंबाचा एकंदर व्यवहार पाहणें, इत्यादि अनेक उद्योग त्यांच्या मागें असत. त्यांतच लहान लहान गोष्टी लिहिण्याचें काम ते करीत. अशा रीतीनें कार्यव्यासता पुष्कळ होती, तरी टॉलस्टॉय यांचा उत्साह व मनोबळ हीं इतकीं दांडगीं होतीं कीं, एवढें काम त्यांस पुरेसें वाटत नव्हतें. अशा स्थितींत त्यांच्या चित्ताची चलबिचलहि कांहीं कमी झाली नव्हती. ते स्वतः काव्याचे भोक्ते व पहिल्या प्रतीचे कादंबरीलेखक असल्यामुळें त्यांचें एक मन कादंबऱ्या लिहिण्याकडे त्यांना ओढी, तर दुसरें मन त्यांना दुसऱ्या बाजूस खेंची. लहानापासून थोरापर्यंत ज्या लेखाची गोडी सर्वांना लागत नाहीं, असले लेख लिहिणें निष्फळ आहे, असाहि विचार त्यांच्या मनांत येई. कादंबऱ्या कितीहि सोप्या झाल्या, तरी ज्याच्या बुद्धीला शिक्षणाचा संस्कार घडलेला नाहीं, त्याला त्यांच्या वाचनांत फारशी गोडी वाटावयाची नाहीं, असा विचार मनांत आला म्हणजे कादंबऱ्या लिहूं नयेत असें त्यांना वाटे. अशा प्रकारच्या द्विधा मनःस्थितींत असतां, टॉलस्टॉय यांचे या वेळचे जे लेख निर्माण झाले आहेत त्यांत बहुधा सामान्य जनतेच्या परिस्थितीविषयीं वरीचशी चर्चा केली असून त्यांची स्थिति असावी तशी संतोषकारक नाहीं, असें त्यांनीं ठरविलें आहे. काव्यमय लेखनाशीं त्यांची अगदींच फारकत झाली होती, असें नाहीं; तथापि त्यांच्या विचारसरणींत जी मोठी घडामोड सुरू होती, तिची छाया त्यांच्या लेखांत स्पष्ट उमटल्यावांचून राहिली नाहीं. हीच छाया त्यांच्या या वेळच्या पत्रव्यवहारांत, संभाषणांत, कपड्यालत्त्यांत, खाण्यापिण्यांत आणि रोजच्या सामान्य वागणुकींतहि स्पष्ट दिसत असे.

'ॲनाक्यारेनीना' ही कादंबरी लिहून झाल्यानंतर 'एव्हान इलिच' या नांवाची एक फार सुंदर कादंबरी त्यांनीं लिहिली. हींत एका न्यायाधि-

शाचा आयुष्यक्रम आणि त्याचा मृत्यु, यांचें सुंदर चित्र रेखाटलें आहे. एक न्यायाधीश मृत्युशय्येवर पडला असतां स्वतःच्या पूर्वचरिताचें स्मरण त्याला होतें. आपलें सारें आयुष्य फुकट गेलें आहे, असें त्याला दिसून येतें. अशा आयुष्यक्रमापेक्षां केवळ परार्थासाठीं आपला देह आपण झिजविला असता, तर या प्रसंगाला मनाला पूर्ण शांति देण्याला केवढें तरी मोठें साधन आपणास निर्माण करतां आलें असतें. अशी विचारमालिका सुरू असतां, त्याला मृत्यु येतो. अशा प्रकारची या कादंबरीची रूपरेषा आहे. ही कादंबरी इ. स. १८८६ च्या मार्च महिन्यांत पुरी झाली.

एकाच व्यक्तीच्या केवळ मनःस्थितीचें चित्र टॉलस्टॉय यांनीं या कादंबरींत यथातथ्य रीतीनें रंगविण्याचा यत्न केला आहे. कादंबरीचा नायक ऐव्हान इलिच हा जणूं काय परात्पर न्यायाधिशासमोर उभा असून आपलें सारें आयुष्य पापकर्मांत त्यानें घालविलें, असा आरोप जणूं काय त्याजवर आला असून तो त्याला जबाब देत आहे. या आरोपाला ऐव्हान उत्तर देत असतां आपल्या मनाच्या निरनिराळ्या अवस्थांचें व विकारांचें जें वर्णन करतो, तें टॉलस्टॉय यांजसारख्या अप्रतिम कादंबरीकारांच्या कीर्तीस पूर्णपणें साजण्यासारखें आहे.

इ. स. १८८६ च्या उन्हाळ्यांत टॉलस्टॉय बरेच अजारी होते. त्यांच्या पायाला आरंभीं एक लहानशी जखम झाली होती. तिच्याकडे लक्ष न देतां शेतकीचीं वगैरे सर्व कामें टॉलस्टॉय करीत होते. पुढें तीच जखम विकोपास जाऊन त्यांच्या पायाला बरींच फांपरें पडलीं. तेव्हां कौंटेसबाईंनीं मास्को येथील एका ओळखीच्या डॉक्टराला यासनाया येथें बोलावलें; पण औषधें आणि वैद्य यांचा विलक्षण तिटकारा असल्यामुळें त्यांचें औषध घेण्यास टॉलस्टॉय कबूल होईनात. अखेरीस मोठ्या मुष्किलीनें ती जखम त्यांनीं डॉक्टरला दाखविली. ही जखम फारच विकोपास गेल्यामुळें त्यांच्या तंगडीला भयंकर सूज येऊन त्यांच्या अंगांत तापहि भरला. शस्त्रक्रियेशिवाय ती बरी होण्यासारखी नसल्यामुळें ताबडतोब तो प्रयोग करण्यांत आला. केव्हां केव्हां जखमेंतून एवढ्या कळा येत कीं, टॉलस्टॉय यांच्या किंकाळ्या ऐकून आजूबाजूचीं माणसेंहि पळून

जात. या प्रसंगीं सुमारें अडीच महिने टॉलस्टॉय यांची शुश्रूषा कौंटेस-बाईनीं फार उत्तम प्रकारें केली.

अशा रीतीनें टॉलस्टॉय अंथरुणाला खिळले असतांहि त्यांचें डोकें त्यांना स्वस्थ बसूं देईना. या आजारीपणांत एक नाटक त्यांनीं लिहिलें. हें लिहिण्याचें काम चाले, त्या वेळीं मुलेंसुद्धां पाय न वाजवितां इकडून तिकडे जात येत असत. या नाटकाचें नांव 'पापाचें सामर्थ्य' असें होतें.

मनुष्यानें एकादे वेळीं एकादें पातक केलें म्हणजे, तें पचविण्यासाठीं तो दुसरें, तिसरें, चवथें अशीं पातकें कशीं करीत जातो, याचें उत्तम चित्र टॉलस्टॉय यांनीं या नाटकांत रंगविलें आहे. व्यभिचार, विषप्रयोग, भ्रूण-हत्या, यांजसारखे भयंकर प्रसंग या नाटकांत गोंविले आहेत. यांतील भ्रूणहत्येचा प्रसंग तर इतका वहारीचा आहे कीं, तो वाचीत असतां पाषाणहृदयी मनुष्यसुद्धां खळखळां रडल्यावांचून राहणार नाहीं. आपल्या या नाटकासंबंधीं फिन्दरसन याजपाशीं बोलत असतां टॉलस्टॉय म्हणाले, "नाटकापेक्षां कादंबरी लिहिण्याचें काम सोपें आहे. ब्रशानें चित्रें रंगविणें आणि दगडाची मूर्ति घडविणें यांत जो फरक आहे, तोच कादंबरी आणि नाटक यांत आहे. कादंबरींत रंगाचा उठाव कोठें कमी अधिक असला, तरी तो खपून जातो; पण नाटकांत असला कमी अधिक-पणा यत्किंचितहि खपावयाचा नाहीं. त्यांतील पात्रांच्या मनःस्थितीचे सारे धागेधोरे अगदीं स्पष्ट उमटले पाहिजेत. त्यांत थोडाहि बोबडेपणा कोठेंहि आला कीं, त्या पात्राची माती होते. पात्राच्या मनांतील विचाराची अथवा विकाराची पूर्ण परिपक्वदशा यथास्थित रीतीनें रंगविणें, हें कर्म अत्यंत कठिण आहे. त्यांतून तीं पात्रें शेतकरी वर्गाचीं असलीं म्हणजे तर बोलावयासच नको. कारण या वर्गाशीं आमचा परिचय म्हणजे आफ्रिकाखंडांतील निग्रो लोकांशीं असलेल्या परिचयाइतकाच होय."

या नाटकांत पुरुष आणि स्त्रिया या दोहोंपैकीं स्त्रियांचीं पात्रें नीति-दृष्ट्या कमी दर्जाचीं आहेत, असें टॉलस्टॉय यांनीं दाखविलें आहे. स्त्री-पात्रें परिस्थितीनें बिघडलीं नसून स्वभावतःच कमी दर्जाचीं अशीं रेखाटलीं आहेत.

परिपक्व दशेस येण्याचा हा काळ आहे, तीं जमीनीवर पडून त्यांतील बीजांचा प्रसार व्हावा आणि त्यापासून नवे वृक्ष निर्माण व्हावेत, हीच इच्छा आतां स्वाभाविक आहे."

" माझें सर्व कांहीं ठीक चाललें आहे. आपला मृत्यूचा काळ आतां जवळ जवळ येत आहे, ही जाणीव चित्तांतून जावूं न देण्याविषयीं मी यत्न करीत असतों. यामुळें पुष्कळ वेळां माझी रात्रीची झोंप नीटशी येत नाहीं. झोंप न आली म्हणजे, डोकें कळकळतें आणि मग लिहिण्याचें कामहि नीट चालत नाहीं. अशा रीतीनें बाह्यतः मी निरुद्योगी असलों तरी अंतःसृष्टींतील माझा उद्योग बंद पडत नाहीं, या गोष्टीचा मला संतोष वाटतो. हा उद्योग म्हणजे परमेश्वर आणि मानवी सृष्टि यांशीं एकचित्त होण्याचा यत्न करणें हा होय."

" माझ्या डोक्यांत सध्यां इतक्या प्रकारचीं कामें आहेत कीं, तीं सारीं माझ्या हातून पार पडणें शक्य नाहीं, हें माझें मलाच कळतें. या कामांत स्वार्थ असा मला कांहींच साधावयाचा नसल्यानें तीं केवळ लोकसेवा आहे, अशी खात्री चित्तांत असल्यामुळें पुष्कळ वेळां या अर्ध्यामुर्ध्या कृत्यांबद्दलहि मला आनंद होतो; तथापि माझ्या एकाद्या लेखाबद्दल माझी स्तुति लोक करूं लागले कीं, माझी स्वार्थबुद्धि पुन्हां हळूच डोकावूं लागते. असला मूर्ख प्राणि मी आहें. अशा या माझ्या स्वभावाला मी करूं तरी काय ? "

इ. स. १८८६ सालीं वरील नाटकाशिवाय टॉलस्टॉय यांनीं लहान लहान गोष्टी बऱ्याच लिहिल्या व त्यांतील एकदोन गोष्टींच्या आधारानें एकदोन नाटकेंहि त्यांनीं लिहिलीं.

टॉलस्टॉय यांच्या मास्को शहरांतील घराशेजारीं एक मोठें मैदान असून तेथें सणावारीं जत्रा भरत असते या जत्रांतून नाटकें आणि तमाशे यांचेहि प्रयोग होत असतात. सामान्यतः हलक्या प्रतीच्या लोकांस कसल्या प्रकारची आवड आहे, हें टॉलस्टॉय यांनीं येथें जाऊन पाहिलें आणि मद्यपाननिषेधावर लिहिलेल्या एका लहानशा नाटकाचा एक प्रयोगहि असल्या एका सभेंत त्यांनीं करविला.

या वेळीं पोलिसाशीं फिनरमन याचा कांहीं तंटा होऊन त्यांनीं त्याला

या सभागृहामधून हांकून लावलें. तेव्हां गोष्टी व कादंबऱ्या लिहून आपला चरितार्थ चालवावा, असा बेत फिनरमननें केला. इ. स. १८८६ च्या दिसेंबर महिन्यांत त्याला लिहिलेल्या पत्रांत टॉलस्टॉय म्हणतात, "आपण लिहीत असलेली गोष्ट शक्य तितक्या लवकर संपवून मजकडे पाठवावी. एकाच गोष्टींत अनेक तत्त्वें कशीं तरी खचून भरण्याचा यत्न कधींहि करूं नये. नवशिका मनुष्य ही चूक नेहमीं करीत असतो. त्याच-प्रमाणें प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींचा विपर्यासहि करूं नये. आपण एकादी गोष्ट लिहावयास घेतली, तर त्यांतील सारा तपशील अगदीं सुयंत्रित असला पाहिजे असें नाहीं. जगांत घडणाऱ्या अनेक गोष्टींचा संबंध पर-स्परांशीं असतो असें नाहीं. आणि त्यांत सुयंत्रितपणा असतो, असेंहि नाहीं. असा रेखीवपणा प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टींत कधींच असत नाहीं. याकरतां कथेचा ओघ अगदीं स्वाभाविकरणें जसा वळेल, तसा वळूं द्यावा, हें बरें."

या वेळेच्या सुमारापर्यंत टॉलस्टॉय यांच्या अनुयायांची संख्या बरीच वाढली होती व टॉलस्टॉय यांचीं मतें प्रत्यक्ष व्यवहारांत आणण्याकरतां लहान लहान वसाहतीहि हे अनुयायी स्थापूं लागले होते. एकंदरीनें पाहतां या वसाहतींना यावें तसें यश आलें, असें म्हणतां येणार नाहीं. याच धर्तीवर पुढें इंग्लंड, हालंड व अमेरिका, येथेंहि कांहीं वसाहती निर्माण झाल्या होत्या. त्यांचाहि शेवट त्यांच्या रशियन भावंडांप्रमाणेंच झाला. यावरून अगदीं सामान्य प्रतीच्या मनुष्यांना टॉलस्टॉय यांचीं मतें फारशीं उपयोगीं पडण्याचा संभव नाहीं, असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

टॉलस्टॉय यांचीं मतें सामान्यतः हल्लींच्या साऱ्या संस्कृतीस प्रतिकूल होतीं. कसल्याहि प्रकारचें सरकार त्यांना नको होतें. लष्कर, आरमार इत्यादि संस्था त्यांना त्याज्य वाटत होत्या. फार काय; पण रेखीव पद्धतीचे धर्मग्रंथ आणि ते चालविणारे उपाध्याय हेंहि त्यांच्या दृष्टीनें त्याज्यच होतें. त्याप्रमाणें जमीनदार वर्ग आणि व्यापारी वर्गहि त्यांना नको होता. हल्लींच्या शास्त्रीय शिक्षणालाहि ते नांवें ठेवीत. शास्त्रीय शिक्षण आणि शास्त्राचे शोध हीं मनुष्याचें कल्याणापेक्षां अकल्याणच अधिक करतात, असें त्यांचें मत होतें. शास्त्रीय शोधांमुळें जीव घेणाऱ्या शस्त्रास्त्रांचा संभार

अधिक वाढतो आणि त्यामुळें माणसेंहि अधिक लोभी व दुष्ट होऊन एक-मेकांच्या घाताला प्रवृत्त होतात. टॉलस्टॉय यांचा प्रत्यक्ष परिचय ज्यांना झाला, त्यांजवर त्यांच्या वक्तृत्वाची मोहिनीहि लवकर पडे. टॉलस्टॉय यांस सारी वस्तुस्थिति कळली असून चालू दुःखदायक परिस्थितीचा नाश करण्यास रामबाण उपाय त्यांना सांपडला आहे, असें त्यांना वाटे. टॉलस्टॉय हेहि मनुष्य असून चुकीला पात्र आहेत, ही गोष्ट चुकूनसुद्धां त्यांच्या कधीं मनांत येत नसे. यामुळें कसल्याहि प्रकारचा विचार न करतां, स्वतःच्या मनोवृत्ति न तपासतां आणि आपल्या मनोबलाचा अज-मास न काढतां, हे लोक टॉलस्टॉय यांचीं मतें प्रत्यक्ष प्रचारांत आणण्या-करतां अंधकूपांत खुशाल उडी घेत. आपलें सारें गणगोत सोडून देऊन एकाद्या भलत्याच अनोळखी जाग्याचा आश्रय ते करीत आणि तेथें त्यांचा खरा स्वभाव बाहेर पडूं लागला, म्हणजे आपसांत मारामाऱ्या करून अखेरीस ते देशोधडीस लागत.

जुन्या गोष्टी साऱ्या वाईट हें टॉलस्टॉय यांचें मत मान्य करून त्या-प्रमाणें त्यांचा त्याग ते करीत, पण जें जुनें नाहींसें झालें, त्या ऐवजीं नवें काय घ्यावयाचें, याचा अगाऊ विचार त्यांनीं केलेला नव्हता. प्रत्येकानें आपआपलें पोट स्वतःच्या हातानें उद्योग करून भरावें, हें टॉलस्टॉय यांचें पहिलें तत्व होय. पण हें प्रचारांत आणावयाचें झालें, तरी त्यालाहि परस्पर सहाय्य आणि तशा सल्लागार मंडळीची मदत हीं अवश्य पाहि-जेतच. एकादा जमीनदार उद्यां उठला आणि स्वतःचें शेत स्वतःच नांगरूं लागला, तरी त्या गोष्टीचा सराव त्याला नसल्यामुळें असला उद्योग त्याला कितपतसा फलद्रूप करतां येईल ? त्याकरतां परस्पर सहकारितां अवश्य पाहिजे.

अशा रीतीनें दुसऱ्याच्या मदतीची आवश्यकता सिद्ध झाल्यानंतरहि आणखी एक प्रश्न शिल्लक राहतो. तो असा, दहा पांच लोक एकत्र जमले आणि त्यांच्यांत स्वभावभिन्नता असली, तर त्यांचें जुळावयाचें कसें ? या अडचणीचा प्रत्यक्ष अनुभव या वसाहतीस थोडक्याच काळांत येऊं लागला. टॉलस्टॉय यांचीं मतें कितीहि उदार असलीं, तरी चालू व्यव-हारांत त्यांचा प्रत्यक्ष अम्मल सुरू करणें कठिण आहे, ही गोष्ट या

वसाहतवाल्यांच्या अनुभवास येऊं लागली. जमीन हा पदार्थ हवा आणि पाणी यांजप्रमाणेंच ईश्वरदत्त असल्यामुळें त्याचा क्रयविक्रय करणें अयोग्य आहे, हें टॉलस्टॉय यांचें मत. तथापि या वसाहतवाल्यांस फुकट जमीन कोण देणार ? तेव्हां टॉलस्टॉय याच्या एका तत्त्वाचें उल्लंघन त्यांना आरंभींच करावें लागलें. कोणत्याहि प्रकारचें सरकार असूं नये आणि कायद्यांनाहि अस्तित्व असूं नये, हें टॉलस्टॉय यांचें दुसरें तत्त्व. हें तत्त्व ज्यांनीं मान्य केलें, असेच लोक या वसाहतवाल्यांत असणार हें उघड आहे. त्यांच्या दृष्टीनें मुलकी अथवा फौजदारी कायदा अगदीं त्याज्य होय. सामान्य चालू जीविताचा त्याग करून शुद्ध सदसद्विवेकबुद्धीच्या आज्ञेप्रमाणेंच चालावयाचें असा निश्चय करून हे लोक घराबाहेर पडले होते. अर्थातच सामान्य उदीमाच्या चालीरीतींचा त्यागहि त्यांनीं केला होता. यामुळें वसाहतींत देवघेव कशी करावी, हें जाणण्याचें कांहीं साधन त्यांना उपलब्ध नव्हतें. असलें कांहीं तरी साधन निर्माण करावें, म्हणून टॉलस्टॉय यांच्या सार्‍या श्रुतिक ग्रंथांची उलथापालथ त्यांनीं केली; पण याला कांहीं तोड त्यांतून निघेना. तेव्हां टॉलस्टॉय यांचीं मतें कितीहि उदात्त आणि शुद्ध असलीं, तरी तीं जशींच्या तशींच व्यवहार्य होण्यासारखीं नाहींत, ही गोष्ट या वसाहतवाल्यांच्या प्रत्ययास येऊं लागली. मानवी जीवनचरिताची सामान्य दिशा दाखवून त्यांतील तपशिलाची योजना करण्याचें काम मनुष्याच्या सदसद्विवेक बुद्धीवर टॉलस्टॉय यांनीं सोंपविलें आहे; पण प्रत्येक मनुष्याच्या विवेकबुद्धीची वाढ वेगवेगळ्या परिस्थितीस अनुसरून वेगवेगळ्या प्रकारें झाली असल्यामुळें अनेकांच्या विवेकबुद्धीची सर्वांशीं एकवाक्यता होणें कधींहि शक्य नाहीं. जी गोष्ट एकाला वाईट दिसणार, तीच दुसऱ्याला चांगलीशी वाटणार आणि या वसाहतींत निश्चित स्वरूपाचे कष्ट नसल्यामुळें या दोघांतील तंटा तरी कोणी तोडावा आणि कसा तोडावा ? जेथें निश्चित कायदा नाहीं, आणि निश्चित चालीरीतीहि नाहींत, तेथें कांहीं समाजबंधन असणेंहि शक्य नाहीं आणि बंधनाच्या अभावीं कांहीं माणसें समाजरूपानें एकत्र राहणें ही गोष्टहि शक्य नाहीं. ठराविक कायदे नसल्यामुळें असल्या वसाहतींत शुष्क गोष्टींवरहि वादविवादाचीं मोठीं रणें माजत आणि जो वेळ कामांत खर्च व्हावयाचा तो तोंडातोंडींत

खर्च होऊनहि अखेर निष्पत्ति कांहींच व्हावयाची नाहीं, असें होई. अशा स्थितींत परस्परांत गैरसमजूत होऊन सहकारितेंत व्यत्यय येऊं लागला. सर्व घटकांची एकजूट राहणें अशक्य होऊं लागलें. कायदा, सरकार आणि समाजाच्या ठराविक चालीरीती इत्यादि गोष्टींची बंधनें असल्या-शिवाय समाजघटना होऊं शकत नाहीं आणि समाजरूपानें मनुष्य राहूं शकत नाहीं, ही गोष्ट या मंडळीच्या प्रत्ययास येऊं लागली. लोकां-पासून आपणास मदत किती मिळेल आणि लोक आपणापासून किती मदतीची अपेक्षा करतात, याचा अगाऊ अजमास समाजांतील प्रत्येक घटकास असला पाहिजे. कायदा आणि सरकार, यामुळें हें काम होतें. समाज या नात्यानें कांहीं मनुष्यें एकत्र राहणें अवश्य असेल, तर या सर्व घटकांचे परस्परसंबंध निश्चित स्वरूपाचे असले पाहिजेत. असा निश्चय नसेल, तर प्रत्येक घटकाची स्वार्थबुद्धि प्रबळ होऊन तो समाज विस्कळीत होण्यास उशीर लागणार नाहीं, हा धडा या वसाहतींनीं शिकविला आहे. कायद्याच्या कोर्टांत श्रीमंतांनीं गरीबांना लुटावें, लुच्चानें भोळ्याला फसवावें आणि वकिलांनीं अशीलांचे खिसे कापावेत, असे प्रकार घडत नाहींत असें नाहीं; पण असे प्रकार घडावेत हा कायद्याचा उद्देश आहे, असें कोण म्हणेल ! कायदा अस्तित्वांत आला म्हणून हे प्रकार घडतात, असें नव्हे. या दोहोंत कार्यकारण संबंध नाहीं. दोन पक्षांतील खरा प्रकार जाणून् शक्य तितक्या निःपक्षपातानें त्यांच्यांत तोड पाडावी याच हेतूनें कायदा अस्तित्वांत आला आहे. एकाद्या जमिनीबद्दल दोन पक्षांत तंटा लागला, तर त्यांपैकीं खरा पक्ष शोधून काढून ती जमीन त्याच्या स्वाधीन करणें आणि उभय पक्षांस पुढच्या कार्यासाठीं मोकळें करणें हा कायद्याचा हेतु आहे. कायदा समूळ नष्ट केला, आणि अशा प्रकारचे तंटे केवळ सदसद्विवेकबुद्धीनें परस्परांनीं तोडावेत असा नियम समजांत घातला, तर या तंट्यांचा शेवट कधींच व्हावयाचा नाहीं. या-करतां कायद्याची आवश्यकता आपोआपच सिद्ध होते.

सामान्य जनतेचें ठरीव मर्यादेनें उल्लंघन करूं नये याकरतांच कायदा आणि सरकार यांचें अस्तित्व आहे. या संस्था मनुष्यजातीवर जुलुमानें कोणी लादल्या असें नाहीं. दीर्घकाळाच्या अनुभवानें शहाण्या झालेल्या

मनुष्यजातीनींच या संस्था निर्माण केल्या आहेत. आज त्यांचें स्वरूप सर्वांगांनीं परिपूर्ण नाहीं, ही गोष्ट कोणासहि मान्य होण्यासारखी आहे; पण त्यांत सुधारणा करणें म्हणजे त्या मोडून टाकणें असें मात्र नव्हे. याच संस्थांनीं मनुष्य समाज आजपर्यंत एकत्र टिकविला आहे. आणि यांच्या अस्तित्वामुळेंच मनुष्यप्राणी इतक्या तरी संस्कृतदशेला पोहोंचला आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

टॉलस्टॉय यांच्या वसाहती यशस्वी न होण्यास आणखीहि एक कारण आहे. तें कारण म्हणजे त्यांचें अप्रतिकाराचें मत हेंच होय. कोणी मनुष्य कशाहि तऱ्हेनें वागत असला, तरी मनगटाच्या बळानें त्याचा प्रतिकार करावयाचा नाहीं, असें टॉलस्टॉय यांचें तत्त्व होतें. या तत्त्वाच्या बळावर आजपर्यंत अनेक चमत्कार घडून आले आणि न घडणाऱ्या गोष्टीहि घडून आल्या, ही गोष्ट कबूल केली, तरी एकाद्या समाजांतील अनेक घटकांच्या मनस्थितीचा विचार न करतां हें तत्त्व त्यांस सरसि लागू केलें, तर त्याचा उपयोग कितपत होईल ?

स्मालेन्स्क प्रांतांत अशा प्रकारची एक वसाहत स्थापन झाली होती. एका वेळीं या वसाहतींत राहण्याकरतां एक पोरका मुलगा आला. टॉलस्टॉयच्या तत्त्वांची जी चर्चा या मंडळींत चाले, ती सारी रोज तो ऐकत असे. एके दिवशीं सकाळीं एक वसाहतवाला बाहेर जाण्यासाठीं निघाला आणि अंगांत घालावयास आपला कोट शोधूं लागला. कोट त्याला कोठेंच आढळेना. तो पोरका मुलगा त्या गृहस्थाजवळ रहात होता. यजमानाचा कोट अंगांत घालून हा पोरगा बाहेर गेला होता. थोड्या वेळानें तो परत आला तेव्हां त्या गृहस्थानें आपला कोट त्याजपाशीं परत मागितला. तो देण्याचें पोर नाकारूं लागला, तेव्हां त्या गृहस्थानें त्याला अनेक प्रकारें उपदेश केला. चोरी करणें हा मोठा गुन्हा आहे, असें त्या गृहस्थानें त्याला म्हटलें; पण कांहीं केल्या हा मुद्दा त्या मुलाच्या लक्षांत येईना. कसलीहि मालमत्ता स्वतःची म्हणविणें हेंच जर पाप, तर ती जवळ बाळगण्यानें तें पाप तो गृहस्थ स्वतःच करीत नाहीं काय ? तो कोट कोणाहिजवळ असला, तरी तुम्ही आणि मी सारखेच पापी आहों, असें तो पोर म्हणाला. अशा रीतीनें हा वादविवाद चालू असतां दुसरेहि

आणखी वसाहतवाले तेथें आले. टॉलस्टॉय यांच्या साऱ्या स्मृतींची उलथा-पालथ करून त्या पोराची समजूत पाडण्याचा यत्न त्यांनीं केला; पण अखेरीस प्रत्येकाचें म्हणणें खोडून काढून त्या पोरानें त्यांची विचारसरणी उलट त्यांच्याच गळ्यांत पूर्णपणें घातली. तो म्हणाला, " मी कोणावर कसलाच आरोप करीत नाहीं. मी कोणाला चोर म्हणत नाहीं अथवा सात्र म्हणत नाहीं. या कोटाची गरज या गृहस्थाला जितकी आहे तितकीच मला आहे. तुम्ही वाटेल तितका वादविवाद माझ्याशीं केला, तरी या कोटाची गरज मला नाहीं, असें ठरत नाहीं. आतां माझ्यापासून तो तुम्ही जबरीनें घ्याल; पण त्यांत तुम्हीच दोषी ठराल." अशा प्रकारचा पुष्कळ वादविवाद होऊन तो कोट त्या पोरानें दिला नाहीं. या ठिकाणीं एकाद्या कोटाची विशेष मातबरी होती असें नाहीं. तेथें झालेला वाद कोटासाठीं नसून तत्त्वाकरतां चालला होता. आणि पुष्कळ वेळ भाषणें होऊनहि या वादाचा निकाल न लागतां अखेरीस तो प्रश्न तसाच मुग्ध राहिला; तथापि या वादांत एक गोष्ट मात्र सिद्ध झाली. ती ही कीं, अशा प्रकारचीं तत्त्वें शुद्ध नीतिदृष्ट्या उच्च व कितीहि खरीं असलीं, तरी सामान्य मनुष्यांच्या चालू व्यवहारांत जशींच्यातशीं लागू करणें चुकीचें आहे. अशा प्रकारच्या विचारसरणीचा फैलाव अगदीं सामान्य प्रतीच्या माणसांत करून देऊन टॉलस्टॉय यांनीं आणखी एक चूक केली होती. कायदा, गांवपंचायती आणि धर्मोपदेशक यांच्या ठिकाणीं जो पूर्ण विश्वास आजपर्यंत होता तो मात्र या सामान्य लोकांच्या मनांतून नष्ट होऊं लागला होता. आणि यामुळें समाजाच्या मूळ पायालाच कीड लागू पहात होती. 'न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानाम् कर्मसंगिनाम्' या तत्त्वाची सत्यता येथें पूर्णपणें दिसून येते. ज्यांच्या मनांतून स्वार्थ लेशभरहि कमी झाला नाहीं असा सामान्य प्रतीचा जनसमाज साधुसंतांच्या तत्त्वानुसंधानानें चालूं शकेल, ही गोष्ट शक्य नाहीं. टॉलस्टॉय यांचीं हीं तत्त्वें सामान्य जनसमूहास लागू केलीं, तर समाजाची पूर्ण विघटना होऊन त्याचा नाश होण्यास उशीर लागणार नाहीं.

अशाच प्रकारची दुसरीहि एक वसाहत द्वेर नांवाच्या प्रांतांत होती वसाहतवाल्यांनीं जी जमीन येथें खरेदी केली होती, ती फारशी चांगली

नसून वाळवंटासारखी रेताड होती; पण या जमिनीबरोबरच दुसरें एक ऐशीं एकर रान त्यांना मिळालें होतें. हें रान त्या जमिनीपासून दीड दोन मैलांवर होतें. तेथें वसाहत करून थोडे दिवस झाल्यानंतर एका गृहस्थानें तेथें येऊन राहण्याबद्दल बोलणें लावलें. तें त्याचें बोलणें मान्य करून त्याला घर बांधण्याकरतां त्या रानांत बरीच सागाचीं झाडें वसाहतवाल्यांनीं तोडलीं. पुढें कांहीं कारणानें तो गृहस्थ या वसाहतींत आला नाहीं तेव्हां तीं पाडलेलीं झाडें विकत देण्याबद्दल शेजारच्या गांवकऱ्यानीं या वसाहतवाल्यांकडे बोलणें लावलें; पण अशा प्रकारें तीं झाडें विकणें योग्य आहे कीं नाहीं, असा एक मोठा नीतीचा प्रश्न एका गृहस्थानें काढला. तो म्हणाला, " ज्या वस्तूची जरूरी आपल्या जीविताला नाहीं त्या वस्तूवर आपली मालकी सांगण्याचें कारण नाहीं. कारण तसें झालें, तर ती आपली मालमत्ता होईल आणि अशा रीतीनें स्वतःच्या हक्काची म्हणून मालमत्ता निर्माण करून ठेवणें हें टॉलस्टॉय यांच्या तत्त्वाविरुद्ध आहे. आतां ज्या अर्थी या झाडांची जरूर आपणास नाहीं, त्या-अर्थी त्यांजवर आपली मालकीहि नाहीं. आणि ज्या जिनसावर आपली मालकी नाहीं, तो जिन्नस दुसऱ्यास विकण्याचा अधिकार आपणास कसा येतो ? त्या जिनसाची जरूर ज्याला आहे, त्याजवर त्याची मालकी आहेच. आपणाला जरूर नसलेली जिन्नस आपण बळकावून बसलों, तर हें कृत्य शुद्ध दडपशाहीचें होईल. आपणास जरूर नसलेलीं हीं झाडें आपलीं आहेत, असें आपण प्रतिपादिलें तर जुलमी पद्धतीला आपण संमति दिल्यासारखें होतें. याकरतां हीं झाडें विकण्याचा अधिकारच आपणास नाहीं. जगांत जुलूम असूं नये या तत्त्वावरच या वसाहतीची स्थापना आपण केली आहे; मग जुलमी पद्धतीला आपणास संमति द्यावयाची असेल, तर वसाहत स्थापण्याचेंच कांहीं कारण नाहीं."

त्या वसाहतवाल्यांच्या या भाषणाचा परिणाम बाकीच्या मंडळीवर होऊन त्यांनीं त्या शेजारच्या खेड्यांतील शेतकरी मंडळीस बोलावून आणून म्हटलें, " हीं झाडें ईश्वरनिर्मित असल्यामुळें 'त्यांजवर आमचा हक्क नाहीं. याकरतां आम्हीं तीं तुम्हांस विकूं शकत नाहीं. आतां तुम्हाला त्यांची गरज असेल, तर तीं तुम्हीं घेऊन जा."

वसाहतवाल्यांचें हें बोलणें ऐकून. ते शेतकरी मोठ्या कुचंब्यांत पडले. हे लोक खरें बोलतात कीं आपली थट्टा करतात, कीं ते वेडे झाले आहेत, याचा कांहींच उमज त्यांस पडेना. पण ते मनापासून बोलत आहेत, अशी खात्री होतांच त्यांना फार आनंद झाला आणि तीं झाडें उचलून नेण्याच्या तयारीस ते लागले. पण ते शेतकरी निरक्षर असले, तरी अगदींच तर्कहीन नव्हते. त्यांपैकीं एकजण वसाहतवाल्यांस म्हणाला, "ज्या अर्थी सारेंच जंगल ईश्वरनिर्मित आहे, त्या अर्थीं आम्ही आणखीहि कांहीं झाडें तोडलीं, तर तुमची काय हरकत आहे ?" पहिल्या विचारसरणीस संमति दिल्यानंतर तिचीच ही पुढील पायरी त्या वसाहतवाल्यांना नाकारवेना. तेव्हां या गोष्टीलाहि त्यांनीं आपली संमति दिली.

ही बातमी हां हां म्हणतां आजूबाजूंच्या साऱ्या खेड्यांत पसरली आणि शेतकऱ्यांचे थवेच्या थवे आपापल्या बैलगाड्या घेऊन त्या रानाकडे धांवले. पुढें थोड्या वेळानें एक शेतकरी वसाहतवाल्याकडे येऊन म्हणाला, " आजूबाजूच्या शेतकऱ्यांची गर्दी त्या जंगलांत होऊन तेथें आतां मारामारीस सुरुवात झाली आहे. या गोष्टीचा बंदोबस्त तावडतोब केला पाहिजे." ही बातमी ऐकून वसाहतवाल्यांचें धाबें दणाणलें. आतां तेथें कांहीं खून पडतात कीं काय अशी भीति त्यांना पडली; पण तेथें जाऊन कोणाचाहि हात धरणें अप्रतिकाराच्या तत्त्वाविरुद्ध आहे कीं काय, यावद्दलच प्रथम भवति न भवति सुरू झाली. तथापि कांहीं तरी बंदोबस्त करणें अवश्य असल्यामुळें बातमी आणणाऱ्या त्या शेतकऱ्यालाच त्यांनीं आपला मुकादम नेमलें व दरवेळीं थोडीं थोडीं माणसें जंगलांत सोड, असा हुकूम त्याला दिला. त्या शेतकऱ्यानेंहि या संधीचा फायदा घेऊन ज्यांनीं त्याची मूठ दाबली, तेवढ्यानांच आंत सोडलें.

एवढें करूनहि आजूबाजूची सारी शेतकरी मंडळी वसाहतवाल्यांवर नाखुष झाली, ती झालीच. ज्यांना लांकडें थोडीं मिळालीं, ते तीं थोडीं म्हणून नाखुष झाले आणि ज्यांना मुळींच मिळालीं नाहींत, ते तर अर्थातच नाखुष झाले. शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी वसावतवाल्यांकडे लोटूं लागल्या तेव्हां त्या साऱ्यांना वाटाण्याच्या अक्षता वसाहतवाल्यांना लावाव्या लागल्या. इतक्या थोरल्या गोंधळाला आणि कटकटीला आपण कारण

झाली, हें मनांत येऊन ते वसाहतवाले, अगदीं खजील होऊन गेले. अखेरीस एक शहाणा शेतकरी त्यांना म्हाणाला, " तुम्हांला जर परोपकार करावयाचा होता, तर अगदीं गरीब शेतकरी पाहून तेवढ्यांतच त्या झाडांची वांटणी तुम्ही करावयाची होती. आतां तुमच्या कृतीचा परीणाम असा झाला कीं, ज्याच्याजवळ दहा पांच गाड्या होत्या अशा श्रीमंत शेतकऱ्यांनीं बहुतेक सारें जंगल लुटलें आणि खऱ्या गरीब शेतकऱ्यांना लांकडाची एक ढलपीहि मिळाली नाहीं."

स्थाईक मिळकत कोणीच करूं नये, या टॉलस्टॉय यांच्या तत्त्वानें समाजांत किती गोंधळ होण्यासारखा आहे, हें वरील हकीकतीवरून दिसून येते. आपल्या मालमत्तेचा उपयोग पुष्कळ मनुष्यें शुद्ध स्वार्थबुद्धीनें करतात, आणि कित्येक वेळां उपयोगापेक्षां तिचा दुरुपयोगच अधिक होतो ही गोष्टहि खरी; तथापि तेवढ्यावरून मालमिळकत करणें, ही गोष्ट मूळांतच वाईट आहे, असें सिद्ध होत नाहीं. मालमिळकत कोणीच करीनासा झाला आणि केवळ आपल्या पोटापुरतेंच मिळवावें, अशा हेतूनें मनुष्य काम करूं लागला, तर मनुष्यसमाज विस्कळीत होऊन तो देशोधडीस लागण्यास वेळ लागणार नाहीं. केवळ आपल्यापुरतेंच पाहण्याची बुद्धि मनुष्यजातींत उत्पन्न झाली, तर मनुष्याची खचित उपासमार होईल. याकरतां खाजगी मालमिळकत निर्माण होणें, हें अगत्याचें आहे. आतां इतकी गोष्ट मात्र खरी कीं, तिचा उपयोग केवळ स्वार्थबुद्धीनें होऊं नये. ती एकाद्या व्यक्तीच्या हातांत असो अथवा म्युनिसिपालिटी आणि सरकार यांसारख्या संस्थांच्या हातीं असो. ती धारण करणारानें आपणावरची जबाबदारी ओळखून तिचें फळ सर्वांस सारखें प्राप्त होईल अशा रीतीनें तिचा उपयोग केला पाहिजे.

वर सांगितलेल्या उदाहरणासारखेंच आणखी एक उदाहरण खारकॉफ येथील वसाहतींत घडून आलें. तेथील वसाहतीची जागा आणि तेथील घरें यांचे कागदपत्र अलोहिन नांवाच्या एका गृहस्थाच्या नांवानें नोंदविले होते. वसाहतींतील शेतजमिनीवर अथवा घरादारावर सर्वांची सारखीच सत्ता असावयाची आणि त्याकरतां कोणीं तटेभांडणें करावयाचीं नाहींत,

अथवा कोर्टाची पायरी चढावयाची नाहीं, या मूळ तत्त्वावरच या वसाहतीची स्थापना झाली होती.

एके दिवशीं क्रोस्की या नांवाचा एक विक्षिप्त गृहस्थ या वसाहतींत आला. टॉलस्टॉय यांच्या सर्व तत्त्वांवर वसाहतवाल्यांशीं मोठ्या कडाक्याचा वादविवाद करून ही स्वारी झोंपी गेली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व मंडळीस एकत्र जमा करून क्रोस्की म्हणाला, "मित्रहो, येथील एकाहि शेतावर आजपासून तुमचा कसल्याहि प्रकारचा हक्क नाहीं, असें तुम्हास कळविण्याची मी परवानगी घेतों. हें घर, याच्या आजूबाजूचीं सर्व घरें, येथील बागायत जमिनी आणि बाकीच्या साऱ्या जमिनी ही आजपासून माझ्या मालकीच्या झाल्या आहेत, येथून निघून जाण्यास मी तुम्हास तीन दिवसांची मुदत देतों."

चमत्कार हा कीं, ही सारी वसाहतवाली मंडळी तेथून निघून गेली. यानंतर दोन दिवसांनीं अलेहिन यानें आजूबाजूच्या खेड्यांतील शेतकरी मंडळीस एकत्र करून ही सर्व हकीकत त्यांना सांगितली आणि वसाहतीच्या सर्व मिळकतीचें एक बक्षीसपत्र त्या शेतकऱ्यांच्या नांवानें केलें. आपला डाव फसला असें पाहून क्रोस्की यानें तेथून पोबारा केला आणि ती मिळकत अखेरीस त्या शेतकऱ्यांना मिळाली.

या बाबीसंबंधीं लिहीत असतां ॲना सुरोन म्हणते, "टॉलस्टॉय यांच्या साध्या राहणीचा आणि स्वकष्टार्जित अन्न मिळविण्याच्या तत्त्वांचा अंगिकार श्रीमंतांच्या पुष्कळ तरुण मुलांनीं केला होता. या तरुण पोरांनीं शेतकऱ्यांच्या मुलींशीं लग्नें केलीं आणि ते खेड्यापाड्यांत राहूं लागले. यापैकीं कित्येकजणांना आपल्या या जिण्याचा इतका कंटाळा आला कीं, ते शेवटीं अट्टल दारूबाज बनले आणि अखेरीस दारूतच त्यांचा अंत झाला. दुसऱ्या कित्येकांनीं शारीरिक कष्ट इतके केले कीं, अखेरीस क्षयी होऊन ते मरण पावले. या गोष्टी पुष्कळांना ठाऊक नाहींत. याचें कारण इतकेंच कीं, त्यांचा बभ्रा या तरुणांच्या कुटुंबीयांनीं होऊं दिला नाहीं."

"टॉलस्टॉय यांचें हें तत्त्व या वेळीं खुळासारखें पसरलें होतें. त्यांतील रहस्य अथवा मुद्दा लक्षांत न घेतां पुष्कळ लोक टॉलस्टॉय यांचें अनुकरण करूं पहात. अशा लोकांपैकीं बहुतेक अखेरीस पश्चात्तापांतच पडत. हा

पहिला खुळाचा काळ निघून गेल्यानंतर जे कोणी टॉलस्टॉय यांचे अनुयायी बनले, त्यांनीं आपल्या स्वतंत्रबुद्धीचा उपयोग करून टॉलस्टॉय यांच्या तत्त्वांची छाननी केली आणि त्यांतील उपयुक्त व व्यवहार्य भागाचें ग्रहण करून बाकीचा चोथा त्यांनीं फेंकून दिला."

अशा रीतीनें टॉलस्टॉय यांच्या वऱ्याचशा वसाहतींची वाट लागली व त्यांचा प्रत्यक्ष अनुभव टॉलस्टॉय यांस मिळाला. तथापि टॉलस्टॉय यांच्या मतांत या अनुभवानंतरहि फारसा फरक पडल्याचें दिसत नाहीं. कदाचित् साऱ्या वसाहतींची खुलासेवार हकीकत त्यांच्या कानीं गेली नसेल अथवा स्वतःच्या कार्यांत ते इतके निमग्न असतील कीं, या गोष्टींचा विचार करावयास त्यांस फुरसतच मिळाली नसेल. 'त्यांच्या स्वतःच्या विचारांचा प्रतिध्वनि त्यांच्या कानांत इतका गुणगुणत राही कीं, त्यामुळें इतरांचें म्हणणें त्यांना स्पष्टपणें कधींच ऐकूं येत नसे.' असें जें त्यांजविषयीं एका ग्रंथकारानें म्हटलें आहे, तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

---

## प्रकरण चवथें.

# मतांचा प्रसार व त्याचा परिणाम.

इ. स. १८७७ सालाच्या सुमारास टॉलस्टॉय यांच्या धार्मिक मतांत चलविचल होण्यास सुरुवात झाली होती. पुढें त्यांत उत्क्रांति होत होत इ. स. १८८७ सालापर्यंत बऱ्याच अंशीं ती पूर्णदशेस आली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. या दहा वर्षांच्या दरम्यान त्यांच्या वर्तनांत आणि मतांत जी धरसोड दिसत होती, तिचें कारण हेंच होय. त्यांचीं मतें या काळांत उत्क्रमणावस्थेंत असल्यामुळें त्यांत निश्चितपणा नव्हता आणि मतांच्या या अनिश्चितपणामुळें त्यांची वागणूकहि धरसोडीची दिसत होती. या काळानंतर हा मनु बदलला. विचारानें आणि अनुभवानें त्यांच्या मतांना बऱ्याच अंशानें निश्चितपणा येऊन यानंतरच्या काळांत त्यांत फारसा फरक पडला नाहीं.

याच सुमारास त्यांचा मित्र गे हा ख्रिस्ताचा चित्रमय जीवनक्रम तयार करीत होता. इ. स. १८८७ च्या मे महिन्यांत त्याला लिहिलेल्या पत्रांत

टॉलस्टॉय म्हणतात, "ज्याच्या हृदयांत कोणताहि विषय उत्कटपणें भरून वाहूं लागला आहे, त्याची माहिती लोकांस व्हावी, अशी प्रबळ इच्छा ज्याच्या हृदयांत वास करीत आहे आणि या इच्छेला मूर्तरूप कसें द्यावें, हें ज्ञान ज्याला आहे, तोच खरा कलावान होऊं शकेल. मग तो लेखक असो, चित्रकार असो अथवा दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेचा आश्रय तो करो. या कलांचें बाह्यरूप वेगवेगळें असलें तरी त्या सर्वांचा मूळ हेतु एकच आहे. त्यांचें अधिष्ठान एकाच स्वरूपाचें आहे. अशा प्रकारचा अभिज्ञ मनुष्य चांगला परीक्षकहि असतो. स्वतःच्या विशिष्ट कलेचें रहस्य ज्याप्रमाणें तो जाणतो, त्याचप्रमाणें इतर कलांचें मर्महि त्याला कळत असतें. दुसऱ्यांनीं केलेल्या कार्याचें परीक्षण जितक्या कठोरपणानें आणि निःपक्षपाताच्या दृष्टीनें तो करीत असतो, तितक्याच कठोरपणानें स्वतःच्या कामगिरीकडेहि तो पहात असतो. अशा कठोर दृष्टीमुळेंच पुष्कळ वेळां लोकोपयोगी कामगिरी त्याच्या हातून होऊं शकत नाहीं. स्वतःचेंच काम त्याला स्वतःला पुष्कळ वेळां नापसंत होतें आणि तें तो लोकांपुढें आणीत नाहीं. तुमचेंहि असेंच झालें असावें, असें मला वाटतें. आपण हातीं घेतलेलें कार्य पुरें होणें निःसंशय जरूरीचें आहे; तथापि त्या कामीं आपलें पाऊल जितकें झपाट्यानें पुढें पडावें, तितकें तें पडत नाहीं; पण एक गोष्ट तुम्ही लक्षांत ठेवा, ती ही कीं, ख्रिस्ताच्या जीवनचरित्राचें खरें रहस्य तुम्हाला जसें कळलें आहे, तसें तें दुसऱ्या कोणालाहि कळलेलें नाहीं. त्याचप्रमाणें या रहस्याला मूर्तरूप देण्याचें सामर्थ्यहि तुमच्याप्रमाणें दुसऱ्यांच्या आंगीं नाहीं. या विषयांचीं चित्रें तुमच्या इतकीं चांगलीं दुसऱ्या कोणासहि काढतां यावयाचीं नाहींत. तुमचीं सारींच चित्रें सारखींच सर्वोत्कृष्ट होतील असें नाहीं; तथापि त्यांतलें अगदीं वाईटसुद्धां इतरांच्या चांगल्या चित्रांहून खास वरच्या प्रतीचें ठरेल."

या वेळीं टॉलस्टॉय यांनीं 'मानवी जीवनक्रम आणि मृत्यु' या मथळ्याचा एक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ केवळ तत्त्वविचारांचा आहे. अशा प्रकारच्या शुद्ध तत्त्वमय ग्रंथांची गोडी अभिज्ञ वाचकांशिवाय फारशी दुसऱ्यांस नसल्यामुळें त्याचा प्रसार बेताबाताचाच झाला आणि इतर भाषांतूनहि त्याचीं चांगलीशीं भाषांतरें झालीं नाहींत.

जगांतील प्रत्येक मनुष्य स्वतःच्या कल्याणाचा मार्ग शोधीत असतो. आपलें वाईट व्हावें असें कधींहि कोणाच्या मनांत येत नाहीं. पण 'बरें' या शब्दाची व्याख्या प्रत्येकाची वेगळी असल्यामुळें परस्परांत वादाचे प्रसंग उद्भवतात. आपणाला जें बरें म्हणून वाटत असतें तें मोठ्या परिश्रमानें प्राप्त झालें, तरी अखेरीस आपण असंतुष्टच राहतों आणि चित्ताला कशाहि प्रकारची शांति प्राप्त न होतां आपण एक दिवस मरून जातों. हल्लींच्या युगांत अर्वाचीन शास्त्रांची वाढ विलक्षण झपाट्यानें झाली आहे. शक्य तितक्या प्रकारें ऐहिकविषय भोगून घ्या, असा या शास्त्रांचा उपदेश आहे. धर्माकडे पाहतां त्याची दिशा निराळ्या प्रकारची असली, तरी चालू आयुष्यांत व्यवहार साधण्याकडे त्याचें लक्ष नाहीं. चालू जीविताकडे न पाहतां जीवात्म्याच्या भविष्यस्थितीकडेच लक्ष ठेवा, असें हल्लींचा ख्रिस्तीधर्म सांगतो. खऱ्या ख्रिस्तीधर्माचें हें खोटें स्वरूप आहे आणि धर्माप्रमाणें अर्वाचीन भौतिक शास्त्रेंहि खोट्या स्वरूपानें सांप्रत वागत आहेत. अशा प्रकारचा मुख्य मुद्दा या ग्रंथांत आहे.

टॉलस्टॉय म्हणतात, " सुख हें आपल्यांत हक्काचें आहे असें सदोदित आपणास वाटत असतें. सुखी असणें हें स्वाभाविक आहे. ही जाणीव आपणास कधींहि सोडून जात नाहीं. पण असें असतांहि सुखाची प्राप्ती आपणास व्हावी, असेंहि कधी घडत नाहीं. असें कां होतें? याचें कारण हेंच कीं, आपलें उद्दिष्ट एकच नसतें. एकाच उद्दिष्टाच्या कार्याकडे आपलें तनमन आपण कधींच लावीत नाहीं. केवळ देहाच्या सुखासाठीं अनेक प्रकारची धडपड आपण करीत असतों; पण आपल्या सुखाच्या कल्पनेचें खरें स्वरूप देहाचें सुख हें नसून अध्यात्मिक सुख असतें, ही गोष्ट आपणास कळत नाहीं. अथवा आपण ती विसरून गेलेली असतों. यामुळें व्याधी एकीकडे आणि उपाययोजना भलतीकडेच असा प्रकार घडतो. जड वस्तूंचा अभ्यास आपण कितीहि केला तरी मानवी जीविताच्या अंतिम हेतूंचा शोध आपणास कधींहि लागावयाचा नाहीं. आपल्या ऐहिक सुखाची इच्छा अध्यात्मिक वृत्तीच्या आधीन झाल्याशिवाय आत्मसंतोषाचा लाभ आपणास कधींच होणार नाहीं. देहाला सुखी ठेवण्याकरतां भौतिक शास्त्रांनीं कोट्यावधि साधनें निर्माण केलीं,

तरी त्यापासून मनाची शांति प्राप्त व्हावयाची नाहीं. जगांतील सर्व मोठ्या धर्मांनीं हाच संदेश मुक्तकंठानें सांगितला आहे. आपल्या उच्च मनोवृत्तींची वाढ करून पशुवृत्ति नष्ट करणें, हेंच मानवी जीविताचें खरें ध्येय असलें पाहिजे. हें ध्येय ज्या प्रमाणानें साध्य होईल, त्याच प्रमाणानें शांतीचा लाभ तुम्हास होईल. देहबुद्धीचा त्याग स्वप्रेरणेनें प्राप्त झाला असला, तर देहभोगापेक्षां त्या त्यागांत किती आनंद असतो, हें अनुभवावांचून कळणार नाहीं. या सिद्धांताची साक्ष चित्ताला बरोबर पटणें ही अंतिम हेतूच्या साध्याची पहिली प्राप्ती आहे. केवळ परक्यासाठीं आपला देह झिजवावयाचा अशा निश्चयानें आपली संसारयात्रा जो चालवितो तो देहानें नाहींसा झाला, तरी तो मेला असें म्हणतां येत नाहीं. परोपकाराच्या रूपानें देहपातानंतर तो वावरत असतो. या साऱ्या गोष्टी सामान्य प्रतीच्या अशिक्षित जनसमूहाला सहज समजतात. यांत तर्कशास्त्राला विरुद्ध असें त्यांना कांहीं आढळून येत नाहीं; पण सुशिक्षित माणसांना या गोष्टी कळत नाहींत. हल्लींच्या शिक्षणाचा आणि संस्कृतीचा परिणाम असा झाला आहे कीं, त्यामुळें सात्विक बुद्धीचे डोळे आंधळे होतात. एका देहाला ज्याप्रमाणें अनेक अवयव असतात, त्याचप्रमाणें समाजांतील प्रत्येक मनुष्य हा समाजाचा अवयव आहे. देहाचे अवयव आपलीं नियतकर्मे योग्य रीतीनें करून ज्याप्रमाणें सबंध देहाचें संरक्षण करतात, त्याचप्रमाणें समाजांतील प्रत्येक व्यक्तीनेंहि दुसऱ्याच्या आड न येतां समाजरक्षणाकडेच आपलें सामर्थ्य खर्च करणें हें त्यांचें कर्तव्य आहे. असें न झाल्यास समाज विनाशाच्या मार्गास लागेल. यावरून स्वार्थत्याग हाच आपल्या एकंदर जीवनचरिताचा मुख्य पाया असला पाहिजे, हें उघड दिसतें. ज्याच्या चित्तांत प्रेमाचा यत्किंचित् ओलावासुद्धां नाहीं, असा एकहि प्राणि तुम्हास आढळावयाचा नाहीं. याच बीजाची जोपासना करून त्याचा जोमदार वृक्ष आपण बनविला, तर स्वार्थत्यागाचा मार्ग आपणास सुकर होईल. आपल्या जीवनचरित्रांत जो विरोधाभास अनेक वेळां दिसतो, तो आभाससुद्धां नाहींसा करण्यास प्रेमजीवनाइतकें दिव्य औषध दुसरें नाहीं. फार काय; पण परक्यांच्या दुःखमय स्थितीपासूनहि आपणास अनेक प्रकारचा बोध घेतां

येतो. त्यांना दुःखमुक्त करण्यासाठीं आपण मनापासून यत्न करूं लागलों तर आपलेंच अंतःकरण कसें उदार आणि प्रेममय होऊन आपणास उन्नतीच्या मार्गास लावतें, हें अनुभवानेंच जाणलें पाहिजे. प्रेम हीसुद्धां एक क्षणिक लहर असून यापासूनहि अखेरीस दुःखप्राप्ति होते, असें कित्येक म्हणतात; पण असे लोक सकाम प्रेमी असतात, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्या प्रत्येक चांगल्या कर्माबद्दल कांहीं तरी फळ आपणास मिळालें पाहिजे, असें त्यांना सदोदित वाटत असतें. त्यांचें प्रेम आशामय असतें. त्यांच्या ठिकाणीं खऱ्या प्रेमाचें वास्तव्य नसून त्यांचा स्वार्थ प्रेमाचें रूप घेऊन आलेला असतो. असल्या सोंगाड्या प्रेमाचा शेवट दुःखांत झाला, तर त्यांत नवल काय? खऱ्या प्रेमाला स्वतःच्या सुखाची आशा नसते. आपणापासून परक्याला सुखप्राप्ती कशी होईल, याच गोष्टीकडे त्याचें लक्ष असतें. अशा प्रकारचें प्रेम वाटेल त्या प्रकारचा स्वार्थत्याग करण्यास तयार असतें. त्याच्या त्यागाला सीमाच नसते. एवढेंच नव्हे, तर असा त्याग अमक्यासाठीं करावा आणि अमक्यासाठीं करूं नये असाहि भेदभाव अशा प्रेमाच्या ठिकाणीं नसतो. आपल्या मित्रांची मात्र सेवा करावी आणि शत्रूंची करूं नये असें त्यांस वाटत नाहीं. ज्या मनोवृत्तीला आपण सामान्यतः प्रेम असें समजत असतों, तिला खऱ्या प्रेमाची ओळख नसते. अमुक एका गोष्टीपासून आपणास सुख होईल, या भावनेनें आपली मनोवृत्ति त्या गोष्टीकडे ओढली जाते, आणि तिला प्रेम असें नांव आपण देतों. पण त्या गोष्टीबद्दल खरें प्रेम आपल्या ठिकाणीं नसून फायद्याच्या आशेनें आपली वृत्ति दूषित झालेली असते. आपल्या या भावनेचा हा दोष नाहींसा झाला, तर या बीजापासूनहि खऱ्या प्रेमाचा वृक्ष उगवणें अशक्य नाहीं. असा वृक्ष उगवणें म्हणजे स्वार्थबुद्धि मरून परार्थबुद्धि जन्माला येणें होय. आणि ही बुद्धि जेव्हां जन्माला येते, तेव्हांच आपल्या खऱ्या सुखाला आरंभ होतो. त्याच वेळीं खरी दृष्टि आपणास प्राप्त होते. आपल्या शारीरिक सुखाच्या मागें लागणें हा मानवी जीविताचा अंतिम हेतु नसून परार्थाकरतां आपल्या देहाचा होम करणें, हाच सुखाचा आत्मकल्याणाचा निश्चित मार्ग आहे, असें आपणास दिसूं लागतें.

स्वार्थी प्रेमामुळें आपण स्वतःला दुःखाच्या मार्गाला मात्र लावतों. सुखाचीं साधनें पुष्कळ मिळवून त्यांच्या द्वारें सुखी होऊं पाहणें अथवा अशीं पुष्कळशीं साधनें स्वतःजवळ आल्यानंतर त्यांतील कांहीं अंश दुसऱ्यास दान करणें हा सुखी होण्याचा उपाय नव्हे. सुखी होण्याचा मार्ग या साधनांचा त्याग करणे हाच होय. मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन आणि स्वतःला विसरून परसेवा करणें हाच सुखाचा आणि आत्मकल्याणाचा मार्ग आहे. प्रेम याचा खरा अर्थ सर्व प्रकारचा स्वार्थ विसरणें हाच. स्वतःच्या साऱ्या इच्छा नाहीशा झाल्यावांचून तुमच्या अंतःकरणांत खऱ्या प्रेमाचा उद्भव कधींहि होणार नाहीं. अशा प्रकारचें स्वयंभू प्रेम पुष्कळ वेळां लहान मुलांच्या ठिकाणीं आढळतें. मोठ्या वयाच्या मनुष्यांना असल्या प्रेमाचा प्रत्यय स्वतःस येत नाहीं आणि दुसऱ्या ठिकाणीं तें असलें, तर तें त्यांस दिसतहि नाहीं. अशा माणसांचें प्रेम आणि पशूंचें प्रेम हीं वस्तुतः एकाच किंमतीचीं असतात. मानवी जीविताची दिशा पाहिली, तर तिचा कल त्याचें पशुत्व नाहींसें करण्याकडे आहे, असें आढळून येईल आणि सध्यांच्या लोकांच्या वागणुकीकडे पाहिलें तर ते तेंच पशुत्व रक्षण कसें करावें, या विचारांत चूर झाल्यासारखे दिसतात. या इच्छेनें प्रेरित होऊन प्रथम इच्छेच्या तृप्तीच्या मार्गे ते लागतात. क्षणमात्र इच्छातृप्तीचा अनुभव आपणास झाला, असा भास त्यांस होतो; पण हा क्षण लोटतो न लोटतो तोंच ही इच्छा दुप्पट जोरानें उसळते आणि अनेक दुःखांचें प्रचंड पेंढार ती बरोबर घेऊन येते. या सैन्याशीं झगडतां झगडतां मनुष्याचा जीव मट्यास येतो आणि अखेरीस हतबल आणि हताश होऊन तो काळाच्या मुखीं जातो. आपल्या आयुष्यांत अनेक प्रकारचे श्रीमंतीचे उपभोग आपणास मिळावेत ही इच्छा जों जों वाढत जाते, तों तों मृत्यूचें भयहि वाढतें. अशा प्रकारची चैन नेहमींच परक्याच्या दुःखांतून उत्पन्न झालेली असते. हजारों लोकांचें रक्त पिळावें तेव्हांच श्रीमंतीच्या चैनीचा उपभोग प्राप्त होत असतो. अशा स्थितींत परक्याबद्दल आपल्या चित्तांत प्रेम कोठून उद्भवणार ? स्वतःची चैन चालवावयास हवी असेल तर दुसऱ्या शंभर माणसांच्या मानेवर शस्त्र ठेवण्यास आपला हात तयार केला पाहिजे. मनाच्या अशा

स्थितींत प्रेमासारख्या मृदुभावनेचा उद्भव तेथें होणें शक्य आहे काय? आपल्या गरजा वाढवीत जाणें आणि त्या भागविण्याकरतां अनेक साधनें मिळवीत राहणें ही धांवपळ मृगजळाचा पाठलाग करण्यासारखी आहे. तिचा कांहींच उपयोग होत नाहीं, एवढेंच नव्हे, तर या धांवपळींत प्रसंगीं आपले हातपाय मात्र मोडतात.

मी मरेन अशी कल्पना मनुष्याच्या मनांत कधींच येत नाहीं. आपण चिरंजीव आहों, असें त्याला सदोदित वाटत असतें. मृत्यूला अस्तित्व नाहीं, असें त्याचें अंतःकरण त्याला ओरडून सांगत असतें. असंस्कृत बुद्धीला हें म्हणणें खोटें वाटतें; पण यांत खोटें काय आहे? मृत्यु हें एक रूपांतर मात्र आहे. सांप्रतचा देह प्राप्त होण्यापूर्वींहि अशींच अनेक रूपांतरें आपण पाहिलीं, असें अर्वाचीन शास्त्रें आपणास सांगतात आणि अशा प्रकारचीं रूपांतरें होत होतच सांप्रतची स्पृहणीय स्थिति-आपणास प्राप्त झाली आहे. अशा प्रकारचीं रूपांतरें झालीं नसतीं, तर कदाचित् मनुष्यत्वापर्यंतहि आपण आलों नसतों. यावरून रूपांतरें होत जाणें हाच सृष्टीचा स्वाभाविक क्रम आहे, असें उघड दिसून येतें. हा क्रम उलटला आणि रूपांतरें होण्याचें बंद होऊन आहे याच स्थितींत आपण कायम राहिलों, तर आपणासच आपलें जीवित इतकें जड होईल कीं, मरण्याच्या भीतिपेक्षां जगण्याची भीतीच आपणास अधिक वाटूं लागेल. 'जाणीव' हें आपल्या जीविताचें मूळ रूप आहे. ही जाणीव अनेक युगांपासून आपल्या पूर्वजांत अवतरून आपणापर्यंत ती येऊन ठेपली आहे. मग आपल्या देहपातानंतर ती नष्ट होईल-म्हणजे तिचा आत्यंतिक नाश होईल--असें म्हणण्यास काय पुरावा आहे? अशी कल्पना आपण कां करावी? आपणास मुख्य भीति म्हटली तर ती हीच कीं, आपली जाणीव नष्ट होऊन जाईल. सामान्य सृष्टिक्रमाला अननुरूप अशा प्रकारचें कांहीं रूपांतर आपणामध्यें होईल असें वाटणें हेंच आपल्या भीतीचें मूळ आहे. मृत्यु म्हणजे सृष्टीच्या क्रमावेगळें रूपांतर असें आपणास वाटतें; पण या आपल्या कल्पनेचा मेळ वस्तुस्थितीशीं बसत नाहीं. यामुळें शास्त्रांनीं सिद्ध केलेला सृष्टीचा क्रम आणि आपल्या कल्पना यांत विरोध उत्पन्न होऊन तो आपल्या चित्ताच्या चलबिचलपणास आणि भीतीस

कारण होतो. देहपाताची भीति मनुष्यांना वाटते. कारण मृत्यु येणार अशी कल्पना चित्तांत आल्याबरोबर तुम्हांला न समजतांहि तुमचें चित्त तुमच्या गतायुष्यक्रमाकडे वळतें. आणि चिरजीवनाचा विचार या गेलेल्या दिवसांत आपण कधींच केलेला नाहीं, ही जाणीव थोडीशी उत्पन्न झाल्याबरोबर भीतीनें आपल्या चित्ताचा थरकांप होतो. चिरजीवनाला लागणारीं साधनें आपण मिळवून ठेवलेलीं नाहींत, ही जाणीव मनुष्याच्या चित्तांत त्या वेळीं येते. देह म्हणजे काय ? अव्यक्त अथवा अस्पष्ट जाणीवेचें जें व्यक्त अथवा स्पष्ट रूप तोच देह ! देह म्हणजे सूक्ष्म जाणीवेचें जडरूप. या दृष्टीनें पाहतां देहाला खरी किंमत कांहींच नाहीं. विचारप्रवणता हें आपलें खरें स्वरूप आहे. आपलें शरीर बदलत नाहीं, असा एकक्षणहि केव्हां जात नाहीं. शरीराला स्थायीभाव एकक्षणहि असत नाहीं. प्रत्येक क्षणीं त्याच्या घडामोडी सुरू असतात आणि प्रत्येक दिवशीं नवा देह आपणास प्राप्त होत असतो. असें असतांहि आपल्या जाणीवेंत, विचार प्रवणतेंत आणि ज्ञानार्जनांत केव्हांच उणीव येत नाहीं. यावरून देह आणि जाणीव हीं एकरूप नसून परस्परांपासून अगदीं विभक्त आहेत, असें उघड दिसतें. यामुळें मृत्यूनें आपला देह गेला, तरी त्याबरोबर आपली जाणीवहि जाईल, असें कां मानावयाचें ? असें मानण्यास कांहींच पुरावा दिसत नाहीं. देह हें आपलें आत्मरूप नसून 'जाणीव' हें आपलें आत्मरूप आहे. प्रेम आणि द्वेष या भावना देहापाशीं नसून त्या आत्मरूपाशीं संलग्न आहेत. प्रेम करणारा अथवा द्वेष करणारा देह नसून या भावना आपल्या आत्मरूपाच्या ठिकाणीं प्रगट होत असतात. आपल्या साऱ्या अस्तित्वाचा अर्क आत्मरूप हेंच आहे. यामुळें मृत्यूबरोबर आपण जें कांहीं गमावतों त्या वस्तूचें स्वरूप इतकें तुच्छ आहे कीं, ती वस्तु आपल्या मोजदादींतहि घेण्याचें कारण नाहीं. आपली विवेकबुद्धि जागृत झाली आणि रूपांतराचा हा कायदा अनुल्लंघ्य आहे ही खूणगांठ आपणास एकवार पटली म्हणजे आपलें अंतःकरण विस्तृत होतें. खऱ्या प्रेमाच्या उद्भवाला तें योग्य होतें आणि हळू हळू खरें सुख प्राप्त करून घेण्याच्या मार्गास तें लागतें. पूर्वी अनेक युगें अनेक रूपांतरांचा अनुभव घेत घेत सांप्रतच्या स्थितीला आपण प्राप्त

झालों आहों, हा सिद्धांत आपल्या विवेकबुद्धीला एकवार पूर्णपणें पटला म्हणजे या नव्या रूपांतराबद्दल भीति वाटण्याचें कांहींच प्रयोजन आपणास उरत नाहीं.

माझा वडील भाऊ निकोलस जिवंत होता, तेव्हां त्याच्या मनोवृत्तीचा परिणाम मजवर घडून येत होता आणि आतां तो देहानें नाहींसा झाला आहे तरी, त्याच वृत्तींच्या भावना मजवर अम्मल चालवीत आहेत. याचा अर्थ इतकाच कीं, त्याच्या जिवंतपणीं आम्हां दोघांमध्यें जो परस्पर संबंध होता, तोच त्याच्या देहपातानंतरहि अद्यापि कायम राहिला आहे. आपल्या जीविताची खरी किंमत आपली जाणीव हीच आहे. जड देहानें घडणारीं कर्में हें खरें जीवित नव्हे, तर त्या कर्मांचा जो परिपाक आपल्या जाणिवेंत राहतो तें आपलें खरें जीवित होय आणि आपला देह मेला तरी हें जीवित नष्ट होत नाहीं. हें जीवित सृष्टीच्या कायद्यानें बांधलें गेलें आहे. यांत दिसून येणाऱ्या सर्व घडामोडी ठरीव नियमांना अनुसरून होत असतात. याकरतां आपल्या दृष्टिपथाच्या बाहेरच्या गोष्टी आपणास समजत नसल्या, तरी त्यांबद्दल कांहीं तक्रार करण्याचें कारण आपणास नाहीं. ही सारी विचारपरंपरा नित्य लक्षांत बाळगून आपण जीविताकडे आणि मृत्यूकडे पाहिलें म्हणजे मृत्यूचें स्वरूप आपणास उग्र अथवा उदासवाणें वाटणार नाहीं. संसारयात्रेंत असतां अनेक प्रकारच्या आपत्ति आपणास भोगाव्या लागतात आणि असें कां होतें याचें कारणहि आपणास कळत नाहीं; पण ज्याअर्थीं कारणावांचून कार्य घडत नाहीं, त्याअर्थीं त्या आपत्तींनाहि कांहीं कारण अथवा हेतु असला पाहिजे आणि ज्याअर्थीं हा हेतु या जड जीवितांत स्पष्ट दिसत नाहीं, त्याअर्थीं एवढेंच जीवित पूर्ण स्थितीचें नसलें पाहिजे हें उघड आहे. चूक आणि चुकीचे परिणाम यांचा कार्य कारणभाव आपल्या लक्षांत आला म्हणजे आपल्या आपत्तीचें कारणहि शोधावयास फार लांब जाणें नको. मनुष्यावर एकादी आपत्ति कोसळली, म्हणजे त्याची कार्यक्षमताहि वाढते आणि तो नटानें उद्योग करूं लागतो. असा अनुभव आपणास नेहमीं येतो. किंबहुना मनुष्यमात्राचा कोणताहि उद्योग पाहिला, तरी त्यांतील मूळ हेतु दुःखनिवारण हाच असतो. कांहीं तरी गरज भासूं लागली म्हणजे दुःखाची उत्पत्ति

होते, आणि मग तें निवारण करण्यासाठीं मनुष्य उद्योग करूं लागतो. जगांतून दुःख समूळ नष्ट झालें तर कोणीहि मनुष्य कांहींच उद्योग करावयाचा नाहीं. यावरून दुःख हा आपल्या कर्मप्रवणतेचा जिवंत झरा आहे, हें उघड सिद्ध होतें. आपण आपल्या स्वतःच्या संबंधांत अथवा बांधवांशीं होणाऱ्या व्यवहारांत ज्या चुका करतों, त्यांपासूनच आपत्ति उत्पन्न होते. आणि ती निवारावयाची म्हटली म्हणजे आणखी कर्म आपणास करावें लागतें. या वेळीं आपलें चित्त शुद्धीवर ठेवून आणि सृष्टीच्या कायद्यास अनुसरून कोणतेंहि कार्य करणें हाच आपत्ति निवारण्याचा मार्ग होय. ही परंपरा लक्षांत आली म्हणजे आपत्ति हें कोडें आहे, असें आपणास वाटणार नाहीं; अथवा तिचें स्वरूप भयानकहि दिसणार नाहीं. आपल्या जीवितयात्रेंत आपणास पुढें पाऊल टाकावयाचें असेल, तर असल्या दुःखांच्या डोक्यावर पाय देऊनच आपणास गेलें पाहिजे. केवढेंहि मोठें दुःख असलें, तरी कालांतरानें मनुष्य तें विसरतो. यावरून दुःख विसरण्याची प्रवृत्ति बीजरूपानें तरी आपणांत आहे, असें स्पष्ट दिसतें. हीच प्रवृत्ति वाढवून दुःख नाहींसें करणें आपणास अशक्य नाहीं. आणि ही प्रवृत्ति वाढविण्याचा मार्ग म्हटला म्हणजे आपलें जीवित परार्थाच्या कामीं लावणें, हाच होय. सृष्टीचा हा कायदा ज्याला कळतो आणि त्याप्रमाणें जो वागतो, त्याला सुखाचा तोटा नाहीं.

'जीवितयात्रा' हा टॉलस्टॉय यांचा ग्रंथ रशियांत प्रसिद्ध होण्याजोगा नव्हता. रशियांतील चालू धर्मपंथाविरुद्ध बरेच विचार या ग्रंथांत असल्यामुळें सरकारी परीक्षकांच्या तावडींतून तो घडपणें सुटला नसता. यामुळें टॉलस्टॉय यांनीं त्याजबद्दल सरकारची परवानगीहि मागितली नाहीं. पुढें याची एक हस्तलिखित प्रत जिनीवा येथें गेली आणि हा ग्रंथ तेथें छापला गेला. ग्रंथ छापला जात असतां त्याचा कच्चा खर्डा सुद्धां टॉलस्टॉय यांच्या नजरेखालून गेला नव्हता. यामुळें पुष्कळ ठिकाणीं मजकुराची विसंगतता त्यांत राहिली आहे. याशिवाय हस्तलिखितावरून छापखान्यासाठीं ज्यानें प्रत तयार केली त्याच्या निष्क

उजीपणामुळें अथवा अज्ञानामुळें पुष्कळ ठिकाणीं अर्थाचा अनर्थहि झाला आहे. या ग्रथाचें सार यानंतर न्यूयार्क येथें प्रसिद्ध झालें.

आपल्या मतांचा प्रसार शक्य तितक्या रीतीनें लोकांत व्हावा, अशी टॉलस्टॉय यांची मनःपूर्वक इच्छा होती आणि या इच्छेला अनुसरून अनेक मार्गांनीं आपल्या मतप्रसाराचें कार्य ते करीत असत. जीवित-हेतु या मथळ्याचा एक निबंध मास्को येथील विद्वान्मंडळापुढें या वेळीं त्यांनीं वाचला. अशा प्रकारचा निबंध टॉलस्टॉय वाचणार आहेत अशी बातमी अगाऊ बाहेर पडल्यामुळें या सभेला लोकांची गर्दी अतोनात झाली होती. अर्थातच गर्दीतील बराचसा भाग सुशिक्षित म्हणविणाऱ्या तरुणांचा होता. पाश्चात्यांच्या जडवादाचा बराच पगडा या वेळीं रशियन तरुणांवर बसला असल्यामुळें टॉलस्टॉय यांच्या मतांची छाप त्यांजवर पडली नाहीं. इतकेंच नव्हे, तर बहुतेकांना त्यांचा मुद्दासुद्धां नीट समजला नाहीं.

" जीवितयात्रा " हा ग्रंथ ज्यांच्या ज्यांच्या अवलोकनांत आला त्यांच्या चित्तावर त्याचा बराच परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. अशा वाचकांपैकीं पुष्कळांचीं मतें साफ बदलून जाऊन कित्येकांनीं सरकारी नौकरीचे राजीनामे दिले आणि दुसरे कित्येक राजकारणांतूनहि बाहेर पडले. अशा गोष्टी केवळ रशियांतच घडल्या असें नाहीं, तर अमेरिकेसारख्या स्वातंत्र्याच्या माहेरघरींहि कित्येक लोक टॉलस्टॉय यांचे शिष्य बनले.

टॉलस्टॉय यांचा मेव्हणा बर्स हा या वेळीं कॉकेशस् प्रांतांतून परत आला होता. टॉलस्टॉय यांच्या भेटीसाठीं इ. स. १८८७ च्या ( आगष्ट महिन्यांत तो यासनाया येथें गेला होता. या वेळच्या टॉलस्टॉय यांच्या वृत्तिसंबंधानें तो म्हणतो—

" टॉलस्टॉय यांचा चेहरा अगदीं शांत दिसे, तथापि उदासीनतेची छटा त्याजवर नव्हती असें नाहीं. त्यांनीं एकंदरीनें मानसिक यातना किती भोगल्या असाव्या याचें अनुमान कोणालाहि त्यांच्या चेहऱ्यावरून सहज करतां येण्यासारखें होतें. त्यांचा पूर्वीचा चेहरा आणि आतांचा चेहरा यांत जमीनअस्मानाची तफावत मला आढळली.

त्यांचा चेहराच केवळ बदलला होता, असें नाहीं; तर त्यांच्या पूर्वीच्या साऱ्याच व्यक्तिविशिष्ट तत्त्वांत फेरबदल झाला होता."

"'आपल्या शेजाऱ्यावर प्रीति कर' हा खिस्ताचा उपदेश टॉलस्टॉय यांस इतका पटला होता कीं, त्यांच्या साऱ्या वागणुकीत त्याची छटा पूर्ण दिसत होती."

"चालू शिक्षणपद्धतीबद्दल टॉलस्टॉय यांच्या मतांत असाच बदल झाला होता. आपणास मनुष्यजातीची सेवा उत्तम प्रकारें करतां यावी या हेतूनें दिलेलें शिक्षण तेंच शिक्षण—"शिक्षण" या नांवास पात्र आहे असें तें म्हणत; पण यापलीकडे आपण सुशिक्षित म्हणून लोकांवर तोरा मिरविणारें शिक्षण हें खरें शिक्षण नव्हे असें ते स्पष्टपणें म्हणत. असल्या प्रकारच्या शिक्षणाचा कोणताहि चांगला परिणाम न होतां, त्यानें स्वार्थबुद्धि बळावते, इंद्रियसुखलोलुपता वाढते आणि दुसऱ्यांची सेवा करण्याऐवजीं दुसऱ्यांस आपल्या सेवेला लावण्याची दुर्बुद्धि निर्माण होते, असें त्यांचें मत होतें. चालू शिक्षणपद्धति केवळ याच विचारानें प्रेरित झालेली असून सुशिक्षिताला दुसऱ्याच्या डोक्यावर पाय देऊन स्वतः वर कसें चढतां येईल इतक्यापुरताच विचार ती करते. टॉलस्टॉय यांच्या डोक्यांत हें मत पक्कें झाल्यामुळें स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष्य देण्याचें त्यांनीं साफ सोडून दिलें. अर्थातच हें काम त्यांच्या पत्नीस संभाळावें लागलें; पण ती तें करते म्हणून तिजवरहि त्यांचा रोष झाला होता. विश्वविद्यालयाचें शिकामोर्तब मिळवून आतां पुढें काय करावें, याजबद्दल सल्ला विचारण्यासाठीं त्यांचा वडील मुलगा त्यांजपाशीं आला, तेव्हां कोणा तरी शेतकऱ्याच्या हाताखालीं रोजमुऱ्यानें काम कर असा उपदेश त्यांनीं त्याला दिला."

"सहानुकंपा आणि बंधुप्रेम यांची व्युत्पत्ति करणें हें शिक्षणाचें कार्य आहे, असें टॉलस्टॉय यांचें निश्चित मत दिसतें. अशा प्रकारच्या भावना पुढील पिढीच्या मनांत उत्पन्न करावयाच्या असतील तर इंद्रियसुखलोलुपताहि तिच्या चित्तांतून काढून टाकली पाहिजे; पण तसें न करतां उलट हल्लींचें शिक्षण—विषय सुखाची लालसा वाढवितें, असा टॉलस्टॉय यांचा आक्षेप आहे. हल्लींच्या शिक्षणानें साधेपणाची राहणी आवडेनाशी

होते, एवढेंच नव्हे, तर आपल्या आजूबाजूच्या माणसांनीं आपल्या वाटेल त्या चैनीसाठीं, वाटेल तसें राबलें पाहिजे, असेंहि अलीकडील सुशिक्षितांस वाटतें. रोजच्या व्यवहारांत खऱ्या सौजन्याची फार जरूर आहे; पण अलीकडल्या पद्धतीनें शिकलेल्या लोकांत नाटकी सौजन्य मात्र आढळून येतें. सौजन्याचें नाटक करणें, ही प्रवृत्ति शुद्ध स्वार्थीपणाची द्योतक आहे. टॉलस्टॉय यांचीं हीं मतें ठाम असल्यामुळें ते स्वतः एखाद्या सामान्य शेतकऱ्याप्रमाणें वागूं लागले असल्याचें मला आढळलें. याच दृष्टीनें गांवढळ भाषेचा देखील स्वीकार त्यांनीं केला होता."

"मी पूर्वीं यासनाया येथें होतों, तेव्हां स्वतःच्या मोठ्या कुळाचा अभिमान टॉलस्टॉय यांस होता, असें मला आठवतें आणि त्या वेळीं सामान्यतः एकंदर जमीनदार वर्गाच्या कर्तबगारीबद्दल त्यांना भरंवसा वाटत होता; पण हें मान या खेपेस साफ पालटलेलें दिसलें. त्यांच्या चित्तांत आतां शेतकरी वर्गाबद्दल प्रेम उत्पन्न झालें. मनुष्याचा दर्जा जों जों कमी तों तों आपल्या दयेला व प्रेमाला तो अधिक पात्र आहे, असें ते म्हणूं लागले."

"पूर्वीं टॉलस्टॉय यांचा स्वभाव बराच एकलकोंडा होता; पण आतां यांतहि पुरा पालट होऊन वाटेल त्याची भेट ते घेतात. त्यांची प्रकृति नादुरुस्त असते, तेव्हां कांहीं कांहीं माणसांस भेटूं न देण्याचें काम त्यांच्या पत्नीस करावें लागतें; पण त्याबद्दलहि त्यांना राग येतो."

"वतनवाडीसंबंधींहि त्यांच्या मतांत अशीच उलटापालट झाली होती. आपल्या मिळकतीवर मालकीहक्क आपण अद्यापि सांगतों या गोष्टीबद्दल त्यांना फार खेद होत असल्याचें मला आढळून आलें. या पापांतून मुक्त होण्याची मला फार इच्छा आहे, असें त्यांनीं मजजवळ स्पष्टपणें बोलूनहि दाखविलें. याच उद्देशानें जमीनजुमल्याची वांटणी करण्याची गोष्ट त्यांनीं आपल्या पत्नीजवळ काढली, तेव्हां त्या दोघांत मोठा खटका उडाला. तेव्हां मालकीहक्काचे सारे कागदपत्र तुझ्या नांवानें करून देतों असेंहि बोलणें त्यांनीं तिजजवळ लावलें. या गोष्टीस ती कबूल होईना आणि तसें करण्यास त्यांच्या मुलांचीहि संमति मिळेना. तेव्हां या बाबीकडे लक्षच द्यावयाचें नाहीं, असा तिसराच पंथ त्यांनीं

काढला. शेतीसंबंधीं अथवा दुसऱ्या कोणत्याहि मिळकतीच्या बाबीसंबंधीं एकादें कूळ त्यांना विचारावयास आलें, तर मला कांहीं ठाऊक नाहीं, एवढेंच उत्तर ते देत. यासनाया येथील घरांत राहून केवळ शरीरधारणापुरतें अन्न खावयाचें आणि इतर व्यवहार करावयाचे; इतकाच त्यांचा त्यांच्या मिळकतीशीं संबंध राहिला होता. या वेळीं बनेतोंपर्यंत पैशाला स्पर्श करावयाचा नाहीं, असें त्यांनीं ठरविलें होतें. यामुळें गोरगरीबांना कांहीं दानहि ते करीत नसत. तथापि त्यांच्या कुटुंबांतून केवळ दानधर्मानिमित्त वर्षाकाठीं दोन तीन हजार रुपये खर्च होतो, असें माझ्या बहिणीच्या सांगण्यावरूनच मला कळलें. ते स्वतः पैसा वापरीत नसत; तथापि गरिबांना अन्य रीतीनें मदत करण्यांत ते कसूर करीत नसत. या वेळीं एका शेतकऱ्याचें घर जळून गेल्यामुळें तो मदत मागण्यास त्यांजकडे आला. तेव्हां टॉलस्टॉय हातीं कुऱ्हाड घेऊन बाहेर पडले आणि यासनायाच्या जंगलांतून झाडें तोडून तीं त्या शेतकऱ्याला त्यांनीं दिलीं. या कामीं मदत करण्यास त्यांजबरोबर मीहि गेलों होतों."

"तंबाखू आणि दारू या दोन्ही वस्तूंचा त्याग टॉलस्टॉय यांनीं या वेळीं केला होता. त्याचप्रमाणें कांहीं बारीकसारीक कामाकरतांहि कोणाला हुकूम सोडण्याचें त्यांनीं बंद केलें होतें. स्वतःला कांहीं जिन्नस लागली तर कोणा चाकरमाणसाला अथवा कुटुंबांतल्या माणसालाहि ते हांक मारीत नसत. कित्येक वेळां त्यांचें काम आपणहून कोणीं केलें, तर मात्र त्या वेळीं ते त्यांना हरकत घेत नसत. अशा वेळीं त्यांचा उद्देश स्वतःचे श्रम वांचविण्याचा नव्हता, तर त्यांची सेवा करण्यांत त्यांच्या नौकरांना जो आनंद होई त्यांत आपल्या कृतीनें विरजण पडेल कीं काय, अशी भीति त्यांना वाटे. जेवण्याच्या वेळींहि एकाद्या पदार्थाची बशी नौकरानें त्यांजपुढें केली, तर त्याजकडून ते ती घेत; पण या वेळींहि त्याला दुखवूं नये इतकाच त्यांचा उद्देश असे. आपल्या स्वतःच्या खोलीची झाडलोट ते स्वतः करीत; पण यामुळें पुस्तकें वगैरे कांहीं वस्तूंवरील धूळ तशीच रहात असे. तथापि मौज ही कीं, एकाद्या केराच्या जागेंत मनाला जसें किळसवाणें वाटतें. तशी भावना त्यांच्या खोलींत मला तरी कधींच उत्पन्न झाली नाहीं."

" शिकार त्यांनीं अगदीं सोडून दिली होती. ते शिकारीला जात नसत, एवढेंच नव्हे तर मांस खाण्याचेंहि त्यांनीं सोडून दिलें होतें. पूर्वी घोड्यावर बसण्याचा शोक त्यांना होता; पण आतां त्यांनीं तेंहि सोडून दिल्याचें मला दिसलें."

" मध्यंतरीं कुटुंबांतील मंडळी मास्को येथें गेली होती, तेव्हां स्वतःचा स्वयंपाक ते स्वतःच करीत. शारीरिकश्रमाची हौस त्यांना पूर्वीपासूनच होती. या वेळीं तिचें वळण मात्र बदललेलें होतें. पूर्वी ते शिकारीला जात अगर घोड्यावरून अथवा पायीं फेरफटका करीत; पण आतां त्याऐवजीं शेतें नांगरण्याचें अथवा गरीबांचीं झोंपडीं बांधण्याचें काम ते करूं लागत."

" त्यांच्या वृत्तीला या वेळीं उदासपणा आला असल्याचें मला आढळून आलें. पूर्वी मुलांबरोबर हंसूनखिदळून मौज करावी, अशी त्यांची वृत्ति होती; पण या वेळीं ती साफ मावळली होती. त्यांचा चेहरा दुःखीकष्टि दिसे अथवा ते सुतकी बनले होते, असें मात्र कोणी समजूं नये. आनंदीवृत्तीच्या ऐवजीं त्यांच्या चेहऱ्यावर पूर्ण गांभीर्य मात्र दिसत होतें; पण त्यांच्या ठिकाणचा नष्ट झालेला आनंदी स्वभाव त्यांच्या मुलांमध्यें पूर्णपणें उतरला होता. त्यांच्या देखताहि त्यांचीं मुलें दंगामस्ती करीत; तथापि ते त्यांना या कामींहि मनाई करीत नसत. नीतिशिक्षणाच्या उद्देशानें मुलांना धारेवर धरणें त्यांना पसंत नव्हतें. आतां फरक पडला होता तो इतकाच कीं, त्यांच्यांत ते स्वतः मिसळत नसत. मी तेथें होतों तेव्हां त्यांचे धाकटे मुलगे आणि पुतणे त्यांजबरोबर बुद्धिबळें खेळत; पण या वेळींहि त्यांचें मन त्या खेळांत नसे, असें मला स्पष्ट दिसून येई आजूबाजूला चाललेल्या गप्पागोष्टी शांतपणें ते ऐकून घेत; पण पूर्वीसारखें त्यांत स्वतः भाग घेण्याचे भाव त्यांनीं सोडून दिलें होतें. अशा प्रकारच्या गप्पागोष्टींत त्यांच्या स्वतःच्या मतावरच कोणी आक्षेप घेतला तर केवळ उत्तरापुरता एकादा दुसरा शब्द ते बोलत; पण इतर विषयांत मन घालण्याचें त्यांनीं अगदीं सोडून दिलें होतें."

" सरकारी नोकरी सोडून कांहीं तरी शेतकामाचा खाजगी धंदा तूं करावास, असा उपदेश या वेळीं त्यांनीं मला केला. ते म्हणाले, 'प्रिन्स

हिलकॉफसारख्या तरुण श्रीमंताचें प्रत्यक्ष उदाहरण तुजपुढें आहे. तो मला ओळखीत नाहीं. अथवा माझे ग्रंथहि त्यानें कदाचित् वाचले नसतील; पण केवळ स्वयंस्फूर्तीनें आपला सारा जमीनजुमला आपल्या कुळांना वांटून देऊन स्वतःकरतां केवळ पंचवीस एकर जागा त्यानें ठेवली आहे आणि आतां शेतकीचें काम शिकण्यासाठीं एका शेतकऱ्याच्या हाताखालीं बिनपगारी नौकरी त्यानें पतकरली आहे. शेतकीच्या कामांत तरबेज होऊन स्वतःचें पोट भरण्याइतका रोजमुरा मिळविण्याची योग्यता अंगीं आली म्हणजे लग्न करून त्या पचवीस एकर शेतकीवर घरदार करून राहण्याचा त्याचा उद्देश आहे."

प्रिन्स हिलकॉफ या गृहस्थासंबंधीं थोडीशी माहिती येथें देणें वावगें होणार नाहीं. हा रशियन लष्करांत कर्नलच्या हुद्यापर्यंत चढला होता. वयानें लहान असतांहि लष्करी बाबींत त्यानें चांगली बुद्धिमत्ता प्रगट केल्यामुळें थोड्याच काळांत एवढ्या मोठ्या हुद्यापर्यंत तो चढला. तुर्की युद्धांत त्यानें चांगली नौकरी बजावली होती. त्याची वर्तणूक अतिशय प्रामाणिकपणाची असल्यामुळें लष्करी सामग्री पुरविणाऱ्या कंत्राटदारावर त्याचा चांगला वचक होता. तुर्की युद्धांत एका प्रसंगीं घोडदळाचा हल्ला चढविण्याचें काम त्याजकडे आलें. घोडदळाच्या अगदीं अघाडीला तो चालला होता. या हल्ल्यांत त्याच्या वारानें एक तुर्क जागच्याजागींच ठार झाला; पण या वेळीं त्याचें मन एकाएकीं इतकें बेताल झालें कीं, युद्ध संपतांच इ. स. १८७८ सालीं त्यानें आपल्या नौकरीचा राजीनामा दिला. लष्करी नौकरींतून मोकळीक करून घेतांच त्यानें अगदीं साध्या राहणीचा स्वीकार केला आणि सामान्य प्रतीच्या शेतकरी मंडळींत तो उठूं बसूं लागला. तो स्वभावानें शांत, दिलदार आणि दयाळू असल्यामुळें शेतकरी वर्गाला तो लवकरच प्रिय झाला. पुढें चालू रशियन धर्मपंथाचा त्याग त्यानें केल्यावरून रशियन भटांनीं त्याची उचलबांगडी करून कॉकेशस प्रांतांत त्याला हद्दपार केलें. त्या ठिकाणीं दुखोबार पंथाची कांहीं मंडळी रहात होती. हिलकॉफ त्या मंडळींत जाऊन मिसळला. इ. स. १८९५ सालीं लष्करभरतीचा हुकूम आला असतां या मंडळीनें लष्करांत जाण्याचें नाकारलें, तेव्हां तसें करण्यास

हिलकॉफ यानेंच चिथावणी दिली असावी, अशा संशयावरून सरकारनें त्याची रवानगी बाल्टिक समुद्रावरील प्रांताकडे केली. तेथें तीन वर्षे काढल्यानंतर रशियाबाहेरील दुसऱ्या कोणत्याहि देशांत जाण्याची परवानगी त्यास मिळाली. तेव्हां इ. स. १८९८ सालीं तो इंग्लंडांत जाऊन राहिला.

टॉलस्टॉय यांचीं मतें अगदीं अक्षरशः पाळण्याचा मनःपूर्वक प्रयत्न जर कोणी केला असेल, तर तो हिलकॉफनेंच होय; पण अशा रीतीनें प्रयत्न केल्यानंतरहि टॉलस्टॉय यांचीं सारीं मतें सामान्य जनतेला व्यवहार्य नाहींत हाच अनुभव त्यालाहि आला. टॉलस्टॉय यांचीं सारीं मतें उद्यां प्रचारांत आलीं, तरी तेवढ्यामुळें रशियापुढील प्रश्न कायमचा सुटणार नाहीं, असें तो म्हणूं लागला. रशियांतील साऱ्या परिस्थितीचा अनुभव त्याला आला होता. या अनुभवाचा परिणाम असा झाला कीं, चालू सरकारी पद्धत कायम आहे, तोंपर्यंत टॉलस्टॉय यांच्या मतप्रसारानेंहि रशियाचें दुर्दैव संपावयाचें नाहीं, अशी त्याची खात्री झाली. सरकारानें ही त्याची उचलबांगडी कॉकेशससारख्या दूरवरच्या प्रांतीं केली, तेव्हां कसल्याहि प्रकारच्या कोर्टांत त्याची चौकशी केली नव्हती; एवढेंच नव्हे, तर त्याजवर कांहीं आरोपहि ठेवला नव्हता. अशा रीतीनें अगदीं बेदरकारपणानें वागणारें सरकार जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत हिलकॉफसारख्या एकट्या दुकट्या माणसानें केवढाहि स्वार्थत्याग केला, तरी सामान्य शेतकरीवर्गाला त्याचा फायदा कितपत होणार ? अशा प्रकारच्या परिस्थितींत हिलकॉफ याचें मन हळू हळू टॉलस्टॉयपंथावरून निघून क्रांतिकारक पक्षाकडे वळलें, यांत नवल नाहीं.

आतां ही हकीकत येथें इतकीच सोडून आपण पुन्हां टॉलस्टॉयकडे वळूं. बर्स पुढें म्हणतोः—

"टॉलस्टॉय यांची आपल्या कुटुंबाशीं वागणूक थोडीशी तुसडेपणाची झाल्यासारखी वाटली, तथापि त्यामुळें त्यांजवर असलेल्या त्यांच्या मंडळीच्या प्रेमांत कांहीं उणेपणा आला नव्हता. टॉलस्टॉय यांजबद्दल कुटुंबांतील सर्व मंडळीच्या चित्तांत पूर्ण आदर वसत होता."

"आपलीं मतें दुसऱ्यावर लादावीं अशी इच्छा टॉलस्टॉय यांस मुळींच

नव्हती. स्वतःच्या कुटुंबीयांशीं सुद्धां हेंच धोरण त्यांनीं स्वीकारलें होतें. आणि याच धोरणास अनुसरून स्वतःच्या मुलांनासुद्धां स्वतःच्या मताप्रमाणें वागण्यास त्यांनीं पूर्ण मोकळीक दिली होती. त्यांच्या मुलांनाहि ही गोष्ट माहीत असल्यामुळें केवळ पितृप्रेम म्हणून टॉलस्टॉय यांच्या मतांचा स्वीकार त्यांनीं कधींच केला नाहीं."

"आतां त्यांच्या पत्नीसंबंधीं पाहतां तिच्याशीं त्यांची वागणूक अधिक कठोरपणाची होती, असें म्हटल्याशिवाय इलाज नाहीं. जमीनजुमल्याची वांटणी ती करूं देईना, हें एक व दुसरें कारण चालू पद्धतीला अनुसरून मुलांचा शिक्षणक्रम तिनें ठेवला हें होय. या दोन कारणांमुळें तिजवर त्यांचा रोष झाला होता आणि त्यांच्या वागणुकींत पुष्कळ वेळां तो स्पष्टपणें नजरेसहि येत असे."

"उलटपक्षीं आपण करतों तें बरोबर आहे, अशी तिची खात्री होती, यामुळें टॉलस्टॉय यांची वागणूक तिला अक्षम्य वाटे. टॉलस्टॉय यांच्या मतांत उत्क्रांति कशी होत गेली, हें तिला सविस्तरपणें ठाऊक होतें. आणि अशा उत्क्रांतीमुळें पुष्कळ वेळां तिला त्रासहि भोगावा लागत असे. यामुळें टॉलस्टॉय यांच्या मतांबद्दल तिच्या ठिकाणीं आदर राहिला नाहीं; इतकेंच नव्हे, तर तीं अगदीं त्याज्य आहेत, असेंहि तिच्या मनानें घेतलें. टॉलस्टॉयांस कांहीं उपदेश करूं जावें तर त्याचा कांहींच उपयोग होणार नाहीं, हें तिला स्पष्ट दिसत होतें. तेव्हां त्यांच्या मतांचा उपसर्ग निदान मुलांना तरी लागूं नये व त्यांचें नुकसान होऊं नये, असें तिच्या बुद्धीला साहजिकच वाटे. मुलांना सांप्रतच्या पद्धतीनें शिक्षण न देणें आणि घरचा जमीनजुमला कुळांना वांटून टाकणें म्हणजे आपल्याच हातानें आपल्या मुलांना दुनियेंतून उठविण्यासारखें आहे, असें तिच्या मातृहृदयाला वाटे. एका बाजूस आड आणि दुसरीकडे विहीर अशा स्थितींत ती बिचारी सांपडली होती. नवऱ्याला खुष करण्याला जावें तर मुलांचें जन्माचें नुकसान होणार आणि तें टाळावें तर नवरा नाखुष होणार अशा भयंकर कात्रीची स्थिति उणीपुरी दहा वर्षें चालू होती. टॉलस्टॉय आणि त्यांची पत्नी यांच्यांत होणाऱ्या बेबनावाचें मूळ कारण हें होय. याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि बाबतींत त्या दोघांत कसलाच मतभेद नव्हता."

" एके वेळीं डोळयांत अश्रु आणून ती मला म्हणाली, पूर्वी सारीं कामें तेच करीत असत. मी फक्त मदतनीस होत्यें. आतां मालमत्ता सांभाळण्याचें आणि मुलांच्या शिक्षणाचें अशीं दोन कामें सर्वतोपरी माझ्याच शिरावर पडतात. मुलांना घराबाहेर घालवून त्यांना भीक मागण्यास मी लावीत नाहीं, या मोठ्या अपराधाबद्दल त्यांचा मजवर राग आहे. काय करूं! मला मुलें नसतीं तर त्यांच्याबरोबर बैरागीण बनून मी भिक्षासुद्धां मागितली असती; पण मुलांचें नुकसान करण्यास माझा हात वहात नाहीं. आपल्या मतापुढें पूर्वीचें सारें प्रेम ते विसरून गेले आहेत."

" जमिनीच्या वांटणीसंबंधीं या दोघांत पुढें बरेच तंटे झाले. एके वेळीं तर सारी दौलत मुलें मोठीं होईपर्यंत आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं सरकाराकडे अर्ज करावा, असाहि तिचा विचार होता. ही गोष्ट इतक्या निकराला आली, तेव्हां टॉलस्टॉय यांनीं सर्व इष्टेटीचा स्वतः पुरता राजीनामा देऊन तिचें कुळमुकत्यारपत्र आपल्या पत्नीच्या नांवानें केलें तथापि या मुकत्यार पत्रांतून कांहीं ग्रंथ मात्र त्यांनीं वगळले होते."

" टॉलस्टॉय यांचा वडील मुलगा सर्जेस याला आपल्या बापाचीं सारींच मतें पसंत नसावींत, असा माझा समज आहे. दवलतीचा राजीनामा वडिलांनीं दिला तेव्हां आईच्या सांगण्यावरून दवलतीचा कारभार तो करूं लागला आणि त्याच वेळीं सरकारी नौकरींतहि तो शिरला. या दोन्ही गोष्टी टॉलस्टॉय यांच्या तत्त्वास विरुद्ध आहेत, हें सांगावयास नको."

" दुसरा मुलगा इलिया हा मात्र पुष्कळ अंशीं आपल्या बापाच्या वळणावर गेला होता. त्यानें शिक्षणास रजा देऊन एका सामान्य घराण्यांतील मुलीशीं लग्न केलें आहे व शेतावर लहानसें घर बांधून त्यांत त्यानें कायमची वस्ती केली आहे. त्याचा जीवनक्रम अगदीं साधा आहे. त्याची बायको कुलीन घराण्यांतली असतांहि घरांतलि सारीं कामें ती स्वतःच करते. त्यानें नौकर ठेवलेला नाहीं."

" टॉलस्टॉय यांचा तिसरा मुलगा लिओ हा आपल्या शिक्षणक्रमांतून अद्यापि बाहेर पडला नव्हता; तथापि आपल्या वडिलांचीं मतें आपणास

मान्य आहेत, असें त्यानें स्वतः मजजवळ बोलून दाखविलें होतें. दुसरे धाकटे मुलगे अॅन्ड्र्यू आणि मायकेल या दोघांसहि टॉलस्टॉय यांचीं मतें फारशीं मान्य नाहींत. केवळ आपखुषीनेंच त्यांनीं लष्करी नौकऱ्या पत-करल्या होत्या, अॅन्ड्र्यू हा पुढें इतका बेफाम झाला कीं, त्यानें जवळजवळ क्रांतिकारक पक्षच स्वीकारला. टॉलस्टॉय यांची मुलगी मेरी ही मात्र बापाच्या वळणावर पूर्णपणें गेली होती. टॉलस्टॉय यांचीं सारीं मतें तिला पूर्ण मान्य असून तीं प्रत्यक्ष आचरणांत आणण्यासाठीं ती मनापासून धडपड करीत होती. तिनें पुढें प्रिन्स अबोलेन्स्की याजबरोबर विवाह केला आणि वैद्यकाचा अभ्यासहि तिनें पुढें चांगला केला होता. तथापि तिचा पोषाख आणि रहाणी हीं सामान्य शेतकन्यासारखींच होतीं. गांवांतील गोरगरिबांच्या घरीं जाऊन मुलांना शिक्षण देण्याचें व अजा-ऱ्यांची शुश्रूषा करण्याचें काम ती करीत असे."

कौंटेस बाईंच्या धाकट्या बहिणीबद्दल वर्स यानें पुढील हकीकत सांगितली आहे.

"माझी धाकटी बहीण दर वर्षी उन्हाळ्याच्या दिवसांत आपल्या मुलांबाळांसह यासनाया येथें येऊन रहात असे. टॉलस्टॉय यांच्या अंगीं असलेल्या अनेक गुणांबद्दल तिची त्यांच्या ठिकाणीं पूज्य बुद्धि होती. त्याचप्रमाणें केवळ उपपत्ति या दृष्टीनें त्यांचीं बरींच मतें तिला मान्य होतीं; तथापि तीं सारीं व्यवहार्य नाहींत असें ती स्पष्टपणें बोलून दाख-वीत असे. पुष्कळ वेळां टॉलस्टॉय यांजबरोबर तिचे वादविवाद होत असत आणि अशा वेळीं आपलें हें मत ती स्पष्टपणें त्यांना बोलून दाखवी."

इ. स. १८८७ च्या आगष्ट महिन्यांत रेपीन या नांवाचा सुप्रसिद्ध चित्रकार टॉलस्टॉय यांचें चित्र उतरण्याकरतां यासनाया येथें आला होता. यानंतरहि हा गृहस्थ वारंवार यासनाया येथें येऊं लागला आणि पुढें थोड्याच काळांत तो टॉलस्टॉय यांचा शिष्यहि बनला.

इ. स. १८८७ सालीं 'एमटी ड्रम' या नांवाची एक गोष्ट टॉलस्टॉय यांनीं लिहिली. लष्करी नोकरीला शेतकरी किती नाखुष असतात, हें त्यांनीं या गोष्टींत उत्तम प्रकारें दाखविलें आहे. त्याचप्रमाणें मनुष्यप्राणी सामान्यतः किती शांतताप्रिय आहे आणि लढाया करून

परस्परांचे गळे कापणें त्याला किती दुःसह होतें, हेंहि त्यांनीं उत्कृष्ट प्रकारें या गोष्टींत दाखविलें आहे.

या वेळच्या सुमारास टॉलस्टॉय यांची कीर्ति साऱ्या रशियांत सर्वतोमुखीं झाली असून विश्वविद्यालयासारख्या अनेक प्रकारच्या सार्वजनिक संस्थांकडून अनेक बहुमानाच्या पदव्या त्यांस येऊं लागल्या. खुद्द टॉलस्टॉय यांस असल्या बहुमानांची आणि पदव्यांची किंमत यत्किंचितहि वाटत नव्हती. त्याचप्रमाणें टॉलस्टॉय यांशीं प्रत्यक्ष परिचय असल्याचें भाग्य ज्यांना प्राप्त झालें होतें, त्यांनाहि अशा पदव्यांनीं टॉलस्टॉय यांचा बहुमान होतो असें वाटण्याचें कारण नव्हतें. असली पदवी त्यांना एकहि मिळाली नसती, तरी त्यांच्या अंगच्या बहुमोलपणांत कांहीं उणीव आली असती असें नाहीं. तथापि अशा रीतीनें त्यांची कीर्ति साऱ्या रशियांत होत असतांहि जुन्या धर्मपंथांच्या भिक्षुकांनीं त्यांची निंदा करण्याचें व्रत या वेळींहि अखंड चालू ठेवलें होतें, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

या वेळच्या कांहीं आठवणी सांगत असतां टॉलस्टॉय यांचा शेतकरी मित्र सेनिओनॉफ म्हणतो, " टॉलस्टॉय यांनीं लिहिलेल्या कांहीं गोष्टी एका पत्रांत मीं प्रथम वाचल्या आणि मला त्या फारच आवडल्या. त्या वाचून मलाहि लिहिण्याची स्फूर्ति झाली. याच कारणामुळें टॉलस्टॉय यांची माझी भेट झाली व त्यानंतर त्यांजकडे मी वारंवार जाऊं लागलों. पुढें मी लवकरच आपल्या खेड्यांत परत गेलों तेव्हां या मुलाखतीची बातमी माझ्या आधींच तेथें पोहोंचल्याचें माझ्या आढळण्यांत आलें. आमचा गांवांतला उपाध्याय माझ्या वडिलांना म्हणाला, 'तुमचा मुलगा एका भयंकर जाळ्यांत सांपडला आहे. लियो टॉलस्टॉय मोठा दुष्ट मनुष्य असून तरुण पोरांना बिघडविण्यासाठीं अनेक युक्त्या तो योजीत असतो. तुमच्या मुलासारखीं भोळीं पोरें त्याच्या तावडींत सांपडलीं म्हणजे आणा दोन आणे देऊन त्यांजकडून तो गोष्टी लिहून घेतो आणि पुढें त्यांजवर स्वतः हवा तितका पैसा मिळवितो.' उपाध्यायाचें हें बोलणें ऐकून माझ्या वडिलांना माझ्याबद्दल अतोनात संताप आला आणि त्याच्या भरांत माझ्या प्रत्येक कृतीबद्दल ते मला शिव्या देत सुटले."

ही एक गोष्ट केवळ नमुन्यादाखल म्हणून सांगितली आहे. अशा-प्रकारें अनेक युक्त्या योजून जुन्या पंथाचे भिक्षुक टॉलस्टॉय यांची निंदा मनसोक्त करीत होते. जुन्या धर्मपंथाबद्दल बोलतांना टॉलस्टॉय यांचें तोंड पुष्कळ वेळां बेभानपणें चालतें; याचें कारण या भिक्षुकमंडळीची ही कृतीच होय. टॉलस्टॉय यांच्या साऱ्या लेखांत मनुष्यजातीची उन्नति हा एकच हेतु सर्वत्र आढळून येतो. आणि या त्यांच्या कृतीबद्दल उपाध्यायां-कडून त्यांना असें बक्षीस वारंवार मिळूं लागल्यावर त्यांचेंहि चित्त भडकल्यास त्यांत नवल नाहीं. आतां सर्वच धर्माधिकारी या पद्धतीचे होते, असें नाहीं. त्यांतील कित्येकांना टॉलस्टॉय यांची योग्यता कळली होती; तथापि तसें उघड बोलून दाखविण्याची छाती त्यांस होत नसे. आणि ज्या एक दोघांनीं असें धैर्य दाखविलें त्यांना त्याचें कडू फळ ताबडतोब चाखावें लागलें.

इ. स. १८८७ च्या अखेरीच्या सुमारास डॉ० अलेक्झीएफ् या नांवाचे एक गृहस्थ अमेरिकेची सफर करून मास्को येथें नुकतेच आले होते. अमेरिकेंत त्या वेळीं दारूस आळा घालण्याचा बराच यत्न सुरू झाला होता. ही सारी चळवळ अलेक्झीएफ् हे स्वतः पाहून आले होते. या चळवळीची सारी हकीकत त्यांनीं टॉलस्टॉय यांस सांगितली. ही चळवळ टॉलस्टॉय यांस पसंत पडून त्यांनीं आपल्या घरींच ती प्रथम सुरू केली. एक शपथपत्रक तयार करून त्याजवर आपण प्रथम सही केली. यानंतर त्यांच्या घरांतील बऱ्याच मंडळींनींहि त्याजवर सह्या केल्या. पुढें लवकरच यासनाया येथील शेतकऱ्यांची एक सभा भरवून दारू व तंबाखू सोडण्याचा उपदेश टॉलस्टॉय यांनीं त्यांस केला. कांहीं दिवस-पर्यंत या शपथांची अम्मलबजावणीहि बऱ्याच चांगल्या रीतीनें झाली.

एकादी गोष्ट करण्यासाठीं बराचसा लोकसमुदाय एकसूत्रबद्ध करून त्यांजकडून कांहीं कार्य करवून घ्यावें, हें सामर्थ्य टॉलस्टॉय यांजमध्यें फारसें नव्हतें. त्यांच्या ठिकाणीं विचारशक्तीची वाढ पुष्कळ झाली होती; पण त्या मानानें अशा प्रकारची क्रियाशक्ति कमी होती. यामुळें स्वमतप्रसारार्थ संघ निर्माण करणें आणि ते चालविणें ही गोष्ट टॉलस्टॉय यांस कधींच साध्य झाली नाहीं. तथापि त्यांचे विचारपूर्ण लेख

आणि त्यांचें स्वतःचें वर्तन यांचा परिणाम सामान्य जनतेवर हळू हळू पण निश्चयानें घडून त्यांच्या मतांचा प्रसार होत होता. दारूचें दुष्ट व्यसन रशियांतून नाहींसें व्हावें याकरतां या दिशेनें जे प्रयत्न रशियांत झाले, त्यांत टॉलस्टॉय यांनींहि थोडाबहुत हातभार लावला. त्यांनीं यासंबधीं जे पांचचार लेख लिहिले, त्यापैकीं 'सुसंस्कृतांचा सण' या मथळयाचा लेख फार प्रसिद्ध आहे. स्वतःस सुशिक्षित आणि सुसंस्कृत म्हणविणारे अलीकडचे तरुण सणावाराच्या दिवशीं मद्यपानानें कसे बेहोष होतात आणि कित्येक वेळां अनन्वित कृत्ये करण्यापर्यंत त्यांची मजल कशी पोहोंचते, हें या लेखांत त्यांनीं दाखविलें आहे. मानवी मनाचीं चित्रें काढण्याच्या कामांत टॉलस्टॉय हे मोठे नामांकित चित्रकार असल्यामुळें केवळ साहित्यकला या दृष्टीनेंहि हा लेख फार उत्तम उतरला आहे. तो प्रसिद्ध होतांच त्यानें मोठी खळबळ उडवून दिली. पुष्कळ विद्यार्थिवर्गांत या विषयाची चर्चा सुरू झाली. टॉलस्टॉय यांनीं सुशिक्षितांची बदनामी करण्याचा यत्न या लेखांत केला आहे, अशीहि ओरड कित्येकांनीं सुरू केली. या चळवळीमुळें सरकारचें पित्तहि खवळणार, असाहि रंग दिसूं लागला; पण असल्या वावटळीला भीक घालण्याइतके टॉलस्टॉय लेच्यापेच्या मनाचे नव्हते. केवळ सुशिक्षितांचा उपहास करावा एवढ्याच एका हेतूनें हा लेख त्यांनीं लिहिला होता, असें नाहीं. तर प्रसंगीं शेतकऱ्यांनाहि उपदेश करण्याच्या वेळीं अशाच प्रकारची कडक भाषा बिनदिक्कतपणें ते वापरीत.


तथापि दारूनें झिंगलेला शेतकरी आणि दारूनें मस्त झालेला अलीकडला सुशिक्षित यांच्या मनोवृत्तींची तुलना करीत असतां आपल्या स्नेह्याजवळ ते म्हणाले, "एकादा शेतकरी झिंगला म्हणजे त्या वेळीं त्याची वृत्ति खरोखर मोठी पाहण्यालायक होते. त्याच्या हृदयांतल्या साऱ्या कोमल भावनांना उद्रेक येत असतो. शेतकऱ्याच्या अंगीं जी उदारता उपजतच असते, ती अशा स्थितींत पूर्ण बाहेर पडते. केवळ प्रेमाच्या भरांत तुम्हास मिठी मारण्यास तो धांवेल. अशा वेळीं तुमच्यासाठीं प्राण देण्यासहि तो एका पायावर तयार होईल. उलटपक्षीं मस्त झालेल्या सुशिक्षिताकडे पहा! त्याचा सारा स्वार्थ त्या वेळीं

तुम्हांस स्पष्ट दिसेल. दुसऱ्यावर तो अरेरावी कशी गाजवितो याचें पूर्ण चित्र तुम्हास त्या वेळीं दिसेल. स्वतःच्या चैनीसाठीं कोणाचा प्राण घेण्यासहि त्या वेळीं तो मागेंपुढें पहावयाचा नाहीं. यामुळें झिंगलेल्या शेतकऱ्याला पाहून प्रेक्षकाच्या मनांत सहानुकंपा उत्पन्न होते आणि त्याच्या दीनस्थितीबद्दल त्याचें अंतःकरण सकरुण होतें आणि त्याच स्थितींतल्या सुशिक्षिताबद्दल त्याच्या हृदयांत अत्यंत तिट्कारा मात्र उत्पन्न होतो. या दीड शहाण्याला आपल्यापासून दूर ढकलून द्यावें, असें मनाला सहज वाटूं लागतें."

याच विषयावर 'मनुष्यें अंमली पदार्थ कां सेवन करतात.' या मथळ्याचा एक अत्युत्कृष्ट निबंध टॉलस्टॉय यांनीं लिहिला आहे. कांहीं अंमली पदार्थ गुंग करणारे असून कांहीं दारूसारखे उत्तेजक असतात. या दोन पदार्थांचे परिणाम फार मार्मिकपणें या निबंधांत दाखविले आहेत. तंबाखूसारख्या क्षुल्लक दिसणाऱ्या पदार्थांचे परिणाम आपल्या लेखावर सुद्धां कसे झाले आहेत, हें या निबंधांत फार मार्मिकपणें त्यांनीं दाखविलें आहे.

लोकांस असल्या प्रकारच्या व्यसनांपासून मुक्त करण्याकरतां लहान लहान गोष्टी लिहिणें, निबंध प्रसिद्ध करणें, व्याख्यानें देणें आणि खाजगी रीतीनें शेतकऱ्यांजवळ स्वतः संभाषण करणें, अशा प्रकारचा टॉलस्टॉय यांचा उद्योग अखेरपर्यंत चालू होता.

इ. स. १८८८ सालीं एक इंग्रज गृहस्थ टॉलस्टॉय यांच्या भेटीस गेला होता. धन संपादन करणें बरें कीं वाईट, हा विषय चर्चेस निघाला असतां तो इंग्रज गृहस्थ टॉलस्टॉय यांस म्हणाला, 'गिरण्या आणि कारखाने अशा प्रकारच्या संस्था मनुष्याच्या कल्याणाला विघातक आहेत, या मताचें प्रतिपादन तुम्ही करतां; पण अशा रीतीनें सारे कारखाने बंद झाले, तर अत्यंत जरूरीच्याहि वस्तु आपणास मिळणार नाहींत, याची वाट काय ? चाकू, सुऱ्या यांसारख्या वस्तु तरी आवश्यक आहेत कीं नाहींत ?' टॉलस्टॉय म्हणाले, 'यांची आवश्यकता भाकरीइतकी नाहीं. असल्या प्रकारच्या जिनसा मिळाल्या नाहींत तरी कोणीहि मनुष्य आपलें सारें आयुष्य त्यावांचून कंठील; पण भाकरीवांचून त्याचें घटकाभरहि चाल-



काँट टॉलस्टॉय.

( नुकतेच शेतकामावरून येऊन आपल्या खोलींत ग्रंथ लिहीत बसले आहेत. )

णार नाहीं. याकरतां प्रथम सर्वांना पोटभर भाकरी मिळेल, अशी तजवीज आधीं झाली पाहिजे आणि हें साधावयाचें असेल, तर प्रत्येकानें फुकटखाऊपणा सोडून भाकरी अधिक निर्माण करणें आणि शक्य तितक्या प्रमाणावर लोकांचे श्रम कमी घेणें, हें आवश्यक नाहीं काय ?"

अशा प्रकारच्या टॉलस्टॉय यांच्या विचारसरणीनें त्या इंग्रज गृहस्थाची पुरी खात्री झाली असें नाहीं; तथापि टॉलस्टॉय अंतःकरणपूर्वक बोलत आहेत आणि सामान्यजनतेची स्थिति सुधारण्याची खरी कळकळ त्यांना आहे, एवढें मात्र त्याला चांगलें दिसून आलें; आणि या भेटीनंतर अनेक वेळां टॉलस्टॉय यांच्या भेटीसाठीं तो गेला होता. टॉलस्टॉय हे स्वतःच चतुरस्र गृहस्थ असल्यामुळें त्यांच्या भेटीला विद्वान् अथवा अविद्वान्, श्रीमंत अथवा दरिद्री, कोणीहि गेला, तरी त्यांच्या भाषणानें तो संतुष्ट होत असे. सामान्य शेतकरी म्हणजे क्षुद्र मनुष्य अशी भावना त्यांच्या चित्ताला केव्हांहि शिवली नाहीं. सारीं मनुष्यें सारखींच आहेत, अशी त्यांची श्रद्धा होती आणि ती त्यांची श्रद्धा त्यांच्या वागणुकींत इतकी स्पष्ट दिसे कीं, कसल्याहि दर्जाचा मनुष्य त्यांच्या भेटीस गेला, तरी तो कधींहि नाखुष होऊन जात नसे. त्यांची बोलण्याची आणि वागण्याची पद्धत इतकी मोहक असे कीं, एकाद्याच्या मताविरुद्ध ते कांहीं प्रतिपादन करीत असले, तरी त्यांच्या प्रतिपक्षाला त्यांच्या भाषणामुळें कधींहि विषाद उत्पन्न होत नसे. एकाद्या यंत्राला जसें वंगण अवश्य आहे, त्याचप्रमाणें सभ्यपणाच्या रीतीभाति आणि गोड भाषा हीं व्यवहाराला आवश्यक आहेत, असें ते म्हणत. अमुक एका विषयावर बोलावयाचें नाहीं, अथवा अमुक विषय त्याज्य असें त्यांना कधींच वाटलें नाहीं. कोणी कसल्याहि विषयावर त्यांच्याशीं बोलण्यास सुरुवात केली तरी ते मोठ्या मार्मिकपणें त्यावर चर्चा करीत.

या वेळची रशियाची राजकीय स्थिति बऱ्याच अंशीं बिघडली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. एका बाजूनें सरकारची दडपशाही अखंड चालू होती आणि दिवसेंदिवस लोकांस दडपण्याच्या नव्या नव्या युक्त्या सरकार काढीत होतें; तर दुसऱ्या बाजूनें सरकारला प्रत्युत्तर म्हणून क्रांतिकारक पक्षाच्या मतांचा प्रसार जोरानें होत होता. अशा प्रकारच्या

नाजुक परिस्थितींत कोणत्याहि राजकीय, धार्मिक, तात्विक अथवा सामाजिक विषयाची चर्चा मोकळेपणें करण्याची चांगल्या लोकांस चोरी झाली होती. कोणाच्याहि घरीं यांपैकीं एकादा विषय निघाला, तर मालक कोणत्या पक्षाचा असेल अशी धास्ती इतर मंडळीला वाटे. बाहेरून दिसावयास अगदीं सद्गृहस्थ परंतु आंतून सरकारच्या कानाशीं लागणाऱ्या माणसांचा सुळसुळाट या वेळीं रशियांत बराच झाला होता. यामुळें कोठेंहि चार मंडळी जमली, तरी परस्परांशीं मोकळ्या मनानें त्यांच्यांत संभाषण होत नसे. अशा स्थितींत टॉलस्टॉय यांचें घर म्हणजे कोणाहि मनुष्यास आपलें मत मोकळेपणें सांगण्याचें ठिकाण अशा स्वरूपाचें होऊन बसलें होतें. ही गोष्ट कमी महत्त्वाची नव्हे. टॉलस्टॉय हे उदारचरित आहेत, ही सर्वांची पक्की खात्री असे. स्वार्थाचा आणि त्यापासून उत्पन्न होणाऱ्या दुर्गुणांचा गंधहि त्यांजपाशीं नाहीं, अशी सर्वांची खात्री होती. आणि याहूनहि महत्त्वाची गोष्ट ही कीं, टॉलस्टॉय हे मोठे आशावादी होते. चालू परिस्थिति अन्यायाची असल्यामुळें ती फार दिवस चालूं शकणार नाहीं, आणि रशियाला सुखाचे दिवस लवकरच येतील ही भावना त्यांच्या ठिकाणीं इतक्या उज्ज्वलपणें दिसे कीं, तिचा पगडा त्यांच्या साऱ्या श्रोतृगणावर चांगलाच बसे.

इ. स. १८८७ च्या दिसेंबरच्या प्रारंभीं गे यास लिहिलेल्या पत्रांत टॉलस्टॉय म्हणतात, " आज एक आठवडाभर मी मास्को येथें आहें. खेड्यावर असतां मी लिहिणें सोडून दिलें होतें आणि आतां येथेंहि तोच प्रकार आहे. लिहिणें बंद केल्यामुळें मला खरोखर फार बरें वाटतें. हें ऐकून तुम्हांला कदाचित् नवल वाटेल. कांहींतरी लिहित बसणें हेंसुद्धां एक प्रकारचें व्यसन होय. तें फार हळू हळू जडतें. आणि मग कांहीं तरी पांढऱ्यावर काळें केल्याशिवाय मनुष्याला चैन पडेनासें होतें. हें व्यसन मनुष्याला जडण्याचें कारण हेंच कीं, आजूबाजूची दुःखद परिस्थिति कल्पनामय साम्राज्यांत नाहींशी करावी, अशी त्याची इच्छा असते. आणि दुसरें असें कीं, मनुष्याच्या आत्मश्लाघेला त्यामुळें प्रोत्साहन मिळतें. पूर्वी मलाहि असेंच वाटत होतें. मी कांहीं खरडलें तरी त्यांत मोठें ज्ञान भरलें आहे, असें माझा अहंकार मला सांगे. आणि मग त्याला तृप्त

करण्याकरतां मी कांहीं तरी खरडत बसत असे. आतां हा अहंकार नाहींसा झाल्यामुळें माझ्या पोकळ गर्वाला भर देणारा कोणी प्राणी माझ्या हृदयांत राहिला नाहीं. मी लिहिणें सोडून दिलें आणि त्यामुळें स्वतःची अथवा लोकांची दिशाभूल होणेंहि बंद झालें, हा विचार मनांत आला म्हणजे मला फार आनंद होतो. विडीसारखें व्यसन सुटल्यानंतर जो पवित्र आनंद होतो, तसा आनंद सध्यां मला होत आहे. लेखनाच्या दुष्ट व्यसनापासून मी मुक्त झालों आहें, आणि त्यामुळें परमावधीचा आनंद मला होत आहे."

"तुम्हीं सध्यां कामांत चूर झाल्यासारखे दिसतां. या कामांत देव तुम्हांस सहाय्य करो. आपल्या कामांत अमुक एका विशिष्ट हद्दीपर्यंत पोहोंचावें या हेतूनें आपण तांतडीनें कामाच्या मागें लागतों आणि अनेक कारणांनीं ती हद्द आपणास गांठतां येत नाहीं; पण एखाद्या कामांत त्या हद्दीला आपण पोहोंचलों म्हणजे जो आनंद आपणास होतो, तो वर्णन करून सांगतां येत नाहीं. असा आनंदाचा प्रसंग अगदीं क्वचित् येतो. इतर प्रसंगीं त्या हद्दीला पोहोंचण्याकरतां आपण धडपड मात्र करीत असतों. आज मी स्वतः या स्थितींत आहें."

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या मतांचा प्रसार इतर देशांतहि हळू हळू होऊं लागला होता. इ. स. १८८८ सालीं 'शारीरिक आणि मानसिक श्रम' या विषयावर पत्ररूपानें एक निबंध एका फ्रेंच गृहस्थाकडे टॉलस्टॉय यांनीं पाठविला होता. हें पत्र पुढें प्रसिद्ध झालें आणि फ्रान्समध्येंहि या विषयाची बरीच चर्चा झाली. टॉलस्टॉय मास्को येथें असतां कांहीं तरुण विद्यार्थी दर गुरुवारीं संध्याकाळीं त्यांच्याकडे येऊं लागले. अशी मंडळी जमली म्हणजे अनेक प्रकारच्या विषयांवर तेथें चर्चा चाले. अशा प्रकारच्या एका मुलाखतीचें वर्णन एका विद्यार्थ्यानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

"टॉलस्टॉय यांजबरोबर वादविवाद होतां होतां पुष्कळ वेळां आमचे खटकेंहि उडत. सामान्य जनतेचें प्रेम टॉलस्टॉय यांच्या ठिकाणीं इतकें होतें कीं, पुष्कळ वेळां तिच्यातर्फे बोलूं लागल्यावर त्यांच्या मतांवर पुष्कळ वेळां क्रांतिकारक पक्षाची छाया पडल्याचा भास होई. आमच्या

आक्षेपांना ते उत्तर देऊं लागले म्हणजे त्यांच्या डोळयांतून तेज जणूं काय स्रवतें आहे, असा भास होई. अशा प्रसंगाचें चित्र काढण्यास एकादा योग्य चितारी तेथें नव्हता, याचें मला खरोखर फार वाईट वाटतें."

" नीति आणि तत्त्वज्ञान यांचा मनोहर संगम त्यांच्या भाषणांत दिसे. धर्मवेड आणि भोळसरपणा हीं नाहींशीं करून शुद्ध तत्त्वप्रधान धर्म सामान्य जनतेस द्यावा, यासाठीं त्यांची सारी घडपड चालू होती. एकाद्या राजकीय विषयावर ते बोलूं लागले, तरी त्यांतहि नीतीचा, धर्माचा व तत्त्वाचा पाया स्पष्ट दिसे. त्यांच्या दृष्टीनें राजकीय विषयाला धर्माइतकें महत्त्व नव्हतें. या बाबींत त्यांच्यांत व आमच्यांत मतभेद होता. राजकीय सुधारणा अगोदर पाहिजेत आणि धार्मिक सुधारणा न झाली तरी चालेल असे आमचे विचार होते. यामुळें ते राजकीयदृष्ट्या बोलूं लागले म्हणजे त्यांचीं क्रांतिकारक मतें आम्हांला जेवढीं आवडत तेवढीं त्यांचीं धार्मिक मतें आवडत नसत. आमच्या दृष्टीनें धार्मिक विषयाला कांहीं महत्त्वच नव्हतें. आमच्यांत केव्हां केव्हां जो खटका उडे तो याच कारणामुळें होय. टॉलस्टॉय यांचे शिष्य म्हणविणारे लोक अजूनहि जुन्या पद्धतीनें कसे वागतात आणि सर्वसंगपरित्याग करून लोकसेवच्या मार्गे कां लागत नाहींत, याचें आम्हांला मोठें नवल वाटे. एके दिवशीं हा प्रश्न चर्चेस निघाला असतां टॉलस्टॉय म्हणाले, 'कोणी एकाद्यानें आपल्या इष्टमित्राचा संबंध तोडून लोक॰ सेवा केली नाहीं, म्हणून तेवढ्यानेंच तो अगदीं दोषी होतो असें नाहीं. आजूबाजूचीं सारीं माणसें आणि सारें गणगोत अंधपरंपरेच्या चालीरीतींत वाढलेलें असतें. त्यांचे पाश एकदम तोडून त्यांना दुःख देणें हें तरी इष्ट आहे काय ? यापेक्षां त्यांच्याच तंत्रानें वागून हळू हळू आपल्या मतांचा प्रसार करावा हें मला अधिक बरें दिसते."

" यावर आमच्यांतला एक तरुण म्हणाला, 'मनुष्याचे खरे शत्रु त्याच्या घरांत आणि त्याच्या आप्तेष्टांतच असतात, हें बायबलांचें वचन तुम्ही विसरलां काय ? माझ्या गणगोताच्या संतोषासाठीं कोठें दरोडा घालण्याची माझ्यावर पाळी आली, तर त्यांच्यासाठीं मी तसें करावें कीं काय ? ' यावर टॉलस्टॉय यांनीं त्याची समजूत पाडण्याचा यत्न

अनेक प्रकारें करून पाहिला; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं."

"अशा रीतीनें टॉलस्टॉय यांच्या पंथांतून दोन पोट पंथ उपस्थित झाले. यांपैकीं आम्हां तरुणांचा पंथ फक्त राजकीय विषयांत मन घालणारा असून सामान्य जनतेच्या कल्याणासाठीं प्रसंगीं आपल्या सर्वस्वावरहि पाणी सोडण्यास तयार असा होता. टॉलस्टॉय यांच्या धर्ममतांसंबंधीं आम्हां तरुणांच्या या पक्षानें फारसा विचारच केला नव्हता. याहून दुसरा पंथ होता, तो केवळ धर्मसुधारणेस वाहिलेला होता. टॉलस्टॉय यांचीं धर्ममतें प्रचारांत आणून सुधारलेल्या ख्रिस्ती धर्माचा प्रसार करावयाचा असा त्याचा हेतु होता. हा पक्ष राजकीय विषयांत फारसें मन घालीत नसे. तथापि केवळ टॉलस्टॉय यांच्या दृष्टीनें पाहतां हा पक्ष टॉलस्टॉय यांच्या मताशीं अधिक जुळता होता. याच लोकांना आपलीं मतें अधिक चांगल्या तऱ्हेनें कळलीं आहेत, असें खुद्द टॉलस्टॉयहि म्हणत. आणि या लोकांच्या मनांतहि टॉलस्टॉय यांजबद्दल इतकी पूज्यबुद्धि होती कीं, त्यांना ते जवळ जवळ अवतारी पुरुषच समजत. टॉलस्टॉय जें कांहीं बोलतात, त्यांत असत्याचा अंशहि असणें शक्य नाहीं, अशी त्यांची भावना असे."

"प्रथम सांगितलेला तरुणांचा पक्ष टॉलस्टॉय यांचीं मतें प्रत्यक्ष प्रचारांत आणण्याकरतां विलक्षण धडपड करूं लागला होता. त्याच्या मार्गांतील अडचणी फार भयंकर होत्या. तथापि त्यांस न जुमानतां लोकजागृतीचें काम करावयाचें असा त्याचा निश्चय होता. यामुळें प्रसंगीं घरादारांचाहि त्याग करून आईबापांची अथवा इष्टमित्रांचीहि पर्वा न करतां शेतकरीवर्गांत मिसळून त्याशीं तो एकरूप होऊं पहात होता. उलटपक्षीं दुसरा पक्ष जरी टॉलस्टॉय यांस अधिक जवळ म्हणवीत होता, तरी त्यांतील लोकांच्या बाह्य वागणुकींत फारसा फरक झालेला नव्हता. त्यांतील जे लोक लष्करी नौकरी करीत होते, त्यांनीं ती नौकरी मात्र सोडली."

"या धार्मिक पक्षाच्या लोकांच्या मतांत अखेरपर्यंत फारसा फरक पडला नाहीं; पण तरुणांच्या पक्षाबद्दल मात्र असें म्हणतां येत नाहीं. त्या पक्षांत पुढें फाटाफूट होऊन त्यांतील अनेक लोक अनेक मार्गांनीं गेले. यांतील कांहीं लोकांनीं नवीन वसाहती स्थापण्याचा बेत करून टॉलस्टॉय

यांचें मत त्यांनीं विचारलें. टॉलस्टॉय यांनीं या गोष्टीला आपलें अनुमोदन दिलें; तथापि कृत्रिम पायावर उभारलेलीं कार्यें फार दिवस चालूं शकत नाहींत असेंहि त्यांनीं त्याच वेळीं बजावलें होतें."

याच वेळीं प्रोफेसर यांझूल या नांवाचे एक गृहस्थ टॉलस्टॉय यांच्या भेटीस गेले होते. हे टॉलस्टॉय यांचे प्रत्यक्ष अनुयायी नव्हते, तथापि त्यांचीं बरींचशीं मतें त्यांना मान्य असून टॉलस्टॉय यांचे ते मोठे चाहते होते. संध्याकाळच्या वेळीं टॉलस्टॉय यांच्या घरीं ते गेले, तेव्हां दिवाणखान्या-जवळच्या एका लहानशा खोलींत टॉलस्टॉय यांची स्वारी बूट शिवीत बसली होती. प्रोफेसरांस पाहिल्याबरोबर आपल्या खाजगी खोलीकडे बोट करून टॉलस्टॉय म्हणाले, 'तिकडे थोडा वेळ बसा. पुष्कळशीं अमेरिकन पत्रें आतांच्याच डांकेनें आलीं आहेत तीं वाचण्यास घ्या, इतक्यांत हें काम संपवून मी येतों.'

यांझूल त्या खोलींत गेले तेव्हां अनेक भाषांतील वर्तमानपत्रांचा एक मोठा भारा तेथें पडला होता. टॉलस्टॉयनीं तीं मुळींच उघडलींहि नव्हतीं, हें स्पष्ट दिसत होतें. त्यांतील एक बरेंचसें मोठें पत्र घेऊन यांझूल यांनीं तें उघडलें. हें एक अमेरिकेंतील पत्र होतें. तें उघडतांक्षणींच बऱ्याच ठिकाणीं टॉलस्टॉय यांचें नांव त्यांना आढळून आलें. तेव्हां तो लेख पाहतां त्यांत टॉलस्टॉय यांच्या धर्मविषयक मताची चर्चा केली असल्याचें त्यांस आढळून आलें. या लेखांत व अग्रलेखांतहि त्या पत्रकर्त्यानें टॉलस्टॉय यांची स्तुति ओतप्रोत केली होती. या भेटीच्या प्रसंगाचें वर्णन यांझूल यानें पुढीलप्रमाणें केलें आहे.

"अमेरिकन पत्रांतील हा लेख मी वाचीत होतों आणि केवळ महात्मा म्हणून ज्याची स्तुति त्या पत्रानें केली होती, त्या महात्म्याची मूर्ति मला समोरच दिसत होती. एका खडबडीत घडवंचीवर बसून आणि अरान्या मागें सारून हे महात्मा बूट शिवीत होते. अंगावर एक फाटकेंसें उपरणें होतें. एका बाजूला अमेरिकेंतील पत्राचें तें भपकेबाज वर्णन आणि दुसऱ्या बाजूला ती अगदीं साधी मूर्ति यांचा वस्तुविरोध माझ्या चित्तांत या वेळीं इतक्या जोरानें उभा राहिला कीं, माझें हंसूं मला आवरेना. एखादा वेडा जसा भयंकर रीतीनें हंसतो, तसेंच माझें हें हंसूं होतें. माझें हंसणें

ऐकून टॉलस्टॉय घाबरून उठले व काय झालें म्हणून मला विचारूं लागले. मीं त्या पत्रांतील कांहीं कांहीं वाक्यें त्यांस वाचून दाखविलीं, तेव्हां ते हंसुन म्हणाले, "कोणतीहि गोष्ट अतिरेकास न्यावयाची ही संवय अमेरिकन लोकांना पूर्वींपासूनच आहे." इतकें बोलून ते तसेच परत गेले आणि हात वगैरे स्वच्छ धुवून परत आल्यावर अनेक विषयांवर आमचें संभाषण झालें. त्या साऱ्या वेळांत त्या अमेरिकन पत्राकडे त्यांनीं ढुंकूनहि पाहिलें नाहीं."

"या वेळीं अनेक विषयांवर आमचें संभाषण झालें. त्यांत टॉलस्टॉय यांनीं सांगितलेला एकच मुद्दा विशेषें करून माझ्या ध्यानांत राहिला. ते म्हणाले, 'तुमच्या कोणत्याहि मताचें मूळ बीज आणि त्यावरून निघणारीं तर्कशुद्ध अनुमानें हीं बरोबर आणि पायाशुद्ध असलीं, तर तुमचीं मतें व्यवहाराला धरून नाहींत, या आक्षेपाला तुम्ही भिऊं नका. केवळ मनोदौर्बल्यानें तुम्ही असल्या आक्षेपाला भिऊन मागें सरलां तर तुमच्या हातून अगदीं नवा असा लेख एकहि निपजावयाचा नाहीं."

ख्रिस्ताचें चित्रमय चरित्र गे तयार करीत होता, हें वाचकांस आठवत असेलच. अशाच प्रकारचें एक चित्र पोलिएनॉफ नांवाच्या एका चितान्यानें तयार केलें होतें. हा चित्रकार गेहूनहि अधिक नावाजलेला होता आणि हें चित्र तयार करण्याकरतां खुद्द ख्रिस्ताच्या जन्मभूमीला जाऊन आपल्या विषयाचा विशेष अभ्यास त्यानें केला होता. इ. स. १८८८ सालीं त्याचें चित्र प्रसिद्ध झालें, तेव्हां त्याच्या उत्तमपणाबद्दल साऱ्या देशभर त्याची मोठी ख्याती झाली. पोलिएनॉफची टॉलस्टॉयशीं फारशी ओळख नव्हती; तथापि हें चित्र पाहण्याकरतां टॉलस्टॉय स्वतः त्याच्या घरीं गेले. बराच वेळपर्यंत त्या चित्राकडे निरखून पाहून आणि त्यांत मुख्य जागीं काढलेल्या चेहऱ्याकडे बोट दाखवून पोलिएनॉफला ते म्हणाले, 'या व्यक्तीवर तुमचें प्रेम मनापासून नाहीं असें दिसतें.' यावर चित्रकार म्हणाला, 'कोणत्या व्यक्तीवर?'

"या मध्यभागीं काढलेल्या."

'तो तर खुद्द ख्रिस्ताचा चेहेरा आहे.'

'बरोबर. मी तेंच म्हणतों, त्याच्यावर तुमचें प्रेम नाहीं, हेंच खरें.' इतकें बोलून टॉलस्टॉय तेथून तडक निघून गेले.

## प्रकरण पांचवें.

## अप्रतिकार.

इ. स. १८८९ सालच्या आरंभीं साहित्यशास्त्रांत पुन्हां एकवार टॉलस्टॉय प्रवेश करणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. अलीकडे बराच काळपर्यंत लहानसहान गोष्टी लिहिण्यापलीकडे कोणतीहि महत्त्वाची भर रशियन साहित्यांत टॉलस्टॉय यांनीं टाकली नव्हती. याच वेळीं एक फार महत्त्वाचें चित्र रंगविण्यांत गे गुंतला होता. त्या बाबतींत लिहिलेल्या पत्रांत टॉलस्टॉय म्हणतात.

"आपणहि कांहीं करावें, असें अलीकडे मला वाटूं लागलें आहे; पण मी तसें करावें अशी ईश्वराचीच मर्जी दिसत नाहीं. आणि आतां मी कांहीं लिहिलें नाहीं, तरी माझा वेळ अगदीं आनंदांत जातो. मनानें आणि आचरणानें शुद्ध राहून दुसऱ्याची सेवा करण्यांत जो आनंद आहे, तो अगदीं निर्मळ स्वरूपाचा आहे. तो आनंद आपणास मिळूं नये, असें करण्याचें सामर्थ्य कोणासहि नाहीं. तेव्हां अशा प्रकारच्या आनंदाचा उपभोग घेत स्वस्थपणें आयुष्याचा काळ कंठावा, असें पुष्कळ वेळां मला वाटतें. आपल्या आनंदाचें स्वरूप जितकें अधिक निर्मळ तितकें त्या आनंदाला अधिक चिकटून बसावें असें आपणास वाटतें; पण अशा आनंदांत इंद्रियजन्य सुखाचा अंतर्भाव होत नाहीं, हें मात्र अवश्य लक्षांत ठेवलें पाहिजे. अनेक प्रकारचीं खाद्यपेयें, दारू, तंबाखू इत्यादि वस्तूंपासून होणारा आनंद हा शुद्ध स्वरूपाचा नव्हे. त्याचप्रमाणें केवळ नांवलौकिकाकरतां एकादें सत्कार्य करीत असतां होणारा आनंदहि शुद्ध नाहीं. आपण केलेल्या कार्याबद्दल कोणीहि आपली स्तुति न केली तरी चालेल; इतकेंच नव्हे, पण उलट त्याबद्दल आपली निंदा केली, अथवा आपली फजिती करण्याचा यत्न कोणी केला, तरी ज्याच्या चित्ताला यत्किंचितहि दिक्कत वाटत नाहीं, तोच मनुष्य शुद्ध आनंदाचा उपभोग घेत

असतो. अशा प्रकारची मानसिक अवस्था आपणास प्राप्त व्हावी, असें मला वाटतें आणि तुमचीहि इच्छा तशीच असावी असें मला वाटतें."

"आतां जें काम मी करणार आहें त्याची थोडीशी दिशा दाखवितों. पशुपक्षांकडे पाहतां केवळ प्रजाजननाच्या वेळीं मात्र नर आणि मादी यांचा संयोग होतो; पण शहाणीं म्हणविणारीं माणसें मात्र यांस अपवाद आहेत. माणसांची जात खरोखर दीडशहाणी म्हटली पाहिजे. स्त्रीसंभोग किंबहुना त्याचा अतिरेकहि शरीरस्वास्थ्याला आवश्यक आहे, असेंहि प्रतिपादन कांहीं लोक आतां करूं लागले आहेत. पण यामताचा परिणाम विशेषतः स्त्रीवर्गावर किती भयंकर होत आहे; हें कोणाच्याहि लक्षांत येत नाहीं. अशा रीतीनें केवळ स्वच्छंदपणें वागून स्त्रियांच्या कोमल भावनांचा नाश पुरुषवर्ग करीत आहे. या नाशाचीं कडू फळें चाखण्याची वेळ आली म्हणजे पुरुषवर्ग संतापतो आणि उलट स्त्रियांसच शिव्या देऊं लागतो आणि मग या भावना उत्पन्न करण्याकरतां तो ग्रंथ लिहूं लागतो व व्याख्यानें झोडीत सुटतो. या बाबतींत मनुष्यानें पशूंची योग्यता अंगीं आणण्यासाठीं मनापासून खटपट केली पाहिजे. हें साधण्याकरतां प्रथम आपली बुद्धि त्यानें शुद्ध केली पाहिजे. अशा रीतीनें बुद्धि शुद्ध होईपर्यंत ज्या अनेक खटपटी तो करीत असतो, त्यांचा उपयोग त्या पशुवृत्ति जागी करण्याकडे मात्र होत असतो. अलीकडे माझें सारें चित्त याच विषयाकडे वेधलें आहे. आणि यामुळेंच या पत्रांत त्याचा उल्लेख मीं केला आहे. तुमच्या चित्तांत जे विचार परिपक्वदशेला पोहोंचलेले आहेत त्यांना चित्रांच्या रूपानें चिरस्थाइत्व देणें हें तुमचें कर्तव्य आहे. याचें मुख्य कारण हेंच कीं, असे विचार आधीं कोणास सुचावयाचे नाहींत, सुचले तर ते परिपक्वदशेला येत नाहींत आणि कदाचित् ते पक्व झाले, तरी त्यांना मूर्तरूप देणें तुम्हांप्रमाणें कोणास साधावयाचें नाहीं."

"मीं तुमची स्तुति करावी या हेतूनें मी हें लिहितों असें नाहीं, तर जें कार्य अत्यंत महत्त्वाचें असून जनतेलाहि ज्याची फार जरूर आहे, तें तुम्ही करावें, या हेतूनें मी हें लिहीत आहें. त्यांतून दुसरा विचार असा कीं, जनतेची खरी गरज भागविण्याकरतां आपण एकादें कार्य करीत

आहों या जाणिवेमुळें उत्पन्न होणारा आनंद अशा प्रतीचा आहे कीं, या जगांत त्याला तोड म्हणून कधींच सांपडावयाची नाहीं."

आपल्या चित्तांत परिपक्वदशेला आलेले विचार मूर्तरूपानें उघड करून ठेवणें हें आपलें कर्तव्य आहे, अशा प्रकारचे विचार पूर्वी टॉलस्टॉय यांच्या चित्तांत नव्हते; पण अलीकडे हेच विचार त्याच्या चित्तांत विशेष प्रामुख्यानें घेऊं लागले होते. यानंतर पुढें थोडक्याच काळांत 'कला म्हणजे काय?' अशा मथळ्याचा एक स्वतंत्र निबंधच त्यांनीं लिहिला. साहित्य-कलेसंबंधीं जो अनादर पूर्वी त्यांच्या चित्तात होता, त्याचें कारण हेंच कीं, साहित्यात पडणारी भर जशा प्रकारची असावी तशी नव्हती. अली-कडच्या साहित्याचा परिणाम सामान्य जनतेस कुमार्गांत प्रवृत्त करण्या-कडे होतो, असा त्यांचा समज होता. तथापि लोकांच्या चित्ताला नवें वळण लावण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यांत साहित्याचा मार्ग सोपा आणि चित्ताकर्षक आहे, ही गोष्ट त्यांना अवगत नव्हती असें नाहीं. लोकांचीं मनें इष्ट दिशेकडे वळविण्याचें कार्य जितक्या सहजपणें साहित्य करूं शकतें, तसें दुसऱ्या कोणत्याहि मार्गानें करतां येत नाहीं.

तारीख २४ एप्रील रोजीं गे यास लिहिलेल्या पत्रांत टॉलस्टॉय म्हण-तात, 'ओरूसॉफ याच्या घरीं आज तीन आठवडे मी राहिलों असून या अवधींत लिहिण्याचें काम मी केलें आहे; पण आतां मात्र माझ्या बुद्धीचा झरा आटून गेला आहे कीं काय असें वाटतें. कला म्हणजे काय याचें स्पष्टीकरण करण्याच्या हेतूनें एक लेख लिहिण्यास मीं सुरुवात केली आहे. पण अद्यापि तो पुरा होत नाहीं. हा निबंध लिहिणें माझें कर्तव्य आहे, असें एक मन मला सांगतें. कारण ज्या गोष्टी मला स्पष्ट दिसतात, तशा दुसऱ्यांना त्या दिसत नाहींत असा माझा समज झाला आहे. मृत्यु येण्यापूर्वी मला दिसणाऱ्या गोष्टी लोकांनाहि दिसतील असें करणें हें माझें कर्तव्य आहे; तुमचेंहि कर्तव्य हेंच आहे, असें मला वाटतें. लोकांच्या ऋणांतून सदोदित आपण मुक्त राहिलें पाहिजे. याकरतां दुहेरी काम आपणास करावें लागतें. आपल्या चरितार्थाचा भाग दुसऱ्या कोणावरहि लादावयाचा नाहीं आणि आपलीं सारीं कर्तव्यें योग्य रीतीनें पार पाडून पूर्वीच्या ऋणांतून मुक्त व्हावयाचें, हे मार्ग परस्परांस विरोधी नाहींत.

एवढच नव्हे, तर ते परस्परांना पोषाक असून आपलें जीवितहि याच क्रमानें शुद्ध आणि पवित्र होतें.

स्वतःच्या उदरनिर्वाहाकरतां दुसऱ्यांचे श्रम केव्हांहि न घेणें हा पुण्य-मार्ग आहे, हें आपलें तत्त्व टॉलस्टॉय यांनीं अशा रीतीनें अनेकवार उच्चारून दाखविलें होतें; पण बुद्धीचे श्रम ज्याला करावयाचे असतात त्याला शारीरिक कष्ट करणें तितकें शक्य नसतें, या गोष्टीचा अनुभव स्वतः टॉल्स्टॉय यांसहि आला होता. यासनाया येथें असतांना अशा रीतीनें बौद्धिक व शारीरिक श्रम यांची सांगड घालण्याचा यत्न ते मना-पासून करीत; तथापि पुष्कळ वेळां लेखनाचें काम सतत केल्यानंतर निव्वळ शारीरिक श्रमाला फारसा हुरूप अंगांत रहात नाहीं, असा अनु-भव त्यांस येई. शेतकरी वर्गांत मिळून मिसळून काम करण्याची हौस त्यांना असल्यामुळें शेतकीचें काम हें त्यांचें एक करमणुकीचेंच साधन होऊन बसलें होतें. आणि शेतकरी लोकांनाहि त्यांच्या संगतीचा उप-योग पुष्कळ होत असे. रशियन शेतकऱ्यांची शेतकीची पद्धत पुष्कळ अंशीं अडाणीपणाची असल्यामुळें श्रम आणि पैसा यांचा निष्कारण व्यय पुष्कळ वेळां होई. अशा वेळीं टॉलस्टॉय त्यांना नव्या औताची व शेत-कीच्या साधनाची मदत करीत. अशा रीतीनें हा परस्परसंबंध परस्परांस संतोषकारक होत असे. तारीख २३ जूनच्या गेल्या लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतातः—

"माझा एक स्नेही आपल्या घरच्या कागाळ्या सांगून मला पुष्कळसा त्रास देत असतो. केवळ बाह्य उपाधींत सुख अथवा दुःख भरलें आहे, हें म्हणणें अक्षरशः खोटें आहे. एकाद्या अडमुठ्याला अगदीं सुलक्षणी बायको मिळाली आणि दुसऱ्या एकाद्या चांगल्याची गांठ एकाद्या डाकि-णीशीं पडली तर दोघेहि सारखेच दुःखी असतात. हल्लींच्या काळीं बहुतेक विवाहित लोक आपल्या कमनशिबाबद्दल रडत असल्याचें मला आढळून आलें आहे; आपल्याइतकें दुःख जगांत दुसऱ्या कोणालाहि नसेल, अशी त्यांची पक्की भावना झाली आहे. पण स्वतःचें सुखदुःख बाह्य परिस्थितीवर अवलंबून नसतें हें त्यांना समजत नाहीं. दुःख दुःख म्हणून ते दुःखालाच मिठी मारून बसतात. मग ते सुखी कशानें

होणार ? माझ्याविषयीं म्हणाल तर मी पूर्ण सुखांत आहें. केव्हां थोडें गवत कापावें, केव्हां नांगरावें, केव्हां पुष्कळसें लिहावें अथवा लिहिलेलें खोडावें, अशा कार्यक्रमांत माझा काळ आनंदानें जात आहे. लिहितों असें म्हणण्यापेक्षां कांहीं तरी लिहिण्याची तयारी मीं करतों असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल. सध्यां एक नाटक, एक गोष्ट आणि एक निबंध इतके विषय मी हातीं घेतले आहेत. अशा स्थितींत माझा काळ आनंदांत न गेला, तरच नवल! येशू ख्रिस्तानें ज्ञान ज्योतीची जी लहानशी ज्योत या भूतलावर आणली तिचा प्रकाश दिवसेंदिवस वाढत असल्याचा अनुभव मला नित्य येत आहे.

टॉलस्टॉय यांनीं प्रतिपादिलेल्या अप्रतिकाराचा उदय या सुमारास अशा रीतीनें झाला. त्याचा नव्या कराराचा अभ्यास अद्यापि चालूच होता. सेंट म्याथ्यू याच्या करारांतील पुढील वचन मनन करण्यासारखें आहे. "डोळ्याला डोळा आणि दांताला दांत, हें तत्त्व पूर्वीं तुम्हीं ऐकलेंच आहे; पण मी तुम्हाला सांगतों कीं, दुष्टाचा प्रतिकार करूं नका. तुमच्या उजव्या गालावर कोणीं मारलें, तर डावाहि त्याच्यापुढें करा आणि तुमचा अंगरखा कोणी घेतला, तर त्याला सद्राहि घेऊं द्या." ख्रिस्ताच्या या वचनांवर टॉलस्टॉय यांच्या अप्रतिकाराच्या तत्त्वाची उभारणी मुख्यत: झाली आहे. कोणाहि मनुष्याला कोणत्याहि कामापासून परावृत्त करण्याकरतां शारीरिक बळाचा उपयोग करावयाचा नाहीं, असें टॉलस्टॉय यांचें तत्त्व निघालें.

आतां हें तत्त्व व्यवहारांत लागू करावयाचें म्हटलें, म्हणजे शारीरिक बलाचा उपयोग कोणत्याहि प्रकारें करणारें सरकार अस्तित्वांत नसावें असा होतो. या तत्वानुरोधानें पाहतां पोलिस आणि दिवाणी अथवा फौजदारी कोर्टेंहि त्याज्य ठरतात. त्याचप्रमाणें कर वसूल करणें हेंहि त्याज्य ठरतें. फार काय; पण आपलें घरदार अथवा जीवहि कोणीं घेऊं लागलें, तर त्याला मनाई करणें पापमूलक ठरतें. साऱ्या समाजाला घातक असें एकादें भलतेंच कृत्य कोणी करूं लागला, तर या तत्वानुसार त्यालाहि प्रतिकार करतां येत नाहीं. अशा स्थितींत अशा प्रकारच्या तत्त्वांवर जगांतला सांप्रतचा कोणताहि समाज चालूं शकेल कीं काय याचा विचार

वाचकांनींच करावा. ज्याला स्वार्थ असा मुळींच उरला नाहीं, अशा बुद्धीच्या टॉलस्टॉय यांजसारख्या एकाद्या व्यक्तीपुरतेंच हें तत्त्व खरें असूं शकेल. सर्व मनुष्यें आपल्याच कुटुंबांतील आहेत आणि हें सारें विश्व माझें घर आहे, अशी भावना ज्याच्या चित्तांत उद्भवली असेल, त्याच्या आध्यात्मिक वाढीला हें तत्त्व अत्यंत उपकारक होतें, यांत संशय नाहीं; तथापि निव्वळ स्वार्थानें भरलेल्या या जगांत त्याचा प्रसार जबरीनें करूं पाहणें वेडेपणाचें आहे. सांप्रतचा सामान्य मनुष्यस्वभाव आमूलाग्र बदललला आहे, अशी कल्पना केल्याशिवाय हें तत्त्व सामान्य समाजांत रूढ करूं पाहणें हें अखेरीस समाजाच्या घातासच कारण होईल.

हें तत्त्व टॉलस्टॉय यांनीं अगदीं नवीनच शोधून काढलें असें नाहीं. अशा तत्त्वाचा पुरस्कार करणारे लोक अत्यंत प्राचीनकाळींहि होते आणि पुढें ते राहतीलच. शारीरिक बलाचा दुरुपयोग होऊं लागला म्हणजे जुलमाचा जन्म आपोआपच होतो. अशा वेळीं शारीरिक बळाचा उपयोग कोणत्याहि कार्यासाठीं करणें पापमूलक आहे, असें सांगणारीं माणसेंहि अशा वेळीं जन्मास येत असतात. शारीरिक अथवा बौद्धिक बलाचा उपयोग जुलुमाकडे करणें, हें केव्हांहि आणि कोणत्याहि समाजांत त्याज्यच आहे; पण या शक्तीचा सदुपयोग करतां येत नाहीं असें नाहीं. कोणत्याहि गुणाचा सदुपयोग अथवा दुरुपयोग त्या गुणाच्या ठिकाणीं नसून तो त्याच्या मालकाच्या अंगीं असतो.

कोणत्याहि बाबतींत दोन मनुष्यांत मतभेद झाला असतां, स्वतः मतस्थापनेसाठीं शारीरिक बळाचा आश्रय ज्याला करावा लागतो, त्याचा पक्ष नैतिकदृष्ट्या दुर्बल असतो. हा अप्रतिकारवाद्यांचा पहिला मोठा मुद्दा होय. स्वमताच्या प्रतिपादनासाठीं पडतील ते कष्ट मी सोसीन, असें तोंडानें म्हणण्याइतकेंच नव्हे, तर प्रत्यक्षपणें आचरण्याइतकें धैर्य आणि मनोबल हीं ज्याच्या अंगीं असतात, त्याचा पक्ष उघडपणें खरा असला पाहिजे, असें त्यांचें म्हणणें आहे. स्वमताच्या पुष्टीसाठीं हातघाईवर येणाऱ्या मनुष्याचें मनच त्याचा पक्ष खोटा आहे, असें त्याला सांगत असतें. टॉलस्टॉय यांच्यासारख्या उच्च मनोवृत्तीच्या मनुष्याला या तत्त्वानुरूप व्यवहार करणें कठिण नाहीं; इतकेंच नव्हे, तर त्याच्या वाढीला तें पोषकच होतें. आपलें

कार्य नैतिक आणि धार्मिक स्वरूपाचें आहे, असें टॉलस्टॉय यांनीं सर्व्या जगाला उघडपणें सांगितलें आहे. यांत कोणताहि राजकीय हेतु साधावा असा गुप्त हेतुसुद्धां त्यांच्या मनांत नव्हता. त्याचप्रमाणें हें तत्त्व केवळ रशियापुरतेंच खरें आणि त्याचा व्यवहार रशियापुरताच व्हावा, असेंहि ते म्हणत नव्हते. अशा प्रकारचा आचार सर्व मनुष्यजातींत रूढ झाला, तर जगाला चिरशांतीचा लाभ होईल, असें त्यांचें म्हणणें होतें. कोणत्याहि प्रसंगीं शारीरिक बळाचा उपयोग करावयाचा नाहीं, हें तत्त्व एकवार मान्य झालें, म्हणजे त्याचा उपयोग करणारीं सरकारेंहि अवश्य अमान्य करावीं लागणार आणि याच अनुरोधानें रशियाचें सरकार अमान्य करावें व त्याच सरकारच्या पाठिंब्यावर चालणारा जुना धर्मपंथहि अमान्य करावा, असा उपदेश यांनीं केला. केवळ मनगटाच्या जोरावर लोकांच्या धर्मबुद्धीलाहि वक्रता आणल्याचें उदाहरण या जुन्या पंथाशिवाय दुसरें सांपडावयाचें नाहीं, असें ते म्हणत. यामुळें सरकार आणि चालू धर्मपंथ या दोहोंचेंहि उच्चाटण झालें पाहिजे असा टॉलस्टॉय यांचा आग्रह होता.

टॉलस्टॉय यांशीं बुद्धिवाद करून त्याचें मत खोटें पाडावें असें करण्याइतकी तयारी सरकार अथवा धर्मगुरु यांपैकीं कोणापाशींहि नव्हती. ते नित्यशः करीत असलेलीं पातकें लोकांच्या डोळ्यांपुढें इतक्या ठळकपणें होतीं कीं, टॉलस्टॉय यांजविरुद्ध केवढींहि प्रमाणें त्यांनीं जरी उभीं केलीं असतीं तरी त्यांचा पक्ष लोकांना कधींहि खरा वाटला नसता. याशिवाय टॉलस्टॉय यांच्या म्हणण्यांतील कांहीं मुद्दे तरी इतके उघड होते कीं, त्यांच विरुद्ध तोंड उघडण्याची कोणाचीच छाती झाली नसती. आतां आपल्या कोसाक स्वारांचा अथवा पोलिसाचा उपयोग करून टॉलस्टॉय यांच्या तोंडास कायमचें कुलूप घालण्याचें सामर्थ्य रशियन सरकारपाशीं नव्हतें असें नाहीं; पण या साधनाचा उपयोग सरकारानें केला असता, तर त्यामुळें टॉलस्टॉय यांच्या मताचा प्रसार थांबण्याचें एका बाजूस राहून उलट त्याला अधिकच पुष्टी मिळाली असती. कोणत्या ग्रंथाच्या लेखनामुळें टॉलस्टॉय यांस तुरुंगांत पडावे लागलें, हें जाणण्याच्या जिज्ञासेनेंच हजारों लोकांनीं त्यांचे ग्रंथ वाचले असते, आणि अशा रीतीनें सरकारी पक्ष खोटा आहे, असें लोकांच्या नजरेस अधिक उघडपणें आलें असतें.

'माझीं मतें' या नांवाचा जो एक ग्रंथ टॉलस्टॉय यांनीं लिहिला आहे, त्यांत या अप्रतिकाराच्या तत्त्वाची मांडणी बरीच सविस्तरपणें केली आहे. टॉलस्टॉय यांच्या मनांत या तत्त्वाची वाढ बायबलाच्या वचनानें झाली असेल, अथवा दुसऱ्या कांहीं कारणामुळें झाली असेल. इतकी गोष्ट खरी कीं या मताचें प्रतिपादन करणारीं माणसें सर्व देशांत आणि सर्व काळीं होऊन गेलीं आहेत. कोणत्याहि कारणासाठीं हातीं शस्त्र घ्यावयाचें नाहीं, या तत्त्वाचें प्रतिपादन करणारे पंथ सर्व देशांत चालू काळींहि आहेत. 'माझीं मतें' हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर टॉलस्टॉय यांस अमेरिका व बोहेमिया या देशांतून बरींच उत्तेजनपर पत्रें आलीं आणि एका गृह स्थानें ॲडिन बालू या ग्रंथकाराचा याच विषयावर असलेला एक ग्रंथ टॉलस्टॉय यांस नजर केला. हा ग्रंथ लक्षपूर्वक वाचून त्याजवर पुढील मत टॉलस्टॉय यांनीं नमूद केलें आहे.

हा ग्रंथ वाचून मला अतिशय आनंद झाला. अप्रतिकाराच्या तत्त्वाची इतकी सशास्त्र मांडणी दुसऱ्या कोठेहि केलेली माझ्या पहाण्यांत नाहीं. या तत्त्वाविरुद्ध जे आक्षेप नेहमीं ऐकूं येतात, त्यांना चोख उत्तर दिलें आहे. अशा दृष्टीनें या ग्रंथाची एकंदर उभारणी फार पायाशुद्ध झाली आहे. तथापि यावर माझे असलेले आक्षेपहि नमूद करणें अवश्य आहे.

" दारूनें धुंद झालेले आणि वेडे अशा लोकांच्या क्रियांना प्रतिकार करावा, हें बालू यांचें मत मला मान्य नाहीं. येशूख्रिस्तानें अशा प्रकारची सवलत दिलेली नाहीं. याकरतां तशी ती घेणें मला मान्य नाहीं. आतां शक्य तोंपर्यंत अशीं माणसेंच समाजांत निर्माण होऊं नयेत, हें बालू यांचें म्हणणें मात्र मला पूर्णपणें मान्य आहे; पण अशीं माणसें असलींच तर मनगटाच्या जोरावर त्यांना प्रतिकार करण्यापेक्षां मी मरण पत्करीन. जो ख्रिस्ताचा खरा अनुयायी असेल, त्यानें एखाद्या वेड्याच्या हातून मरणहि पत्करणें उचित आहे.

" बालू यांच्या ग्रंथावर माझा दुसरा आक्षेप हा कीं, खाजगी संपत्ति मिळविणें या बाबीसंबंधीं बालू यांनीं कोणतेंच मत निश्चितपणें दिलेलें नाहीं. खऱ्या ख्रिस्तानुयायाला कसल्याहि प्रकारच्या मिळकतीवर हक्क

सांगतां येत नाहीं. एवढेंच नव्हे, तर खाजगी मिळकत हा शब्दसुद्धां त्यांच्या दृष्टीनें अर्थशून्य असला पाहिजे, असें माझें मत आहे. त्याच्या मिळकतीवर दुसरा कोणी हक्क सांगूं लागला तर ज्याअर्थीं त्याचें निवारण त्याला करतां येत नाहीं, त्याअर्थीं मिळकत या शब्दाला त्याच्या दृष्टीनें कांहीं अर्थच नाहीं.

" माझा तिसरा आक्षेप सरकार या संस्थेबद्दल आहे. या संस्थेचा निषेध बाल्रू यांनीं कोठेंहि स्पष्ट केलेला नाहीं. खऱ्या खिस्तानुयायांच्या दृष्टीनें ही संस्था निरुपयोगी आहे, एवढेंच नव्हे, तर ती अनर्थकारकहि आहे. सरकार म्हणजे सुसंघटित शरीरबळाचा दुरुपयोग. सरकार, राष्ट्र, मिळकत, धर्मग्रंथ, हीं सारीं खुळें असून खऱ्या खिस्तानुयायाच्या दृष्टीनें हे शब्द अर्थशून्य आहेत. इतर लोक या शब्दांचा अर्थ काय करतात, हें खिस्ताच्या अनुयायाला ठाऊक असतें; पण त्याच्या चित्ताला तो अर्थ कधींहि पटावयाचा नाहीं. खिस्ताच्या आज्ञेबरहुकूम चालण्यांत अस्सल खिस्तानुयायी तडजोडी करावयाचा नाहीं. खिस्ताच्या आज्ञेबरहुकूम जो तंतोतंत वागेल आणि त्याच्या आज्ञा प्रत्यक्ष व्यवहारांत जो तंतोतंत पाळील, तोच खरा अनुयायी होय. खिस्ताच्या आज्ञा अर्धवट पाळल्या तरी चालतील, असें नाहीं. त्यांत असलेला सर्व अर्थ प्रत्यक्ष वागणुकींत दिसला पाहिजे. खिस्त म्हणतो, 'जो कोणी माझ्या मागें येऊं इच्छितो त्यानें त्यागी बनून आणि आपलीं सारीं दुःखें आपल्या शिरावर घेऊन माझ्या मागें आलें पाहिजे' हें त्याचें वचन त्याच्या काळीं जितकें खरें होतें, तितकेंच तें आजहि खरें आहे. दारिद्र्य आणि दुःख हीं सदैव सोसण्यास खिस्ताच्या अनुयायानें तयार असलें पाहिजे. तसें नसेल, तर तो त्याचा शिष्य होऊं शकत नाहीं. दुसरें असें कीं, हाल सोसणें हें प्रत्येक खिस्ताला आवश्यकच आहे. कारण ज्या गोष्टीसाठीं आपण दुःख सोशीत आहों, ती आपण परमेश्वराकरतां करीत असतों कीं स्वसुखाच्या अभिलाषानें करीत असतों, हें समजण्यास मार्ग नाहीं.

" कोणतेंहि तत्त्व व्यवहारांत येऊं लागलें म्हणजे तें अगदीं जसेंच्या तसें न येतां त्यांत कमीअधिकपणा करावा लागतो आणि तडजोडहि करावी लागते, हें मला कबूल आहे; पण कोणत्याहि सिद्धांताचा विचार

केवळ तत्त्वदृष्ट्या करण्याचा असतां त्या वेळीं तडजोडीची भाषा बोलण्याचा उपयोग नसतो. केवळ तात्विक बाबतींत तडजोड करणें म्हणजे तत्त्वाचाच उच्छेद करण्यासारखें होय. सरळरेषा म्हणजे दोन बिंदूंमधील कमींत कमी अंतर. ही सरळ रेषेची गणितदृष्टीची व्याख्या आहे. आतां शुद्ध गणिताच्या दृष्टीनें अगदीं बरोबर अशी सरळ रेषा आपणास काढतां येत नाहीं, म्हणून सरळ रेषेची व्याख्या बदलावयाची काय ?"

"जगाला आग लागण्याची वेळ जवळ आली आहे. फार काय पण कोठें कोठें तें पेटलेंहि आहे. आणि आपणास ज्याअर्थी या जगांतच रहावयाचें आहे, त्याअर्थी आपणहि त्याच्या बरोबर जळलें पाहिजे. आणि जेथें जेथें असे पेटलेले भाग असतील, तेथें तेथें त्या भागाशीं विचारविनिमयाच्या रुपानें स्वतःस सूत्रबद्ध करून घेतले पाहिजे. आतां राहिलेल्या आयुष्यांत हाच उद्योग मी करणार आहें. बालू यांच्या पुस्तकापासून मला फार उपयोग झाला असल्यामुळें मी सदैव त्यांचा ऋणी राहीन."

या पत्राला बालू यांजकडून पुढील उत्तर आलें:—

"मी आतां वृद्धावस्थेस पोहोंचलेला एक मनुष्य असून मी कीर्तिमान नाहीं आणि जगाकडून जयजयकार घेतल्यावांचून अदृश्य जगांत मला आतां लवकरच जावें लागेल. त्या ठिकाणीं जगांतल्या कीर्तीचा आणि चढाओढीचा मुळींच हिशेब नसतो. माझ्या ग्रंथावर आपण जे कांहीं आक्षेप घेतले आहेत, ते सर्व फार काळजीपूर्वक मी वाचले आणि आपल्या लेखाविरुद्ध माझ्यातर्फेनें जें कांहीं मला सांगावयाचें आहे, तें सांगण्याची परवानगी आपण मला द्यावी."

"दारूनें धुंद झालेले व वेडे यांच्या क्रियांविरुद्ध मनगटाच्या जोराचा उपयोग करण्यास हरकत नाहीं, असें माझें मत असल्याचें सांगून त्याचा निषेध आपण केला आहे. अप्रतिकाराच्या तत्त्वांत स्वतः खिस्तानें अशी सवड ठेवली नसल्यामुळें आपण ती बळेंच घेणें वाजवी नाहीं, असेंहि आपलें म्हणणें आहे. यावर माझें उत्तर हेंच कीं, वेड्याचा अथवा दारूबाजांचा प्रतिकार करतांना त्याला इजा होईल, अशा प्रकारचा प्रतिकार करावा, असें मीं कोठेंहि म्हटलेलें नाहीं. तर ज्या वेळीं अनेकांच्या हिताविरुद्ध कांहीं क्रिया त्यांच्या हातून घडतील, त्या वेळीं समजुतीच्या

चार गोष्टी सांगून आणि अशा कर्मांपासून तो परावृत्त होईल, इतक्याच प्रतीचें शारीरिक बळ उपयोगांत आणावें, असें माझें म्हणणें आहे. त्याला दुखापत करावी अथवा त्याचा जीव घ्यावा असें प्रतिपादन मीं कोठेंहि केलेलें नाहीं. आणि अप्रतिकाराच्या तत्त्वाच्या व्यवहारांत असली भयंकर तडजोड मी कधींच मान्य करणार नाहीं. मनुष्याच्या चालू व्यवहारानें माझ्या या मताला पुष्टी दिली आहे; इतकेंच नव्हे, तर व्यवहारिक नीतिशास्त्राच्या दृष्टीनें असें करणें आपणास भागच आहे, असें मी म्हणतों. एकादे वेळीं रागाच्या भरीं भरून अथवा दुसऱ्या एकाद्या विकाराला बळी पडून एकादा मनुष्य आपल्या बांधवाला इजा करण्यास प्रवृत्त होत असतो. अशा वेळीं मध्यें पडून आणि आपल्या शारीरबलाचा परिमित उपयोग करून त्या दोघांना आपण सोडविलें, तर रागाचा भर ओसरून गेल्यानंतर दोघेहि आपणास दुवाच देतील, अशी माझी खात्री आहे. अशा प्रकारचे शेकडों अनुभव रोजच्या व्यवहारांत आपणास प्रत्यक्ष येत असतात. अशा प्रकारच्या स्थितींत शारीरिक बळाचा उपयोग योग्य प्रकारें करणें हितावहच ठरतें. मनगटाच्या जोराचा उपयोग करून शुद्ध स्वार्थाकरतां रक्ताच्या नद्या वहावयास लावणें, हें पापकर्म आहे, हें कोणीहि कबूल करील; पण तशा प्रकारचा प्रतिकार आणि पूर्वीं सांगितलेला प्रतिकार यांत फेर आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. खिस्तानें ज्या प्रकारच्या प्रतिकाराला आक्षेप घेतला आहे, तो हा दुसरा प्रकार होय असें मला वाटतें."

"अप्रतिकाराच्या कायद्याला खिस्तानें अपवाद सांगितलेला नाहीं आणि यामुळें तसा अपवाद आपण उत्पन्न करणें अयुक्त आहे, असें आपण म्हणतां ही गोष्ट खरी आहे, पण जो भेद मीं वर सांगितला; तो येथेंहि लक्षांत ठेवला पाहिजे. पहिल्या प्रकारच्या परिस्थितींत प्रतिकार करण्याला कायदा आणि रूढि या दोहोंनींहि प्राचीन काळापासून मुभा ठेवली आहे. हा प्रतिकाराचा प्रकार आवश्यक नसता तर रूढि आणि कायदा या दोहोंनींहि अशी सवलत ठेवली नसती. खिस्तानें अशी सवलत ठेवली नाहीं, असें आपण म्हणतां, तर मग शारीरिक इजा न करतां केवळ उभयपक्षांच्या बऱ्याकरतां शारीरिक अथवा नैतिक बळाचा उपयोग करणें

अयुक्त आहे, असें ख्रिस्ताचें मत समजावयाचें काय ? छे, छे ! हें म्हणणें मला केव्हांहि मान्य होणार नाहीं. सत्कर्मांपुरतीहि सवलत ख्रिस्तानें ठेवली नाहीं, असें म्हणणें म्हणजे त्याच्या वचनाचा पूर्वापार संबंध न पाहतां भलतीच चुकी त्याच्या गळ्यांत बांधणें होय. ज्यासंबंधीं हें वचन निर्माण झालें आहे, त्याकडे लक्ष देतां पहिल्या प्रकारचा प्रतिकार अवश्य आणि इष्ट आहे. आणि ख्रिस्ताचा प्रतिबंध फक्त दुसऱ्या प्रकारापुरताच आहे हें उघड आहे."

" 'प्रत्येक तत्त्व व्यवहारांत येऊं लागलें म्हणजे त्यांत सवलती अवश्य उत्पन्न होतात' असें आपण म्हणतां. या आपल्या वाक्याचा अर्थ कदाचित् मला बरोबर समजला नसेल. सवलती असल्याशिवाय कोणतेंहि तत्त्व व्यवहारांत उतरणें शक्य नाहीं, असा आपला उद्दिष्ट अर्थ असेल, तर याविरुद्ध मला आक्षेप घेतला पाहिजे. जें नीतितत्त्व कसल्याहि सवलतीशिवाय व्यवहारांत येऊं शकत नाहीं, तें शास्त्रशुद्ध तत्त्वच नव्हे, असें मी म्हणतों. मनुष्याचा स्वभाव अनेक सवलती अधिक शोधीत असतो. आणि त्यांत अशा सवलती शास्त्रानें आपण होऊन दिल्या तर मग साराच ग्रंथ आटोपला ! अशा सवलती शास्त्रानें ठेवल्या म्हणजे पातकाचें महाद्वार उघडण्यासारखें होय. स्वतःस धार्मिक म्हणविणारे आणि नीतिवेत्तेपणाचा बाणा बाळगणारे लोकहि नीतिशास्त्राच्या आणि ख्रिस्ताच्या वचनांना तोंडानें मान देतात आणि व्यवहारांत सवलतीच्या फायद्याखालीं दडून शास्त्रमर्यादा उघड्या माथ्यानें उल्लंघीत असतात. मनुष्याचा स्वभाव आधीच किती अधोगामी आहे, हें यावरून आपणास उघड दिसतें. अशा स्थितींत त्याला सवलती देणें म्हणजे पिशाच्चाच्या हातीं कोलीत देण्यासारखें होत नाहीं काय ? किमानपक्ष अप्रतिकाराच्या तत्त्वास वाहिलेल्या तुमच्या आमच्यासारख्या एकांतिक भक्तांनीं बोलणें एक आणि करणें भलतेंच असला दुटप्पीपणा करणें अत्यंत गर्हणीय आहे."

" 'एकाद्या वेड्याच्या हातून ख्रिस्ताचा खरा अनुयायी मरण पत्करील; पण त्याच्या क्रियेला प्रतिक्रिया करणार नाहीं' असें आपण म्हणतां. आतां आपण दर्शविलेल्या बुद्धिवादाच्या याच दिशेनें आपण पुढें चाललों, तर

एकादा मनुष्य तापानें फणफणून त्याच्या भ्रमांत आपल्या बायकामुलांना अथवा स्नेह्यांना जिवें मारूं लागला, तर त्याला इजा न होईल, इतक्या बेतानेंहि त्याच्या क्रियेला प्रतिकार करूं नये, असा आपल्या म्हणण्याचा आशय उघड उघड सिद्ध होतो. मस्तकभ्रमानें अशा रीतीनें घोर अपराध केले, तरी त्यावर पवित्रतेचें शिक्कामोर्तब खिस्ताच्या कोणत्या वचनानें बसतें, हें माझ्या तरी लक्षांत येत नाहीं. तसेंच शुद्ध बुद्धीच्या कोणत्या तर्कानें अथवा मनुष्यकृत कोणत्या नीतिशास्त्रानें अशा कृतीला सवड ठेवली आहे, हें समजणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे."

"खऱ्या खिस्तानुयायाला मालमिळकतीवर हक्क सांगतां येत नाहीं, एवढेंच नव्हे, तर हक्क हा शब्दसुद्धां त्याच्या दृष्टीनें अर्थशून्य असला पाहिजे, असें आपण म्हणतां. पण वस्त्रप्रावरण आणि अन्न व त्याच-प्रमाणें निवाऱ्याची जागा इतक्या वस्तु तरी खिस्तानुयायालाहि अत्याव-श्यक आहेत. कोणी खिस्ताचा अनुयायी झाला, तरी तो सामान्य मानवी जीव आहे, हें विसरून चालावयाचें नाहीं. इतर कोणालाहि जगण्याचा जितका हक्क आहे, तितकाच तो खिस्ताच्या अनुयायालाहि आहे. या-करतां एवढ्या वस्तूंचा तरी त्याग करणें त्याला शक्य नाहीं. 'तुम्हांला या वस्तूंची जरूर आहे, ही गोष्ट परमेश्वराला माहीत आहे' असें खुद्द खिस्तानेंहि म्हटलें आहे. आणि ज्याअर्थी या वस्तु जीवित धारणाला अत्यावश्यक आहेत, त्याअर्थी त्यावर हक्क सांगणेंहि वाजवी आहे. 'प्रथम स्वर्गाचें राज्य आपलेंसें करा, म्हणजे या साऱ्या वस्तूंची जोड तुम्हांस आपोआप मिळेल,' असें खिस्ताचें वचन आहे. मग ज्या वस्तु खुद्द परमेश्वराच्या इच्छेनें आमच्या जीविताशीं जोडल्या गेल्या, त्यांजवर हक्क कोणाचा ? परमेश्वरानेंच त्या दिल्या, त्याअर्थी, ती मालमिळकत आमच्या हक्काची नव्हे काय ? ज्याप्रमाणें परमेश्वरानें दिलेलें शरीरें आणि बुद्धि हीं आमच्या मालकीचीं असून फसवून अथवा जबरीनें आम्हांपासून हिरावून घेण्याचा हक्क जसा कोणासहि नाहीं, त्याचप्रमाणें ही मालमिळकतहि ईश्वरदत्त असल्यामुळें आम्हांपासून कोणास हिरावून घेतां येत नाहीं. असें असतांहि तिजवर आम्हास हक्क सांगतां येत नाहीं, असें आपण कसें म्हणतां, हें मला समजत नाहीं. एकाद्या भ.मत्याला

आपलें घर लुटावें अशी इच्छा उद्यां झाली, तर मी खिस्ताचा अनुयायी एवढ्यामुळेंच तें लुटण्याचा हक्क त्याला प्राप्त होतो काय? चोरी, दरोडा, लूट यांसारख्या शब्दांना कांहीं अर्थच नाहीं काय? 'आपलें सर्वस्व गरीबगुरिबांना देऊन टाका' असें खिस्त म्हणतो. जर मालमिळकतीवर कांहीं हक्कच नसेल, तर सर्वस्व तरी कोठून देणार? आणि सर्वस्व नसेल, तर देऊन काय टाकणार? अशा स्थितींत 'आपलें सर्वस्व देऊन टाका' ही खिस्ताची आज्ञाच निरर्थक ठरावयाची नाहीं काय? मालमिळकतीवर हक्क सांगणें पापात्मक आहे, असा खिस्ताचा आशय मला तरी कोठें आढळला नाहीं. त्याचप्रमाणें शुद्ध बुद्धिवादाला अथवा भक्तिमार्गी मनुष्यालाहि आपलें हें तत्त्व पटावयाचें नाहीं."

"खऱ्या खिस्तानुयायाच्या दृष्टीनें सरकार म्हणजे नियमबद्ध जुलूम! सरकार, राष्ट्र, मालमिळकत आणि विशिष्ट पंथ हे सारे शब्द खिस्तानुयायाच्या दृष्टीनें अर्थशून्य आहेत, असें आपण म्हणतां; पण या साऱ्या वस्तु आपल्या जीविताशीं आज पक्क्या जखडल्या गेल्या आहेत. त्यांचें अस्तित्व नाकबूल करून चालावयाचें नाहीं. दीर्घ काळापासून आजपर्यंत त्यांची घटना स्वाभाविकपणेंच होत आली आहे. अद्यापि या संस्था रानटी स्थितींत असतील, आणि त्यांच्यांत उणीवाहि पुष्कळ असतील हें खरें; तथापि काळाच्या दीर्घ उदरांतून सृष्टिनियमानुरूप त्यांचा जन्म झाला आहे, हेंहि खोटें नाहीं. मनुष्यस्वभावाची घटना पाहतां तो समाजप्रिय प्राणी आहे, हें उघड दिसतें. तो अगदीं एकटा, अगदीं निराश्रय, सर्वथा स्वावलंबी, अशा रीतीनें कधीं राहणार नाहीं, आणि राहू शकणारहि नाहीं. कमी अधिक प्रमाणानें प्रत्येक मनुष्याचें जीवित एकाकी नसून तें सामाजिक स्वरूपाचें असतें. याचमुळें कुटुंब, समाज, गांव, राष्ट्र, संस्थान, सरकार इत्यादि प्रकारांनीं मनुष्यप्राण्यांची वस्ती पृथ्वीवर अनंत काळापासून चालत आली आहे. आणि हीच व्यवस्था पुढेंहि चालू राहणार आहे. खिस्ताचा अवतार समाज मोडण्यासाठीं नसून समाजरचना अत्युच्च दर्जाला पोहोंचविण्याकरतां होता, असा माझा समज आहे. बंधुभाव आणि समता यांच्या वाढीला पूर्ण वाव मिळावा आणि अशा उच्च स्थितीचा समाज निर्माण व्हावा,

कीं ज्याच्या रचनेंत नरकाचें द्वार उघडण्यासाठीं संधीच राहूं नये, असा धर्म जगाला त्यानें दिला. याच कार्यासाठीं त्यानें अवतार घेतला आणि याच कार्यासाठीं त्यानें देहदंड भोगला. अराजकता, समाजविध्वंस अथवा विघटना हीं खऱ्या ख्रिस्ती धर्माचीं कर्में नव्हत. हीं कार्यें अस्वाभाविक आहेत. आणि यामुळेंच तीं अशक्यहि आहेत. याकरतां ख्रिस्तानें सांगितलेल्या तत्त्वांचा प्रत्यक्ष आचार कोणतीहि सवलत न घेतां व्यवहारांत करून समाजाला रानटी अथवा अर्धवट रानटी स्थितींतून अत्युच्च दर्जाला पोहोंचविणें हेंच आपणां सर्वांचें ध्येय असलें पाहिजे. खऱ्या ख्रिस्तीधर्माचें उद्दिष्ट कार्य हेंच आहे. ज्या ठिकाणीं अत्युच्च दर्जाचा मनुष्य अत्यंत निकृष्ट स्थितींतल्या मनुष्याशीं समरसता पावतो, तो समाज आदर्शवत् होय. असा आदर्शवत् समाज निर्माण करणें, हीच सत्य निष्ठा आणि हेंच पुण्याचरण होय अशी माझ्या चित्ताची खात्री झाली आहे."

या पत्रावर टॉलस्टॉय यांनीं इ. स. १८९० च्या ता. २६ मार्च रोजीं पुढील उत्तर लिहिलें:—

"प्रियमित्र बालू, आपल्या आक्षेपावर अधिक चर्चा करण्याची इच्छा नाहीं. कारण तीपासून कांहीं उपयोग होईल, असें मला वाटत नाहीं. माझ्या पत्रांत एकच मुद्दा मी स्पष्ट केला नव्हता, तो आतां स्पष्ट करणार आहें. कारण तसें न केलें, तर तुमचा गैरसमज कायम राहील. तो मुद्दा सवलत अथवा तडजोड हा होय."

"केवळ तत्त्वविचाराच्या दृष्टीनें पाहतां सवलत किंवा तडजोड कबूल करणें पाप आहे, असा माझा म्हणण्याचा उद्देश होता. पण प्रत्यक्ष व्यवहारांत सवलत अवश्य आहे, असेंहि मला वाटतें. तत्त्वदृष्टीनें सवलत कबूल केली, तर त्यामुळें उद्दिष्ट कार्य अवनत होतें, म्हणून तेथें सवलत उपयोगी नाहीं, हें मला केव्हांहि कबूल आहे. याच दृष्टीनें विचार करतां शारीरिक बळाचा उपयोग—एकाद्या वेड्याविरुद्ध कां होईना—ही सवलत तत्त्वदृष्ट्या मला गर्हणीय वाटते. तत्त्वविचारांत अशी सवलत येऊं शकत नाहीं, असें माझें मत आहे. त्यांतून वेडा या शब्दाची शास्त्रीय व्याख्या काय करावी, हेंहि माझ्या बुद्धीला ठरवितां येत नाहीं. आतां अशा स्थितींत कदाचित् जीव गमावण्याची वेळहि मला येईल, हें

मला मान्य आहे; पण परमेश्वराच्या इच्छेनुरूप वर्तन करीत असतां जीव गमावणें म्हणजे त्याचा आशिर्वाद मिळविणें होय, असें मला वाटतें. परमेश्वराच्या इच्छेनुरूप वर्तन करणें हेंच पुण्य, ही गोष्ट आपल्या पुस्तकांतहि आपण कबूल केली आहे. पण अशी सवलत मीं एकवार कबूल केली, तर परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वर्तन करण्याच्या मोहांत सांपडण्याचा संभव मी निर्माण करतों, असें होत नाहीं काय? मृत्यु अथवा ईश्वराच्या आज्ञेचें उल्लंघन या दोहोंत उल्लंघन हें अधिक मोठें पाप आहे, असें माझें स्पष्ट मत आहे. तुमच्याबद्दल माझ्या ठिकाणीं अत्यंत पूज्य बुद्धि उत्पन्न झाली आहे. आणि तुम्ही मला माझ्या भावाइतकेंच प्रिय आहां, इतकें सांगून मी आपली रजा घेतों.

"लियो टॉलस्टॉय."

बालू आणि टॉलस्टॉय हे दोघेहि पक्के खिस्तभक्त. खिस्ताच्या आज्ञेनुरूप वागलं पाहिजे हा दोघांचाहि बाणा! 'बालू हा अप्रतिकाराच्या तत्त्वाचा धुरंधर प्रणेता वीर!' असें खुद्द टॉलस्टॉय म्हणतात. अशा रीतीनें मूलतः दोघांत एकवाक्यता असतां दोघांत तीव्र मतभेद उत्पन्न होतात, ही गोष्ट आश्चर्याची आहे. खिस्ताची आज्ञा दोघेहि सारखेंच मान्य करतात; पण दोघांचा अर्थ मात्र वेगवेगळा आहे. यामुळें खिस्ताच्या आज्ञेचा खरा अर्थ काय आहे, हें शोधीत बसण्यांत खरोखर कांहीं फायदा होईल कीं काय, अशी शंका सामान्य मनुष्याच्या चित्तांत आल्यास त्यांत नवल नाहीं. खिस्ताज्ञेच्या संहितेचा अर्थ लावण्यांत व्यर्थ कालक्षेप न करतां या प्रश्नाची चर्चा केवळ बुद्धिवादानें केल्यास अधिक फायदा होण्याचा संभव आहे, असेंहि त्याच्या मनांत येईल.

पहिल्या दृष्टीनें या प्रश्नाचा विचार केल्यास येशूखिस्तानें काय सांगितलें, हें शब्दशः समजण्याचें एकहि साधन आज उपलब्ध नाहीं. यामुळें या प्रश्नाची चर्चा केवळ दुसऱ्या दृष्टीनें करणें अधिक सोयीचें आणि श्रेयस्कर आहे. या प्रश्नासंबंधीं बालू यांनीं आपलें मत पुढीलप्रमाणें प्रकट केलें आहे.

"दुसऱ्याला सुखदायक अथवा दुःखदायक वस्तु कोणत्या, हें कोणालाहि स्वतःच्या मनानें ठरवितां येत नाहीं. त्याची स्वतःची प्रवृत्ति या

कामीं निरुपयोगी आहे. एकाद्याला सत्य वस्तुहि दुःखद होऊं शकेल. दुराचरणापासून एकाद्याला परावृत्त करीत असतां त्या वेळच्या त्याच्या यातनाहि त्याला दुःखद होऊं शकतील. अशा वेळीं केवळ मनोदौर्बल्याला बळी पडून आपल्या एकाद्या बांधवाला, तो भलत्याच मार्गाला खुशाल जाऊं देईल. अशा स्थितींत त्याची इच्छा, त्याची भावना आणि त्याचीं मतें, योग्य वागणूक कोणती, हें ठरविण्यास त्याच्या उपयोगी पडावयाचीं नाहींत. दुबळ्या झालेल्या त्यांच्या मनांत बुद्धीचा प्रकाश अंधुक होऊन त्याला खोटें तें खरें आणि खरें तें खोटें असेंहि भासण्याचा संभव आहे."

"एकादा दुष्ट मनुष्य, एकादें व्यक्तिहितविघातक अथवा समाजहितविघातक कृत्य करीत असतां अप्रतिकाराच्या तत्त्वामागें लपून त्याला तसें कृत्य करण्यास पूर्ण वाव देणें नीतीला तरी अनुसरून आहे काय? असें होऊं लागल्यास व्यक्ति अथवा समाज यांच्या अस्तित्वावरहि गदा येण्याचा संभव आहे. अशा वेळीं अशा मनुष्याचे पाय मागें ओढणें, हें समाजाला आणि खुद्द त्यालाहि श्रेयस्कर आहे."

"हट्टी मुलें आणि भ्रमिष्ट अजारी लोक यांस दुखापत केल्याशिवाय एकाद्या दुष्कृत्यापासून त्यांना मागें ओढणें शक्य नाहीं काय? त्याचप्रमाणें एकाद्या दांभिकाला शारीरिक इजा न करतां त्याचा दंभस्फोट करून लोकहित साधणें शक्य नाहीं काय? यावरून हें उघड दिसतें कीं, व्यक्तीचें अथवा जनतेचें हित साधण्यास कोणाला शारीरिक इजा करणें अवश्य आहे, असें नाहीं. मनुष्याची बुद्धि अपुरी आहे आणि पुष्कळ वेळां त्याच्या हातून चुका घडतात, हें कोणीहि कबूल करील; तथापि अशा चुका होत असल्या तरी वर्तणुकीचे नियम ठरून गेल्यावर आणि त्या त्यागण्याचा निश्चय असल्यावर त्याच्या हातून एकंदरीनें अहितापेक्षां हितच अधिक होईल."

टॉलस्टॉय यांचें प्रतिकाराचें तत्त्व बाह्यतः अगदीं सोपेंसें वाटतें; पण त्यांतील मुख्य उणीव हीच कीं, तें पुष्कळ अंशीं चालू समाजरचनेंत अव्यवहार्य आहे. हें तत्त्व सर्रास चालू केलें, तर त्याच्या योगानें समाजाचें

हित न साधतां घोटाळा मात्र अधिक निर्माण होण्याचा संभव आहे. याच बाबतींत रस्कीन या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें पुढील मत प्रकट केलें आहे.

" दुखापत म्हणजे काय, याची निश्चित व्याख्या अगोदर केली पाहिजे. एकाद्या मनुष्याच्या कृतीनें दुसऱ्याला दुःखाची जाणीव उत्पन्न झाली म्हणजे त्यानें त्याला दुखापत केली, असें आपण समजतों; पण वास्तविक पाहतां दुःखाची जाणीवहि न होतां एकाद्याकडून दुसऱ्याचें जें अहित होत असतें, तें खरोखर अधिक दुष्टपणाचें आहे. पुष्कळ वेळां बाह्यतः दिलेलें दुःख अंतीं सुखाला कारण होत असतें. योग्य वेळीं एकाद्याला मार्ग न ओढल्यामुळेंच तो दुःखांत पडत असतो. अशा वेळीं शारीरिक बळाचा उपयोग करून त्याच्या कृत्यापासून त्याला परावृत्त करणें हें कार्य वस्तुतः दुःखप्रद नसून अंतीं सुखाचेंच होतें, असें म्हटलें पाहिजे. अकार्य करण्यापासून एकानें दुसऱ्याला परावृत्त केलें, तर त्याचें स्वातंत्र्य त्यानें हिराहून घेतलें असें होत नाहीं."

" कोणीं आपला डोळा फोडला, तर त्याचा डोळा आपण फोडावा आणि उसनें कोणाचें ठेवूं नये, असा कायदा मानव कुलाच्या रानटी अवस्थेंत चालू होता; पण अशा प्रकारच्या कृतीनें हितापेक्षां अहितच अधिक होतें, ही सामान्य अनुभवाची गोष्ट आहे. दुसऱ्याला दुखापत करण्याची इच्छा बाळगण्यानें मन अधोगतीला जात असतें. याकरतां सूड उगविण्याची सारी इच्छा मनुष्याच्या मनांतून नाहींशी व्हावी, हें युक्त आहे; तथापि कित्येक वेळां स्वतःला सूड घेण्याची इच्छा नसतांहि केवळ समाजहित साधण्याकरतां प्रसंगीं एकाद्या मनुष्याचा वध करणें इष्ट असतें. स्वहिताचा विचार बाजूला ठेवून समाजांतील घटकांत परस्पर प्रेम जेणें-करून वाढेल, आणि समाजरचना सुसंबद्ध राहण्यास जेणेंकरून मदत होईल, अशा रीतीनें वागणें हें समाजांतील प्रत्येक घटकाचें कर्तव्य आहे. हें कार्य साधण्यासाठीं आपल्या शारीरिक, मानसिक अथवा नैतिक बळाचा उपयोग करणें योग्य आहे. एवढेंच नव्हे, तर तसें करणें समाजाला अवश्यकहि आहे. अशा स्थितींत जंत्रींत ओतलेले नियम समाजाला एकसहा लागू करणें शक्य नाहीं. कोणत्याहि विशिष्ट प्रसंगीं कसें वागावें, हें निश्चित करण्याचें काम ज्याचें त्यावरच सोंपविणें इष्ट आहे."

मनुष्याच्या सामान्य वागणुकीचें हें तत्त्व इतकें स्पष्ट आहे कीं, त्या-बद्दल अधिक विवेचन करण्याचेंहि कारण नाहीं. सामान्य जनतेला हें तत्त्व पटणें आणि त्यांतील रहस्याबरहुकूम तिच्या हातून व्यवहार होणें, हीच काय ती अडचणीची गोष्ट आहे. कोणालाहि एकादा मनुष्य कांहीं इजा करतो, त्या वेळीं त्याचा हेतु त्याला इजा करून कांहीं स्वार्थ साधण्याचा आहे कीं कांहीं परार्थ साधण्याचा आहे, हा मुद्दा ठरविणें तिऱ्हाइताला कठिण आहे. ही गोष्ट ज्याची त्याजवर सोपविल्यावांचून गत्यंतर नाहीं.

टॉलस्टॉय फक्त कृतीकडे पाहतात. कर्म करणाराचा उद्देश ते पहात नाहींत. टॉलस्टॉय यांनीं या मुद्याचें विवेचन अनेक प्रसंगीं अनेक प्रकारें केलें आहे. त्यावरून बाह्यतः दिसणारें कर्म हा मुद्दा नसून त्यांतील अंतर्गत हेतु हा मुद्दा आहे, ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं.

ते म्हणतात, 'तुम्ही कोणालाहि इजा केली, तर इजा करणें हेंच काम अगोदर चुकीचें आहे. एकादा मनुष्य वाईट कामाला प्रवृत्त झाला असला तरी तें दुष्कृत्य त्यानें अखेरपर्यंत खरोखर तडीस नेलें असतेंच असें गृहित धरून त्यापासून तुम्ही त्याला बळजबरीनें परावृत्त करतां; पण असें गृहित धरण्यास तुम्हांस काय अधिकार आहे? कदाचित् अखेरच्या क्षणींहि त्यास पश्चात्ताप झाला असता आणि त्या कृत्यापासून तो परावृत्त झाला असता.' टॉलस्टॉय यांचें हें म्हणणें कबूल केलें, तरी यांत कार्यकर्त्याकडे दोष येत नाहीं. जबरीचें कृत्य करण्यांत त्याचा हेतु वाईट होता, असें यांत सिद्ध होत नाहीं. फार तर त्याची तारतम्यबुद्धि चुकली, इतकेंच म्हणतां येईल. आपली बुद्धि अशा रीतीनें क्वचित् प्रसंगीं फसते, म्हणून तिचा उपयोगच करावयाचा नाहीं, असा नियम करतां येईल का? तसें असेल तर परमेश्वरानें आपणास बुद्धि दिली तरी कशाला! आपण धान्य पेरतों, तेव्हां पाऊस उत्तम पडेलच अशी खात्री आपणास देतां येत नाहीं आणि पाऊस न पडल्यामुळें शेत पिकलें नाहीं, असेंहि पुष्कळ वेळां घडतें. अशा स्थितींत आपला अजमास चुकतो म्हणून शेतकी सोडावयाची कीं काय? त्याचप्रमाणें एकादा दारुडा शस्त्र घेऊन कोणावर धांवला, तर तो खून करील असा अजमास करून अशा कृत्यापासून वाटेल त्या रीतीनें त्याला परावृत्त करणें चुकीचें आहे काय? अखेरच्या क्षणीं त्याला पश्चा-

त्राप होईल, असें मानावयास काय आधार आहे ? टॉलस्टॉय यांचें म्हणणें गृहित धरून अखेरच्या क्षणीं तो परावृत्त होईल, असें मानलें, तरी जुलुमानें त्याला परावृत्त करणारा मनुष्य नीतिदृष्ट्या दोषी ठरणार नाहीं. परिस्थित्यनुरूप परार्थाकरतां एखादें जबरीचेंहि कृत्य करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. किंबहुना समाजस्वास्थ्याकरतां अशा रीतीनें वागणें प्रत्येकाला अवश्य आहे आणि अशा रीतीनें तो न वागेल, तरच तो दोषी ठरेल.

वरील नियम कायद्यासंबंधानेंहि लागू करतां येण्यासारखा आहे. कायदा हा सरकारच्या हातचा दंड असून त्याचा उपयोग गरिबांना दडविण्याकडे सरकार करतें, असा टॉलस्टॉय यांचा आक्षेप आहे. गरीब लोकांची संमति अथवा खुशी नसतां श्रीमंत आणि राज्यकर्त्यांवर्गाच्या हिताकरतां गरिबांना पिळून काढण्याचें जें यंत्र त्याचें नांव कायदा, अशी टॉलस्टॉय यांची व्याख्या आहे; पण येथेंहि एक मुद्दा लक्षांत ठेवला पाहिजे. पोलिस अथवा सैन्य यांजसारखे कायद्याचे हस्तक संख्येनें कितीहि पुष्कळ असले, तरी एकंदर जनसमूहाच्या मानानें त्यांची संख्या किती तरी कमी असते. जनसमुहाची संमति कायद्याला नसेल, तर तुरळ्या संख्येच्या बळावर त्याची अम्मलबजावणी सरकारास करतां येणें शक्य नाहीं. एखाद्या प्रसंगीं सरकारास मदत करण्याकरतां लोक आपणहून पोलिसांत स्वयंसेवकाचें काम पत्करितात. यावरून एकंदर जनसमूहाला शांततेची चाड किती आहे, हें उघड दिसतें. किमानपक्ष जेथें सनदशीर राज्यपद्धति आहे, अशा इंग्लंडसारख्या देशांत तरी कायदा हें गरिबांना पिळण्याचें यंत्र आहे असें म्हणवत नाहीं.

कायद्यासंबंधीं लिहितांना टॉलस्टॉय यांच्या मनाचा तोल कायद्याविरुद्ध इतका झुकला आहे कीं, कसल्याहि राज्यपद्धतीपेक्षां त्यांना जणूं काय अराजकता ही बरी वाटते. याचें कारण हेंच कीं, जुलमी रशियन राज्यपद्धतीच्या सदोदित येणाऱ्या अनुभवाचा परिणाम त्यांच्या चित्तावर इतका झाला कीं, त्यामुळें त्यांची बुद्धि बेताल झाली. याबद्दल त्यांनाहि फारसा दोष देतां येत नाहीं. टॉलस्टॉय तत्त्ववेत्ते झाले तरी मनुष्यप्राणी होते यामुळें सामान्य मनुष्याचे मनोविकार त्यांसहि व्हावेत यांत नवल नाहीं.

याकरतां टॉल्स्टॉय यांच्या विचारसरणीचें परीक्षण करतांना रशियाची जुलमी राज्यपद्धतीहि लक्षांत बाळगून हें परीक्षणाचें काम करणें वाजवी आहे. या विचारसरणींतील अतिशयोक्ति बाजूला ठेवली, तर तिच्या पोटीं जीं तत्त्वरत्नें टॉल्स्टॉय यांनीं सांठवून ठेवलीं आहेत, तीं सर्वांनींच सारखीं मनन करण्यासारखीं आहेत. सोन्याच्या खाणींतून मूल्यवान् धातु ज्याप्रमाणें निवडून काढावी लागते, त्याचप्रमाणें टॉल्स्टॉय यांजसारख्या प्रतिभासंपन्न ग्रंथकाराच्या लेखांतून तत्त्वरत्नें प्रत्येकांनीं शोधून घ्यावींत. त्यांच्या भोंवतीं जें कांहीं निरुपयोगी द्रव्य असेल तें केवळ परिस्थितीनें निर्माण झालेलें आहे, हें लक्षांत बाळगून हंसक्षीरन्यायानें उपयुक्त भागाची निवड करणें हेंच सुज्ञांचें काम आहे.

इ. स. १८८९ सालांत टॉल्स्टॉय यांच्या लेखांत 'सेव्हास्टोपोलच्या आठवणी' या नांवाच्या पुस्तकाला जोडण्याकरतां लिहिलेल्या प्रस्तावनेचा उल्लेख प्रामुख्यानें केला पाहिजे. अरशॉफ नांवाच्या एका लष्करी कामगारानें हें पुस्तक लिहिलें होतें आणि त्याची आरंभींची प्रस्तावना टॉल्स्टॉय यांनीं लिहिली होती. या प्रस्तावनेंतील मजकूर सरकारी परीक्षकाला पसंत पडण्यासारखा नसल्यामुळें पुष्कळ काळपर्यंत चालू वहिवाटीप्रमाणें ती दप्तरीं पडून होती. या प्रस्तावनेंत टॉल्स्टॉय यांनीं आपले सारे युद्धविषयक अनुभव नमूद केले होते. यामुळेंच ही प्रस्तावना विशेष महत्त्वाची आहे. लढाईविषयीं टॉल्स्टॉय यांच्या मनांत इतका तिट्कारा कां भरला, हें या प्रस्तावनेवरून चांगलें निदर्शनास येतें.

या वेळीं लूऑफ नांवाच्या एका श्रीमंत जमीनदाराशीं टॉल्स्टॉय यांची ओळख झाली. हा गृहस्थ भुतेंखेतें आणि चेटकें या विद्येच्या मागें लागला होता. इ. स. १८८९ च्या मार्च महिन्यांत एके दिवशीं टॉल्स्टॉय यांच्या भेटीसाठीं तो आला. बोलतां बोलतां मृत्यु म्हणजे काय या विषयावर त्यांच्यांत चर्चा सुरू झाली. या चर्चेची थोडीशी हकीकत ॲना सुरोन हिनें पुढीलप्रमाणें सांगितली आहे.

"लूऑफ म्हणाला, खरोखर या जगांत कोणीच मरत नाहीं. फार कशाला, मी मेल्यानंतर तीन दिवसांनीं आपल्या खोलींत विडी ओढीत बसलेला तुम्हास आढळेन. आतां तुम्हाला तशी दृष्टि नसली, तर तुम्ही

मला पाहूं शकणार नाहीं; पण मी मात्र तुम्हास खचित पाहीन. मृत्यूची भीति मला मुळींच वाटत नाहीं." बोलतां बोलतां लूऑफ थांबला आणि आपला चहा ढवळूं लागला. थोड्या वेळानें माझ्याकडे एकदम वळून तो म्हणाला, 'सुरोनबाई, माझ्या अंतकाळच्या क्षणीं हजर राहण्याबद्दल कौंट-साहेबांस तुमच्या साक्षीनें मी आमंत्रण देतों. म्हणजे मृत्यु आणि झोंप यांत कांहींच फरक नाहीं, ही गोष्ट त्यांना प्रत्यक्षच दिसेल.'

" कर्मधर्मसंयोग असा कीं, लुऑफची प्रकृति दुसऱ्याच दिवशीं बिघडली आणि पुढें तिसऱ्या दिवशीं त्याजकडून टॉलस्टॉय यांस बोलावणें आलें; पण या वेळीं टॉलस्टॉय तेथें गेले नाहींत. ते म्हणाले, 'असल्या प्रसंगीं मला तेथें जाण्याची मुळींच इच्छा नाहीं.' अखेरीस लुऑफ याचा अंत झाल्यानंतर ते त्याच्या मृत्युशय्येजवळ क्षणमात्र उभे राहून आले."

" लूऑफ याच्या मृत्यूचा परिणाम टॉलस्टॉय यांच्या चित्तावर बराच झाला. दोन तीन दिवसांपूर्वींच ज्या गृहस्थाबरोबर मृत्युविषयक चर्चा आपण केली, तो गृहस्थ इतक्या लवकर स्वतः मृत्यूचा विषय व्हावा, हा योगायोग टॉलस्टॉय यांस बराच विषाद उत्पन्न करण्यास कारण झाला. टॉलस्टॉय इतके विद्वान् होते, तरी त्यांच्या अंगचा भोळसरपणा गेला नव्हता. सामान्यतः रशियन लोकांत भोळसरपणा पुष्कळच आहे आणि बाल्यापासून याच परिस्थितींत वाढलेल्या या विद्वान् गृहस्थालाहि त्यानें पछाडलें असल्यास नवल नाहीं. किती तरी वेळां आपलीं स्वप्नें ते दुसऱ्यांना सांगत आणि त्यांचा अर्थ काय असावा, याबद्दल लक्षपूर्वक चर्चाहि करीत. आतां इतकें मात्र खरें कीं, असल्या गोष्टींनीं त्यांचीं मतें बदललीं नाहींत अथवा त्यांच्या वागणुकीवरहि कांहीं परिणाम झाला नाहीं."

" लूऑफ याजबद्दल टॉलस्टॉय यांच्या चित्तांत फारसा आदर नव्हता. सामान्य श्रीमंत मनुष्याप्रमाणें त्याच्याहि अंगीं थोडाबहुत उद्धटपणा होता. 'सूक्ष्मेंद्रियशास्त्र अथवा अतींद्रियशास्त्र यांचा अभ्यास केवळ चैनीखातर तो करतो,' असें टॉलस्टॉय यांचें मत होतें."

ही हकीकत येथें विस्तारानें सांगण्याचें मुख्य कारण हेंच कीं, या काळाच्या सुमारास जें एक नाटक त्यांनीं लिहिलें त्यांतील कांहीं पात्रांच्या भूमिका रंगविण्याच्या कामीं लूऑफ आणि त्याच्या कुटुंबांतील माणसें टॉलस्टॉय

यांच्या उपयोगीं पडलीं. या नाटकाचा प्रयोग इ. स. १८८९ च्या डिसें बर महिन्यांत खाजगी रीतीनें यासनाया येथें झाला. यांत काम केलेल्य एका नटानें या वेळची यासनाया येथील टॉलस्टॉय यांची गृहस्थिति पुढीलप्रमाणें वर्णिली आहे:—

" मी यासनाया येथें आलों, तेव्हां सर्व कुटुंब चहाच्या तयारींत होतें. खुद्द कुटुंबांतील मंडळीशिवाय त्यांचे बरेच आप्त व स्नेही या वेळीं तेथें जमले होते. माझे वडील मास्को येथें गणिताचे गुरु असतां टॉलस्टॉय यांची त्यांच्याशीं ओळख झाली होती. आम्ही चहा प्यावयास बसलो तेव्हां टॉलस्टॉय मजकडे वळून म्हणाले, 'मला गणिताची आवड आहे; पण त्यांतील पुष्कळशा उपपत्ति मला नीटशा समजत नाहींत. त्या समजल्या असत्या तर मीहि गणिताचा गुरु झालों असतों.'"

" इतक्यांत मीं विडी पेटविली. त्याबरोबर टॉलस्टॉय मला म्हणाले, 'अरे, हें काय करतोस ? हा प्रश्न ऐकून मनांतून मी फार ओशाळलों, पण कांहीं तरी सपादणी करावी म्हणून मीं त्यांना म्हटलें, 'विडी ओढण्यानें मननक्रिया चांगली चालते, विचारशक्ति अधिक तीव्र होते."

" यावर टॉलस्टॉय हंसून म्हणाले, 'वस्तुस्थिति तूं म्हणतोस त्याच्या उलट आहे, हा माझा स्वतःचा अनुभव आहे. विडी ओढल्यानें विचारशक्ति वाढते, असा भ्रम उत्पन्न होण्याचें कारण हेंच कीं, विडी ओढल्यानंतर मेंदु तापून अनेक विचारांचा मोठा गोंधळ तेथें उडतो आणि तार तम्यभावावर अंधुकतेचें पटल येतें. यामुळें विचारांचा घोटाळा लक्षांत येत नाहीं आणि विचार पुष्कळ सुचले इतकीच जाणीव शिल्लक उरते. आणि त्यांतच व्होडका दारूचा एकादा पेला पोटांत गेला म्हणजे किती गोंधळ होतो, हें कोणीं विचारूं नये."

" सकाळची चह कॉफी झाल्यानंतर आपलें नाटक जरूर तेथें दुरस्त करण्याचें काम टॉलस्टॉय करीत. हा दुरुस्तीचा उद्योग अगदीं प्रयोगाच्या दिवसापर्यंत चालू होता. या प्रयोगांत काम करण्यासाठीं टॉलस्टॉय यांची कांहीं मित्रमंडळी बाहेर गांवांहून मुद्दाम आली होती. यांपैकीं लोप्यटीन नांवाच्या गृहस्थानें केलेले शेतकऱ्याचें काम टॉलस्टॉय यांस फार आवडलें. सर्व मंडळी धंदवाईक नसतांहि हा प्रयोग एकदरीनें फारच यशस्वी झाला."

" या दिवशीं संध्याकाळीं साहित्यकला या विषयासंबंधीं कांहीं विचार टॉलस्टॉय यांनीं प्रगट केले. ते म्हणाले, सामान्य मनुष्य आणि साहित्यकार यांच्या दृष्टींत फेर इतकाच कीं, आजूबाजूच्या परिस्थितींतील ज्या गोष्टी सामान्य मनुष्यास दिसत नाहींत, त्या साहित्यकाराच्या नजरेंत येतात. इतरांप्रमाणें साध्या गोष्टी तो पाहतोच; पण त्यांतील जें रहस्य इतरांस समजत नाहीं, तें त्याला समजतें आणि इतरांस समजावून देतां येतें. त्याच गोष्टींची मांडणी तो अशा रीतीनें करतो कीं, अगदीं सामान्य बुद्धीच्या मनुष्यालाहि तीं रहस्यें सुगम होतात."

" साहित्यकला या दृष्टीनें जे ग्रंथ श्रेष्ठप्रतीचे असतात, ते यामुळेंच आपणास नेहमीं नवेसे वाटत असतात. हीच गोष्ट नाट्यकलेलाहि लागू आहे. एकादी भूमिका रंगवितांना कुशल नट एकादें सामान्य पात्रहि अशा रीतीनें रंगवितें कीं, मुळांतील सारें रहस्य आपल्या नजरेसमोर जणूं काय प्रत्यक्ष उभें राहतें." -

यानंतर ता. ३०. दिसेंबर रोजीं याच नाटकाचा प्रयोग खाजगी रीतीनें पण बऱ्याचशा विस्तृत जाग्यांत झाला. आणि हा प्रयोगहि चांगला यशस्वी झाला.

या नाटकांत बराचसा हास्यरस दिसत असला, तरी हें नाटक लिहिण्यांत टॉलस्टॉय यांचा हेतु लोकांस नुसते हंसवावें हा नव्हता. धर्म ही चालू व्यवहाराची बाब आहे, आणि धर्मतत्त्वाचा प्रत्यक्ष आचार रोजच्या व्यवहारांत दिसला पाहिजे, हें दाखविण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. सांप्रत धर्म आणि त्याचे अनुयायी यांची फारकत युरोपांत झालेली आहे. कांहीं ठरीव मतें मान्य केलीं असें म्हणणें आणि आठ दिवसांनीं देवळांत एकदां गुडघे टेकणें इतकी कवाईत कोणी केली कीं, तो धार्मिक म्हणविला जातो. याशिवाय युरोपांतील धर्माला या काळाच्या सुमारास आणखीहि एक स्वरूप यावयास प्रारंभ झाला होता. मृताशीं संभाषण करणें, मृतांचे निरोप जिवंतास पोहोंचविणें आणि असल्याच प्रकारचे दुसरे चमत्कार, याचें नांव धर्म ! हा समज या वेळीं फैलावू लागला होता. पण धर्म आणि असले चमत्कार यांत अर्थाअर्थी संबंध नाहीं, हें मत टॉलस्टॉय प्रतिपादित असत आणि याच मताला पुष्टी देण्यासाठीं हें

नाटक त्यांनीं लिहिलें. 'जड वस्तु आणि चैतन्य यांतील भेद क्यांट यानें इतका विषद केला आहे कीं, त्याच्या काळानंतर या गोष्टींचें अज्ञान वास्तविक मुळींच असूं नये. आपल्या पंचेंद्रियांच्याद्वारें ज्या वस्तूंचा अनुभव आपणास होतो, त्या साऱ्या जड वस्तु होत. भुतेंखेतें आणि इतर अदृश्यपणें संचार करणारे जीव हेहि अर्थातच जडकोटींतील आहेत. या आपल्या पंचेंद्रियांच्याद्वारें या भुताखेतांची जाणीव आपणास होत असेल तर तींहि जडवस्तूंपैकींच होत, हें निःसंशय सिद्ध होतें शुद्ध चैतन्याचें रूप याहून वेगळें आहे. आणि आपल्या मनांतील नीतीच्या भावना या चैतन्यकोटींतील भावना होत. आपल्या पंचेंद्रियांपैकीं इंद्रियांच्या सहाय्यानें या भावनांचें पृथक्करण आपणास करतां येत नाहीं. याकरतां जड देखावे आमच्यासमोर मांडून ते चैतन्यकोटींतील होत, असें म्हणा, म्हणून आम्हास सांगणारे हे बीरमंत्री मूर्ख नव्हेत काय ! जड वस्तु आणि चैतन्य यांच्यांतील भेद या सदगृहस्थांस माहीत नसतो. आणि स्वतःच्या डोक्यांतील हा ब्रह्मघोंटाळा आमच्यासारख्यावर तें लादूं पाहतात. एखादें तत्त्व व्यासपीठावरून उच्चारलें गेलें अथवा हवेंतील एकाद्या प्राण्याकडून एकाद्या बीरमांत्रिकामार्फत आम्हांकडे आलें, एवढ्यानेंच तें महत्त्वाचें ठरत नाहीं. त्याची खरी किंमत त्याच्या अंतर्गत गुणांवर अवलंबून आहे, असें या विषयासंबंधानें टॉलस्टॉय यांचें मत आहे. याचा स्पष्ट खुलासा एका ग्रंथांत पुढीलप्रमाणें त्यांनीं केला आहे. " आपल्या मतांची सत्यता अजमावण्याकरतां हे बीरमंत्री लोकांना पूर्ण मुभा कधींच देत नाहींत. कांहीं अर्धवट वेडसर लोकांबरोबर तासांचेतास अंधारांत तिष्ठत बसा आणि मग काय दिसेल तें पहा, असें हे आम्हांस सांगतात."

" ठीकच आहे. असल्या प्रकारच्या परिस्थितींत आमच्या भडकलेल्या कल्पनेला वाटेल ती सृष्टि निर्माण करतां येते, यांत नवल काय ? पण सडकून दारू पिऊन किंवा पंचरंगी चिलीम ओढून हीच गोष्ट अधिक लवकर आणि अधिक चांगल्या रीतीनें तुम्हांस करतां येईल."

" या गोष्टी क्षणभर खऱ्या मानल्या; तथापि मनुष्यजातीची नैतिक अथवा धार्मिक वाढ होण्यास यांचा काय उपयोग होईल, हें मला तरी निदान समजत नाहीं. प्रस्तुत देह गेल्यानंतर दुसऱ्या एकाद्या रूपानें सत्तर

हजार वर्षांचें आयुष्य मला प्राप्त होणार, असें उद्यां कोणीं सिद्ध केलें तरी तेवढ्यावरून माझी वाढ नैतिक आणि धार्मिकदृष्ट्या होईल असें सिद्ध होतें काय ? देश आणि काल या कल्पनाहि इंद्रियगत आहेत. आणि चैतन्य आणि इंद्रियें यांच्यांत अर्थाअर्थीं संबंध नसल्यामुळें इंद्रियगत कल्पनांचाहि संबंध चैतन्याशीं येऊं शकत नाहीं. 'एची देहीं, एची डोळां, दावीन मुक्तीचा सोहळा' हा धर्माचा बाणा आहे. काळाची, परिस्थितीची अथवा देशाची वाट पहाण्याचें कारण तो ठेवीत नाहीं. इंद्रियगत मार्गांनीं साऱ्या विश्वाचें निरीक्षण व पृथक्करण तुम्हीं केलें, तरी धर्माचा अल्पसा अंशहि तुम्हास त्यांत सांपडावयाचा नाहीं."

याच तत्त्वास अनुसरून टॉलस्टॉय यांनीं आपल्या नाटकाची रचना केली आहे. 'स्पिरिच्युअ‌ॅलिझम' सारख्या अर्वाचीन पंथाचें शास्त्रीय विवरण पाहण्याच्या दृष्टीनें हें नाटक कोणीं वाचलें तर त्यांत त्याची निराशा होईल, हें उघड आहे. तथापि नाटक या दृष्टीनें प्रत्येक पात्राभोंवतीं टॉलस्टॉय यांनीं अशी परिस्थिति निर्माण केली आहे कीं, त्याच्या मनाच्या दुबळेपणाला अधिक अवसर सांपडून तें सहजगत्या फसून जातें. व्यवहारांतील अशा प्रत्यक्ष स्थितींतहि दुबळ्या मनाचीं माणसें जशा रीतीनें फसतात, तशाच रीतीनें या नाटकांतील पात्रेंहि फसलीं आहेत. स्पिरिच्युआलिझमच्या पंथाचे लोक जे प्रयोग दाखवितात, त्यांत हातचलाखी पुष्कळ असते, ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक आहेच. किंबहुना या मार्गांत ऑलिव्हर लॉजसारखे जे कांहीं चांगले लोक पडलेले आहेत, तेहि ही गोष्ट कबूल करतात.

याच नाटकांत अर्वाचीन सुशिक्षितांवरहि टॉलस्टॉय यांनीं बराच ताशेरा झाडला आहे. श्रीमंत आणि निरुद्योगी तरुण आपला काळ किती क्षुल्लक गोष्टींत घालवितात, याचें चित्र त्यांनीं फार बहारीचें काढलें आहे आणि त्याबरोबरच शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचें चित्रहि त्यांनीं रेखाटलें आहे.

प्रस्तुत नाटकांत कोणत्याहि राजकीय विषयाची चर्चा नसल्यामुळें फारसे आढेवेढे न घेतां सरकारी परीक्षकानें तें पास केलें. त्याचा पहिला सार्वजनिक प्रयोग टूला येथें झाला. या प्रयोगासाठीं टॉलस्टॉय स्वतः टूला येथें गेले होते; पण थिएटराच्या दरवाजावरील मनुष्याला त्यांची ओळख

न पटल्यामुळें एकादा शेतकरी समजून धक्का मारून त्यांना त्यानें हांकून दिलें. पुढें म्यानेजर यांस ही हकीकत कळतांच त्यानें स्वतः बाहेर येऊन त्यांस हांक मारली. या नाटकांत एका श्रीमंत जमीनदाराकडे कांहीं शेतकरी गेले असतां त्याचा नौकर त्यास हाकून देत आहे, असा भाग आहे. याचा प्रयोग चालला असतां ती भूमिका करणाऱ्या पात्रानें शेतकऱ्यांना थोड्याशा आदबीनें वागविलें. प्रयोग संपल्यानंतर त्या पात्राला टॉलस्टॉय म्हणाले, 'शेतकऱ्यांना अशा आदबीनें वागविणें अस्वाभाविक आहे. तुमच्या दरवाजावरील माणसानें मला जसें फेंकून दिलें, तशीच नक्कल नाटकांत तुम्ही वठविली पाहिजे.'

याच नाटकाच्या एका प्रयोगाला तिसरे आलेक्झांडर बादशहा स्वतः हजर होते. आणि त्यांच्याबरोबर एक डझनभर ग्रँड डयूक आणि ग्रँड डचेस आल्या होत्या. प्रयोग पाहून ही सर्व मंडळी फार खुष झाली. नाटकांत या बड्या मंडळींवर व्यंग अर्थानें जो ताशेरा झाडला होता, तो यांपैकीं कोणाच्याहि लक्षांत बहुतकरून आला नसावा.

याशिवाय आणखीहि दोन नाटकें याच सुमारास टॉलस्टॉय यांनीं लिहिलीं होतीं. यांपैकीं एका नाटकांत दुष्काळग्रस्त रशियन शेतकऱ्यांचें वर्णन आहे. या दुसऱ्या नाटकाचे प्रयोग प्रथम चालू झाले, तेव्हां रशियांत भयंकर दुष्काळ पडला होता. यामुळें याचा प्रयोग रंगभूमीवर होऊं लागला म्हणजे प्रत्यक्ष घडणाऱ्या हकीकतींशीं त्याचा मेळ पडून प्रयोगाला विलक्षण उठाव येत असे.

या नाटकाचे प्रयोग मास्को येथेंहि झाले, आणि तेहि पूर्ण यशस्वी होऊन सदरहू नाटक रशियन साहित्याच्या उत्कृष्ट ग्रंथावलींत कायमचें नमूद झालें.

अशाच प्रकारचे आणखी कांहीं खेळ आम्हास लिहून द्याल कीं काय ? असा प्रश्न एका मंडळीनें टॉलस्टॉय यांस विचारला असतां, टॉलस्टॉय म्हणाले, 'रशियाच्या सांप्रतच्या स्थितीचें चित्र ज्यांत पूर्णपणें रेखाटलें आहे, अशीं पुष्कळ नाटकें मला लिहावींशीं वाटतात; पण सरकारी परीक्षकाला तीं कधींच पसंत पडावयाचीं नाहींत. मी हातीं लेखणी धरली त्या काळापासून हा सरकारी समंध मला एकसारखा भेडसावीत आहे.

त्यांच्या भीतीनें दर शब्दागणिक माझी लेखणी अडखळते. यामुळें माझें किती तरी वाङ्मय गर्भावस्थेंतच मरण पावलें आहे.'

रशियाच्या राजकीय स्थितीचें स्वरुप किती भेसूर होतें, याचें वर्णन याहून अधिक चांगल्या रीतीनें करतां येणें शक्य नाहीं.

---

## प्रकरण सहावें.

### विवाहाचा प्रश्न.

सिमिओनॉफ या नांवाचा टॉलस्टॉय यांचा एक स्नेही होता, ही गोष्ट वाचकांस आठवत असेलच. इ. स. १८९० सालीं गे याशीं याची भेट झाली होती, तिची हकीकत सांगत असतां सिमिओनॉफ म्हणतो,

" टॉलस्टॉय यांची हकीकत मीं विचारली तेव्हां, त्यांची प्रकृति चांगली असल्याचें मला समजलें. तथापि टॉलस्टॉय यांजबद्दल बोलत असतां गेची मुद्रा मला नीटशी दिसली नाहीं, तेव्हां जरा अधिक खोदून त्याला विचारतां तो म्हणाला, 'टॉलस्टॉय शरीरप्रकृतीनें चांगले आहेत; पण त्यांच्या मनाची प्रकृति असावी तशी नाहीं, असा माझा समज आहे. धर्मविचाराकडे यावें तितकें लक्ष न देतां जगाच्या उठाठेवी करण्यांत अलीकडे ते अधिक गुंतले आहेत. घरीं सदोदित पाहुणे जमवावे आणि त्यांजबरोबर क्षुल्लक गोष्टींचा काथ्याकुट करावा, हा नाद त्यांना लागला आहे. अलीकडे त्यांनीं कांहीं नाटकें लिहिलीं आहेत. आणि तीं लोकप्रियहि झालीं आहेत; पण ज्यांत धर्मविचार नाहींत, असले लेख मला शुष्क वाटतात. कांहीं तरी लेख लिहून द्रव्य संपादन करणें हें मोठ्या ग्रंथकाराचें काम नव्हे. असें करणें हें पाप होय. मनुष्याला अज्ञानाच्या अंधकारांतून बाहेर काढणें हें बुद्धिमंतांचें काम आहे; पण त्यांत पैशाची बाब आली कीं तो वाण्याच्या दुकानांतला सौदा होतो. एकादा मनुष्य बुडत असतां आपण याचा जीव वांचविला आणि तसें करण्याबद्दल त्याजपासून कांहीं द्रव्य घेतलें, तर तें कसें शोभेल ? टॉलस्टॉय यांचा स्नेही चरकॉफ हा त्यांचें ग्रंथ विकून त्याजवर पुष्कळ कमाई करतो. "

चरकॉफ हा टॉलस्टॉय यांच्या मोठ्या विश्वासांतला स्नेही होता. टॉल-

स्टॉय यांचीं तत्वें ग्रंथांतून व्यवहारांत आणावीं यासाठीं धडपड करणारीं जीं कांहीं माणसें टॉलस्टॉय यांजकडे येत, त्यांची रवनागी ते चरकॉफ यांजकडे करीत. चरकॉफ याचा स्वभाव उतावळा आणि तडजोड न करण्यासारखा असल्यामुळें या लोकांत नेहमीं तंटे होत. यामुळें पुष्कळ वेळां टॉलस्टॉय यांचीं तत्वें बाजुलाच राहून हीं भांडणें सोडवण्याचें काम टॉलस्टॉय यांजकडे येत असे. स्वतःच्या ग्रंथ प्रकाशनाचें काम सर्वस्वीं त्यांनीं चरकॉफकडे सोंपविलें होतें आणि तो स्वभावाचा तुसडा व आपलें तेंच खरें करणारा असल्यामुळें प्रकाशकाशीं आरंभापासूनच तंट्यास सुरुवात होई.

क्रुटझर सोनाटा या नाटकांत टॉलस्टॉय यांचा मुख्य कटाक्ष ब्रम्हचर्याचे महत्त्व सांगण्याकडे आहे. स्त्रीपुरुषांच्या एकंदर संबंधाबद्दल टॉलस्टॉय म्हणतात,

"विषयवासनेला बळी पडून जे अपराध स्त्रिया अथवा पुरुष करतात, ते गुप्त राखण्याबद्दल त्यांची जेवढी खटपट असते, तेवढी दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या अपराधाबद्दल असत नाहीं. वास्तविक पाहतां हे अपराध इतके सर्वसामान्य आहेत कीं, त्यांतून अगदीं सुटलेला असा पुरुष क्वचितच सांपडावयाचा. तथापि या अपराधाचींहि दोन स्वरूपें लोक मानीत असतात. जें कृत्य एका ठिकाणीं भयंकर पातक म्हणून गणलें जातें, तेंच दुसऱ्या ठिकाणीं चैनीची एक बाब म्हणून क्षम्य मानलें जातें. एकंदर जनसमूहांत या बाबीसंबंधीं जितका दुटप्पीपणा भरला आहे, तितका दुसऱ्या कोणत्याहि बाबींत तो आढळत नाहीं; पण वास्तविक पाहतां हा विषय अशा दुटप्पीपणाचा नव्हे. मनुष्याच्या नैतिक सामर्थ्याची खरी कसोटी ज्यांत आहे आणि ज्यांत ढिलेपणा झाला असतां मनुष्यजातीची पिछेहाट निश्चयानें होईल, असा हा विषय आहे."

टॉलस्टॉय यांच्या इतर लेखांप्रमाणें या नाटकावरहि सरकारनें बहिष्कार घातला होता; तथापि त्याच्या शिळा छापाच्या प्रतींचा प्रसार इतक्या मोठ्या प्रमाणावर झाला कीं, त्यामुळें सरकारच्या अस्त्राचा वास्तविक उपयोग कांहींच झाला नाहीं. केवळ रशियांतच नव्हे, तर थेट इंग्लंडपर्यंतसुद्धां या नाटकाचा प्रसार झाला. या वेळीं रशियांत कसल्याहि

प्रकारचें स्वातंत्र्य नव्हतें. राजकीय विषयांची चर्चा करण्यास कायद्याची बंदी, धर्माच्या बाबींतहि हाच जुलूम, वर्तमानपत्रकारांचीं तोंडें कायद्यानें आवळलेलीं; फार काय पण एकाद्याच्या घरीं चार माणसें एकत्र जमलीं, तर सभामनाईच्या हुकुमाखालीं त्याजवरहि दंडुकेशाहि चालविण्याची पूर्ण मुभा पोलिसखात्याला होती. अशा स्थितींत देश या नात्यानें रशियाला जिवंत ठेवण्याचें कार्यहि अत्यंत दुष्कर झालें होतें. आणि हें कार्य टॉलस्टॉय यांजसारख्या बुद्धिमान वर्गानें एकजुटीनें केलें. रशियनजनतेचें चैतन्य त्यांनीं जिवंत राखलें. या बुद्धिवान् वर्गाची चळवळ समूळ बंद पाडण्याची कांहीं युक्ति रशियन सरकारापाशीं असती, तर तिचा उपयोग त्यांनीं खास केला असता.

कोणीं कोणतींहि पुस्तकें छापावीं आणि ज्याला वाटेल त्यानें विकत घेऊन वाचावीत, इतकें स्वातंत्र्य ज्या देशांतील लोकांना आहे, त्यांना रशियांतील या परिस्थितीची कल्पना चांगलीशी होणार नाहीं. जनतेस अत्यंत उपयुक्त अशा एकाद्या विषयावर एकाद्या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें लिहिलेल्या ग्रंथकाराच्या प्रकाशनास सरकारानें बंदी केली, म्हणजे लोकांत केवढी खळबळ उडून जाई, याची कल्पना रशियाबाहेर इतरांस चांगलीशी होणार नाहीं; पण अशा बंदीमुळें सरकारचा हेतु मुळींच साधत नसे. एकाद्याच्या घरीं खाजगी रीतीनें पांचपन्नास मंडळी बसून असें पुस्तक कोणी तरी मोठ्यानें वाचून दाखवी आणि अशा रीतीनें त्यांतील मजकुरांचा प्रसार सर्वत्र होत असे. सरकारानें अशी बंदी केली नसती, तर ज्या पुस्तकांकडे लोकांनीं कदाचित पाहिलेंहि नसतें, त्यांतील मतांचा प्रसार अधिक झपाट्यानें होऊन तो अधिक परिणामकारहि होई.

यासुमारास 'क्रुटझर सोनाटा' या नांवाचें एक नाटक टॉलस्टॉय यांनीं लिहिलें होतें. या नाटकाच्या प्रकाशनास सरकाराकडून बंदी झाली. आणि नेहमींप्रमाणेंच या बंदीनें सरकारचा उद्देश सिद्धीस न जातां त्याच्या हस्तलिखित प्रतींचा प्रसार गुप्त रीतीनें सर्व रशियाभर झाला.

ब्रह्मचर्याचें महत्त्व लोकांच्या मनावर बिंबविणें हें या नाटकाचें उद्दिष्ट कार्य आहे. स्त्रीपुरुषांच्या संबंधाबद्दल आपल्या मुख्य पात्राकडून टॉलस्टॉय यांनीं पुढील मत वदविलें आहे.

" पुरुषांनीं स्त्रियांच्या कपाळीं गुलामगिरी बांधली आहे, असें स्त्रियांचे कैवारी म्हणत असतात. केवळ बाह्य दृष्टीनें पाहतां ही गोष्ट खरी असावी, असें वाटतें; पण वास्तविक हें नातें दिसतें त्याहून उलट असतें. येथें खरें धनीपण स्त्रियांकडे असून गुलामगिरी पुरुषांकडे असते. यहुदी अथवा मारवाडी धनकोप्रमाणेंच हा प्रकार आहे. असल्या जातीच्या व्याज-बट्टयाचा धंदा करणाऱ्या लोकांची हेटाळणी सर्वत्र होत असते. त्यांना कोणी बरें पहात नाहीं. त्यांची खोडी काढण्याचा प्रसंग कोणी वांयां जाऊं देत नाहीं. त्यांचें सारें आयुष्य सामाजिक जुलुमाखालीं जात असतें; तथापि आपल्या पैशाच्या बळावर या जुलुमाचें उट्टें ते सव्याज काढीत असतात, हेंहि खोटें नाहीं. हाच न्याय स्त्रियांसहि लागू आहे. युरोपांतील सर्व देशांत यहुदी सावकारावर अनेक प्रकारचीं बंधनें कायद्यानें लादलीं आहेत आणि त्या बंधनांत राहून आपल्या ऋणकोवर सुलतानी अम्मल ते गाजवीत असतात. यहुद्यांनीं व्यापाराशिवाय कांहीं करूं नये! यहुदी म्हणतात—'ठीक आहे. व्यापाराचेच पाश तुमच्या गळ्यांत घालून तुमच्या मुसक्या आम्ही बांधूं.' हीच स्थिति स्त्रियांचीहि आहे. 'तुम्ही आम्हाला आपल्या कामवासनेच्या बटकी करून ठेवणार काय? ठीक आहे! त्याच कामाच्या पाशांत तुमचें हातपाय कसे जखडतों पहा! पुरुषांच्या दास्यांतून स्त्रियांची मुक्ति करावयाची म्हटलें, तर ती गोष्ट त्यांना मतांचा अधिकार देऊन साधणार नाहीं. त्याचप्रमाणें त्यांना वकिली करण्याची परवानगी देऊन अथवा त्यांना मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या देऊनहि ती साधावयाची नाहीं. ही गोष्ट साध्य करण्यास स्त्रिपुरुषांचे विषयतृप्तीचे हक्क समान केले पाहिजेत. हल्लीं युरोपांत प्रेमविवाह होतात, असें म्हणतात. तथापि तेथेंहि स्त्रीची निवड करण्याचा पुरुषास हक्क आहे. पुरुषाची निवड करण्याचा हक्क स्त्रीला नाहीं. असा हक्क स्त्रियांस द्यावयाचा नसेल, तर पुरुषाचाहि हा हक्क काढून घेतला पाहिजे. पुरुषाची निवड करण्याचा उघड हक्क आपणास नाहीं, ही जाणीव स्त्रियांच्या ठिकाणीं असल्यामुळें हल्लींच्या स्त्रिया पुरुषांची कामवासना जागृत करण्याकरतां नानाप्रकारचे यत्न करतात. आणि त्यांच्या ठिकाणीं अशी वासना जागृत झाली म्हणजे त्यांचा निवडीचा हक्क वस्तुतः त्यांजपाशीं रहातच नाहीं. कामवासना

त्यांचे डोळे बांधून टाकते. त्यांचा हक्क हिरावून घेऊन तो स्त्रियांच्या स्वाधीन ही करते. यामुळें नांवाचा हक्क पुरुषांचा आणि त्याची अंमलबजावणी स्त्रियांकडे असा प्रकार घडतो. पुरुष आपला बंदा गुलाम झाला आहे, ही गोष्ट स्त्रियांस एकवार पक्केपणीं समजली म्हणजे आपल्या अधिकाराचा हवा तसा दुरुपयोग त्या करतात. त्यांच्या या सामर्थ्याचा प्रभाव मग सर्वत्र दृग्गोचर होऊं शकतो. प्रत्येक ठिकाणीं आणि प्रत्येक वस्तूवर त्याची छाया तुम्हास दिसून येईल. कोणत्याहि मोठ्या शहरीं रस्त्यांतून जातां येतां आजूबाजूच्या दुकानावर सहज नजर फेंका, त्यांत लक्षावधि चीजा तुम्हास आढळून येतील. या चिजांची किंमत कोट्यवधि रुपये होईल. आणि लक्षावधि लोकांचे श्रम त्या तयार करण्यांत खर्च झाले असतील. तथापि यांतील किती चीजा पुरुषांच्या उपयोगी पडणाऱ्या आहेत, याचा हिशोब करा. ही संख्या एकदशांशाइतकी भरेल कीं नाहीं, याची मला शंकाच वाटते. मनुष्याच्या जीवनक्रमांतील सारी चैन स्त्रियांनीं निर्माण केली असून त्यांनींच ती जिवंत ठेवली आहे.

सगळे कारखाने शोधा. त्यांतील श्रमांचा बराच मोठा अंश दागदागिने, नानापरींचीं वाहनें, शृंगाराचें सामान आणि अनेक प्रकारच्या क्षुल्लक चीजा निर्माण करण्यांत खर्ची पडलेला असतो. लक्षावधि मजुरांच्या पिढ्यानुपिढ्या स्त्रियांचे चोचले पुरविण्याकरितां कारखान्यांतून गुलामासारख्या राबून यमधामीं प्रवेश करीत असतात. अशा रीतीनें एकंदर मानवजातीचा नऊदशांश भाग स्त्रियांच्या पाशांत पूर्ण जखडला गेला असून जन्मठेप सक्तमजुरीची कैद भोगीत आहे. या साऱ्या अनर्थाचें मूळ कारण इतकेंच कीं, पुरुषांचा निवडीचा हक्क स्त्रियांस नसल्यामुळें त्या जणूं काय पुरुषजातीवर अशा रीतीनें सूडच उगवीत असतात.

पुरुषांतील कामविकार जागृत करण्याची विद्या स्त्रियांनीं इतकी आपलीशी करून टाकली आहे कीं, आपलें चित्त निर्विकार राखून स्त्रियांशीं संभाषण करणें पुरुषास अशक्य झालें आहे. स्त्रियांसन्निध पुरुष आला कीं, तिच्या नुसत्या दृष्टिक्षेपानेंच तो भारला जाऊन बुद्धिभ्रष्ट होतो. माझा तारुण्यांतील काळ मला अद्यापिहि पक्का आठवतो. बॉलच्या पोषाकांत एकाद्या स्त्रीला मीं पाहिलें कीं, ताबडतोब मला कसेंसेंच होऊं

लागे. मी अगदीं घाबरून जात असें. ही भावना त्या वेळीं होती; पण आतां तर अशा स्त्रीची भीति मला इतकी वाटते कीं, एकाद्या पोलिस शिपायाला हाक मारून कायद्याच्या संरक्षक शक्तीचा आश्रय करण्याची इच्छा मला होते."

" ही हकीकत ऐकून तुम्ही खरोखर हंसत सुटाल; पण यांत हंसण्यासारखें कांहीं नाहीं. मी हें थट्टेनें बोलत नाहीं. माझ्या मनांतील हेतु तुमच्या सर्वांच्या लक्षांत येण्याचे दिवस लवकरच येतील, अशी माझी खात्री आहे आणि मग समाजाची शांति उलथून टाकण्याजोगी वर्तणूक करणाऱ्या स्त्रिया समाजांत लोक उघड्या माथ्यानें कसे वावरूं देत होते, याचेंच तुम्हांस नवल वाटूं लागेल. हल्लींच्या स्त्रियांचे पोषाक, त्यांचा शरीरशृंगार, त्यांचा नटवेपणा आणि बोलण्याचालण्याची ढब हीं सारीं समाजाच्या नाशास कारण होत आहेत. जागजागीं सांपळे मांडून ठेवावेत, तसेंच हें आहे. किंबहुना हें त्याहूनहि अधिक वाईट आहे. जुगारीचे अड्डे कायद्यानें बंद करतात, मग पुरुषांना नीतिभ्रष्ट करणारे हे अड्डे कां बंद होत नाहींत? वास्तविक पाहतां जुगारीच्या अड्ड्यांपेक्षांहि हे अड्डे समाजस्वास्थ्याला अधिक घातक आहेत."

" हल्लींचें स्त्रियांचें शिक्षण पाहिलें तर तेंहि याच दिशेनें दिलें जात आहे. एकाद्या स्त्रीनें लग्न केलें नाहीं, तर तिला 'वृद्ध कुमारी' असें नांव देऊन हल्लींच्या स्त्रिया तिची चेष्टा करतात. कामपाशांत ती स्वतः पडली नाहीं आणि कोणाहि पुरुषास तिनें त्यांत गोंविलें नाहीं, हें तिचें केवढें पातक? कोणा तरी पुरुषाला कामपाशांत गोंवतां यावें याच हेतूनें तिच्या शिक्षणाचा क्रम हल्लीं ठरविलेला आहे. या शिक्षणाच्या पाशांनीं ती सज्ज झाली म्हणजे तिला नखरेबाज पोषाक घालून एकाद्या बॉलमध्यें तिचें प्रदर्शन मांडलें जातें. पुरुषाला कामपाशांत गोंवण्याचा धंदा उघडपणें करणाऱ्या राजरस्त्यावरील खिडक्यांत बसणाऱ्या वेश्या आणि याच हेतूनें बॉलमध्यें वावरणाऱ्या तरुणी यांच्यात मला कांहींच अंतर दिसत नाहीं."

" आणि असल्या या बाजारी प्रेमाचा मोबदला जगाला कोणता मिळतो? या पापानें जगांतील अर्धी मानवजाति विनाशाच्या मार्गास

लागली आहे. वास्तविक पाहतां सत्याच्या आणि कल्याणाच्या मार्गांत स्त्रियांनीं पुरुषांस मदत करावी; पण पुरुषानें आपल्या चैनीसाठीं स्त्रीचें इतकें मातेरें करून टाकलें आहे. यामुळें मदतगार होण्याऐवजीं ती त्याची शत्रु बनली आहे! आपल्या आजूबाजूला जरा नजर फेंका. उन्नतीच्या मार्गांत मानवकुलाचें पाऊल पुढें कां पडत नाहीं, याचा विचार करायाचें कारण सांप्रतची स्त्री हें एकच आणि तिच्या सांप्रतच्या स्थितीचें कारण पुरुषानेंच तिला तशी बनविली आहे, हें होय."

"अर्वाचीन काळच्या मुलांची जोपासना कशी होते, हेंहि पाहण्यासारखें आहे. वास्तविक पाहतां त्यांची जोपासना त्यांच्या भावी आयुष्यक्रमाकडे नजर देऊन केली पाहिजे. मनुष्यप्राणी या नात्यानें जीं उच्चतर कर्तव्यें त्यास करावयाचीं असतात, तीं पार पाडण्याकरतां त्यांचीं शरीरें व मनें तयार करणें हें आईबापांचें आद्यकर्तव्य होय; पण तसें न करतां डॉक्टर लोकांच्या नादीं लागून मुलानें धष्टपुष्ट व्हावें याकरतां नाना प्रकारच्या अन्नांनीं त्यांचीं पोटें तुंबडीसारखीं भरतात. याशिवाय छानछोक भपकेबाज पोषाक घालून त्यांचा दिखाऊपणा वाढविला म्हणजे आपलें काम संपलें असें आईबापांस वाटतें."

"मसालेदार अन्न खाऊन लाडानें बिघडलेल्या या पोरांच्या ठिकाणीं कामवासना लवकरच जागृत व्हावी, यांत नवल नाहीं आणि यामुळें तीं वयांत येण्याच्या सुमारास भयंकर यातना त्यांस भोगाव्या लागतात. आजूबाजूची परिस्थिति पाहिली तरी तीहि या वासनेला पोषकच असते. कपडे, पुस्तकें, चित्रें, गाण्याच्या मजलसी, नाचरंग, कादंबऱ्या व मासिकें या साऱ्या वस्तु जणूं काय एकजुटीनें त्यांची कामवासना जागृत करण्यासाठीं धडपडत असतात. एवढ्या मोठ्या हल्ल्याचा परिणाम अपेक्षेप्रमाणें घडतो, हें रीतसरच आहे. याच स्थितींतून अनेक प्रकारच्या रोगांचा उद्भव तरुण स्त्रीपुरुषांत होऊन कित्येक वेळां पुष्कळांच्या जन्माचें मातेरें होतें."

"अर्वाचीन समाजांतील तरुण आणि तरुणी यांचा जीवनक्रम पाहिला, तर तोहि याच स्थितीचा पोषक असतो. सुंदर मुली हुडकून काढण्याकरतां तरुण पुरुष गांवभर भटकत असतात. यांपैकीं कोणती तरुणी लग्नानें अथवा लग्नाशिवाय आपल्या जाळ्यांत सांपडेल, याशिवाय अधिक

कोणताहि उच्च विचार त्यांच्या चित्तांत नसतो. उलटपक्षीं तरुणीहि जाळीं पसरण्याशिवाय दुसरा अधिक चांगला उद्योग कोणताच करीत नाहींत."

" अशा रीतीनें तरुण पिढीची क्रियाशक्ति भलत्याच कामीं खर्च होत आहे. इतकेंच नव्हे तर आपली शक्ति खर्चून आपल्या जन्माचें मातेरें तीं करून घेत आहेत. अशा रीतीनें त्यांचें आयुष्य जात आहे. त्यांच्या हातून माणुसकीला शोभण्यासारखें एकहि कार्य होणें शक्य नाहीं. त्यांच्या हातून समाजसेवा होणार नाहीं. त्यांच्या हातून देश सेवा घडणार नाहीं. अथवा मोठे शास्त्रीयशोधहि त्यांजकडून लागणार नाहींत. मग ईश्वराची सेवा ते करतील, ही शंका देखील घ्यावयाला नको. विषयसुखाच्या मागें जो लागला, त्याच्या मार्गांत अनेक अडचणी नेहमीं उभ्या राहतात. येथें विषयसुख आणि प्रेम यांतील फरक नेहमीं लक्षांत ठेवला पाहिजे."

" परमेश्वर प्रेमस्वरूप आहे, असें ख्रिस्ती शास्त्राचें वचन आहे. यावरून परमेश्वराची एकांतिक भक्ति हेंच प्रेमाचें खरें स्वरूप होय, असा ख्रिस्ती शास्त्राचा अभिप्राय स्पष्ट दिसून येतो. परमेश्वर आपला पिता आणि सर्व माणसें आपले बांधव, हें तत्व प्रत्येकाला पटणें, हें ख्रिस्तीधर्माचें अखेरचें साध्य आहे. विषयसुखाच्या अभिलाषानें उत्पन्न झालेलें स्त्रीविषयक प्रेम अखिल मानवजातीपर्यंत कधींहि न पोहोंचतां केवळ एकाच विषयाशीं संलग्न राहतें. मग ख्रिस्तीशास्त्राच्या मताप्रमाणें त्याला प्रेम हें नांव देतां येईल कीं काय याचा विचार तुम्हीच करा. हें प्रेम मानवजातीपर्यंत पोहोंचत नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्याच्या मार्गांत भिंतीसारखें तें आडवें पडतें. यामुळें ख्रिस्तीशास्त्राच्या मताप्रमाणें पाहतां स्त्रीविषयक प्रेम उन्नतिकारक नसून तें अधोगतीला नेणारें आहे. याकरतां असलें प्रेम पापरूप होय."

" विवाहाच्या ग्रंथीनें बद्ध होऊन आपल मन एकाच स्त्रीला वाहिलें तरीहि अडचण तीच. परमेश्वराच्या अथवा मानवजातीच्या सेवेला या ग्रंथीचा उपयोग कांहींच होत नाहीं. तिचा मोठा उपयोग म्हटला, तर मानवजातीचें अस्तित्व राखण्यापलीकडे नाहीं. मानवजाती कायम राखणें, एवढेंच आपलें अखेरचें साध्य असेल, तर लग्न करून प्रजा वाढविणें

भाग आहे असें नाहीं. अन्नाच्या अभावीं लक्षावधि मुलें आज मृत्युमुखीं जात आहेत. तेवढ्यांचें संरक्षण आपण केलें, तर तेवढ्यानेंच आपलें काम भागणार आहे."

" या बाबतींत खिस्तीशास्त्राच्या आज्ञा काय आहेत, त्या पहा. विवाहित स्त्रीशीं घटस्फोट न करतां आणि दुसरी स्त्री न करतां पहिल्याच स्त्रीशीं आपला संसार कर, असें खिस्ती शास्त्राचें वचन आहे. त्याचप्रमाणें स्त्री ही केवळ विषयसुखाच्या तृप्तीसाठीं आहे असें मानू नको, अशी दुसरी आज्ञा आहे. आणि या दोन आज्ञांच्या जणूं काय शिरोभागीं म्हणून या विवाहितांनीं अविवाहित राहणें बरें, असें तिसरें वचन आहे. यावरून या बाबतींत खिस्तीशास्त्राचा अभिप्राय उघड दिसतो."

कोणत्याहि बाबीचा विचार टॉलस्टॉय करूं लागले, म्हणजे त्यांच्या विचारसरणींत एकच मोठा दोष ढोवळपणें दिसून येतो. सामान्य जनास आकळतां येतील अशा गोष्टी कोणत्या, याचें भान त्यांस राहात नाहीं. सामान्य मनुष्याच्या आटोक्याबाहेर त्यांचें साध्य असतें. हाच दोष त्यांच्या साऱ्या विचारसरणींत आढळून येतो. मनुष्यानें पैशाचा लोभ धरूं नये हें तत्त्व चांगलें आहे; पण टॉलस्टॉय यांच्या विचारसरणींत तें सांपडलें कीं, मनुष्यानें अठराविश्वे दारिद्र्यांत राहिलें पाहिजे, असें त्याचें रूपांतर होतें. हीच स्थिति त्यांच्या स्त्रीविषयक प्रेमाची झाली आहे. तुमचें साध्य अशक्य कोटींतलें आहे असें कोणी त्यांना म्हटलें, तर त्यावरहि त्यांचें उत्तर ठरलेलें आहे. ते म्हणतात, " ही गोष्ट अशक्य आहे आणि मनुष्यें त्याप्रमाणें वागणार नाहींत, हें मला कबूल आहे; तथापि तें अशक्य कोटींतलें असलें, तरी त्याची उजळणी मनुष्यापुढें वारंवार केली पाहिजे. अशक्य म्हणून तें नजरेआड करणें किंवा आपलें साध्यच कमी प्रतीचें ठेवणें हा मार्ग अनिष्ट आहे. उच्च साध्य पुढें ठेवून त्याच्या सिद्धीसाठीं मनुष्यें धडपडतील असा प्रयत्न नित्य करणें हाच श्रेयस्कर मार्ग आहे."

हें नाटक लिहिण्यापूर्वी थोडींच वर्षें याच विषयासंबंधीं टॉलस्टॉय यांनीं अगदीं वेगळे विचार प्रगट केले होते. विवाह ही ग्रंथी पापमूलक नाहीं, असें त्या वेळीं त्यांचें प्रतिपादन होतें. एका पत्नीबरोबर आपलें आयुष्य कंठून प्रजा निर्माण करणें हें आपलें सामाजिक व धार्मिक कर्तव्य

आहे, असेंहि ते म्हणत होते. आणि पुढें थोड्याच वर्षांनीं तीच गोष्ट त्यांना अपवित्र आणि पापमूलक वाटूं लागली. सुमारें पांच सहा वर्षांच्या अवधींतच त्यांच्या विचारसरणींत इतका फरक पडला. या फरकासंबंधीं बोलत असतां, ते स्वतः म्हणतात,

"माझ्या विचारांत इतक्या जलद एवढी वाढ होऊन या सिद्धांतापर्यंत मी पोहोंचेन अशी माझी कल्पनाहि नव्हती. माझेच हे दोन प्रकारचे विचार एकाच वेळीं मला आढळल्याबरोबर माझें मलाच मोठें नवल वाटतें. ही माझी नवी विचारसरणी चुकीची तर नाहीं ना ? अशीहि शंका मला येते; पण पुनः पुन्हां दूरवर विचार करूनसुद्धां ती खोडून काढण्याचा मार्ग मला दिसत नाहीं. तेव्हां आतां तोच सिद्धांत खरा मानल्यावांचून गत्यंतर नाहीं."

टॉलस्टॉय यांच्या एकंदर जीवनक्रमाचा विचार करतां त्याचें पर्यवसान् पूर्ण आत्मसंयमनांत व्हावें, असा त्याचा रोंख आरंभापासून दिसतो. तारुण्याच्या भर अमदानींत त्यांच्या हातून पुष्कळसा उच्छृंखलपणा झाला, ही गोष्ट खरी; तथापि तेव्हांहि, या गोष्टीचा पश्चात्ताप त्यांस वारंवार होत असे. लग्न केल्याशिवाय या पश्चात्तापाच्या कारणांचें उन्मूलन व्हावयाचें नाहीं, असा बुद्धिपूर्वक निश्चय करून मग त्यांनीं लग्न केलें, येथेंहि त्यांच्या आत्मसंयमी वृत्तीची पहिली ओळख पटण्यासारखी आहे. लग्न झाल्यानंतर त्यांनीं कधींहि परद्वार केलें नाहीं. आणि अखेरीस एक स्त्री असणें हेंहि पापरूप आहे, असें त्यांना वाटूं लागलें. यावरून त्यांच्या जीवनचारित्र्याचा रोंख आरंभापासूनच प्रवृत्तिपर नसून निवृत्तिपरच होता, असें म्हणण्यास हरकत नाहीं. आपली विवाहित स्त्री आपल्या मानसिक उन्नतीच्या आड येत आहे, असें दिसूं लागतांच निष्ठूरपणें तिचाहि त्याग करण्याची तयारी त्यांनीं केली.

त्यांच्या आयुष्यक्रमाचा विचार करतां याबद्दल कोणालाहि फारसें नवल वाटण्याचें कारण नाहीं. लग्न न करतां बेलगामपणें वागून मनुष्याचें आयुष्य मातीमोल कसें होतें, याचीं शेंकडों उदाहरणें त्यांच्या डोळ्यांसमोर नित्य होतीं आणि ते जात्याच विचारी असल्यामुळें हा बिनजबाबदारीचा, कमी त्रासाचा, पण अखेरीस नाश करणारा मार्ग त्यांच्या

पसंतीस मुळींच पडला नाहीं. आतां विवाह ही धर्मग्रंथी आहे, व विवाहित पत्नीला सोडून जाणें, हा अधर्म आहे, असे विचार त्यांच्या मनांत येण्याचा संभव होता. त्यांची धर्मबुद्धि उज्वल होती; पण केवळ जुन्या पंथाला चिकटून राहून धर्मोपदेशकांच्या तंत्रानें चालण्याइतका दुबळेपणा त्यांच्यांत कधींच नव्हता. जुन्या पंथानें घालून दिलेलीं बंधनें त्यांनीं कधींच तोडलीं होतीं, मग त्याच पंथानें बांधलेल्या विवाहग्रंथीचा पवित्रपणा त्यांच्या चित्तास फारसा पटला नाहीं, यांत नवल नाहीं. जी गोष्ट मुळांतच चुकीची ती उपाध्याच्या बडबडीनें झाली असली अथवा रजिस्टर बुकांत नोंदून झाली असली, तरी ती बरोबर कशी होणार ? असा त्यांचा बुद्धिवाद होता.

प्रत्यक्ष खिस्ताचें उदाहरण त्यांच्या समोर होतें. आजन्म अविवाहित आणि मनानें व शरीरानें पवित्र असें खिस्ताचें आचरण त्यांच्या डोळ्यासमोर त्यांना दिसत होतें. क्याथोलिक पंथाचें संतमंडळ याच प्रकारें वागत असल्याचें त्यांना दिसत होतें. त्याचप्रमाणें पौर्वात्य आणि पाश्चात्य तत्त्ववेत्तेंहि या बाबतींत त्यांना पाठिंबा देण्यास उभे होते. अशा स्थितींत नैष्ठिक ब्रह्मचर्य हें पुण्य आणि तद्विरुद्ध वर्तन हें सर्वथा पाप आहे, असा त्यांच्या बुद्धीचा निश्चय झाला, यांत नवल नाहीं.

या बाबतींत टॉलस्टॉय यांची लेखणी वाजवीहून अधिक जहाल गेली आहे, असें पुष्कळ विचारवंतांसहि वाटतें. केवळ विषयवासनेनें उत्पन्न होणारें पशूचें प्रेम आणि सात्त्विक मनोभावनेचें प्रेम यांत टॉलस्टॉय यांच्या दृष्टीस कांहींच फरक पडत नाहीं, ही त्यांची मोठी चूक होय, असें या आक्षेपकांचें म्हणणें आहे. सारा मानवी आयुष्यक्रम उत्क्रांतिरूप असून त्यांत अनेक पायऱ्या आहेत, यांतील पहिली व शेवटची, या दोन्ही एकाच किंमतीच्या मानणें ही मोठी चूक आहे. टॉलस्टॉयसारख्या विस्तृत विचारशक्तीच्या मनुष्याच्या हातून अशा प्रकारची चूक घडावी ह्याचें त्यांस मोठें नवल वाटतें. त्यांच्या मतें असें होण्याचें कारण टॉलस्टॉय यांची कल्पनावशता होय.

आतां या बाबींत वैद्यशास्त्राचें मतहि पाहण्यासारखें आहे. वरील नाटक लिहिलें गेलें, त्याच वेळीं एक सुप्रसिद्ध इंग्रज वैद्य मास्को येथें

रहात होता. एके वेळीं एक तरुण त्याची सल्ला घेण्याकरतां आला. त्याची सर्व हकीकत ऐकून घेऊन डॉक्टर त्याला म्हणाला, 'तूं आतां भर तारुण्यांत आला आहेस. तुझा सारा विकार त्यामुळें उद्भवला आहे. याकरतां ताबडतोब लग्न कर अथवा दुसरी कांहीं सोय पहा !' यावर तो तरुण म्हणाला, 'पण असें करणें अनीतीचें नाहीं काय ?' डॉक्टर म्हणाला, 'वैद्यशास्त्राचा अभिप्राय तुला आम्हीं सांगितला. नीतिविषयक चर्चा तुला करावयाची असेल, तर एकाद्या धर्मोपाध्याला भेट.'

नंतर थोडा वेळ थांबून डॉक्टर म्हणाला, "तुझ्या प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं कशाची जरूर आहे, हें मीं तुला सांगितलें; तथापि याला दुसराहि एक उपाय आहे. तो उपाय म्हणजे खऱ्या अंतःकरणानें नैष्ठिक ब्रम्हचर्य स्वीकारणें हा होय. आपली विषयवासना तुला पुरी मारून टाकावी लागेल. तरुण स्त्रीयांच्या मेळ्यांत तूं केव्हांहि जाऊं नकोस. फार काय; पण स्त्रियांचीं चित्रें पाहणें देखील तुला धोक्याचें आहे. तसेंच छाकट्या तरुण पुरुषांपासूनहि तुला लांब राहिलें पाहिजे. मी कांहीं धार्मिक मनुष्य नाहीं; पण येशुखिस्तानें केलेला उपदेश किती योग्य आणि किती सशास्त्र आहे, हें मला समजतें. येशूखिस्त म्हणतो, 'कोणत्याहि स्त्रीकडे विषयीदृष्टीनें जो पाहतो, तो मनानें तिच्याशीं बदफैली करतो.' हें त्याचें वचन अर्वाचीन शास्त्रांच्या कसोटीस तंतोतंत उतरतें. केवळ जड दृष्टीनें पाहणाऱ्या आम्हा डॉक्टर लोकांचा अनुभवहि अगदीं असाच आहे.'

डॉक्टरचें हें मत टॉलस्टॉय यांच्या मताशीं ताडून पाहिलें म्हणजे या दोन मतांत कसलाहि फरक नाहीं, ही गोष्ट वाचकांच्या लक्षांत येईल. आपल्या नाटकांतील एका प्रवेशांत दोन पात्रांच्या संभाषणांत त्यांनीं पुढील मजकूर घातला आहे.

"अरे ! तुझें हें भाषण केवळ शारीरिक जड प्रेमाला अनुसरून आहे; पण सर्वत्र प्रेम अशाप्रकारचें आहे काय ? ज्यांत दोन चैतन्यें एकमेकांकडे ओढलीं जातात आणि एकरूप होतात, अशाप्रकारच्या प्रेमाची कल्पना तुला कशी होत नाहीं ? मनाचें ऐक्य, स्वभावाचें ऐक्य, आणि साध्यांचेंहि ऐक्य जेथें आहे, तेथें शारीरिक ऐक्याची आठवणहि होणार नाहीं."

" मानसिक ऐक्य ! चैतन्यांचें ऐक्य ! साध्याचें ऐक्य, काय ही भाषा ! ही नुसती हवा. नुसते शब्द. माफ करा; पण मी तुम्हाला असें विचारतों कीं,-अशा प्रेमाचीं स्त्रीपुरुषें एका शय्येवर कशाला निजतात ! "

वर सांगितलेल्या डॉक्टरानें शरीराच्या स्वास्थ्यसंरक्षणासाठीं जो उपाय त्या तरुणाला सांगितला, तो बाह्यतः टॉलस्टॉय यांच्या मतास अगदीं विरुद्ध दिसतो; तथापि प्रेम आणि शारीरिक स्वास्थ्य यांचा परस्पर संबंध कोणत्याहि प्रकारचा नाहीं, हें दोन्ही पक्षांचें मत अगदीं तंतोतंत जुळतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आतां केवळ व्यावहारिक दृष्ट्या विचार करतां, टॉलस्टॉय यांचें मत अव्यवहार्य आहे, हें कोणीहि कबूल करील. तसेंच समाजशासन आणि नीतिशास्त्र यांच्या दृष्टीनें विचार करतां बद-फैली मनुष्यापेक्षां एकाच स्त्रीबरोबर संसार करणारा मनुष्य किती तरी पटीनें श्रेष्ठ आहे, हें उघड आहे. विषयवासना जन्मजात आमच्या हाडींमासीं खिळलेली आहे. ती पापमूलक असली, तरी तिचें अस्तित्व नाकबूल करून चालावयाचें नाहीं. आणि कोणाची खुषी नसतां ब्रह्मचर्य त्याजवर लादल्यानें फायद्यापेक्षां नुकसानच अधिक होइल, हें शास्त्रानें आणि प्रत्यक्ष अनुभवानेंहि सिद्ध आहे. अशा स्थितींत आपल्या वासना उत्सृंखल न होतील अशी व्यवस्था करणें, हेंच अधिक श्रेयस्कर आहे, असें म्हणणें भाग पडतें.

लग्न न करतां जे लोक इतरांप्रमाणें समाजांत वावरतात, ते पुष्कळ वेळां माथेफिरू आणि तुसड्या स्वभावाचे असतात, हा आपला नेहमींचा अनुभव आहे. समाजाच्या दृष्टीनें पाहतां त्यांचा उपयोग समाजाला फारसा होत असल्याचें दिसत नाहीं. निष्ठावंत ब्रम्हचाऱ्याला ही गोष्ट अर्थातच लागू नाहीं. तथापि अशा खऱ्या ब्रम्हचाऱ्यांचें प्रमाण कोणत्याहि समाजांत अत्यंत अल्प असतें. आणि बाकीचे ब्रम्हचारी केवळ नांवाचे ब्रम्हचारी असतात. एकादा मनुष्य विषयी स्वभावामुळें तेवढ्या एका बाबीपुरता वाईट असला, तरी इतर दृष्टीनें त्याची वर्तणूक वाईट असतेच असें नाहीं. खोट्या ब्रम्हचाऱ्यापेक्षां असला बदफैली मनुष्यहि पुष्कळ वेळां समाजाला अधिक उपयुक्त होत असतो. एकंदरीनें मुख्य मुद्दा हा कीं या बाबींत समाजाला ठरीव नियम घालून देणें शक्य नाहीं.

ज्यानें त्यानें आपली परिस्थिति आणि आपली मानसिक अवस्था ओळखून वागणें इष्ट असतें.

टॉलस्टॉय यांची मनःप्रवृत्ति आरंभापासूनच वेगळी असल्यामुळें अखेरीस त्यांची विचारपंपरा नैष्ठिक ब्रम्हचर्यापर्यंत पोहोंचली, यांतहि नवल नाहीं. त्यांच्या विचाराच्या दिशेंत असा बदल होऊं लागल्यानंतर पतिपत्नींत तेढ उत्पन्न होऊं लागली, यांतहि कांहीं नवल नाहीं.

टॉलस्टॉय यांचे हे विचार प्रसिद्ध झाल्यानंतरहि त्यांस मुलेंबाळें कशीं झालीं ? असा प्रश्न करून कांहीं लोक त्यांच्या सिद्धांतावर आक्षेप घेत असतात; पण हा आक्षेप अगदीं अनाठायीं आहे, हें उघड आहे. एकादा मनुष्य स्वतः दारुबाज असला, तरी दारुबाजी ही घातक आहे, हा स्वतःचा अनुभव लोकांपुढें मांडण्याचा त्याचा अधिकार नष्ट होतो काय ?

टॉलस्टॉय यांच्या एकंदर लेखांचें मुख्य महत्त्व त्यांच्या स्पष्टोक्तींत आहे. त्यांच्या स्वतःच्या चित्ताला ज्या गोष्टी पटल्या त्या स्पष्टपणें लोकांपुढें त्यांनीं मांडल्या. या बाबतींत कोणाची भीड अथवा भीति त्यांनीं धरली नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपली स्वतःची वागणूक आपल्या तत्वास धरून आहे कीं नाहीं, अथवा आपणावर दांभिकपणाचा आरोप येण्याचा संभव आहे कीं काय, याचाहि विचार त्यांनीं केला नाहीं. आपणा सामान्य मनुष्याच्या ठिकाणीं हा गुण किती दुर्लभ आहे, याचा अनुभव आपणास प्रत्यहिं येतो. आपली स्वतःची वर्तणूक निषिद्ध असली तर तशी स्पष्ट कबूली न देतां शास्त्राची ओढाताण करून आपल्या वर्तणुकीशीं त्याला जुळतें करण्याचा यत्न आपण नित्य करीत असतों. आपल्या वर्तणुकीशीं जुळेल तें शास्त्र असाच आपला हट्ट आहे. यामुळें आपली वर्तणूक वस्तुतः दांभिकपणाची होत असते. आपली वर्तणूक चुकीची आहे, ही जाणीव आपल्या अंतःकरणांतून अगदींच नष्ट झालेली असते, असें नाहीं. आपली विवेकबुद्धि केव्हां तरी मधून मधून जागृत होत असते; पण तिच्या आज्ञेप्रमाणें स्पष्ट बोलण्याचें अथवा वागण्याचें धैर्य आपणापाशीं असत नाहीं. अशा स्थितींत दांभिकपणाच्या आरोपास कोणी खरोखर पात्र होत असेल, तर टॉलस्टॉय यांच्या कोटींतले लोक नसून आपणासारखेच लोक होत.

टॉलस्टॉय यांच्या एकंदर विचारसरणीचें मुख्य महत्त्व म्हटलें म्हणजे तिचा अस्सलपणा हें होय. तिच्यांत उसनवारी कोठेंहि आढळून येत नाहीं. सृष्टीचें स्वतः निरीक्षण करून त्यावरून निघालेले सिद्धांत टॉलस्टॉय स्पष्टपणें मांडतात, हा त्यांचा विशेष होय. बुद्ध आणि ख्रिस्त अशा प्रकारच्या विषयत्यागी लोकांनींच जगाचें आत्यंतिक कल्याण केलें आहे, ही गोष्ट टॉलस्टॉय यांच्या नजरेसमोर होती. स्वार्थ पूर्णपणें विसरून जाऊन जो मनुष्य आपल्या तत्त्वाचा एकनिष्ठ उपासक बनलेला असतो, त्याच्याच हातून कांहीं तरी लोकोत्तर कार्य होतें, असा अनुभव आपणासहि प्रत्यहीं येत असतो. अमुक एका विशिष्ट मताचा प्रसार करणें हाच आपल्या जन्माचा हेतु आहे, आणि हीच आपली ईश्वरसेवा आहे, अशी भावना ज्याच्या चित्तांत दृढ झाली असेल त्याच्या मनांत विषयसुखाची कल्पनाच येत नाहीं. आपला सारा जन्म आपल्या सिद्धांताच्या प्रचारार्थ घालवावयाचा असा ज्याच्या बुद्धीचा दृढ निश्चय झाला, त्याला स्त्रियांच्या मेळ्यांत हिंडणें फिरणें सुचणार तरी कसें ? आपलें प्रेमपात्र निवडून काढण्यास त्याला फुरसत नसते आणि तसें करावें हा विचारहि नसतो. या अनुभवावरून टॉलस्टॉय असा सिद्धांत काढतात कीं, सारें स्त्रीपुरुषविषयक प्रेम हें केवळ विषयसुखाच्या लालसेनें उत्पन्न झालें असल्यामुळें त्याचें स्वरूप पूर्ण शुद्ध असणें शक्यच नाहीं. आणि जें प्रेम अशुद्ध आहे, तें केवळ जड अथवा पशूंच्या प्रेमासारखें होय. सामान्य संसारी मनुष्याला टॉलस्टॉय यांचा हा सिद्धांत अतिशय फाजील कडक व पुष्कळ अंशीं चुकीचा आहे, असें वाटेल यांत नवल नाहीं; तथापि केवळ परोक्ष सिद्धांत या दृष्टीनें विचार करतां तो चुकीचा आहे, असें म्हणवत नाहीं.

या बाबींत अर्वाचीन पंडितांच्याहि मतांचा विचार करणें वावगें होणार नाहीं. मनुष्यप्राणि रानटी अवस्थेंत होता, तेव्हां सदोदित लढाया करणें ही गोष्ट त्याच्या चालू जीवनक्रमापैकींच होऊन बसली होती. त्याचप्रमाणें त्या काळीं हिंस्र पशूंची संख्याहि पुष्कळ असल्यामुळें त्यांजकडूनहि मनुष्यजातीचा संहार पुष्कळसा होई. यामुळें पुष्कळशी सदृढ प्रजा निर्माण करणें, ही गोष्ट आवश्यक आणि नीतीची आहे, असें वाटणें अगदीं

साहाजिक होतें. मनुष्यजाति कायमची जीवंत ठेवणें, हेंच त्या वेळीं प्रत्ये- काचें आवश्यक कर्तव्य होतें. यहुदी लोकांतील अथवा मुसलमानी धर्मो- तील अनेक क्रिया करण्याची चाल ही या हेतूचीच निदर्शक आहे. ज्याला पुष्कळसे सशक्त मुलगे असतील, तो मनुष्य त्या काळीं मोठा मानार्ह समजला जात असे. प्राचीनकाळची हिंदुस्थानांतील नियोगाची पद्धतहि हाच हेतु दर्शविते. सांप्रतचा मनुष्यप्राणि अशा प्रकारच्या पूर्व- जांपासून अवतरला आहे. यामुळें सांप्रतच्या मनुष्यप्राण्याच्या ठिकाणीं वाजवीहून फाजील विषयवासनेचें अस्तित्व दिसतें. पूर्वीच्या काळीं मनुष्यजाति जगवावी कशी, याच विचाराला प्राधान्य असल्यामुळें मुलांची पुष्कळशी संख्या निर्माण करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य समजलें जावें, यांत नवल नाहीं; पण ही स्थिति आतां सर्वतोपरी बदलली आहे. आतां मनुष्यजातीला संख्येच्या आधिक्याची जरूर नसून गुणांच्या आधिक्याची जरूर आहे. यामुळें पुष्कळ प्रजा निर्माण करण्यापेक्षां थोडी पण गुणवान प्रजा निर्माण होणें अशीच सांप्रतची नीति होईल, हें उघड आहे. या- करतां सांप्रतच्या नीतिशास्त्रदृष्टीनें आपल्या कामेच्छेला आळा घालणें हेंच युक्त आहे; तथापि यांतहि विचार करण्यासारखा आणखी एक मुद्दा आहे. स्वतःच्या मनाची तयारी नसतां केवळ जुलमानें ब्रम्हचर्याचा स्वीकार करणें ही गोष्ट फायद्याची नसून प्रसंगीं हानिकारक होण्याचाहि संभव आहे. हें अर्वाचीन पंडितांच्या मतांचें सार आहे.

आधीं लग्न करूं नये हा उत्तम पक्ष; पण तें केल्यानंतर एखाद्या कजाग स्त्रीशीं गांठ पडली, तरी घटस्फोट न करतां आपलें उर्वरित आयुष्य तिच्याच संगतींत घालविणें हेंच नीतिदृष्ट्या आणि धर्मदृष्ट्या युक्त आहे, असें टॉलस्टॉय यांचें म्हणणें आहे. या बाबींत ख्रिस्तीधर्मशास्त्र आणि टॉलस्टॉय यांच्यांत एकवाक्यता आहे. जो विवाह देवाच्या व धर्माच्या साक्षीनें झाला, तो मोडण्याचा अधिकार कोणासहि नाहीं, असें ख्रिस्ती शास्त्राचें वचन आहे. सांप्रतची युरोपीय समाजाची रचना आणि त्यांची विवाहपद्धति यांचा विचार करतां हा धर्म पाळणें फारसें शक्य नाहीं, असें दिसून येतें.

आपणाहून वेगळ्या मनोभावनेच्या स्त्रीशीं गांठ पडली असतां, तिज-

पासून होणारा सर्व त्रास मुकाट्यानें गिळून जाणें हें आत्म्याच्या वाढीला अनुकूल आहे असें टॉलस्टॉय म्हणतात; पण यावर असाहि एक आक्षेप निघण्याचा संभव आहे कीं, दोन जीवांना अशा दुःखद स्थितींत सारा जन्म कुचंबत ठेवण्यापेक्षां त्यांना वेगळें करून त्यांच्या विशिष्ट पद्धतीनें त्यांची वाढ होऊं देणें अधिक श्रेयस्कर नाहीं काय? या आक्षेपावर टॉलस्टॉय यांच्यातर्फेंहि उत्तरादाखल प्रति आक्षेप घेतां येण्यासारखा आहे. अशा रीतीनें वाटतील तितके घटस्फोट करण्याची परवानगी दिली, तर आध्यात्मिकदृष्ट्या मनुष्यप्राण्याची वाढ होईल कीं, तो अधोगतीच्या पंथास लागेल, हें कोणत्या मापानें ठरवावें?

युरोपीय समाजाची सांप्रतची स्थिति फार नाजूक झाली आहे. तेथील समाजांत सांप्रतच्या विवाहपद्धतीनें पुष्कळशीं विषम स्वभावाचीं जोडपीं निर्माण होतात, असा अनुभव आला आहे. आतां बायबलाची आज्ञा प्रमाण असें समजावें तर धर्माच्या ठिकाणीं पुष्कळांची पूज्यबुद्धीच राहिलेली नाहीं. लौकिक आचरणाप्रमाणेंच धर्माचरण हाहि आपल्या जीवनक्रमाचा अत्यंत आवश्यक भाग आहे, ही जाणीव बहुधा फारच थोड्यांच्या ठिकाणीं असते. अशा स्थितींत तरुणाच्या उत्शृंखल मनोवृत्तीस धर्मबंधनाचा आळा कितपतसा आंवरूं शकेल हाहि मोठा प्रश्नच आहे.

अशा प्रकारच्या समाजरचनेंत टॉलस्टॉय यांचा उपदेश फारसा मान्य होण्याचा संभव नाहीं. युरोपीय समाजाचा एकंदर कल पाहातां धर्मबंधनें शिथिल करून घटस्फोट अधिक सुलभ करण्याकडे आहे, असें स्पष्ट दिसतें. घटस्फोटाचा कायदा फाजील कडक असल्यामुळें वेश्यांचा वर्ग युरोपांत वाढत आहे, असें तिकडील समाजसुधारक म्हणूं लागले आहेत; तेव्हां आहे इतकेंहि धर्मबंधन पाळण्याची जेथें मारामार, तेथें टॉलस्टॉय यांचें ब्रम्हचर्य कोण कबूल करणार? धर्मबंधन नाहींसें करून समाजबंधनहि होईल तितकें शिथिल करावें, हें मत युरोपीय समाजास अधिकाधिक मान्य होऊं लागलें आहे; याचें कारण हेंच कीं, युरोपीय समाजाची रचना भोगा-या पायावर रचली गेली आहे. सामान्यतः एकंदर युरोपीय संस्कृतीचें स्वरूप त्यागमूलक नसून भोगमूलक आहे. 'त्यागेन एकेन अमृतत्वमानशुः' या पौर्वात्य सूत्राऐवजीं भोगेन एकेन अमृतत्वमानशुः या आदि-

बीजावर युरोपीय समाजाची आणि संस्कृतींची सर्व इमारत उभी राहिली आहे. मनुष्याची त्यागशक्ति वाढवावी हा या संस्कृतीचा मूळ हेतु नसून तिचा आदिहेतु भोगशक्ति वाढविणें हा आहे.

हा मुद्दा लक्षांत घेतला म्हणजे टॉलस्टॉय यांच्या नाटकानें त्यांजविरुद्ध सर्व बाजूंनीं एवढें मोठें काहूर कां उठलें, हें सहज लक्षांत येईल. रशियाच्या चालू धर्मपंथाशीं टॉलस्टॉय यांची फारखत आधींच झाली होती. विवाह हें या धर्मपंथाचें बंधन आहे, हें धर्मोपाध्याचें तत्व त्यांनीं कधींच झुगारून दिलें होतें. यामुळें हा धार्मिकांचा वर्ग त्यांजवर चिडून गेला. आणि अर्वाचीन पद्धतीनें शिकलेल्या तरुणांस टॉलस्टॉय यांचा राग कां आला, हें वरील विवेचनावरून लक्षांत येईलच. जन्मभर एकाच स्त्रीचें लोढणें गळ्यांत वागाविणें ही गोष्ट अर्वाचीन संस्कृतींत वाढलेल्या तरुणांस सर्वथा नापसंत होत चालली आहे. मनुष्याचा जीवितहेतु भोग हा आहे, मग शिळा भोग भोगणें हें मूर्खत्व नव्हे काय ? असा त्यांचा प्रश्न आहे. यामुळें या दोन्हीं पक्षांतून टॉलस्टॉय यांजवर भयंकर भडिमार झाला. खर्सान येथील आर्चबिशप निस्यानॉर यानें तर 'मेंढराचें कातडें पांघरलेला लांडगा' अशी नवी पदवी टॉलस्टॉय यांस देऊन या नाटकाचें बीजहि राहूं देऊं नये, अशी सूचना केली. एका स्त्रीशीं विवाहित स्थितींत जन्मभर राहून कित्येक सरदारघराणीं कशीं सुखानें नांदत होतीं, याचेंहि रसभरित वर्णन सदरहू आर्चबिशप यानें मोठ्या पाल्हाळानें केलें होतें; पण या धर्माचार्याचें नशीब असें खडतर कीं, त्यानें दिलेल्या उदाहरणांपैकीं पुष्कळांची वर्तणुक समाजाच्या न्यायासनासमोर निर्दोष ठरली नसती.

'टॉलस्टॉय आतां वृद्ध झाल्यामुळें 'वृद्धा नारी पतिव्रता' इतक्याच किंमतीचा त्यांचा उपदेश आहे,' असें आपलें मत तरुण मंडळीनें दिलें. यांचीं गात्रें शिथिल झाल्यामुळें आतां द्राक्षें आंबट आहेत, असें हा म्हणूं लागला आहे, असें ते म्हणाले. पण खरा प्रकार असा नव्हता. सदरहू नाटक लिहून गेल्यानंतरहि कित्येक वर्षेपर्यंत टॉलस्टॉय यांची शरीरप्रकृति पूर्ण सुदृढ असून त्यांस मुलेंबाळेंहि झालीं. त्याचप्रमाणें त्यांच्या मानसिक शक्तीलाहि यावेळीं ओहोटी लागली होती, असें नाहीं. तत्वविचारपूर्ण असे त्यांचे कित्येक लेख या कालानंतरच लिहिले गेले आहेत.

आपलीं मतें लोकांपुढें मांडतांना कोणाचीहि भीडमुरवत टॉलस्टॉय बाळगीत नसत, हें खरें; तथापि ते मनातीत स्थितीला पोहोंचलेले होते असें नाहीं. आपणावर झालेल्या या हल्ल्याबद्दल सामान्य जनाप्रमाणें त्यांनाहि दुःख होई. आपल्या एका लेखांत ते म्हणतात—

" तारुण्याच्या ज्वानींत अहंकाराचा ताठा आंगीं असतां जें पशुतुल्य आचरण मीं केलें, त्याजबद्दल मला आतां खरोखर पश्चात्ताप होतो. आतां हा डाग माझ्या चारित्र्यावर कायमचा राहिला असून कोणत्याहि उपायानें तो धुतला जाणारा नाहीं, हें ध्यानांत आलें म्हणजे माझें दुःख दुणावतें. 'तुम्ही बोलूनचालून वृद्ध झाला आहां, आतां ज्या गोष्टी करूं नयेत असें तुम्ही म्हणतां, त्याच गोष्टी आपल्या पूर्व वयांत तुम्ही स्वतः केल्या आहेत. आम्ही म्हातारे झालों म्हणजे आम्हीहि तुमच्याच सारख्या सोंवळेपणाच्या गोष्टी सांगूं' असें लोकांनीं मला म्हटलें, तर त्यांत काय नवल ! लोक माझी हेटाळणी करतात, म्हणून मला वाईट वाटत नाहीं; पण खरी गोष्ट लोकांस सांगण्यास मी अपात्र ठरलों आहें, याचें मला वाईट वाटतें. पापाची खरी शिक्षा असेल, तर ती हीच. परमेश्वराची इच्छा काय आहे, हें लोकांस ज्या साधनानें मीं सांगावयाचें, तें साधनच भ्रष्ट आणि पापमय झालें आहे. हीच जाणीव माझ्या अंतःकरणाला अतीशय बोंचते."

" नरकाग्नीच्या ज्वाळांची आंच कशी असते, याचा प्रत्यय या चालू देहांतच मला येत आहे. माझ्या पूर्वचारित्र्यांतील भयंकर पातकें मजपुढें सदोदित उभीं असतात. कितीहि खटपट मीं केली, तरी माझ्या नजरे-समोरून तीं हालत नाहींत. या पूर्वपातकांनीं माझ्या साऱ्या आयुष्याचें अगदीं मातेरें करून टाकलें आहे. जिवंतपणींच त्याजमुळें मला नरकवास प्राप्त झाला आहे."

याचविषयासंबंधीं एके वेळीं आपल्या एका मित्राशीं बोलत असतां ते म्हणाले.

" माझी तारुण्यांतील वर्तणुक मला आठवली म्हणजे माझ्या अंगा-वर शहारे आल्यावांचून रहात नाहींत. खाण्यापिण्यांत आणि वर्तणुकींत धरबंध नसल्यामुळेंच पुढचे सारे अत्याचार मनुष्याच्या हातून घडतात.

जिव्हालौल्य हेंच अत्यंत विषयासक्तीचें मूळ बीज आहे. एके वेळीं एका तरुण शेतकऱ्याबरोबर मीं गाडींत बसून जात होतों. तारुण्याची ध्वजा त्याच्या हनुवटीवर नुकतीच दिसूं लागली होती. त्याचें लग्न झालेलें नव्हतें. मीं त्याला प्रश्न केला, अरे, तुला बायको हवीशी वाटत नाहीं? त्यानें उत्तर दिलें, कौंटसाहेब, या गोष्टीचा विचार करण्यास मला वेळ कोठें आहे?"

"लहानपणापासून आमच्या साऱ्या शिक्षणाचीच दिशा चुकली आहे. आजूबाजूच्या सर्व स्त्रिया आईबहिणीसारख्या आहेत, हें तत्त्व जर लहानपणापासून आमच्या चित्तावर ठसलें, तर तारुण्यांत आमच्या वर्तणुकीस पुष्कळ आळा पडेल."

"विषयसुखाच्या इच्छेचा जाज्वल्यपणा ज्याला कमी करावयाचा असेल, त्यानें ती वाढूं न देण्याबद्दल प्रथम खबरदारी घेतली पाहिजे. ही वासना मोकळी सुटली म्हणजेच ती अनिवार होते. अनेकवार चित्ताला आळा घालीत असतांहि प्रसंगीं एकाद्याच्या हातून चूक घडली, तरी त्याबद्दल नुसता विषाद मानून स्वस्थ न बसतां अशी चूक पुन्हां घडूं न देण्याबद्दल त्यानें यत्न करावा. ज्याची बाह्य अथवा शारीरिक पवित्रता अबाधित राहिली असेल, त्यानें स्त्रीविषयक विचारास आळा घालावा. ही गोष्ट अत्यंत कठिण आहे, हें मलाहि कबूल आहे. एकनिष्ठ ब्रम्हचर्य अखेरपर्यंत कायम राखणें लक्षावधि माणसांपैकीं एकाद्यासच शक्य असतें; तथापि ही गोष्ट सर्वथा अशक्य नाहीं. आणि आपल्या आध्यात्मिक कल्याणाचा मार्ग तोच आहे; एवढे मुद्दे तरी किमानपक्ष लक्षांत बाळगून त्या दिशेनें जाण्याची धडपड करणें इतकें तरी प्रत्येकास साध्य आहे. नैष्ठिक ब्रम्हचर्याच्या जवळ जों जों तुम्ही जाल, तों तों तुम्ही स्वतःचें अधिक कल्याण करून घ्याल. इतकेंच नव्हे, तर जगाच्या कल्याणाच्या मार्गांतहि तुम्ही मदतगार व्हाल."

यावरून टॉलस्टॉय हे हटवादी नव्हते हें कोणासहि दिसून येण्यासारखें आहे. स्वतःचे विचार लोकांवर लादतांना त्यांचें बलाबल पहावयाचें नाहीं, अशी निष्ठुर मनोवृत्ति त्यांच्या ठिकाणीं नव्हती. केवळ तत्त्वदृष्ट्या एकादा विचार लोकांपुढें मांडतांना तडजोडीची भाषा ते वापरीत नसत

ही गोष्ट खरी; तथापि त्याच प्रश्नांचा व्यावहारिकदृष्ट्या विचार करतांना मनुष्याच्या सामान्य अडचणींचा आणि मानसिक स्थितीचा विचार ते करीत. टॉलस्टॉय हे स्वतः संसारी होते. यामुळें सामान्यजनांच्या अडचणी त्यांच्या स्वतःच्या परिचयांतल्या होत्या. अनेक प्रकारच्या परिस्थितींतून ते स्वतः गेले होते. या साऱ्या परिस्थितींची आठवण त्यांच्या चित्तांत नेहमीं ताजी होती. आणि मानवी मनःस्थितीचें निरीक्षण सूक्ष्मपणें करण्याइतकी कुशाग्रताहि त्यांच्या बुद्धीच्या ठिकाणीं होती. यामुळें हटवादीपणाचा प्रवेश त्यांच्या ठिकाणीं केव्हांच झाला नाहीं. त्यांच्यांत हटवादीपणा दिसे, तो केवळ तत्त्वदृष्ट्या होता. तत्त्वें प्रत्यक्ष आचाराशीं मिळत नाहींत, म्हणून त्यांना खालच्या पायरीवर आणून आपल्या आचाराशीं तीं मिळतीं करावयाचीं, हा मार्ग मात्र त्यांना संमत नव्हता. त्यांचा हटवाद इतक्यापुरताच होता.

'क्रुटझर सोनाटा' या नाटकाचा परिणाम वेगवेगळ्या लोकांवर वेगवेगळ्या प्रकारचा झाला. कित्येक तरुणतरुणींत हें मत फैलावून कांहीं झालें तरी लग्न करावयाचें नाहीं, असा निर्बंध त्यांनीं आपणामागें लावून घेतला; पण स्वतःची शक्ति न अजमावतां जे लोक खोट्या ईर्षेनें आपल्या आवांक्याबाहेर उडी मारतात, त्यांचे पाय मोडावेत यांत कांहीं नवल नाहीं; आणि रशियन तरुणतरुणींची स्थितीहि अशीच झाली. या नाटकामुळें कित्येक विवाहित जोडप्यांची फाटाफूट झाली.

कोणत्याहि तत्त्वाचा प्रचार नवीनच सुरू झाला म्हणजे तें समाजाच्या पचनीं पडेपर्यंत त्याच्या देहांत अनेक प्रकारच्या विकृति उत्पन्न होत असतात आणि या तत्त्वाचें रोप अगदीं बाल्यावस्थेंत असतां त्याची जोपासना कुशल माळ्याच्या हातून झाली नाहीं तर, तें स्वतः मरून जातें अथवा त्याची वाढ भलत्याच दिशेनें होऊन समाजाच्या नाशास तें कारण होतें. स्वतः टॉलस्टॉय यांचे शिष्य म्हणविणाऱ्यांच्या हातून अशा चुका पुष्कळ वेळां घडल्या. स्वतःचें बळ न पाहतां तत्त्वानुरूप आचरणास सुरुवात करावी आणि पहिल्याच अडचणीबरोबर तें झुगारून द्यावें अशाहि गोष्टी वारंवार घडत आणि शिष्यापराधे गुरुर्दण्डः या न्यायानें टॉलस्टॉय यांचीं मतें हा एक थट्टेचा विषय होई.

या दृष्टीनें विचार करतां टॉलस्टॉय यांच्या या नाटकापासून तात्पुरतें जरी अधिक नुकसान झाल्यासारखें दिसलें, तथापि एकंदरीनें पाहतां या विषयाची मांडणी स्पष्टपणें लोकांपुढें करणें अवश्य होतें, आणि तें कार्य टॉलस्टॉय यांनीं उत्तमप्रकारें केलें आहे. कोणतेंहि तत्त्व प्रचारांत रूढ होऊं लागलें म्हणजे कांहीं जुन्या वस्तूंत विघटनेचें कार्य सुरू होतें. समाज-रचनेंत मोडतोड होत आहे,असा भास होतो; पण या मोडतोडीला भिण्याचें कारण नाहीं. जुनें केमळी घर मोडलें, आणि त्या जागीं नवा बंगला आला तर त्यांत घर गेल्याबद्दल शोक करण्याचें कांहीं कारण नाहीं. हीच गोष्ट तत्त्वांच्या प्रसारासहि लागू आहे. केवळ दीर्घकालाच्या सहवासानें वाईट गोष्टीहि आपणास चांगल्याशा भासत असतात आणि अपरिचयामुळें नव्या चांगल्या वस्तूहि टाकाऊ दिसतात. तेव्हां कोणत्याहि वस्तूचें बरें वाईटपण आपल्या मर्जीप्रमाणें ठरत नसून तें तत्त्वानुरोधानेंच ठरत असतें. याकरतां तत्त्व चांगलें असेल, तर थोडीबहुत समाजाची घटना विस्कटूनहि त्याचा प्रसार करण्याचा यत्न करणें हें समाजहितचिंतकाचें कर्तव्य आहे.

ज्यांच्या मनाची पात्रता या प्रश्नाबद्दल विचार करण्याइतकीहि नसते, असे लोक केवळ पशुकोटींतील होत. त्यांजबद्दल कांहीं विचार करण्याचें कारणच नाहीं; पण ज्यांच्या आंगीं विचार करण्याची पात्रता असतां जे लोक केवळ विषयलोलुपतेमुळें याचा विचार करूं इच्छित नाहींत, त्या लोकांस टॉलस्टॉय म्हणतात, "बुद्धीची थोडी तरी जागृति तुमच्या ठिकाणीं असेल, तर आज ना उद्यां या गोष्टीचा विचार करणें, तुम्हास भागच पडेल. तुमची बुद्धि तुम्हास स्वस्थ बसूं देणार नाहीं."

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांत या नाटकाला प्रथम मज्जाव झाला होता. बीभत्स अथवा अश्लील वाङ्मय या सदराखालीं ओढून तेथील पोस्टानें त्याचा बटवडा होऊं दिला नाहीं.

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या मनःस्थितीचें चित्र फिनरमन यानें फार चांगल्या रीतीनें काढलें आहे.

" एके वेळीं एक चितारी माझी तजबीर उतरून घेण्याकरतां यासनाया येथें आला असतां त्याला माझी तजबीर मीं काढूं दिली नाहीं. अनेक

प्रकारें त्यांनीं माझी विनवणी केली; तथापि अखेरपर्यंत माझेंच म्हणणें मीं खरें केलें. माझा हा हट्ट पाहून तो चितारी दुःखी चेहरा करून तेथून निघून गेला. या प्रसंगीं टॉलस्टॉय माझ्या जवळ बसले होते. माझें हें कृत्य त्यांनाहि पसंत पडलें नाहीं, असें मला वाटलें; पण थोड्याच वेळानें प्रफुल्लित चेहरा करून ते मला म्हणाले, 'अशा गोष्टींत साफ नकार देण्याचें मनोधैर्य तुमच्यापाशीं मजपेक्षां अधिक आहे, याजबद्दल तुमचा हेवा करावा, अशी इच्छा मला होते. मी तुम्हाला खरेंच सांगतों कीं, लोकांनीं माझें एवढें स्तोम माजवावें, ही गोष्ट मला बिलकूल पसंत नाहीं. असे चितारी अनेक वेळां मजकडे येतात आणि माझ्या भोंवतीं एकच काहूर करून सोडतात; पण मला तें खपत नसतांहि त्यांना नको म्हणण्याचें धैर्य मला होत नाहीं. वास्तविक पाहतां माझ्या तसबिरीची आवश्यकता जनतेला काय आहे? माझ्या तजबिरीकडे पाहून कोणता दुःखी प्राणी आपलें दुःख विसरेल? कोणता दुष्ट मनुष्य आपले दुर्गुण सोडून देईल? सत्य वस्तूच्या शोधांत त्याचा कांहीं तरी उपयोग आहे का? सत्याचा शोध आणि माझें चित्र यांत अर्थाअर्थीं कांहीं तरी संबंध आहे का? वास्तविक पाहतां हा मूर्तिपूजेचाच एक प्रकार आहे. अथवा रिकामटेंकड्या लोकांना वेळ घालविण्याचें हें एक साधन आहे. माझी इच्छा नसतां कुटुंबांतल्या माणसांपुढें माझें कांहीं चालत नाहीं. माझ्या समग्र ग्रंथांचा बारावा भाग निघाला, तेव्हां त्याजवर माझें चित्र असूं नये याबद्दल मी किती तरी खटपट केली. असें करणें हें पाप आहे, असें मला मनापासून वाटत होतें. माझ्या ग्रंथावरचे सारे हक्क मीं आधींच सोडून दिले होते; मग माझ्या पत्नीनें प्रसिद्ध केलेली ही ग्रंथावली पैशाच्या दृष्टीनें लाभदायक होण्यास अंशतः तरी आपण कारण व्हावें, हें मला बरें वाटेना. याबद्दल कोणीं मला दांभिक म्हटलें असतें, तर त्याचें म्हणणें खरोखर अयोग्य ठरलें नसतें. खरोखर माझें हें वर्तन शुद्ध तर्कशास्त्रदृष्ट्या दांभिकपणाचेंच आहे. तथापि माझा हेतु मात्र खरोखर तसा नव्हता. माझ्या ठिकाणीं मनोधैर्याची वाण होती, हें मात्र मी प्रांजलपणें कबूल करतों. माझ्या मनाचें चित्र त्या चेहऱ्यांत कितपत उमटलें आहे, हें मला सांगता येत नाहीं; पण माझ्या मनाची पूर्ण छाया त्यावर

उमटली असली, तर माझ्या दाढीच्या प्रत्येक केसांत आणि चेहऱ्यावरील प्रत्येक सुरकुतींत दुःखावांचून तुम्हास दुसरें कांहींच आढळणार नाहीं."

या वर्षाच्या उन्हाळ्यांत टॉलस्टॉय आप्टीन येथील मठाधिपतीच्या भेटीस गेले होते. याच मठाच्या शेजारीं दुसराहि एक मठ होता आणि तेथें टॉलस्टॉय यांची बहीण कौंटस मेरी ही जोगीण होऊन राहिली होती. बरेच दिवसांत तिची भेट झाली नसल्यामुळें मुख्यतः तिलाच भेटण्याच्या उद्देशानें आप्टीन मठांत ते गेले होते.

या ठिकाणीं फादर अम्ब्रोज या नांवाचे मुख्य महंत होते. त्यांशीं टॉलस्टॉय यांचा बऱ्याच कडाक्याचा वाद झाला. प्रथमदर्शनाच्या वेळीं या मठपतीनें टॉलस्टॉय यांस नेहमींच्या चालीप्रमाणें आशीर्वाद दिला; पण टॉलस्टॉय यांनीं त्यांची रजा घेतली तेव्हां मात्र असा आशिर्वाद देण्यास ते विसरले, यावरून त्यांच्या वादाचें स्वरूप काय असावें, याचें सहज अनुमान होतें.

याच मठांत यानठीफ नांवाचा टॉलस्टॉय यांचा एक जुना मित्रहि जोगी होऊन राहिला होता. यानठीफ हाहि मोठा विद्वान गृहस्थ असून एक नाणावलेला ग्रंथकारहि होता. त्याला टॉलस्टॉय म्हणाले, "तुम्ही स्वतः इतके कुशाग्रबुद्धीचे असून या जुन्या पंथाच्या मतांस इतके चिकटून कसे बसतां याचें मला नवल वाटतें."

त्यानें उत्तर दिलें, 'तुम्ही स्वतःच कांहीं दिवस येथें रहा म्हणजे तुम्हाला अनुभव येऊन तुम्हीहि जुन्या पंथाचें अनुयायी बनाल.' यावर टॉलस्टॉय म्हणाले, 'बरोबरच आहे. बाह्य जगाशीं कांहींच संबंध नसलेल्या उंबरांतल्या किड्याला स्वतःचेंच जग अति उत्कृष्ट वाटतें, यांत नवल नाहीं.' यावर यानठीफ रागावून म्हणाला, 'अम्ब्रोजसारख्या महंताच्या मठांत असे शब्द तुमच्या तोंडांतून निघतात तरी कसे? हे शब्द सैबेरियांतल्या एकाद्या खेड्यांत मात्र शोभतील !' टॉलस्टॉय यांनीं उत्तर दिलें, 'पिटर्सबर्गला तुमचे वजनदार स्नेही पुष्कळ आहेत. त्यांना लिहून माझी रवानगी तिकडे करण्यास तुम्हांस फारसें जड नाहीं.'

या वेळीं टॉलस्टॉय यांच्या पत्नीनें तिसऱ्या आलेक्झांडर बादशहाची मुलाखत घेतली होती. टॉलस्टॉय यांच्या समग्र ग्रंथाच्या तेराव्या खंडांत

'क्रुटझर सोनाटा' हें नाटक छापण्याची परवानगी बादशहाजवळ तिनें मागितली.

बादशहा म्हणाला, 'लग्न आणि कुटुंबपद्धति' यांच्या विरुद्ध या नाटकाचा कटाक्ष आहे. आणि तुम्ही स्वतः कुटुंबवत्सल असतां असलें नाटक लोकांपुढें आणण्याची खटपट कशी करतां? वास्तविक पाहतां लोकांपुढें तें न येईल, अशी खबरदारी तुम्ही घ्यावी."

कौंटेस म्हणाल्या, "एक कुटुंबवत्सल स्त्री या नात्यानें ही परवानगी मी मागत नसून केवळ प्रकाशक या नात्यानें मी ती मागतें. मला समग्र ग्रंथ प्रकाशीत करावयाचे असल्यामुळें त्यांत कसलीहि उणीव राहूं नये, एवढीच माझी इच्छा आहे."

यावर बादशहानें कांहीं विशेष उत्तर दिलें नाहीं; तथापि टॉलस्टॉय यांचा एखादा गुप्त छापखाना कोठें आहे काय? एवढी मात्र चवकशी केली. तसें कांहीं नसल्याबद्दल कौंटेसबाईंनीं खात्री करतांच हें नाटक छापण्याची परवानगी त्यांस मिळाली.

क्रुटझर सोनाटा या नाटकाशिवाय टॉलस्टॉय यांनीं इ. स. १८९० सालीं विशेष महत्त्वाचे असे लेख लिहिले नाहींत. वर्तमानपत्रांतून अनेक निकराचे हल्ले त्यांजवर झाले आणि कांहीं धर्माधिकाऱ्यांनीं इतर प्रकारेंहि त्यांजवर हल्ले करून असल्या धर्मलंडाला हद्दपार करणेंच योग्य आहे, अशा सूचनांचा भडिमार सरकारावर केला; पण या सूचनांचा या सालीं तरी कांहीं उपयोग न होतां सरकारानें त्या दप्तरीं दाखल करून ठेवल्या.

---

# प्रकरण सातवें.

## दुष्काळ.

मनःपूर्वकता हा गुण टॉलस्टॉय यांच्या ठिकाणीं प्राधान्यें करून होता, हें आतां नव्यानें सांगावयाला नको. एखादा विषय विचार करण्याच्या योग्यतेचा आहे, अशी त्यांच्या चित्ताची खात्री एकवार झाली, कीं, त्याचा सांगोपांग अभ्यास करून त्याची तड लावल्याशिवाय ते रहात नसत. त्यांच्या या विशेष गुणामुळेंच त्यांचा प्रत्येक लेख अत्यंत हृदयंगम

झालेला आहे. त्यांची सारी विचारसरणी सर्वांस सारखीच पटेल अशी नाहीं, तथापि तिचा जोम इतका विलक्षण आहे कीं, त्यांचा कोणताहि लेख वाचावयाला घेतला, तरी त्यांच्या विचारांच्या ओघाबरोबर वाचक अनिवार्यपणें वहात जातो. त्यांच्या लेखांत असलेला जिवंतपणा फारच थोड्या ठिकाणीं आपणास आढळतो. आणि याचें मुख्य कारण हेंच कीं, स्वार्थापेक्षां त्यांचें चित्त परार्थाकडे अधिक वेधलेलें होतें. स्वतःकरतां कोणत्याहि ऐहिक सुखाची पर्वा त्यांनीं बाळगिली नव्हती. यामुळें स्वार्थानें येणारा अंधपणा त्यांच्या बुद्धीला आला नव्हता. जगांतील विषमता त्यांना अगदीं ढळढळीत दिसत होती. ही विषमता नाहींशी करून जगाला सरळ मार्गाला कसें लावतां येईल, याचा विचार करण्यांतच त्यांचें बुद्धि-सर्वस्व आमरण गुंतून राहिलें होतें. मानवी जीवनक्रमांतील सारीं अडचणीचीं स्थळें त्यांना स्पष्ट दिसत होतीं आणि तीं नाहींशीं करण्याचे त्यांचे उपाय सर्व प्रसंगीं आणि सर्वथा बरोबर नसले, तरी तत्त्वदृष्ट्या ते विचारार्ह होते यांत शंका नाहीं. अनेक प्रकारच्या मोहापासून मनुष्याला परावृत्त करण्याचा कांहीं उपाय सांपडला, तर ही पृथ्वीच स्वर्गभूमि होईल असा त्यांचा पक्का विश्वास होता. आणि हा उपाय शोधून काढण्यासाठींच त्यांची सारी धडपड चालू होती. त्यांचे लेख, त्यांच्या कादंबऱ्या, त्यांचीं नाटकें आणि बाकीचे सारे उद्योग हीं या धडपडीचींच फळें होत. त्यांचा कोणताहि उद्योग स्वार्थमूलक नसून परार्थप्रेरित होता आणि यामुळेंच त्यांत इतका जिवंतपणा व इतकें चैतन्य भरून राहिलें होतें.

इ. स. १८९१ सालापर्यंतहि त्यांचे विचार पूर्णपणें स्थिरावले होते, अथवा त्यांचीं मतें निश्चित झालीं होतीं, असें दिसत नाहीं. इ. स. १८९१ च्या मार्च महिन्यांत एका मित्राला लिहिलेल्या पत्रांत ते लिहितात,

"तुमच्या चित्तांत ज्या विचारानें काहूर करून सोडलें आहे, तेच विचार माझ्याहि चित्तांत घोळत आहेत. तुमच्या नजरेसमोर असलेलें क्षितिज माझ्याहि नजरेसमोर आहे. माझा मित्र हिलकॉप याच्याहि चित्तांत असाच गोंधळ उडाला असून आमचा पत्रव्यवहार याच गोष्टींनीं भरलेला असतो."

स्वर्गभूमि म्हणजे काय आणि या पृथ्वीवर ती कशी आणावी, हें

सांगण्यांतच खिस्तानें आपलें सारें आयुष्य खर्च केलें. प्रत्येक मनुष्यानें पूर्णत्व कसें मिळवावें, हेंच त्यानें मुख्यतः सांगितलें आहे. अखिल मानवजातीपुढें हेंच ध्येय खिस्तानें मांडलें आहे. या ध्येयाचीं दोन अंगें आहेत. एक अंतरंगपूर्णता व दुसरें बहिरंगपूर्णता. मनुष्यजात या दोन्ही अंगानीं पूर्ण झाल्याशिवाय तिला खरी पूर्णता येत नाहीं. या साध्याकडे जाणारा रस्ता लांबलचक आणि मोठा अडचणीचा आहे. आपल्या मुक्कामाचे टप्पे समजावेत म्हणून एकाद्या राजमार्गावर मैलांचे धोंडे आपण उभे करतों, त्याचप्रमाणें येशूखिस्तानें आपल्या पांच आज्ञांच्या रूपानें पांच खुणेचे दगड रोवून ठेवले आहेत. या खुणा पाहून आपण किती मजल गांठली, हें प्रवाशास बरोबर समजतें."

"जगांत सर्वत्र अभेद दिसणें हेंच पूर्णत्वाचें लक्षण आहे. झुलू आणि काफीर यांसारखे कृष्णवर्ण लोक अथवा वेडे, भामटे आणि पशु या सर्वांस केवळ बंधुदृष्टीनें जो पाहतो, तोच पूर्णत्व पावलेला मनुष्य होय. ममत्वाच्या मार्गांतील हा पहिल्या मैलाचा टप्पा होय. दुसरा टप्पा नैष्ठिक ब्रम्हचर्याचें पावित्र्य हा आहे. तिसरा टप्पा पूर्ण स्वतंत्रतेची वृत्ति हा आहे. याच टप्प्याला अनुलक्षून खिस्तानें 'तूं कधींहि शपथ घेऊं नको'. अशी आज्ञा केली आहे. चवथा टप्पा अजातशत्रुत्व हा आहे. याकरतां आपणावर कोणी मनुष्यानें अथवा पशूनें हल्ला केला, तर आत्मसंरक्षणाकरतांहि त्याला तूं दुखापत करूं नको, अशी खिस्ताची आज्ञा आहे. आणि पांचवा टप्पा शत्रूंचे मित्र बनविणें हा आहे. याला अनुलक्षून तूं शत्रूवरहि उपकार कर असा खिस्ताचा उपदेश आहे."

"अध्यात्मज्ञानाचा विचार करण्यास मीं आरंभ केला, तेव्हां माझ्याहि हातून पुष्कळ चुका घडल्या. अपिरिचित रस्त्याला लागलेला मनुष्य जसा बावरतो, त्याचप्रमाणें मीहि बावरतों. आणि असें होणें साहजिक असल्यामुळें माझ्या चुका क्षम्य आहेत, असा माझा समज आहे. त्या चुका नव्हेत, असें मात्र मी म्हणत नाहीं."

"खिस्तानें आपल्या पदरचें असें कांहींच सांगितलें नाहीं, हाच त्याच्या धर्माचा मोठेपणा होय. मानवजाति जो कायदा आरंभापासून पाळीत आली आहे, त्याचेंच स्पष्टीकरण त्यानें केलें. अमूर्ताला मूर्तरूप त्यानें

दिलें. वास्तविक पाहतां मनुष्यजाति हा कायदा आजहि पाळीत आहे. आणि ती जिवंत असेपर्यंत तो पाळीत राहील. हा कायदा कित्येक जाणून-बुजून पाळतात आणि दुसरे कित्येक न समजतां हाच कायदा पाळीत असतात. याचें अगाऊ ज्ञान करून घेऊन त्या मार्गावर जे बुद्धिपुरस्सर आरूढ होत असतात, त्यांचा जीवनक्रम आनंदमय आणि हेतुपूर्ण चालतो. आणि न समजतां हा कायदा जे पाळीत असतात, ते परिस्थितीच्या ओघाबरोबर असाह्यपणें वाहवत जाऊन गटंगळ्या खात रहातात. या मार्गावर आरूढ होऊन आपल्या गतीचा वेग वाढविणें, हेंच धर्मजीवनाचें खरें चिन्ह होय."

"तथापि आरंभांतच पुष्कळ लोक हातपाय गाळतात, हें मानव-जातीचें मोठें दुर्दैव होय. या मार्गांत मनाचा घडा करून पाऊल पुढें टाकलें पाहिजे. ईश्वराची भेट कशी होईल, असा प्रश्न पुष्कळ लोक मला विचारीत असतात. वास्तविक पाहतां याचें उत्तर इतकें उघड आहे कीं, हा प्रश्नच त्यांच्या डोक्यांत कसा उद्भवतो, याचें मला नवल वाटतें. याला काय उत्तर द्यावें, हेंच मला समजत नाहीं. मला मोठा समजून एकादा गृहस्थ मजकडे येतो आणि त्याला विन्मुख होऊन परत जावें लागतें, याचा मलाहि मोठा विषाद वाटतो;पण मी तरी काय करूं? नानाप्रकारचे लोक माझ्या भेटीला येत असतात. आणि तें निघून गेल्या-नंतर माझें चित्त किती विषण्ण आणि उदास होतें हें लिहून सांगतां येण्याजोगें नाहीं. माझ्या आजूबाजूला पोकळ चैनीचें वातावरण भरलें आहे. हें वातावरण आतां टाकून द्यावें अशी इच्छा मला वारंवार होऊं लागली आहे."

मार्च महिन्यांत फिनरमनला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात,

"नवीन वसाहत नव्या तत्त्वावर निर्माण करण्याचा तुमचा यत्न चांगलासा सिद्धीस गेला नाहीं, याबद्दल इतकें वाईट वाटण्याचें कारण नाहीं. तुमची चूक कोठें झाली याचें निदान तुम्हाला बरोबर करतां आलें नाहीं. ज्या तत्त्वावर तुम्ही आपल्या कार्याची उभारणी केली, ती वस्तु खरोखर तत्त्वरूप नव्हती. क्षुद्र वस्तूवर तत्त्वाचा आरोप करून

तदनुरूप आपला मार्ग तुम्ही आंखला, हीच तुमची चूक होय. आणि या चुकीचा परिणाम जो व्हावयाचा तो झाला."

" आपलें मूळ तत्त्व प्रेम अथवा भक्ति हें आहे. या मूळ पायावर आपली पुढची इमारत रचली पाहिजे. हें प्रेम केवळ शाब्दिक असतां उपयोगी नाहीं. प्रत्यक्ष कृतींत तें ढळढळीत दिसलें पाहिजे. परमेश्वराच्या भक्तीकरितां अथवा आपल्या शेजाऱ्याच्या हिताकरतां सर्व जन्म कष्ट करण्याची आणि प्रसंगीं जीवहि देण्याची आपली तयारी असली पाहिजे. भक्तीकरतां आत्मयज्ञ ! अशा स्वरूपाचें आपलें आद्य तत्त्व आहे. तें तत्त्व एकवार आपण आपलेंसें केलें, म्हणजे त्यांतून नम्रता, साधेपणा आणि अप्रतिकार हीं दुय्यम तत्त्वें आपोआपच निर्माण होतात."

एप्रील महिन्यांत लिहिलेल्या पत्रांत पुढील मजकूर आहे,

" तुमच्या वसाहतवाल्या मंडळींत पुष्कळसे तंटे होतात, असा मजकूर लिहून त्याजबद्दल तुम्ही दुःख प्रदर्शित केलें आहे; चार माणसें कोणत्याहि कार्यासाठीं एकत्र जमलीं म्हणजे आरंभीं त्यांच्यांत हुरूप आणि आनंद हे गुण दिसतात. आपण ज्यांत पडलों आहों, तें सत्कार्य आहे, या भावनेमुळें या गुणांचा उद्भव झालेला असतो. कित्येक वेळां या गुणांचा अतिरेक होऊन आपल्या बुद्धीला मंदपणा येत असतो. यामुळें माणसामाणसांच्या विचारसरणींत फरक असतो, ही महत्त्वाची गोष्ट आपल्या लक्षांत येत नाहीं. पुढें अनुभवानें या तत्त्वाचा खरेपणा प्रत्यक्ष दिसूं लागला म्हणजे आनंदाच्या बाजूकडे झुकलेलें मन उलट खाऊन निराशेच्या आणि विषादाच्या बाजूला झुकतें. आपल्या मार्गांतील मोठ्या-धोक्याची जागा तीच. अशाच प्रसंगीं अत्यंत धीरानें आपण कार्यरत राहिलें पाहिजे. आपली कार्यकारी शक्ति आणि आपलें चित्तस्थैर्य यांची कसोटी लागण्याची वेळ हीच. कारण या वेळीं आपण फसलों, तर मग अपेशाची एकसारखी परंपरा लागून राहते. उद्वेगामुळें कार्याकडे दुर्लक्ष होऊं लागतें, दुर्लक्षामुळें यशाचीं चिन्हें कमी कमी दिसूं लागतात, हीं चिन्हें न दिसल्यामुळें स्वीकृत कार्याची उपेक्षा आपण करूं लागतों, आणि उपेक्षेचें अंतिम पर्यवसान त्या कार्याचा तिरस्कार करण्यांत होतो."

वरील उताऱ्यावरून टॉलस्टॉय यांचीं तत्त्वें व्यवहारांत पूर्णपणें उतरूं शकत नाहींत, असें सिद्ध होऊं लागल्याचें दिसून येतें. टॉलस्टॉय यांच्या ग्रंथांच्या वाचनानें पुष्कळशीं तरुण मुलें हुरळून गेलीं होतीं. आपल्या परिस्थितीचा कोणताहि विचार न करतां अथवा आपलें मानसिक बलाबल न पाहतां नवी समाजरचना करण्यास ही मंडळी उद्युक्त झाली होती. तत्त्वें तींच असलीं, तरी त्यांचा व्यवहार करण्याचे मार्ग व्यक्त्यनुरूप भिन्न भिन्न असूं शकतील, हा मूळ मुद्दा त्यांच्या दृष्टीस कधींच दिसला नव्हता. सर्वांचीं तत्त्वें एक, तर मार्गहि एकच असले पाहिजेत, अशा हट्टामुळेंच त्यांची फसगत झाली. एकाच आकाराचा आणि मापाचा अंगरखा मुलांनीं, तरुणांनीं आणि वृद्धांनींहि वापरला पाहिजे, अशाच प्रकारचा हा वेडेपणाचा हट्ट होता. आणि या हट्टामुळेंच त्यांच्या कार्यांत त्यांस अपेश येऊं लागलें होतें. हा दोष तत्त्वांचा म्हणण्यापेक्षां व्यवहाराचा होता, असें म्हणणें अधिक सयुक्तिक होईल.

टॉलस्टॉय यांच्या तत्त्वांस अनुसरून नवी वसाहत स्थापावी, या उद्देशानें जे तरुण एकत्र झाले होते, त्यांच्या हातून दुसरीहि एक मोठी चूक घडली. आपण कोणत्या कामास लायक आहों याचा विचार त्यांनीं केला नाहीं. आपल्या साऱ्या जन्मांत शारीरिक श्रम ज्यांनीं कधींच केले नाहींत, इतकेंच नव्हे तर ज्यांचे बापदादेहि केवळ निरुद्योगीपणांत वाढले, अशांच्या हातून शेतकीचें, झाडें तोडण्याचें अथवा घरें बांधण्याचें काम कितपतसें होणार? या तरुणांत शरिराची वाढ झाली नव्हती; पण बुद्धीची वाढ चांगल्याप्रकारें झाली होती. शारीरिक श्रम स्वतः करण्यापेक्षां दुसऱ्यांच्या शारीरिक श्रमाचा अधिक चांगला उपयोग कसा करावा, हें त्यांस कळत होतें. तशा कामीं त्यांच्या बुद्धीचा व्यय झाला असता, तर त्यांची अशी फसगत कधींच झाली नसती; पण नव्या वसाहतींत त्यांच्या अशा प्रकारच्या बुद्धीचा उपयोग होण्यासारखा नव्हता. तेथें अमुक धनी आणि अमुक त्याचे नौकर असा भेदच नव्हता. यामुळ कोणत्या कामास कोण योग्य याची निवडहि तेथें करतां येण्याजोगी नव्हती. अशा स्थितींत सर्वच घोंटाळा होऊन या वसाहती अपेशी ठरल्या यांत नवल नाहीं.

आपली सारी समाजरचना बदलली पाहिजे अशाप्रकारचे आपले

विचार लोकांपुढें मांडण्याचा टॉलस्टॉय यांचा क्रम सुरू होता, तथापि त्यांच्या स्वतःच्या कुटुंबरचनेंत अथवा राहणींत कांहीं फेरफार झाला होता, असें नाहीं. त्यांच्या सांसारिक परिस्थितीचा गाडा पूर्वींच्या मार्गानेंच चालला होता. त्यांची स्वतःची इच्छा पाहिली, तर त्या स्थितींत कांहीं फेरबदल व्हावा, अशी नव्हती. त्यांची बुद्धि दिवसेंदिवस अधिक मननशील होत जात होती. यामुळें बाह्य परिस्थितीकडे त्यांचें दुर्लक्ष दिसे. अशा स्थितींत त्यांच्या कुटुंबाच्या राहणींत एकादी घडामोड एकदम झाली असती, तर त्यांच्या विचारांच्या ओघालाहि कदाचित् एकदम खंड पडला असता. या वेळीं त्यांच्या डोक्यांत घोळत असलेले विचार एकंदर मानवजातीच्या दृष्टीनें फार महत्त्वाचे असल्यामुळें त्यांत खंड पडणें इष्ट नव्हतें. सांप्रतचीं सरकारें आणि अप्रतिकाराचें तत्त्व हे त्यांच्या विचाराचे विषय होते. हल्लींचीं सारीं राजशासनें ( गव्हर्मेंन्टस् ) केवळ दंडुक्याच्या तत्त्वावर उभीं असल्यामुळें सामाजिक दृष्ट्या तीं अनर्थकारक आहेत, हा त्यांच्या विचारसरणीचा मूळ पाया आहे. तेव्हां अशाप्रकारच्या सरकाराशीं कोणत्याहि प्रकारची सहकारिता करणें, अनीतिमूलक आणि अपायकारक आहे, असा सिद्धांत त्यांनीं काढला. मुलकी अथवा लष्करी नौकरी करणें, आणि अशा सरकारास कर भरणें चुकीचें आहे, ही त्यांच्या पुढची पायरी येथें आपोआपच निर्माण झाली.

याच सुमारास टॉलस्टॉय यांचा त्रेसष्टावा वाढदिवस उगवला या समारंभानिमित्त त्यांचे पुष्कळ आप्तस्वकीय व त्यांची स्नेहीमंडळी यासनाया येथें गोळा झाली होती. यांत शिंगर या नांवाचा एक सुप्रसिद्ध गणिती त्यांचा स्नेही होता. त्याला ते म्हणाले, " माझा जन्म अठ्ठावीस सालीं आणि महिन्याच्या अठ्ठाविसाव्या तारखेस झाला. माझ्या साऱ्या आयुष्यभर अठ्ठावीस हा आंकडा मला मोठा लाभदायक झाला आहे. मला वाटतें अठ्ठावीस हा आंकडा गणितशास्त्राप्रमाणें पूर्ण आंकडा आहे. पूर्ण आंकडा म्हणजे त्यांच्यांत सर्व पूर्ण भागांची बेरीज केली, तर ती मूळ आंकड्याबरोबर होते. अठ्ठावीस या आंकड्याला १, २, ४, ७, १४ या अंकांनीं बरोबर भाग तुटतो. आणि या सर्व आंकड्यांची बेरीज अठ्ठावीस आहे. असे अंक फारच थोडे आहेत."

या दिवशीं टॉलस्टॉय हे मोठ्या आनंदांत असून सर्वांशीं मोठ्या प्रेमानें बोलत होते, असें झिंगर म्हणतो. यानंतर झिंगर हा आणखीहि कांहीं दिवस यासनाया येथें राहिला होता. एके दिवसाची हकीकत सांगत असतां झिंगर म्हणतो,

" अर्वाचिन भौतिक शास्त्रांत पारंगत अशी सोफाया कोव्ह्या लेस्की या नांवाची एक स्त्री नुकतीच मरण पावली होती.• तिच्यासंबंधीं मी कांहीं बोलत होतों. इतक्यांत टॉलस्टॉय तेथें आले आणि आमच्या विषयास अनुलक्षून ते म्हणाले, पुरुषाप्रमाणेंच स्त्रियांची बुद्धि अर्वाचीन शास्त्रात पारंगत होऊं शकते, असें सिद्ध झालें, तर तो मोठा अन्याय होईल असें मला वाटतें. स्त्रियांच्या ठिकाणीं जो मोहकपणा निसर्गतःच आहे, त्यामुळें पुरुषांवर त्यांचें आधिराज्य अगोदर आहेच आणि मग त्यांत बुद्धीच्याहि वैभवाची भर अधिकच पडेल."

या वर्षीं रशियांत मोठा भयंकर दुष्काळ पडला होता. याचीं पूर्वचिन्हें या जन्मदिवसाच्या वेळीं जाणविण्यास सुरुवात झाली होती. पिटर्सबर्ग येथें वर्गण्या गोळा होऊं लागल्या होत्या. आपला मित्र फिनरमन याला या संबंधाची हकीकत सांगत असतां टॉलस्टॉय म्हणाले, " पिटर्सबर्ग येथून एक राजदूत दहालाख रूबलांची मदत भिकारी लोकांकरतां घेऊन आला. यानें पहिल्या वर्गांतून प्रवास केला. याचा पोषाक आणि राहणी हीं मोठीं भपकेबाज आणि श्रीमंति थाटाचीं होतीं. पिटर्सबर्गसारख्या धनाढ्य शहरांतून एवढी रक्कम म्हणजे वास्तविक कांहींच नव्हे; पण ही तरी शेतकऱ्यांच्या पदरांत जशीच्या तशीच पडेल, असें मात्र समजूं नका. एक डझनभर कार्यालयांच्या आणि कामगारांच्या हातून ती फिरेल. या प्रवासांत तिचे किती तुकडे पडतील याचा नियमच नाहीं. आणि मग इतक्या चाळण्यांतून जी लहानशी गोळी शिल्लक राहील, ती खेडवळ शेतकऱ्यांच्या तोंडावर तुच्छतापूर्वक भिरकावली जाईल."

" साऱ्या शरीराला रंगरोंगण करणारे आणि हातांत सदोदित हात-मोजे घालणारे पिटर्सबर्गचे हे सभ्य गृहस्थ येथें येतात तरी कशाला ! दुष्काळाची स्थिति वास्तविक काय आहे, हें यांच्या स्वप्नींहि कधीं येत नाहीं. आणि हे येथें आले म्हणजे दुष्काळग्रस्त भागांत पाऊलहि न ठेवतां

आपला पुरवठा चांगला चालेल अशा एकाद्या श्रीमान जमीनदाराकडे आपलें बिऱ्हाड लावतात. वास्तविक पाहतां येथें हातापायानें काम करणाऱ्या लोकांची जरूर आहे. नुसते बोलघेवडे आम्हांला नकोत. दुष्काळाचें खरें स्वरूप काय आहे, हें प्रत्यक्ष डोळ्यानें पाहणारे आणि त्यासंबंधीं सारा देश हलवून सोडणारे लोक आम्हांस पाहिजेत."

आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें रशियन सरकारानें या दुष्काळाची खरी स्थिति आपल्या रिपोर्टांत झांकून ठेवली होती. कांहीं प्रांतांत धान्याची उणीव थोडीबहुत भासे, अशा अर्थाचा मजकूर सरकारी रिपोर्टांत होता. हा लेख टॉलस्टॉय यांच्या नजरेस पडला, तेव्हां सरकारचें म्हणणें सपशेल खोटें आहे, हें सप्रमाण सिद्ध करण्याकरतां स्वतः एक लेख लिहिण्याची त्यांनीं तयारी केली. या वेळीं दुष्काळग्रस्त प्रांतांत फिरून स्वतःच्या आंगमेहनतीनें लोकांना मदत करावी असा त्यांचा विचार प्रथम नव्हता; पण वरील लेखाच्या तयारीसाठीं त्या प्रांतांत ते हिंडूं लागले, तेव्हां लोकांची दैना पाहून लेखाचें काम त्यांनीं तसेंच ठेवलें आणि लोकांच्या मदतीस ते धांवले.

या वेळीं रेस्की या नांवाचा त्यांचा एक स्नेही त्यांजकडे रहावयास आला होता. साधारण बाळपणापासूनच टॉलस्टॉय आणि रेस्की हे मित्र होते. पुढें वयपरत्वें त्यांच्या विचारांत पुष्कळ फरक पडला; तथापि त्यामुळें त्यांच्या स्नेहांत उणीव आली नाहीं. आत्मोन्नति हा टॉलस्टॉय यांच्या चित्ताचा मुख्य विषय होऊन बसल्यामुळें त्यांच्या सामान्य भाषणाचा ओघहि धर्म अथवा नीतितत्त्वें यांकडे वळे. उलटपक्षीं रेस्की हा अधिक व्यवहारी असल्यामुळें अर्वाचीन शास्त्रें, सांप्रतचें कलाकौशल्यं, राजकीय बाबी, इत्यादि विषय त्याच्या आवडीचे असत. गणितशास्त्रांत पूर्ण प्राविण्य मिळवून मास्को विश्वविद्यालयाचा अत्युच्च किताब रेस्कीला मिळाला होता. आणि तो व्यवहारी असल्यामुळें अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या सांप्रतच्या वाढीबद्दल त्याला विलक्षण अभिमान होता. मनुष्यजातीचें मोठें हित या शोधांमुळें झालें असून पुढेंहि तें तसेंच होत राहील असें तो म्हणे. टॉलस्टॉय यांचें मत या बाबींत अगदीं उलट होतें. अर्वाचीन शास्त्रांचे शोध अधिक खरे नसून ते निरुपयोगीहि आहेत.

इतकेंच नव्हे, तर मूठभर लोकांच्या हातांत सारी सत्ता एकत्र करून लक्षावधि सामान्य लोकांवर वरवंटा फिरविण्यास ते कारणीभूत होतात. शास्त्रीय शोधांमुळें आपल्या बांधवांचे खून करण्याची मनुष्याची शक्ति वाढली आहे. असल्या शास्त्रांचा उपयोग सध्यांच्या काळीं इतकाच होत आहे, असें ते म्हणत.

प्रत्येक गोष्ट आत्मोन्नतीच्या दृष्टीनेंच पाहिली पाहिजे, असा टॉलस्टॉय यांचा आग्रह असल्यामुळें चालू व्यवहारांतील पुष्कळशा गोष्टी त्यांना त्याज्य आणि हानिकारक वाटत. यामुळें रेस्की आणि टॉलस्टॉय यांजमध्यें वारंवार खटके उडत. एके दिवशीं ते दोघे सहल करून येत असतां घराच्या दारांत टॉलस्टॉय यांचा दोन वर्षें वयाचा धाकटा मुलगा उभा होता. त्याजकडे पाहून टॉलस्टॉय म्हणाले, 'हा पहा! फुकटचें खाऊन कसा बोकडासासारखा माजला आहे!' रेस्की यास ही भाषा अर्थातच रुचली नाहीं. तो म्हणाला, 'दोन वर्षांचें मूल मोठ्या सत्पुरुषाची कामगिरी करील, अशी तुमची अपेक्षा होती काय?' एवढ्याचवरून त्या दोघांत मोठा कडाक्याचा वाद जुंपला. असल्या प्रकारच्या भांडणांत टॉलस्टॉय यांची दृष्टि कोणाहि व्यक्तीविषयीं नसे. स्वतःच्या मुलासंबंधानें जे उद्गार त्यांनीं काढले, त्याचा कटाक्ष त्या मुलाकडे नसून श्रीमंतांचीं मुलें ज्या पद्धतीनें वाढविलीं जातात, त्या पद्धतीवर तो होता. हा मुद्दा रेस्की याच्या लक्षांत आला नाहीं.

अशा प्रकारचे अनेक वादविवाद टॉलस्टॉय आणि रेस्की यांजमध्यें वारंवार होत असत आणि टॉलस्टॉय यांचे जे मुद्दे त्याला पटत त्याप्रमाणें स्वतः वागण्याचाहि तो प्रयत्न करीत असे; तथापि टॉलस्टॉय यांचीं सारींच मतें त्याला मान्य होतीं, असें नाहीं. उदाहरणार्थ लोकलबोर्डें अथवा अशाच प्रकारच्या अर्वाचीन पद्धतीच्या ग्रामसंस्था टॉलस्टॉय यांस पसंत नव्हत्या. रेस्की याचें मत या बाबींत त्यांच्याविरुद्ध होतें. सुशिक्षित माणसांनीं अशा प्रकारच्या संस्थांत काम करून शेतकऱ्यांसारख्या मागासलेल्या वर्गास आपल्या ज्ञानाचा लाभ द्यावा, असें तो म्हणे; पण या दुष्काळाच्या सालीं असल्या प्रकारच्या संस्था प्रत्यक्ष कार्याला मुळींच उपयोगीं पडत नाहींत; असा अनुभव त्यांना आला. श्रीमंत जमीन-

दारांनीं बरीचशी जमीन आपल्या ताब्यांत घेऊन बसणें, याचा वास्तविक अर्थ अशा प्रकारच्या दुष्काळाच्या प्रसंगीं गरीब शेतकऱ्यांची उपासमार होऊं नये म्हणून हा एक प्रकारचा विमा उतरणें होय, असें त्यास कळून आलें. वर्षानुवर्षें जमीनदार जें मोठें उत्पन्न खात असतो, त्याजबद्दल अशा प्रसंगीं आपल्या साऱ्या शेतकऱ्यांचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्या शिरावर जमीनदारांनीं घेतली पाहिजे. जमीनदारीच्या विशिष्ट हक्कदारीबरोबर ही जबाबदारी प्रत्येक जमीनदारावर येत असते, ही गोष्ट जमीनदार लोक विसरतात. त्यांना आपल्या हक्कांचें मात्र स्मरण असतें. रेस्की याच्या लक्षांत ही गोष्ट या सालच्या दुष्काळांत आली; तेव्हां आपल्यावरच्या जबाबदारींतून आणि शेतकऱ्यांच्या ऋणांतून आपण मुक्त झालें पाहिजे, असें त्यास वाटून या कार्यासाठीं त्यानें स्वतःस वाहून घेतलें. या कामांत त्याचे तीन मुलगे आणि त्याचा नोव्हिकॉफ नांवाचा एक मित्र यांचीहि त्यास चांगली मदत झाली. पुढें रेस्की याजबरोबर टॉलस्टॉयहि या कामीं त्यास मदत करूं लागले. प्रथम कांहीं थोडे दिवस दुष्काळी प्रांतांत फिरून व दुष्काळासंबंधीं वर्तमानपत्रांत लेख लिहून श्रीमंत लोकांत जागृति उत्पन्न करावी, इतकाच त्यांचा उद्देश होता; पण त्या प्रांतांत फिरूं लागल्यावर तेथील प्रत्यक्ष स्थिति त्यांच्या नजरेस पडली, तेव्हां लेख लिहिण्याचा विचार बाजूस टाकून तेथें ते जातीनिशीं काम करूं लागले.

या वेळीं त्यांच्या पुस्तकाच्या प्रकाशनासंबंधीं व त्यांचीं नाटकें रंगभूमीवर आणण्यासंबंधीं अनेक प्रकाशकांकडून व नाटकमंडळ्यांकडून त्यांस पत्रें येऊं लागलीं. तेव्हां वर्तमानपत्रांत एक जाहीर लेख प्रसिद्ध करून आपल्या कोणत्याहि पुस्तकावर त्याच्या प्रकाशनाचा अथवा भाषांतराचा हक्क आपण ठेवलेला नाहीं, असें त्यांनीं जाहीर केलें.

या वेळीं ॲनाक्यारेनीना या नांवाची त्यांची कादंबरी पुरी झाली होती. तेव्हां तिच्या प्रकाशनाच्या हक्कासंबंधीं टॉलस्टॉय आणि त्यांची पत्नी यांच्यांत मोठा वाद माजून राहिला होता. त्याचा कायमचा निकाल टॉलस्टॉय यांच्या या लेखामुळें लागला. टॉलस्टॉय यांच्या या लेखामुळें

त्यांच्या पत्नीचे जे कायदेशीर विशिष्ट हक्क असावयाचे, ते या लेखामुळें नाहींसे झाले.

जनहिताच्या दृष्टीनें टॉलस्टॉय यांचें हें औदार्य अगदीं अनाठायीं होतें. इतकेंच नव्हे, तर अनर्थमूलकहि होतें, असेंच म्हणणें भाग आहे. त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध करण्यास सरसहा परवानगी मिळाल्यामुळें लुच्च्या आणि लफंग्या पुस्तकविक्यांचेंहि फावलें. ग्रंथकार या नात्यानें टॉलस्टॉय यांची कीर्ति साऱ्या युरोपभर अगोदरच पसरली असल्यामुळें त्यांच्या पुस्तकाची विक्री होईल कीं नाहीं, असा प्रश्न कोणाहि प्रकाशकाच्या आड येण्यासारखा नव्हता. यामुळें जो आघाडी मारील, तो कमाई करील, ही गोष्ट सर्वांस ठाऊक होती. अशा स्थितींत प्रकाशनाचें काम जितक्या व्यवस्थितपणें होणें अवश्य होतें, तितकें तें झालें नाहीं, यांत नवल नाहीं. उठला सुटला तो टॉलस्टॉय यांचे ग्रंथ प्रसिद्ध करूं लागला. आंतील मजकूर सुसंगत तरी आहे कीं नाहीं, हें पाहण्याची काळजीसुद्धां पुष्कळ प्रकाशकांनीं घेतली नाहीं. भाषांतराचीहि गत अशीच झाली. रशियन भाषेचें यथार्थ ज्ञान नसतां वाटेल त्या रेम्याडोक्यानें वाटेल तो मजकूर लिहून द्यावा आणि प्रकाशकानें तो प्रसिद्ध करावा, असें होऊं लागलें. यांतलीं कित्येक भाषांतरें तर अशीं आहेत कीं, यांत मुळाच्या अगदीं उलट विचार टॉलस्टॉय यांच्या माथीं भाषांतरकारांनीं मारले आहेत. टॉलस्टॉय यांचे ग्रंथ प्रसिद्ध करणें, ही गोष्ट कांहीं काळ अगदीं जुगारीच्या धंद्यासारखी होऊन बसली होती. यामुळें टॉलस्टॉय यांच्या औदार्याचा उपयोग झाला असें म्हणण्यापेक्षां दुरुपयोग मात्र अधिक झाला, असें म्हणणें भाग आहे. पुढें टॉलस्टॉय यांच्या पत्नीनें त्यांच्या समग्र ग्रंथांची एक आवृत्ति अगदीं माफक किंमतीला प्रसिद्ध केल्यामुळें निदान रशियांत तरी या जुगारीला बराच आळा बसला.

कोणाहि रशियन नाटककाराचें नाटक रंगभूमीवर आणण्याकरतां कांहीं ठराविक रक्कम नाटकवाल्यांनीं ग्रंथकारास दिलीच पाहिजे, असा कायदा रशियांत आहे. टॉलस्टॉय यांचीं नाटकें रंगभूमीवर येऊं लागलीं तेव्हां या कायद्याची अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न त्यांच्या मित्रमंडळींत उपस्थित झाला होता. हा प्रश्न खुद्द सरकारनेंच सोडविला.

कायद्यानें ठरविलेल्या रकमेचा स्वीकार टॉलस्टॉय यांनीं केला नाहीं, तर ती रक्कम दरबारी कलावंत खात्यांत जमा करावी, असें फर्मान रशियन सरकारनें काढलें. तेव्हां त्या रकमेचा स्वीकार करून तिचा विनियोग एकाद्या धार्मिक कृत्याकडे करावा, असें टॉलस्टॉय यांच्या पत्नीनें ठरविलें आणि या गोष्टीला टॉलस्टॉय यांनींहि अनुमोदन दिलें. केवळ खाजगी रीतीनें अथवा एकाद्या सत्कृत्यास मदत म्हणून खेळ रंगभूमीवर येत, तेव्हां अशा मंडळीकडून टॉलस्टॉय मुळींच कांहीं रक्कम घेत नसत.

टॉलस्टॉय यांचें औदार्य या बाबतींत अनर्थमूलक झालें, असें जें वर म्हटलें आहे, तें केवळ एकपक्षीय दृष्टीनेंच आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. स्वतः टॉलस्टॉय यांच्या दृष्टीनें त्यांची ही कृति त्यांनीं स्वीकारलेल्या तत्त्वास अगदीं अनुरूप होती, यांत संशय नाहीं. कोणत्याहि प्रकारची स्वतःची अशी खाजगी मालमिळकत करावयाची नाहीं, असें त्यांचें एक तत्त्व होतें. आणि त्यांची ही कृति या तत्त्वाला अनुसरूनच होती. केवळ ग्रंथकार या नात्यानें त्यांच्या या कृतीमुळें त्यांचा स्वतःचा व परंपरेनें जगाचा एका दृष्टीनें फायदाच झाला. लेखनाबरोबर प्रकाशनाचाहि धंदा त्यांनीं केला असता, तर त्यांचा अमूल्य वेळ प्रकाशनाच्या धंद्यांत पुष्कळ फुकट गेला असता. धंदा म्हटला म्हणजे त्यांत थोडाबहुत तरी लोभ येतोच. आणि अशा लोभास टॉलस्टॉय बळी पडले असते, तर त्यांनीं आपलीं मतें जितक्या स्पष्टपणें आणि धैर्यानें जगापुढें मांडलीं तशीं तीं मांडलीं असतीं कीं नाहीं, याची शंका आहे. सरकारी परीक्षक अथवा टीकाकार या व्यक्ती जणूं काय अस्तित्वांतच नाहींत अशा थाटानें त्यांनीं आपलें लेखनाचें कार्य चालविलें होतें. प्रकाशनाच्या धंद्याच्या लोभांत त्यांचें चित्त गुंतलें असतें, तर त्यांचें मन इतकें निरंकुश राहिलें असतें कीं नाहीं, याचीहि शंका आहे. याशिवाय धंद्यांत नेहमीं येणाऱ्या हजारों अडचणी त्यांसहि आल्या असत्या आणि झालें इतकें लेखनाचें कार्य त्यांच्या हातून कधींच झालें नसतें. याशिवाय बोलणें एक आणि करणें एक अशा दुटप्पी वागणुकीच्या आरोपास बळी पडून त्यांच्या कीर्तीसहि मोठा कलंक लागला असता.

याच वेळीं आपल्या इस्टेटीचीहि व्यवस्था टॉलस्टॉय यांनीं केली.

आपली पत्नी आणि मुलें यांच्यांत सर्व मालमिळकत जवळ जवळ सारख्याच प्रमाणानें त्यांनीं वांटून दिली. यासनाया पालियाना येथील मालमिळकत सर्वांत धाकटा मुलगा ऐव्हॉन यास मिळाली. खुद्द रहात्या घराची मालमिळकत सर्वांत धाकट्या मुलाकडे चालावी, अशी पद्धत रशियांत आहे. खुद्द टॉलस्टॉय यांसहि याच कारणामुळें यासनायाची वतनदारी मिळाली होती. पुढें इ. स. १८९५ सालीं ऐव्हॉन मृत्यु पावला तेव्हां ही मिळकत बाकीच्या मुलांत सारखीच वांटली गेली. टॉलस्टॉय यांची मुलगी मेरी हिलाहि इतरांबरोबर टॉलस्टॉय यांनीं वांटणी दिली होती; परंतु आपल्या वडिलांचीं मतें तिला पटलीं असल्यामुळें आपला भाग घेण्याचें तिनें नाकारलें. पुढें प्रिन्स अबोलेन्स्की यांजबरोबर तिचा विवाह झाला, तेव्हां ही मिळकत कौंटेसबाईनें आपल्या जावयास दिली.

दुष्काळ पडलेल्या प्रांतांत जातीनें फिरावयास ते गेले, तेव्हां तेथे मोठी चमत्कारिक स्थिति झाली होती. रशियन सरकारच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें या प्रांतांत दुष्काळ पडला आहे, हीच गोष्ट त्या सरकारानें प्रथम नाकारली. यामुळें सरकाराकडून कांहीं मदत होईल, अशी आशा टॉलस्टॉय यांस फारशी नव्हती; पण सरकार इतक्यावरच थांबलें नाहीं. खाजगी रीतीनें या कामांत पडलेल्या माणसांच्या मार्गांत बनेल तोंपर्यंत अडथळे आणण्याचा यत्न अधिकारी करूं लागले. टॉलस्टॉय यांचीं धार्मिक मतें रशियन धर्माधिकाऱ्यांस कधींच मान्य झालीं नाहींत. टॉलस्टॉय नास्तिक आणि धर्मलंड आहेत, असें शिक्कामोर्तब टॉलस्टॉय यांजवर त्यांनीं पूर्वींच केलें होतें. दुष्काळी प्रांतांत शेतकऱ्यांस मदत करण्याचें काम त्यांनीं हातीं घेतल्याबरोबर या भिक्षुकवर्गानें नास्तिक म्हणून त्यांजविरुद्ध मोठी ओरड सुरू केली.

दुष्काळी प्रांतांत जागोजाग भटारखाने उघडण्याची योजना टॉलस्टॉय यांनीं प्रथम हातीं घेतली. खुद्द स्वतःचा असा पैसा त्यांच्या हातीं मुळींच नव्हता. तथापि त्यांचे लेख ज्या पत्रांतून प्रसिद्ध होत, त्या पत्रांनीं या वेळीं त्यांस चांगली मदत केली. याशिवाय सामान्य लोकांकडूनहि बरीच वर्गणी वसूल झाली होती.

या वेळीं रेस्की आणि टॉलस्टॉय असे जोडीनें काम करीत होते.

दुष्काळी प्रांतांत लोकस्थिति कशा प्रकारची आहे व तेथील लोकांस बाहेरच्या मदतीची जरूर किती आहे, याचें वर्णन टॉलस्टॉय यांच्या पत्नीनें अनेक वर्तमानपत्रांत लेख लिहून केलें होतें. लोकांस मदत करण्याकरितां टॉलस्टॉय आणि रेस्की हे त्या प्रांतीं सहकुटुंब जाऊन राहि-त्याची हकीकत कौंटेसबाईनें प्रसिद्ध केली होती. या लेखांमुळें पुष्कळशा पत्रांकडे वर्गणीच्या रकमा जमा होऊं लागल्या व त्यामुळें टॉलस्टॉय यांचें कार्यहि बरेंच सुकर झालें. या वेळीं या प्रांतांत हवामान अतिशय खराब झालें होतें. त्याचा परिणाम रेस्की याच्या प्रकृतीवर होऊन त्याला ताप येऊं लागला; पण तशा स्थितींतहि आपल्या रोजच्या कामाला तो हजर राही. अखेरीस त्याचें दुखणें विकोपास जाऊन त्यांतच त्याचा अंत झाला.

या वेळीं सरकारी कामगारांच्या एकंदर मनःस्थितीचा जो अनुभव टॉलस्टॉय यांस आला, त्यामुळें एकंदर राजशासनाबद्दल त्यांचें जें आधींच वाईट मत होतें तें अधिकच वाईट झालें. अशा प्रकारचें लोकोपयोगी कार्य ज्या सरकारी अधिकाऱ्यांस करावें लागतें, त्यांच्या वृत्तींत जन-सेवेच्या इच्छेपेक्षां अहंकार आणि अधिकारमद यांचें प्रमाण पुष्कळसें असल्यामुळें एकादें सत्कृत्यहि दुष्कृत्यांतच जमा होतें, असा अनुभव टॉलस्टॉय यांस आला. अशा वेळीं सरकारी अधिकारी, जें कार्य हातीं घेतात, तें वाईट असतें असें नाहीं; पण असें कार्य करण्यांत लोकांवर आपण मोठा उपकार करीत आहों, असा जो आव ते घालतात, त्या-मुळेंच साऱ्या कार्याची नासाडी होते, असें टॉलस्टॉय यांचें ठाम मत झालें. सरकारी अधिकाऱ्यांच्या मनःस्थितीचें हें वळण बदलल्याशिवाय त्यांच्या हातून एकादें सत्कार्यसुद्धां धडपणें पार पडावयाचें नाहीं, असें ते म्हणूं लागले.

टॉलस्टॉय यांचा सहकारी मित्र रेस्की, याच्या मृत्यूमुळें टॉलस्टॉय यांस अतिशय दुःख झालें. त्याचा एक मृत्युलेख प्रसिद्ध करावा, अशी इच्छा त्यांची होती; पण रेस्की यांच्या पत्नीनें या गोष्टीस अनुमोदन न दिल्या-मुळें हा बेत त्यांस मागें ठेवावा लागला. एखाद्या लोकोपयोगी कार्यांतहि आपलें नांव जनतेपुढें केव्हांहि येऊं न देण्याची खबरदारी रेस्की नेहमीं

घेत असे. तेव्हां त्याच्या मृत्यूनंतरहि त्याच्या स्तुतिपर लेख प्रसिद्ध होणें इष्ट नाहीं, अशी टॉलस्टॉय यांची समजूत रेस्की यांच्या पत्नीनें घातली.

रेस्कीचा मृत्युलेख प्रसिद्ध झाला नाहीं; तथापि त्यामुळें लोक त्याचें नांव विसरले असें मात्र नाहीं. त्यानें जातीनिशीं जें काम केलें होतें ते दुष्काळी प्रांतांतील लोकांपुढें होतेंच. पुढें दुष्काळ संपल्यानंतरहि कित्येक वर्षें त्याची आठवण तेथील शेतकरी मोठ्या प्रेमानें काढीत असत.

टॉलस्टॉय यांच्या या उद्योगांत त्यांच्या साऱ्याच कुटुंबाची मदत त्यांस चांगल्या प्रकारें होती. त्यांची पत्नी आपल्या चार लहान मुलांसह मास्को येथें जाऊन राहिली होती. तेथें बसून अनेक पत्रांत या दुष्काळाची हकीकत ती प्रसिद्ध करीत असे. वर्तमानपत्रांच्याद्वारें पुष्कळ रक्कम तिनें गोळा केली आणि ती टॉलस्टॉय यांजकडे पाठविली. पुढें दुष्काळी प्रांतांत तापाचा आजार सुरू झाला, तेव्हां औषधें व कपडे खरेदी करून त्या प्रांतांत तिनें पाठविलीं. याशिवाय पुष्कळसे स्वयंसेवकहि गोळा करून त्यांची रवानगी त्या प्रांतांत तिनें केल्यामुळें टॉलस्टॉय यांच्या उद्योगास चांगलें यश मिळूं लागलें. या वेळीं शेंकडों लोकांकडून तिला रोज पत्रें येत असत; पण रात्रीचा दिवस करून इतक्यांचीहि योग्य वासलात ती लावी. या दुष्काळाचें खरें स्वरूप काय आहे, याची माहिती युरोपांतील इतर देशांस व अमेरिकेसहि तिनें करून दिली. तेव्हां इतर युरोपियन देशांतूनहि पुष्कळ मदत तिजकडे आली. अमेरिकेनें कित्येक जहाजें धान्यानें भरून पाठविलीं.

या वेळीं टॉलस्टॉय यांनीं आपलें कार्य कोणत्या पद्धतीनें केलें याचें वर्णन पुढील पत्रांत त्यांनीं स्वतःच केलें आहे.

" एकाद्या दुष्काळपीडित गांवांत मी गेलों म्हणजे शेतकऱ्यांचीं एक दोन मोठीं कुटुंबें हाताशीं धरून धान्य व भाजीपाला यांचा बराचसा पुरवठा त्यांजकडे मी करीत असें. वृद्ध, आजारी, आणि पोरकीं पोरें या सर्वांपुरतें अन्न तयार करण्याची जबाबदारी त्या कुटुंबावर असे. अशा रीतीनें सुमारें तीसपासून चाळीस माणसांचें अन्न एक दोन कुटुंबांनीं तयार करावें, अशी व्यवस्था मी केली होती. कांहीं गांवीं तेथील सभावित म्हाताऱ्यांस हातीं धरून सार्वजनिक भटारखाने उघडण्याची व्यवस्था

मीं केली. अन्न योग्य रीतीनें तयार केलें जातें कीं नाहीं, हें पाहण्याकरतां मधून मधून या भटारखान्यांत मी स्वतः जेवीत असें."

" येथें रेस्की याच्या घरीं मीं आपला मुक्काम ठेवला होता आणि या कार्यांत माझ्या दोन मुली आणि माझी पुतणी या मला हौसेनें मदत करीत."

" पुढें थोड्याच दिवसांनीं आणखी दोन स्वयंसेवकांची मदत आम्हास मिळाली. हे दोघेहि विश्वविद्यालयाचे पदवीधर होते. मी येथें ज्या घरांत राहिलों होतों, तें एकाद्या सामान्य शेतकऱ्याच्या घरासारखें होतें. या घरांत चैनीची अशी एकहि वस्तु तुम्हास आढळली नसती."

" आम्ही सुरू केलेल्या भटारखान्यांत गांवांतील सुमारें तृतीयांश लोकांची व्यवस्था होत असे. असे भटारखाने उघडण्याचें काम पुढें आमच्या इतकें अंगवळणीं पडलें होतें कीं, आम्हास फारसा त्रास न वाटतां एकंदर वीस खेड्यांत तीस भटारखाने एका महिन्याच्या अवधींत आम्ही सुरू केले. इतक्या भटारखान्यांत सरासरी पंधराशें लोकांस पोटभर अन्न रोज मिळत असे. या ठिकाणीं मिळेल त्या धान्याचा आणि भाजीपाल्याचा उपयोग आम्ही करीत होतों. कित्येक ठिकाणीं तेथल्या ग्रामसंस्थांनीं रायधान्याचा बराच पुरवठा आम्हांस केला; लोकांच्या नेहमींच्या खाण्यांत नसलेले असेहि पदार्थ पुष्कळ वेळां आम्हांस वापरणें भाग पडे. तथापि रोगराई वगैरे फारशी न होतां, थंडीचे दिवस बऱ्याच चांगल्या प्रकारें निभावले."

" मांसाचा पुरवठा आमच्याजवळ मुळींच नसल्यामुळें भाजीपाला आणि धान्य एवढ्यावरच सर्वांचा निर्वाह करणें आम्हांस भाग होतें. तथापि हें अन्न फारच पसंत पडलें होतें. खेड्यांतील भटारखान्यांची पाहणी करण्यास मी जाई तेव्हां तेथील गरीब लोक मला दुवा देत आणि याशिवाय दुसरें कोणतेंहि अन्न यापुढें आम्ही कधींच खाणार नाहीं, असेंहि ते म्हणत."

मुलांच्या शिक्षणाची गैर व्यवस्था होऊं नये म्हणून खेड्यापाड्यांतून शाळांची स्थापनाहि टॉलस्टॉय यांनीं केली होती. अशा रीतीनें या दुष्काळग्रस्त प्रांतांत जिवापाड मेहनत करून मोठें लोकोपयोगी काम टॉलस्टॉय

यांनीं केलें. पण हें कार्य करीत असतांहि त्यांच्या स्वतःच्या चित्ताला असावें तितकें समाधान नव्हतें. त्यांची स्वतःची वृत्ति स्वतःच्या दोषांचें निरीक्षण करणारी असल्यामुळें आपण करतों या कार्याला आपल्या हातून पुष्कळ उणीवा राहतात, या गोष्टीचें त्यांस फार दुःख होई. कोणतेंहि कार्य हातीं घेतलें म्हणजे त्याच्या उच्चतम स्वरूपाची कल्पना त्यांच्या मनांत प्रथम उभी रहात असे आणि या स्वरूपापर्यंत पोहोंचण्यासाठीं खटपट करावी, असा त्यांचा स्वभाव होता. आणि त्यांत कांहीं उणेपणा राहिला, म्हणजे आपल्या हातून व्हावें तसें काम होत नाहीं, अशी रुखरुख त्यांच्या चित्ताला लागे. परक्यांचे दोष पाहतांना सामान्य मनुष्याची दृष्टि जितकी तीव्र असते तितक्यांच तीव्र दृष्टीनें आत्मदोषांचें निरीक्षण करण्याची संवय टॉलस्टॉय यांस होती. सामान्य माणसें आणि टॉलस्टॉय यांसारखे पुरुष यांच्यांतील फरक हाच. इ. स. १८९१ च्या नोवेंबर महिन्यांत फिनरमननें लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात.

" येथें पुष्कळ कामें व्हावीं तशीं होत नाहींत हें मला उघड दिसतें. येथें पैशाला तोटा नाहीं पण दुष्काळग्रस्तांना अन्न देण्याकरतां जीं माणसें मला मिळालीं आहेत, त्यांची लोकांशीं वागणूक असावी तशी सौजन्याची नाहीं. हीं कामेंहि आपण स्वतः करावीं असें वारंवार माझ्या मनांत येतें, पण रात्र थोडी आणि सोंगें फार अशी स्थिति असल्यामुळें माझ्यानें तीं होत नाहींत. लोकांचें काम आवडत नाहीं, आणि स्वतः करतां येत नाहीं, अशा पेचांत मी पडलों आहें. या कामाबद्दल लोक माझी स्तुति करतात; पण मला त्यांच्या स्तुतीचेंहि भय वाटतें. हें काम माझ्या हातून व्हावें तसें होत नाहीं, हें मोठें पातकच नव्हे काय ? असा प्रश्न माझ्या मनांत वारंवार येतो, यामुळें स्तुतीसुद्धां मला विषासारखी लागते. हें काम परमेश्वराचें आहे, ही त्याची सेवा आहे; मग त्यांत चूक पडणें, हें पातकच नव्हे तर काय ? "

" येथून दोन तीन लेख कांहीं पत्रांकडे मीं पाठविले आहेत; पण ते प्रसिद्ध होतील कीं नाहीं, याची वानवाच आहे."

" माझी सध्यांची जीवितयात्रा अत्यंत कष्टमय झाली आहे. या कामांत मी कोंडून पडलों, असें मला झालें आहे. आपल्या निढळाच्या घामानें

आजपर्यंत माझें पोषण ज्यांनीं केलें, त्यांचा अन्नदाता म्हणून घेण्याचा प्रसंग मजवर यावा, ही गोष्ट माझ्या चित्ताला अत्यंत विषाद उत्पन्न करते, पण काय करावें? या कामांत माझे पाय आतां पक्के गुंतले आहेत. उन्मत्त लक्ष्मीपुत्रांनीं ओकून टाकलेलें अन्न या माझ्या अन्नदात्यांच्या तोंडांत घालण्याचा प्रसंग माझ्यावर आला आहे. हें महापातक माझ्या हातून घडत आहे, हें मला उघड दिसत असतांहि माझे पाय येथून मला बाहेर घेऊन जात नाहींत. या पापगर्तेतून बाहेर पडावें, असें हजारों वेळां माझ्या मनांत येतें. पण तसें करण्यास लागणारें मनोधैर्य मजपाशीं नाहीं."

" वर्तमानपत्रांत जो पहिला लेख मीं पाठविला, त्यांत एकच मुद्दा लोकांपुढें मीं स्पष्टपणें मांडला होता. आपल्या हजारों बांधवांस गुलाम बनवून त्यांच्या श्रमावर चैन करण्याचें जें घोर पातक आम्ही जमीनदार वर्गानीं केलें आहे, त्याचेंच हें फळ आहे, असा माझ्या लेखाचा आशय होता. या परिस्थितीचें उच्चाटण कायमचें करावयाचें असेल, तर श्रीमंत आणि गरीब यांजमध्यें जी प्रचंड भिंत पडली आहे, तिचा पार धुव्वा उडविला पाहिजे. विशिष्ट हक्क म्हणून शुद्ध जुलमी धन्याचें जें नातें श्रीमंत लोक आज बळकावून बसले आहेत, तें त्यांनीं सोडून द्यावें. त्यांनीं आपल्या इतर बांधवांच्या बरोबरीचें होऊन जावें. असें होण्यास त्यांच्या चालू जीवनक्रमांत आमूलाग्र बदल झाला पाहिजे. असें झालें, तरच या दुष्काळाचें तोंड काळें होईल. नाहीं तर अधोगतीच्या मार्गाला झपाट्यानें लागलेलें मानवकुल अखेरीस कोणत्या खाड्यांत पडेल हें कोणी सांगावें? हा लेख ज्या पत्राकडे मीं पाठविला होता, त्याच्या संपादकाला तो छापण्याचा धीर अजूनहि होत नाहीं."

" या लेखांत अनेक वेळां त्यानें फिरवाफिरव केली. त्यांतलि कांहीं ठिकाणचें उग्ररूप त्यानें मवाळ केलें. कांहीं मजकूर त्यानें मुळींच गाळून टाकला; तथापि इतकें करूनहि अजून तो हात जोडून बसला आहे."

" या दुष्काळासंबंधीं माझ्या पत्नीनें वर्तमानपत्रांत बरीच चळवळ केल्यामुळें पैसा गोळा होऊं लागला. तो पैसा मजकडे येऊं लागला. मग त्याची वासलात लावण्याचें काम माझ्यावर आपोआपच पडलें. अशा रीतीनें या कामांत माझे पाय अधिकाधिक गुंतत गेले."

" एका बाजूनें लोकांचे हाल वाढत चालले आणि मदतीची वाढ त्या मानानें कमी पडूं लागली. यामुळें मला येथून निघणें अधिकच दुरापास्त होऊं लागलें आणि आतां तर येथें मी पक्का जखडला गेलों आहें."

" पुष्कळसा पैसा जमा केला म्हणजे दुष्काळग्रस्तांस भरपूर मदत मिळून त्यांच्या साऱ्या संकटांचें निवारण होतें, असें कोणास वाटत असेल, तर तो त्याचा भ्रम आहे. मग असलें काम आम्ही कां करतों, असा प्रश्न आम्हास कोणी करील, तर त्यावर उत्तर इतकेंच कीं, चालू समाजरचनेंत आणि परिस्थितींत दुसरा मार्ग आम्हास उपलब्ध नाहीं हेंच."

" केवळ कर्म या दृष्टीनें हें काम इतकें वाईट आहे असें नाहीं. उलटपक्षीं उपासमारीनें मरणारे लोक अन्न खाऊन तृप्त होतात, हें पाहिलें म्हणजे कोणालाहि समाधानच वाटतें. माझ्या अंतर्गत दुःखाचें खरें कारण म्हटलें म्हणजे माझ्या सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी हें होय. वास्तविक माझ्याच पापामुळें ही परिस्थिति उत्पन्न झाली आहे, ही जाणीव मला सोडून जात नाहीं आणि यामुळें हें काम करण्यांत माझी मलाच लाज वाटते. माझ्या दुःखाचें कारण हेंच."

" हा सारा मजकूर मीं तुम्हास लिहिला, याचें कारण तुमची सहृदयता मला ठाऊक आहे, हें होय. माझ्या शब्दाचें रहस्य तुम्हास पटेल, अशी माझी खात्री आहे."

" माझे हे विचार आणि माझी वागणुक यांत जितका तंतोतंत मेळ असावा, तितका नाहीं, असा आक्षेप माझे मित्रहि पुष्कळ वेळां घेतात. यावर माझें उत्तर इतकेंच कीं, मी सत्पुरुष नाहीं, आणि मी आहें, असें भासविण्याचा यत्नहि मीं कधीं केला नाहीं. चारचौघांसारखाच मी सामान्य मनुष्य आहें. माझ्या ठिकाणीं अनेक दोष आहेत; मला जितक्या स्पष्टपणें बोलणें योग्य असतें, तितक्या स्पष्टपणें माझ्या तोंडून तें निघत नाहीं, हें मला ठाऊक आहे. त्याचप्रमाणें माझीं मतें बोलून दाखवितांना राईचा डोंगर आणि डोंगराची राई होते, हेंहि मला समजतें."

" ही बोलण्याची गोष्ट झाली. आणि माझी क्रिया पाहिली तर तिची दशा याहूनहि अधिक वाईट आहे. अनेक दुष्ट संवई मला जडल्या आहेत आणि त्यांमुळें मी अगदीं दुबळा बनून गेलों आहें. सत्यरूप परमेश्वराची

सेवा करावी, म्हणून मी धडपडतों, तथापि या मार्गांतहि माझें फळ सदोदित वांकडेंच पडतें. आणि अशा स्थितींतहि कांहीं लोक जेव्हां मला साधु म्हणतात तेव्हां, मी दंभाचा पुतळा आहें, ही गोष्ट माझ्या नजरेसमोर ढळढळीत उभी राहते."

"याकरतां माझे शब्द आणि माझी कृति यांत एकतानता असेलच असें समजूं नका. जेथें यांत एकरूपता दिसणार नाहीं, तेथें माझें दौर्बल्य आड आलें आहे, हें लक्षांत ठेवा. विवेकबुद्धीनें दाखविलेल्या मार्गानें निश्चयानें चालण्याची माझी इच्छा नाहीं, असें नाहीं. परमेश्वराचा खरा सेवक या नात्यास शोभण्यासारखी कृति आपल्या हातून घडावी म्हणून धडपड करीत असतांहि माझें मनोदौर्बल्य वारंवार माझ्या आड येतें, आणि त्यामुळें मी मार्गभ्रष्ट होतों."

दुष्काळ पडलेल्या प्रांताचें क्षेत्रफळ बरेंच मोठें असल्यामुळें टॉलस्टॉय यांचें कार्यक्षेत्रहि वाढत चाललें; पण त्या मानानें मदतनिसांची संख्या न वाढल्यामुळें त्यांचें काम त्यांना फार जड होऊं लागलें. जे मदतीस म्हणून येत त्यांत खरोखर कार्यकारी लोकांची संख्या फारच कमी असे. दुसरें काम नाहीं, म्हणून या कामांत पुढाकार घेणारीं माणसें येथेंहि निरुपयोगी होतात, असा अनुभव टॉलस्टॉय यांस आला. यामुळें या कार्यासंबंधीं टॉलस्टॉय यांचें चित्त दिवसेंदिवस अधिकच असंतुष्ट होऊं लागलें. तथापि आपल्या कामास ते अखेरपर्यंत चिकटून होते. मध्यंतरीं एक वेळ त्यांची पत्नी तेथें गेली असतां दुसरीहि कांहीं स्नेही मंडळी त्याच वेळीं तेथें आली होती. यांपैकीं एका गृहस्थानें कौंटेसबाई यांजपाशीं झालेला आपला संवाद पुढीलप्रमाणें नमूद केला आहे.

कौंटेस म्हणाल्या, "येथली स्थिति तुम्हांस कशी काय वाटते ?"

"फारच भयंकर; पण येथें पसरलेल्या रोगांच्या संसर्गाची भीति तुम्हांस वाटत नाहीं काय ?"

"भीति ! भीति वाटणें हें आपल्या दौर्बल्याचें लक्षण आहे."

"येथली स्थिति मला तर इतकी भयंकर वाटली कीं, आपल्या आटोकाट प्रयत्नांनींहि तींत कांहीं सुधारणा होईल अशी आशा मला मुळींच नाहीं."

" आणि या गोष्टी डोळ्यांनीं घडघडीत दिसत असतांहि श्रीमंत लोक आपल्या चैनींत कमतरता पडूं देत नाहींत, हें नवल नव्हे काय ? "

" पण तुमच्या साऱ्या कुटुंबानें तरी आपल्या चैनीला रजा दिली आहे कीं नाहीं ? जातीनिशीं तुम्ही त्या लोकांत मिसळतां कीं नाहीं ? "

" होय. कांहीं काम आम्ही करतों, हें खरें; पण आमचे कपडेलत्ते पहा आणि आमचें अन्नहि कोणत्या दर्जाचें आहे, हें पहा. असल्या चिजा आमच्या लक्षावधि बांधवांच्या स्वप्नींहि दिसत नसतील."

" पण आम्ही जमीनदार वर्गानें उद्यां चिंध्या पांघरल्या आणि आम्ही नुसती भाकरी खाऊन राहिलों, तरी त्यामुळें त्यांच्या स्थितींत फरक कसा पडणार ? "

" परंतु आपले लक्षावधि बांधव ज्या स्थितींत राहतात, त्याहून अधिक उच्च स्थितींत राहण्याचा आम्हांस अधिकारच नाहीं."

या भाषणावर मी कांहीं जबाब दिला नाहीं. कौंटेसबाईच्या तेजस्वी चेहऱ्याकडे मी पाहिलें तेव्हां तिचे डोळे पाण्यानें डबडबले होते, असें मला दिसून आलें. हें पाहतांच माझाही गळा भरून आला आणि मग एक शब्दहि माझ्यानें बोलवेना."

टॉलस्टॉय यांची शरीरप्रकृति जात्याच कणखर होती. अनेक प्रकारचे शारीरिक कष्ट सोसण्याची संवय स्वतःस त्यांनीं लावून घेतली होती. तथापि येथें बहुतेक कामें त्यांस स्वतः करावीं लागत असल्यामुळें कित्येक वेळां ते इतके थकून जात कीं, घरीं आल्यानंतर एक शब्द बोलण्याची ताकद त्यांस रहात नसे. तथापि त्यांची मनोवृत्ति जोरदार असल्यामुळें थोडेंसें कारण मिळतांच ती पुन्हां प्रफुल्लित होई. एखादा नवा भटारखाना अथवा एखादी नवी शाळा उघडली, म्हणजे त्या दिवशीं परमावधीचा आनंद त्यांस होई; आणि मग तो सारा दिवस त्यांची वृत्ति अगदीं संतुष्ट असे. हें काम करीत असतां जुन्या पंथाच्या भटाभिक्षुकांनीं त्यांची नालस्ती करण्याचें आपलें अंगीकृत कार्य एकसारखें सुरू ठेवलेंच होतें. टॉलस्टॉय हे सैतानाचे भक्त बनले असून पुष्कळ लोकांस सैतानाची प्रजा बनविण्याकरतां ते खटपट करतात, व या कार्यासाठीं प्रत्येक शेतकऱ्याला ते दहादहा रुपये देतात, अशा गप्पा प्रार्थनेच्या प्रसंगींहि

ठोकण्याच या मंडळीनें कमी केलें नाहीं. अशस्या लोक्स-निंदक लोकांत बिशपसारखी पदवी धारण करणारे मोठ्या दर्जाचे धर्माधिकारीहि असत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अन्नदान आणि वस्त्रदान अशा सारख्या प्रापंचिक वस्तु लोकांस देऊन त्यांस सैतानाच्या मायापाशांत टॉलस्टॉय बसवून टाकीत आहेत, असें विधान एका बिशपनें प्रार्थनेसारख्या शुभ प्रसंगीं आपल्या उपासनास्थळावरून केलें होतें.

खेड्यापाड्यांतल्या हलक्या दर्जाच्या धर्मोपाध्यांनीं अशी बडबड सुरू केली, तेव्हां आरंभीं मोठे शेतकरी खरोखरच घाबरून गेले; पण माध्या-न्हाची वेळ असल्या बडबडीवर भागत नसल्यामुळें टॉलस्टॉय यांच्या मदतीचा अव्हेर करण्याचें धैर्यहि त्यांस होईना! पुढें टॉलस्टॉय यांजपाशीं त्यांचा परिचय वाढत चालला तेव्हां त्यांच्या खऱ्या दयाशील व धार्मिक अंतःकरणाची ओळख त्यांस अधिक पटू लागली. जो गृहस्थ आपल्या पदवीकडे न पाहतां व्याधीनें पीडलेल्या गरीब शेतकऱ्यांतहि जातीनिशीं हिंडतो, आणि जो त्यास स्वहस्तें अन्नदान करतो, तो सैतानाचा भक्त कसा म्हणावा, अशीहि शंका त्यांस हळु हळू येऊं लागली आणि अखे-रीस टॉलस्टॉय यांच्या खऱ्या धर्मशीलतेचा पगडा त्यांजवर बसून ते त्यांचे कट्टे भक्त झाले.

या दुष्काळासंबंधीं टॉलस्टॉय यांनीं अनेक लेख लिहिले होते. त्यांपैकीं थोडेसे संक्षिप्त स्वरूपानें खुद्द रशियांत प्रसिद्ध झाले. बरेचसे लेख लंडन येथील डेली टेलिग्राफ पत्रांत छापले गेले, आणि अखेरीस जिनिव्हा येथें, ते सारे जसेच्या तसेच छापले गेले. या लेखमालिकेंत अनेक विषयांचा अंतर्भाव टॉलस्टॉय यांनीं केला आहे. या दुष्काळाचें उग्ररूप आणि त्यामुळें गरीब शेतकरीवर्गाचे झालेले भयंकर हाल याचें हृदयद्रावक वर्णन त्यांनीं केलें आहे. तसेंच सध्यांच्या समाजरचनेंतील व्यंगें पूर्णपणें दाखवून श्रीमंत जमीनदारावर त्यांनीं ताशेरा झाडला आहे. आणि अखेरीस श्रीमंत लोक जे विशिष्ट हक्क आज बळकावून बसले आहेत, त्याचा त्याग त्यांनीं केल्याशिवाय आणि खऱ्या समाजरचनेची उभारणी समतेच्या तत्वावर झाल्याशिवाय सुखाचे दिवस जगाला दिसणार नाहींत, असें आपलें मत नमूद करून या मालेचा उपसंहार त्यांनीं केला आहे.

उपाशीं मरणाऱ्या लोकांस केवळ अन्न दिल्यानेंच टॉलस्टॉय यांचें सारें कार्य संपणारें नव्हतें. कारण नव्या लागवडीचे दिवस येतांच तिची तरतूद करणेंहि त्यांना अवश्य होतें. याकरतां शेतकीचीं औतें, बियाणें व जनावरें यांचाहि पुरवठा करण्याकरतां त्यांनीं उद्योग सुरू केला. क्षुधितांस अन्न पुरविणें हें काम इतकें कठिण नव्हतें; पण त्यांच्या भावी आयुष्यक्रमाची तरतूद लावून त्यांस स्वतःच्या पायांवर उभें करणें, हेंच काम मोठें कठिण होतें. जनावरांशिवाय शेतकी होणें शक्य नव्हतें. आणि सर्वांना पुरतील इतकीं जनावरें मिळविणें टॉलस्टॉय यांस शक्य नव्हतें. यामुळें कांहीं शेतकऱ्यांस तीं मिळालीं व कांहीं जणांस तीं मिळालीं नाहींत. याचा परिणामहि शेतकरी मंडळी परस्परांचा मत्सर करूं लागली, असा झाला. बियाण्याची स्थितीहि अशीच झाली. साऱ्यांना पुरेल, इतकें बियाणें न मिळाल्यामुळें मिळालेल्या बियाण्याची वांटणी कशी करावी, हा मोठा प्रश्न टॉलस्टॉय यांस येऊन पडला. या पुढच्या कार्यासंबंधीं आपल्या एका स्नेह्याजवळ बोलत असतां टॉलस्टॉय म्हणाले, 'आमच्या या उद्योगाचा परिणाम शेतकऱ्यांस उपयुक्त असा मुळींच झाला नाहीं.'

हा उद्योग सुरू असतां टॉलस्टॉय यांजवर जे अनेक हल्ले वर्तमानपत्रांतून होत, त्याजकडे कानाडोळा करावयाचा, असा निश्चय टॉलस्टॉय यांनीं केला होता. त्याचप्रमाणें तेथें काम करण्यास म्हणून आलेल्या सरकारी कामगारांच्या प्रछन्न शत्रुत्वाकडे अथवा उपाध्याय वर्गाच्या उघड शत्रुत्वाकडेहि त्यांनीं केव्हाच लक्ष दिलें नाहीं. परोपकार करण्याकरतां म्हणून जे कांहीं संघ अशा प्रसंगीं निर्माण होत असतात, त्यांच्या कार्याची पद्धत व सरकारी पद्धत याजसंबंधीं पुढीलप्रमाणें त्यांनीं आपलें मत नमूद केलें आहे.

"जिवंत मनुष्यांना खरी मदत करावयाची असेल, तर ती जिवंत मनुष्यांनींच केली पाहिजे. हा प्रकृतीचा कायदाच आहे. आपल्या पदराला यत्किंचितहि खार लागूं न देतां जे लोक नुसत्या बडबडीनें मदत करूं पाहतात, त्यांचा यत्न फुंकरानें डोंगर उडविण्याइतका हास्यास्पद असतो, असें म्हटलें पाहिजे. शेतकऱ्यांस मदत करण्याची सरकारी रीतहि

त्याच कोटींतील आहे, असा अनुभव मला आला. यामुळें अशा कामीं काडीइतकेंहि यश सरकारच्या पदरीं पडलें नाहीं, तर त्यांत नवल काय!"

"त्याचप्रमाणें गरीब शेतकऱ्यांच्या तुसल्या तपशीलवार याद्या तयार करून त्यांस त्यांच्या परिस्थितीप्रमाणें क्रमशः मदत करूं पहाणाऱ्या दीनवत्सल संघांची पद्धतहि निरुपयोगी आहे. दुष्काळाच्या तडाक्यांतून कोणचा शेतकरी जगेल, कोणता शरीरानें सदृढ राहील, कोणत्याच्या कुटुंबांत किती माणसें सुस्थितींत राहतील, कोणाला किती काम मिळ-ण्यासारखें आहे आणि तें मिळाल्यावर तें नीटपणें करणारे शेतकरी कोणते, हें अगाऊ जाणणारा एकादा ज्योतिषी अथवा भविष्यवादी हें काम हातीं घेईल, तर त्याला मात्र हटकून यश येईल. श्रीमंत आणि गरीब यांचे परस्पर संबंध काय आहेत, हें ज्याला समजत नाहीं, त्याला असें वाटतें कीं, अशा अडचणीच्या प्रसंगीं श्रीमंतांनीं काहीं रकम दिली म्हणजे सारा कार्यभाग उरकला. पण ही त्यांची मोठी चूक आहे. आपल्या सध्यांच्या सामाजिक अडचणींची वासलात इतक्या सोप्या रीतीनें लावतां आली असती, तर काय बहार झाली असती! मला स्वतःलाहि हाच भ्रम एक वेळ होता; पण मला प्रत्यक्ष अनुभव आला, तेव्हां या भ्रमाचा पूर्ण निरास झाला."

"सुमारें सात वर्षांपूर्वी मास्को येथील एका व्यापाऱ्यानें सुमारें दहा हजार रुपयांची रकम भिकाऱ्यांस वांटण्याकरतां ठेवली होती. या दातृत्वाचा लाभ घेण्याकरता त्याच्या दाराशीं गर्दी इतकी जमली कीं, त्यांत दोन माणसें चेंगरून मेलीं आणि कित्येक जखमी झालीं. यांतला बहुतेक सारा पैसा धष्टपुष्ट गलेलठ्ठांच्या हातीं लागला आणि म्हातारेकोतारे व दुबळे भिकारी हात हालवीत परत गेले."

"अशाप्रकारच्या मुक्तद्वारीं हा प्रकार नेहमींच घडत असतो. धट्टे-कट्टे आणि चपल पण आळशी भिकारी बहुधा सारी लूट आपल्या खिशांत घालतात आणि खरे गरजू विन्मुख परत जातात. याशिवाय मत्सरादि दुष्ट गुणांस अशा वेळीं मोठा जोर येत असतो, हें वेगळेंच."

"सरकार आणि खाजगी संस्था या बहुतकरून खरे गरजू शोधून काढण्याचा यत्न करतात; पण या कामीं त्यास यश येत नाहीं. फक्त

कांहीं फुकटचें मिळतें आहे, एवढी बातमी कानीं पडतांच भिकाऱ्यांचे थवेच्याथवे तिकडे धांव घेतात. आपण अगदीं अनाथ आहों, असा बाहणा बहुतेक करतात. इतक्या साऱ्यांची खरी स्थिति शोधून काढणें बहुधा अशक्य असल्यामुळें या देणग्यांचा परिणामहि बहुतांशीं विपरीत होतो. कोठें तरी फुकटची मदत आपणास मिळण्यासारखी आहे, हें कळल्याबरोबर आपला कामधंदा सोडून ती मदत मिळविण्याच्या खटपटीस पुष्कळ लोक लागतात. यामुळें परावलंबी बनण्याची चटक त्यांस लागते. त्यांची धमक भ्रष्ट होते. स्वतःच्या उद्योगानें आपली स्थिति सुधारण्याचा यत्न ते करीतनासे होतात. असल्या मदतीच्या कार्यांत जो मोठा दोष आहे, तो हाच !"

या दुष्काळकार्याचा अखेरचा हिशोब टॉलस्टॉय यांनीं प्रसिद्ध केला, त्यांत मोठ्या माणसांकरतां २४६ व मुलांसाठीं १२४ भटारखाने चालू ठेवल्याचें त्यांनीं नमूद केलें होतें. मोठ्या माणसांच्या भटारखान्यांत रोज सरासरीनें बारातेरा हजार बुभुक्षितांस अन्न मिळत असून सुमारें अडीच तीन हजार मुलें पोसलीं जात होतीं, असें त्यांनीं नमूद केलें आहे. याशिवाय कांहीं खेड्यापाड्यांतून टॉलस्टॉय यांच्या मुलांनीं मदत दिली ती वेगळीच.

अन्नदानाच्या या प्रत्यक्ष कार्याशिवाय शेतकीचीं औतें, जनावरें आणि बियाणें या वस्तु पुरविण्यास निराळा खर्च झाला. आजाऱ्यांस औषधें, मृतांची उत्तरक्रिया, कित्येकाची कर्जफेड, नव्या शाळा वगैरे वस्तूंवर आणखीहि हजारों रुपये टॉलस्टॉय यांच्या हातून खर्च झाले. दुष्काळ संपत आला, तेव्हांच्या शेतकऱ्यांच्या स्थितीचें वर्णन टॉलस्टॉय यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.

" दिवस भर थंडीचे आणि कोळशाचा तुटवडा विलक्षण यामुळें शेतकऱ्यांच्या झोपड्यातून विलक्षण गारठा होता. भिंती आणि जमीनी हीं बर्फासारखीं गार लागत. थंडीचें निवारण करण्याकरता कित्येक शेतकऱ्यांनीं आपले गोठे आणि किरकोळ सामान ठेवण्याची झोंपडी सुद्धा जाळून टाकली. निःसत्व धान्याचे पीक अर्धे आणि कोंडा अर्धा अशाप्रकारच्या भाकरीवर पुष्कळ शेतकरी स्वतःस जगवीत होते. पोटाची खळी भरण्या-

करतां कित्येकांस आपल्या अंगावरचे कपडे सुद्धां विकावे लागले. एकाद्या नवख्या मनुष्यानें हा सारा प्रकार पाहिला असता, तर त्याच्या पोटांत खास भडभडून आलें असतें; पण या गोष्टी आम्हाला नित्याच्या होऊन असल्यामुळें आमच्या डोळ्यांस त्या दिसेनाशा झाल्या."

या दुष्काळासंबंधीं एकंदर जनतेनें जी उपेक्षाबुद्धि दाखविली होती, तिजबद्दल टॉलस्टॉय यांनीं एक कडक लेख लिहिला होता; पण तो प्रसिद्ध झाला नाहीं. सरकारी कामगार आणि धर्माधिकारी ही मंडळी तर बोलूनचालून त्यांस पाण्यांत पाहणारी होती. याच सुमारास लंडनच्या डेली टेलिग्राफ पत्राचा बातमीदार डॉ. डिलन हा टॉलस्टॉय यांस भेटावयास आला होता. या दुष्काळासंबंधीं एकंदर हकीकतीचा एकादा लेख लिहून देण्याबद्दल त्यानें विनंति केल्यावरून रशियनपत्राकडे पाठविलेल्या एका लेखाची नकल टॉलस्टॉय यांनीं त्याला दिली. हा मजकूर रशियन पत्रांत प्रसिद्ध झाला, तेव्हां त्यांतला बहुतेक सारा कडकपणा सरकारी परीक्षकानें नाहींसा करून टाकला होता; पण त्याचें शब्दशः भाषांतर डेली टेलिग्राफ पत्रांत प्रसिद्ध होऊन त्याचे उतारे इंग्लंडांतील दुसऱ्याहि पुष्कळ पत्रांतून प्रसिद्ध झाले. हें सारें वर्तमान रशियांत कळलें तेव्हां तेथें मोठी खळबळ उडाली. टॉलस्टॉय यांच्या शत्रूंस त्यांजवर सूड उगविण्यास ही ऐतीच संधि सांपडली. त्यांनीं इंग्लंडांतील पत्रांत प्रसिद्ध झालेल्या लेखांचें भाषांतर तिखटमीठ लावून प्रसिद्ध केलें. मास्को गॅझेट पत्रानें एक विलक्षण कडक अग्रलेख लिहून अशा देशद्रोह्याची उचलबांगडी केलीच पाहिजे, अशी सूचना सरकारास केली. टॉलस्टॉय यांजविरुद्ध उठलेल्या या वावटळींत भर टाकण्यास कांहीं दरबारी मंडळीहि पुढें सरसावली होती. टॉलस्टॉय यांस पकडलें, अशा बातम्याहि जिकडे तिकडे पसरूं लागल्या.

या वेळीं रशियाची राजकीय परिस्थिति कशी होती याची थोडीशी माहिती देणें इष्ट आहे. टॉलस्टॉय यांचें स्वतःचें लक्ष राजकीय बाबींकडे फारसें नसे. त्याचा आयुष्यक्रम जवळ जवळ जंगलांतील एकाद्या योग्यासारखा बनला होता; तथापि अशा स्थितींतहि या लोककल्याणकारी सत्पुरुषावर मोठा वज्राघात होऊं पहात होता.

मास्कोपासून शंभर मैलांवर सूझडाल या नांवाचें एक गांव आहे. या गांवीं प्राचीन काळचा एक मोठा किल्ला अद्यापिहि अस्तित्वांत आहे. फ्रान्समध्यें बॅस्टिल किल्ल्याची ज्या अर्थानें प्रसिद्धी होती, त्याच अर्थानें या किल्ल्याची रशियांत प्रसिद्धी होती. सरकारी अधिकाऱ्यांस अथवा जुन्या पंथाच्या धर्माध्यक्षांस अप्रिय झालेल्या माणसांची रवानगी या जागीं होत असे. या जागीं येणारीं माणसें, सर्वच अपराधी असत असेंहि नाहीं. पुष्कळ वेळां यांतील कित्येकांची रीतसर चौकशी देखील झालेली नसे. इतकेंच नव्हे तर न्यायमंदिरांत निरपराधी ठरलेलीं माणसेंहि केवळ सरकारी हुकुमावरून या किल्ल्याच्या तळघरांत कोंडलीं जात आणि यांतील कित्येक पुढें केवळ प्रेतांच्या रूपानें बाहेर पडत. अशाच प्रकारचे दोन निरपराधी प्राणी या किल्ल्यांत तेवीस वर्षें खिचपत पडले होते. ही बातमी टॉलस्टॉय यांस समजल्यानंतर राजदरबारापर्यंत वशिले बांधून त्यांची मुक्तता त्यांनीं केली.

रशियांतील धर्माध्यक्ष सरकारी अधिकाऱ्यांचे बंदे गुलाम बनलेले होते. लोकांवर कसलाहि जुलूम सरकारानें केला, तरी सरकार करील तें चांगलें, असा उपदेश व्यासपीठावरून त्यांनीं नित्य करावा. अशा प्रकारच्या आपल्या बगलबच्चयांचा पाठीराखेपणा करणें आपलें कर्तव्य आहे, असें सरकारी अधिकाऱ्यांसहि वाटे. धर्माध्यक्षाची करडी नजर ज्यावर फिरेल त्याची रवानगी अंधारकोठडींत होण्यास उशीर लागत नसे अशा रीतीनें लोकांवर जुलूम करण्यांत राजाचा न्यायदंड आणि धर्मदंड यांचें पूर्ण संगनमत होतें.

सरकारच्या अशा प्रकारच्या जुलमी कृत्यांस आळा घालणें आपलें कर्तव्य आहे, असा समज इतर देशांतील पत्रकाराचा आहे; पण रशियांतील पत्रें याला अपवाद आहेत! असें करण्यांत आपल्या स्वतःच्याच अस्तित्वावर गदा येईल अशी भीति त्यांस असल्यामुळें सरकारच्या अमंगळ कृत्यांवर पांघरूण घालण्यास तीं नेहमींच तयार असत; यामुळें इतर देशांत होणारें लोकरक्षणाचें कार्य त्यांच्या हातून कधींच झालें नाहीं. भाषणबंदीचा कायदा आपलें काम बजावण्यास जय्यत उभा होताच. विद्यार्थीवर्गावर तर सरकारचा विशेषच डोळा होता. एकाद्या निरुपद्रवी

सभेला हजर राहिल्याबद्दलसुद्धां शेंकडों विद्यार्थ्यांची शाळांतून हकालपट्टी होत असे. आणि प्रसंगीं शेंकडों जणांची रवानगी सैबेरियासारख्या ठिकाणींहि होत असे. एकादा शिक्षक विशेष हुषार दिसला, आणि मुलांस तो फाजील आवडता झाला, कीं त्याच्या पोटावर पाय आलाच. विश्वविद्यालयांतील पुष्कळ विद्वान् मंडळीं बडतर्फ करण्याचें धैर्य सरकारी कामगारास नसे, तत्रापि त्यांस इतका त्रास देण्यांत येत असे कीं, ते बिचारे आपण होऊनच घरीं बसत. यांपैकीं कांहीं मंडळी इंग्लंडमध्यें आली होती व आक्सफर्डसारख्या सुप्रसिद्ध विश्वविद्यालयांत नेमणुका मिळवून ती चांगल्या नांवारूपासहि आली.

मुनिसिपालिट्या, लोकलबोर्डें, यांसारख्या संस्थाच काय; पण न्याय-मंदिरेंसुद्धां संशयित वस्तु या सदराखालीं येत. एकाद्या न्यायाधिशाच्या हातांत कांहीं अधिक सत्ता जाते, असा संशय सरकाराला आला कीं, नवे कायदे निर्माण करून हे हक्क संपुष्टांत आणले जात असत. नवा कायदा घडविण्यास कांहीं अडचण दिसली, तर हेंच कार्य नुसत्या सर-कारी हुकुमानेंहि होत असे. सुशिक्षित तरुणास कोणतेंहि स्वतंत्र कार्य हातीं घेऊं दिलें जात नसे. अशा स्थितींतहि टॉलस्टॉय मोकळे राहिले, हें खरोखर मोठें नवल समजलें पाहिजे.

सरकारच्या मुसकटदाबीमुळें स्मशानशांतता सर्वत्र पसरली होती. ही शांतता इतकी भयंकर होती कीं, जिवंत मनाचा मनुष्य रशियात एकहि उरला नसेल असा कोणाचाहि समज झाला असता. अशा सामसुमीच्या स्थितींत एकच आवाज प्रचंड घंटानादाप्रमाणें घुमून मधून निघे. हा घंटानाद टॉलस्टॉय यांच्या मुखातून निघत होता. गोष्टीच्या अथवा कादं-बऱ्याच्या द्वारें अथवा वर्तमानपत्रातील निबंधाच्या द्वारें गरिबावर जुलूम करू नका असा टॉलस्टॉय उपदेश करीत होते. श्रीमंत, व्यापारी, जमीनदार-वर्ग व सरकार यांच्या डोळयांत चरचरीत अंजन घालण्यास पुढें सरसावणारा असा हा एकच हात उभ्या रशियांत होता.

टॉलस्टॉय यांचा लेख इंग्लंडांत प्रसिद्ध झाल्याबरोबर अंतर्गत कारभार पाहणाऱ्या विभागाचीहि धडपड सुरू झाली सूझडाल येथील किल्ल्यांत टॉलस्टॉय यांची रवानगी कोणत्या निमित्तानें करतां येईल हें पाहण्यास

कायदे आणि सरकारी हुकुमांची चोपडीं यांची उलथापालथ तो करूं लागला. त्याजकडे टॉलस्टॉय यांजविरुद्ध लिहिलेल्या लेखांचे भारेच्याभारे येऊन पडले होते. इतकी गडबड उडाल्यानंतर त्या दिवाणाच्या मनांत असतें तरी सुद्धां ही सारी हकीकत बादशहापासून त्यांस चोरून ठेवतां आली नसती. या वेळीं राणीवशांत टॉलस्टॉय यांच्या कुटुंबांतील एक स्त्री राणीच्या खाजगी तैनातींत होती. टॉलस्टॉय यांजबद्दल तिच्या ठिकाणीं अतिशय पूज्यभाव वसत होता. तेव्हां या बाबतींत आपल्या हातून होईल ती खटपट करावी, असे मनांत आणून खुद्द बादशहांची भेट तिनें घेतली. या प्रसंगाची हकीकत तिनें स्वतःच पुढील प्रमाणें सांगितली आहे.

" लियो निकोलिव्हिच याजवर होऊं पाहणारा हा वज्रघात चुकविण्यासाठीं शक्य ती खटपट करावी, असा निश्चय करून भेट देण्याविषयीं बादशहांस मीं विनंति केली. माझ्या विनंतीस मान देऊन तो दिवस त्यांनीं मुकरर केला, तेव्हां मला विलक्षण आनंद झाला. दिवाणखान्यांत बादशहांची स्वारी आली. कांहीं तरी त्रासदायक प्रकार नुकताच घडला असावा, असें त्यांच्या मुद्रेवरून मला दिसलें. अनन्यभावें परमेश्वराची प्रार्थना मी करूं लागलें. 'काय काम आहे?' असा प्रश्न त्यांनीं करताच मी उत्तर दिलें, 'रशियांतील एका मोठ्या सत्पुरुषाची रवानगी एखाद्या किल्ल्यांत करावी अशा शिफारशीचा रिपोर्ट हुजूरस्वारीकडे एकदोन दिवसांत येणार आहे.' बादशहांची मुद्रा एकदम पालटली. उग्रपणा मला तिजवर दिसूं लागला. तथापि दुःखाचीहि छटा त्यांत मिसळली होती."

" बादशहांनीं विचारलें, ' कोण, टॉलस्टॉय ? "

" होय हुजूर, आपण बरोबर ताडलें. "

" तर मग माझा खून करण्याच्या एखाद्या बेतांत तो सामील होता काय ? "

" याजवर मला कळली होती ती सारी हकीकत सरकारच्या कानीं मीं निवेदन केली. हळू हळू बादशहांच्या चेहऱ्यावरील उग्रपणा नाहींसा होऊन नेहमींची शांति तेथें दिसूं लागली; तेव्हां मलाहि थोडेंसें बरें वाटलें. बादशहांची स्वारी जाण्यासाठीं उठली, तेव्हां 'अशी गाष्ट घडल्यास

केवळ रशियांतच नव्हे, तर साऱ्या जगभर मोठी गडबड उडेल' अशी आशेची विनंति मी केली."

" पुढें दोन दिवसांनीं माझ्या अज्ञापत्राप्रमाणें प्रधानाकडून रिपोर्ट आला. त्याची सर्व हकीकत ऐकून घेतल्यानंतर बादशहांनीं पुढील हुकूम काढला."

" टॉलस्टॉय यांस स्पर्शहि करूं नये, अशी माझी इच्छा आहे. त्यांना तुरुंगांत टाकून फुकटचा मोठेपणा देण्याची माझी इच्छा नाहीं. याशिवाय तसें करण्यानें साऱ्या जगभर माझ्या नांवाचा बभ्रा होईल आणि असें होणेंहि इष्ट नाहीं. टॉलस्टॉय खरोखरच दोषी असतील, तर आपल्याच मरण्यानें ते मरतील."

टॉलस्टॉय यांचा जन्म जुन्या रशियन धर्मपंथांत झाला होता, असें असतांहि उघडपणें त्या पंथाचा त्याग करून इतरांसहि त्यांतून परावृत्त करण्याचें कार्य ते करीत होते. रशियांतील धर्माच्या कायद्याच्या दृष्टीनें कोणत्याहि न्यायमंदिरांत ते दोषी ठरले असते. याशिवाय मास्कोच्या शहरनगराच कायद्यानें इतकी मोठी सत्ता दिली होती कीं, उघड चवकशीचा फार्स न करतांहि टॉलस्टॉय यांची वाट त्यांस लावतां आली असती. पण असा कांहीं प्रकार न घडतां टॉलस्टॉय हे लोककल्याणकारी कार्य करण्यास मोकळे राहिले, याचें सर्व श्रेय त्यांच्या त्या आसक्तीस देणें अवश्य आहे. रशियांतील राज्यव्यवस्था कशाप्रकारें चालत होती, याचीहि उत्तम कल्पना या हकीकतीवरून येण्यासारखी आहे. ठराविक कायदे कसेहि असले, तरी ते बादशहांच्या एका मुठींत सामावत होते. अपराध्याची मुक्तता अथवा निरपराध्यास दंड या दोन्ही गोष्टी केवळ बादशहांच्या मर्जीनुरूप घडत होत्या.

इकडे हा प्रकार घडला तेव्हां टॉलस्टॉय यांची पत्नी मास्को येथें होती. वर्तमानपत्रांना लेख लिहून दुष्काळासंबंधीं बरीच माहिती तिनें दिली असल्यामुळें तिजकडे अद्यापीहि वर्गण्या जमा होत होत्या; पण टॉलस्टॉय याजकडून कांहीं आगळीक घडली असून त्याजबद्दल सरकारांत विचार चालू आहे, अशी बातमी पसरतांच पुष्कळ श्रीमंतांनीं व जमीनदारांनीं या मदतींतून आपलें अंग काढून घेतलें. टॉलस्टॉय

यांजवर सरकारची करडी नजर खरोखरच फिरली आहे कीं काय, याची माहिती मिळविण्याकरतां, कौंटेस बाईनीं मास्कोच्या गव्हरनरची भेट घेतली. कोणत्याहिप्रकारच्या अराजक चळवळींत टॉलस्टॉय यांचें आंग कधींच नव्हतें. एवढेंच नव्हे तर राजकीय बाबींचा फारसा विचारसुद्धां ते करीत नाहींत, असें त्यांनीं गव्हरनरास सांगितलें. यावर गव्हरनरानें म्हटलें, "तसें असेल, तर एकाद्या चांगल्या वर्तमानपत्रांत तशा हकीकतीचा लेख लिहून टॉलस्टॉय यांनीं आपल्या सहीनिशीं तो प्रसिद्ध करावा."

या सूचनेप्रमाणें तशा अर्थाचें पत्र लिहून कौंटेस बाईनीं तें टॉलस्टॉयकडे रवाना केलें. त्याजवर त्यांजकडून पुढील उत्तर आलें.

"मी कांहीं मोठा अपराध केला असून याजबद्दल कोणाची तरी माफी मीं मागितली पाहिजे, असें तुमच्या पत्राच्या भाषेवरून दिसतें. अशा प्रकारची भाषा मला कधींच पसंत पडावयाची नाहीं."

"गेलीं बारा वर्षें माझ्या समजाला अनुसरून मी अनेक लेख लिहिले आहेत आणि सरकारला अथवा त्यांच्या बगलबच्यांना ते पसंत पडण्यासारखे नव्हते, हेंहि मला ठाऊक आहे. असा लेख मी एक अर्धा लिहिला आहे, असें नव्हे अथवा विचार न करतां मी कांहीं तरी खरडलें असेंहि कधीं झालें नाहीं. असे लेख मी अनेक लिहिले असून ते सारे पूर्ण विचारांतींच लिहिले आहेत. या लेखांबद्दल क्षमा मागण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. त्यांत ज्या वर्गाबद्दल मी लिहिलें आहे, त्या वर्गानें मला माफी मागण्यास न सांगतां त्या लेखांत दाखविलेले स्वतःचे दोष नाहींसे करण्याचा यत्न केला तर अधिक बरें होईल."

"कोणाचाहि लेख प्रसिद्ध होण्यापूर्वीं सरकारी परीक्षकाच्या पसंतीस तो पडला पाहिजे, हा सरकारचा कायदा मूर्खपणाचा आणि बेकायदेशीर आहे. कोणाचेहि विचार जसेच्या तसेच येथें प्रसिद्ध होऊं न दिले, तर अधिक विकृतरूपानें इतर ठिकाणीं ते प्रसिद्धीस येतात, ही गोष्ट सरकारच्या ध्यानीं येत नाहीं. ते लेख अशा रीतीनें प्रसिद्धीस आले म्हणजे आमच्या सरकारचें माथें भडकतें आणि या परिस्थितीच्या मुळाशीं काय आहे, याचा थाग लावण्याचा यत्न न करतां आपल्या परीक्षकामागें तें तोंड लपवून बसतें. वास्तविक हा सारा दोष सरकारचा असतां प्रांजल-

पणें तो कबूल न करतां त्याचें खापर लेखकाच्या माथीं फोडण्याचें अधिक पाप तें करूं लागतें."

" प्रस्तुतच्या दुष्काळावरच्या लेखांत ज्या मुद्यांचें विवेचन मीं केलें आहे, तेच मुद्दे गेलीं बारा वर्षें अनेक प्रकारच्या रूपांनीं मी लोकांपुढें मांडीत आलों आहें. आणि या हातांत जीव असेल, तोंपर्यंत हेंच कार्य तो करीत राहील. मीं जें कांहीं लिहिलें आहे, त्याला जगांतील साऱ्या सुबुद्ध आणि प्रामाणिक मनुष्यांचें पाठबळ आहे, अशी माझी खात्री आहे. स्वार्थानें ज्याचें अंतःकरण उफराटें झालें नसेल त्याला हे मुद्दे खाचित पटतील. स्वतःस ख्रिस्तानुयायी म्हणवीत असतां जे लोक या लेखांविरुद्ध काहूर उठवितात ते ख्रिस्ताचा मोठा अपराध करतात. कारण हे सारे लेख ख्रिस्ताच्या मताला अनुसरूनच मीं लिहिले आहेत."

" माझ्या लेखांच्या हजारों प्रती शेंकडों भाषांतून प्रसिद्ध झाल्या आहेत आणि त्यांत माझीं मतें अगदीं उघडपणें प्रकाशित झालीं आहेत. अशा स्थितींत त्याच मतांचा एकादा लेख एकाद्या इंग्लिश पत्रांत प्रसिद्ध झाल्याबरोबर आमच्या सरकारानें आणि त्याच्या बगलबच्यांनीं घाबरून गेल्याचें सोंग आणावें हा प्रकार हास्यास्पद नव्हे काय ?"

" मूर्खांतले मूर्ख जर कोणी असले, तर ते दरबारी लोक होत. अशांना हीं माझीं मतें अगदीं विचित्र आणि नवीं वाटावीत यांत नवल नाहीं. माझ्या या मतांमुळें एका रात्रींत सारें जग पालटून जाऊन प्रचंड क्रांति होईल, असली कल्पना या मूर्खांच्याच डोक्यांत यावयाची. हा साराच प्रकार इतका हास्यास्पद आणि उपेक्षणीय आहे कीं, असल्या लोकांशीं वाद करूं जाणें म्हणजे स्वताला कमीपणा आणणें होय."

" याला आपल्या बुद्धीचा गर्व झाला आहे, असा आरोप मजवर कोणी करील; पण हा आरोप अनाठाई आहे, असें मी निश्चयानें सांगतों. असल्या प्रकारच्या ख्रिस्तद्वेषी लोकांपुढें मी मान वांकवूं इच्छित नाहीं, याचें कारण माझा गर्व हें नव्हे तर ज्या तत्त्वांसाठीं मी जगलों आहें, तीं तत्त्वेंच मला तसें करूं देत नाहींत. स्वतःच्या रक्षणासाठीं मी कसलीच धडपड करीत नाहीं अथवा मला स्वतःला चार शिव्या कोणी दिल्या, तरी त्याचाहि खेद मला होत नाहीं; पण ज्या तत्त्वांसाठीं हा देह जगला

आहे, त्यांची आगळीक कोणी केली, की माझें पित्त खवळतें आणि अशा लोकांवर तीव्र शस्त्रप्रहार करण्यास मी मागें घेणार नाहीं."

"जाणून बुजून आणि राजीखुषीनें हा लेख मी लिहित असून त्यावर आपली सही मी स्वहस्तानें करीत आहें. जरूर पडेल त्या वेळीं सत्य असेल तें बोलण्यास मी मागेंपुढें पाहणार नाहीं, असें या लेखाच्या द्वारें मी पुन्हां एकवार जाहीर करतों. माझीं चित्रें कांहीं लोकांनीं फाडून टाकलीं असें मी ऐकतों. वास्तविक अशा लोकांजवळ तीं असणें हेंच अयोग्य होतें."

मास्को गॅझेटांतील लेख प्रसिद्ध झाल्याबरोबर टॉलस्टॉय यांजवर सरकारी रोष होणार अशी पुष्कळांची खात्री झाली होती. राजकीय अपराधी या दृष्टीनें सरकार त्यांजकडे पहात आहे, असें दिसून येतांच अशा मनुष्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं, हें दाखविण्याकरतां आपणाजवळील तसबीरा पुष्कळांनीं फाडून टाकल्या, अशी बातमी कौंटेसबाईनीं टॉलस्टॉय यांस कळविली होती. याच बातमीला अनुलक्षून वरील पत्रांतलि शेवटचें वाक्य टॉलस्टॉय यांनीं लिहिलें होतें.

टॉलस्टॉय यांचें हें पत्र कौंटेसबाईनीं गव्हरमेंट मेसेंजर या पत्राकडे प्रसिद्धीकरतां पाठविलें; पण संपादकानें तें प्रसिद्ध करण्याचें नाकारलें. तेव्हां त्याच्या तीस नकला करून वेगवेगळ्या पत्रांकडे त्यांनीं त्या रवाना केल्या. आणि त्यांतील कांहींनीं तें पत्र प्रसिद्ध करण्याची छाती केली.

या सर्व वादळाची निरवानिरव झाल्यानंतर ता. १८ जून १८९२ रोजीं गे यास टॉलस्टॉय यांनी एक पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात,

"सध्यां लेखनाच्या कामांत मी पूर्ण गढून गेलों आहें. 'परमेश्वराचें राज्य तुझ्या हृदयांतच आहे' या पुस्तकाचें आठवें प्रकरण मी लिहित आहें. हा ग्रंथ लिहितांना कित्येक वेळां पांच पांच तासपर्यंत मी आपली लेखणी थांबवीत नाहीं. याशिवाय संसारिक मनुष्याचे कामधंदे इतरांप्रमाणें माझ्याहि मागें आहेत. हा ग्रंथ शक्य तितक्या दृष्टीनें परिपूर्ण असावा यासाठीं मी धडपड करीत आहें. सामान्य वाचकाला एकादि गोष्ट विशेष महत्त्वाची न वाटली तरी ग्रंथकाराची दृष्टि वेगळी असावी लागते. आपला लेख एकाद्या व्यक्तिसाठीं नसून वेगवेगळ्या मनःस्थितीं-

तील लक्षावधि लोकांवर त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे, हें त्यानें लक्षांत ठेवलें पाहिजे. इतक्या अट्टाहासानें काम करूनहि माझें पाऊल पडावें तितकें पुढें पडत नाहीं. सप्टेंबरपर्यंत हा ग्रंथ संपेल अशी मला आशा आहे. आपला लेख शक्य तितका स्पष्ट, मुद्देसूद आणि सरळ असावा यासाठींच ही सारी खटपट मला करावी लागते."

**चतुर्थ खंड समाप्त.**

रशियांतले सुप्रसिद्ध साधुश्रेष्ठ

# कौंट टॉलस्टॉय.

## ( पूर्वार्ध ).

सध्यां आम्ही हिंदुस्थानवासी ज्या परिस्थितींत सांपडून आपत्ति भोगीत आहों तिची कार्यकारणपरंपरा शोधून काढून ही आपत्ति समूळ टाळण्यास या चरित्रग्रंथाची अत्यंत अवश्यकता असल्यामुळें हा संपूर्ण चरित्रग्रंथ फार परिश्रमानें आम्ही भागशः प्रसिद्ध करीत आहों. या साधुश्रेष्ठाचें चरित्र अत्यंत सदुपदेशक असून हल्लींच्या वेळीं तें अत्यंत उपकारकहि आहे. "जे कां रंजलें गांजलें, त्यसी म्हणें जो आपुलें ॥ तोचि साधु ओळखावा, देव तेथेंचि जाणावा ॥" या काव्य वचनाचे टॉलस्टॉय हे मूर्तरूप होत. रशियांतले ते एक मोठे श्रीमान जहागीरदार होते; परंतु जुलूम आणि दारिद्र्य यांनीं गांजलेल्या आपल्या रशियन बांधवांसाठीं व अखिल मानवजातीच्या फायद्यासाठीं त्यांनीं अनेक आपत्ति भोगल्या, अनेक कष्ट सोसले, आणि स्वानुभवानें देशाच्या दारिद्र्याचें व आपत्तीचें मूळ शोधून काढून सर्व मानवजातीच्या कल्याणाचा उपाय जगापुढें त्यांनीं स्पष्टपणें ठेवला. वावदूकाप्रमाणें रंगभूमीवरील नटाप्रमाणें स्वदेशहितचिंतक म्हणून ज्यांना दंभ पसरावयाचा नसेल, अशा प्रत्येक महाराष्ट्रीयानें या चरित्रग्रंथाचें मनन व अभ्यास करावा, असें आम्ही आग्रहानें म्हणतों. असहकारिता, अप्रतिकार, श्रीमंत आणि गरीब यांत झालेली संपत्तीची विषम वांटणी, सुधारणेच्या टेंभ्याखालीं मजूर म्हणून सशास्त्र पद्धतीनें तयार होणारे गुलाम, यांत्रिक जीवनानें पैशाकडे जाणारा पैसा आणि मनुष्यजातीचा होणार संहार, वगैरे अनेक प्रश्नांविषयीं टॉलस्टॉय यांनीं केलेलें सोपपत्तिक विवेचन या त्यांच्या चरित्रग्रंथांत आलें असल्यामुळें हल्लींच्या परिस्थितींत ज्याला म्हणून आपल्या देशाचें व देशबांधवांचें

कल्याण व्हावें, असें वाटत असेल, त्याला हा चरित्रग्रंथ अत्यंत उपयोगी पडेल यांत शंका नाहीं. सुमारें दोनशें सव्वा दोनशें पानांचा एक याप्रमाणें सहा खंडांत हा चरित्रग्रंथ पूर्ण व्हावयाचा असून पहिल्या सहाशें पृष्ठांच्या तीन खंडांचा पूर्वार्ध छापून तयार असून उत्तरार्ध छापत आहे. पूर्वार्धांत टॉलस्टॉय यांचे सहा फोटो दिले असून बांधणी जाडपुठ्याची मजबूत अशी केली आहे कोणासहि चरित्र घेण्यास जड पडूं नये म्हणून हल्लींच्या कागदाच्या महागाईच्या दिवसांतहि किंमत अवघी तीन रुपये ठेवली आहे.

व्यवस्थापक—भारत गौरव—ग्रंथमाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय गिरगांव—मुंबई.
दा. क्र. १०१८
REFBK-0001917

टॉलस्टॉय यांचें मन निवृत्तिमार्गाकडे वळूं लागलें, तेव्हांपासून नीति दृष्टया स्त्रियांचा दर्जा पुरुषांपेक्षां पुष्कळ कमी आहे, ही गोष्ट स्पष्ट बोलण्यास त्यांनीं सुरुवात केली. निवृत्तीकडे वळण्यापूर्वींहि त्यांचें मत हेंच होतें; पण तें त्यांनीं तितक्या स्पष्टपणें बोलून दाखविलें नव्हतें. कोठेंहि एकादें पापकर्म घडलें, तरी त्याच्या मुळाशीं बीजरूपानें तरी स्त्रीच असावयाची, असें ते स्पष्ट बोलून दाखवीत. स्त्रियांच्या अंगांतील स्वाभाविक दोषामुळेंच पुरुषांचें पतन होतें, हें टॉलस्टॉय यांचें मत हिंदूंच्या प्राचीन शास्त्रास नवीन वाटण्यासारखें नाहीं.

टॉलस्टॉय यांचें हें मत सर्वच स्त्रियांच्या बाबतींत सारखें लागू पडेल असें नाहीं आणि कित्येकांना तर तें कुचकामाचेंहि वाटेल; पण तेवढ्यामुळें त्यांच्या नाटकाला केवळ कला या दृष्टीनें कोणताहि उणेपणा राहिलेला नाहीं, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. रंगभूमीवर उत्तम उठावदार होण्याला नाटकाला जीं जीं प्रमुख अंगें असावीं लागतात, तीं सारीं या नाटकांत आहेत.

इ. स. १८८७ च्या जानेवारी महिन्यांत हें नाटक छापखान्यावरील परीक्षकांच्या पसंतीसाठीं पाठविण्यांत आलें. तेथें पसंतीचा शिक्का त्याला लवकरच मिळाला. रंगभूमीच्या परीक्षकानें त्याचा खेळ करण्यास परवानगी दिली नाहीं. यानंतर तिसरा आलेक्झांडर बादशहा मृत्यु पावून दुसरा निकोलस इ. स १८९५ सालीं गादीवर येईपर्यंत या नाटकाच्या प्रयोगास रशियांत परवानगी मिळाली नाहीं. याचा प्रयोग होण्यास काय अडचणी परीक्षकास दिसल्या हें कोणाच्याहि लक्षांत येईना राजकीय विषयाचा गंधहि त्यांत नव्हता. उच्चप्रतीचा नीतीचा आदर्श प्रेक्षकांपुढें मांडावा, इतकाच टॉलस्टॉय यांचा हेतु होता; मग अशा स्थितींत परीक्षकाच्या दृष्टीनें आक्षेपार्ह भाग कोणता हें सांगणें कठिण आहे. टॉलस्टॉय यांचा लेख म्हटला कीं, त्यांत कोठें तरी आक्षेप घेण्यासारखा भाग असावयाचाच, असें मानण्याची संवयच या परीक्षकांस पडून गेली होती. लोकरक्षणापेक्षां आत्मरक्षणाचीच काळजी हे परीक्षक सामान्यतः अधिक बाळगीत असतात. तेव्हां जो मनुष्य सरकारला सामान्यतः अप्रिय, त्याचा कसलाहि लेख लोकांसमोर येऊं न देणें हेंच त्यांना इष्ट वाटतें. केवळ

यांच्या स्वार्थलोलुपतेमुळेंच कित्येक अत्युत्कृष्ट ग्रंथ गर्भावस्थेंतच मरण पावतात. कसलेंहि हलकट साहित्य त्यांच्या दृष्टीनें दोषार्ह दिसत नाहीं; पण केवळ अप्रिय मनुष्यानें लिहिलेलें एवढ्यावरूनच एकादें चांगलें पुस्तकहि त्याला त्याज्य वाटतें.

सरकारी परवानगी न मिळाल्यामुळें या नाटकाचे सार्वजनिक प्रयोग झाले नाहींत तरी, त्याचे खाजगी प्रयोग पुष्कळ झाले व असाच एक प्रयोग पिटर्सबर्ग येथील एका सरदारघराण्यांत झाला असतां त्या वेळीं पुष्कळ जहागिरदार आणि जमीनदार मंडळी तेथें हजर राहिली होती.

इ. स. १८८८ च्या फेब्रुवारी महिन्यांत याचा प्रयोग प्रथम पारीस येथें झाला. सुप्रसिद्ध फ्रेंच कादंबरीकार झोला यानें या कामांत कसून मेहनत घेतली होती. जणूं काय स्वतःच्याच नाटकाचा हा प्रयोग आहे, असें समजून तो उत्तम वठविण्याची खटपट तो करीत होता. एका तालमीच्या वेळीं नटांना उद्देशून तो म्हणाला, " यांतील एक वाक्य अथवा एक शब्दहि इकडचा तिकडे होऊं न देण्याविषयीं तुम्ही खबरदारी घेतली म्हणजे प्रयोग बहारीचा वठेल, यांत तिळमात्र शंका नको."

हा खेळ अगदीं खाजगी स्वरूपाचा होता आणि यांतील कोणतींहि पात्रें धंदेवाईक नव्हतीं; तरी हा प्रयोग इतका उत्तम वठला कीं, लवकरच पारीस येथील तीन नाटक मंडळींनीं त्याचे प्रयोग सुरू केले. पुढें याचे बरेच प्रयोग युरोपांतील साऱ्या देशांत बहुतेक शहरांत झाले. इ. स. १८९० सालीं याचे प्रयोग बर्लिनमध्यें झाले व याच धर्तीवर दुसरींहि नाटकें तेथें जन्मास आलीं. इ. स. १८९५ सालीं पिटर्सबर्ग येथें त्याचा पहिला सार्वजनिक प्रयोग झाला व तेथेंहि तो उत्कृष्ट वठला.

या काळाच्या सुमारास टॉलस्टॉय यांची मनःस्थिति कशाप्रकारची होती, हें त्यांच्या खालील उताऱ्यावरून दिसून येतें. इ. स. १८८६ च्या आक्टोबर महिन्यांत गे याला लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात,

" तुमची प्रकृति चांगलीशी नसल्यामुळें तुमच्या हातून महत्त्वाचें काम फारसें होत नाहीं, याचें मला वाईट वाटतें. तथापि आपल्या या वयांत आतां कांहीं नवीन उद्योग केलाच पाहिजे, असें मानण्याचें कारण नाहीं. जे वृक्ष आपण पूर्वींच लावून ठेवले आहेत, त्यांचीं फळें